
महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे
(इ.स.१८१८ ते १८८४)
लेखक :
डॉ. वि. गो. खोबरेकर
साहित्य आणि संस्कृती मंडळ
महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## अनुक्रमणिका

# महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे

(इ.स.१८१८ ते १८८४)

अनुक्रमणिका

# महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे

(इ.स.१८१८ ते १८८४)

लेखक
**डॉ. वि. गो.खोबरेकर**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

प्रथम आवृत्ती :
१९९४

मुद्रक:
व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय,
वाई

मुखपृष्ठ:

प्रकाशक:
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
संस्कृती मंडळ, मुंबई

किंमत:
रुपये २०६/-

# अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

प्रस्तावना ........ ७
निवेदन ........ १५
प्रकरण पहिले ........ १७
महाराष्ट्रावर इंग्रजी सत्ता ........ १७
प्रकरण दुसरे ........ २४
महाराष्ट्राचा आर्थिक व सामाजिक अपकर्ष ........ २४
प्रकरण तिसरे ........ २९
सशास्त्र उठाव ........ २९
धारचा उठाव ........ ३३
एकतीस ........ ३४
बीडचा धर्माजी प्रतापराव : १८१८ ........ ३४
तेहतीस ........ ३५
नांदेड जिल्ह्यातील हटकरांचा उठाव : १८१९ - २० ........ ३५
पस्तीस ........ ३६
कित्तूरचे बंड : १८२४ व १८२९ ........ ३६
विजापूरचे उठाव : १८२४ -४० ........ ३८
रामोशांचा उठाव : १८२६ — २९ — ३० — ३१ ........ ३९
सावंतवाडी : १८२८ — ३८, १८४४ — ४५ ........ ४४
कोल्हापूर गडकऱ्यांचा उठाव (१८४४) ........ ४७
प्रकरण चौथे ........ ५०
स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्र ........ ५०
कोल्हापूरची दुसरी सलामी ........ ५६
सातारा ........ ६०
१८५७ चे मुंबईतील पडसाद ........ ६५
खानदेश ........ ६९

नाशिक: १८५७ ............ ७२
नागपूरचा उठाव: १८५७ ............ ७४
औरंगाबादचा उठाव: १८५७ ............ ७६
नरगुंदचे भावे ............ ७९
जमखिंडी ............ ८१
दक्षिण महाराष्ट्रातील उठाव ............ ८२
मुधोळमधील हुलगडीचे बेरड यांचा उठाव ............ ८४
महिपालसिंगाची बेळगावातील कामगिरी ............ ८६
प्रकरण पाचवे ............ ८७
प्रकरण सहावे ............ ९३
क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके ............ ९३

# प्रस्तावना

महाराष्ट्रात इंग्रजी राजवट इ. स. १८१८ मध्ये सुरू झाली. त्यावेळच्या ह्या ब्रिटिश राजवटीचे प्रमुख होते गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन. त्यांनी १८२२ मध्ये असे ठरविले की, हिदी प्रजाजनास इंग्रजी शिक्षण द्यावे. त्यावेळेपासून इंग्रजी शिक्षणाच्या शाळा भराभर निघू लागल्या. इंग्रजी शिक्षणाचा प्रसार फारच मर्यादित होता. मुंबई-महाराष्ट्रातील बरेच सुशिक्षित लोक नवीन संपादन केलेल्या आधुनिक ज्ञानाचा उपयोग समाजसुधारणा करण्याकडे, ब्रिटिश सत्तेच्या साम्राज्यवादी व पिळवणूकखोर स्वरूपाचे विश्लेषण करण्याकडे आणि त्यावर टिका करण्याकडे करू लागले. त्यात बाळशास्त्री जांभेकर, महाजन, भाऊ दाजी, लोकहितवादी आदि मंडळी प्रमुख होती.

ब्रिटिश राजवटीच्या सुरूवातीस भारतीय समाजातील जातीय व्यवस्थेत जो जारूण सामाजिक अन्याय दिसत होता व स्त्रियांना समाजात जो निकष्ट दर्जा प्राप्त झाला होता तो पाहून ह्या सुशिक्षितांचे हृदय कळवळले. त्यांनी वृत्तपत्राद्वारा व सामाजिक संस्थांद्वारा सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला. त्यास इंग्रज राजवटीनेही हातभार लावला. याच सुमारास विल्सन, निस्विटसारख्या धर्मप्रसारकांनीही हिंदी समाज सुधारण्यास मदत केली. हिंदी समाजातील बुरसटलेल्या जुनाट चालीरीतीवर ख्रिस्ती धर्मप्रसारक आपल्या प्रचारी भाषणातून हल्ले करू लागले. त्यांनी अर्धशिक्षित व खालच्या जातीच्या लोकांना ख्रिस्ती करण्याचा, बाटविण्याचा सपाटा चालविला. त्याकरिता ते भरवस्तीतील रस्त्यांच्या चौकात उभे राहून लोकांना ख्रिस्त पुराण ऐकवू लागले. ख्रिस्ती धर्माचा प्रसार व्हावा म्हणून बाळबोधीत सोप्या भाषेत ख्रिस्ती धर्मातील सुरस व रोचक गोष्टी सांगणारी पुस्तके छापण्याचा धडाका सुरू केला. त्याचा परिणाम असा होऊ लागला की, खालच्या जातीचे लोक समूहाने ख्रिस्ती होऊ लागले. ही लाट थांबवण्याचा प्रयत्न त्या वेळच्या सुशिक्षित वर्गाने केले. विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी ख्रिस्ती धर्मापेक्षा हिंदू धर्मातील चांगल्या गोष्टी समाजाला पोषक असल्यामुळे तो धर्म कसा चांगला आहे हे चौपाटीवर विल्सन कॉलेजसमोर सात दिवस भाषणे करून ख्रिस्ती धर्मावर घणाघाती आघात करून दाखवून दिले. १८३३ च्या सुमारास हिंदी समाजातील विचारवंत माणसे राजकीय दृष्टीनी किती पुढारलेली होतीयाची कल्पना राजा राममोहन रॉय यांच्या विस्तीर्ण साक्षीवरन सहज येईल. इ. स. १८५३ पर्यंतच्या काळात आपला महाराष्ट्रीय समाज राजकारणाचे ज्ञान आत्मसात करून ब्रिटिश पार्लमेंटमध्ये आपली कैफियत मांडण्यास तयार झाला. ह्याच सुमारास पुण्यात निघालेल्या "कल्याणोन्नायक मंडळ "ह्या संस्थेने हिंदी समाजाच्या हक्कांचा एक मसुदा तयार केला होता. तो पार्लमेंटकडे रूजू करण्याचा त्यांचा संकल्प होता. त्यात लोकहितवादी गोपाळराव देशमुख प्रमुख होते. हे द्रष्टे समाजसुधारक होते. राजनिष्टेच्या भावनेने त्यांनी आपल्या शतपत्रांतून इंग्रजी राज्याचे स्वागत केले व त्याबद्दल भष्यही केले ते असे "आपल्या समाजातील मूर्खपणा "मोडण्यास इंग्रजी शिक्षण धावून आले. त्या शिक्षणाने लोक शहाणे होतील, त्यामुळे त्यांच्या वाईट चाली सुटतील आणि त्यांची मने शुद्ध होऊन ते आपल्या देशाचा कारभार इंग्रजांसारखा करण्यास तयार होतील. ह्यास शे-दीडशे वर्षे लागतील. मग ते इंग्रजांस सांगतील की, तुम्ही आपले देशास जावे. आम्ही आमच्या देशाचा करभार करु. तुम्ही इथून जा. आमच्या प्रजेचे आम्ही रक्षण करु." अशा प्रकारचे विचार त्यांनी शतपत्रांतून मांडले ते भाष्य खरे ठरले हे आपण पहात आहोत. त्यांनी एका निबंधात असा तळमळीचा विचार मांडला आहे की, "इंग्रजी राज्यापायी हिंदी समाज गुलामगिरीत बुडून नामशेष होईल म्हणून लोकांनी इंग्रजांचे शहाणपण घेऊन आपल्या नशिबाचे दरवाजे उघडण्याचा उद्योग निकराने केला पाहिजे." इंग्रजांनी सातारकर, नागपूरकर यांना मांडलिक बनविल्यानंतर सरंजामदार व जहागिरदार यांना इनाम कमिशन नेमून कायदेशीर रीत्या लुटले. अशा प्रकारे राजकीय सत्तेचे शोषण चालू असता, दुसऱ्या बाजूने शेतकऱ्यांची पिळवणूक,

अनुक्रमणिका

व्यापारधंद्याचे खच्चीकरण, हस्तव्यवसायाचा नाश इत्यादी जालीम उपायांनी सबंध देशच परावलंबी बनविला. त्यामुळे "इंग्रजी झाल्यावर वीस वर्षेपर्यंत अतिशय दरिद्र स्थिती राहिली" (लोकहितवादींच्या जुन्या गोष्टी, भाग १, पृ.८४ ). त्यावेळच्या लोकांच्या मनःस्थितीबद्दल काही विचारू नका. "अग्नीने पोळले अगर दहन केले, राजाने मारले अगर लुटून नेले याची फिर्याद कोण ऐकणार? असा विवेक करून सर्वसामान्य लोक विवंचनेत राहिले" (मुंबई इलाख्यातील गैर इन्साफ, पृ. १२३) पण ज्यांच्या मनगटात जोर होता त्यांनी मुकाट्याने सहन केले नाही.संधी मिळेल त्या ठिकाणी त्यांनी शस्त्रांचा खणखणाट केला. त्यात आदिवासींचा सिंहाचा वाटा होता. म्हणून देशभर पसरलेल्या आदिवासींनी इंग्रजी सत्तेवरून शेकडो उठाव केले. तसेच छोट्या संस्थानिकांना इंग्रज सत्ताधिशांचा जाच असह्य झाला तेव्हा त्यांनी प्रजेच्या सहाय्याने उठाव केले. अशा प्रकारे उठाव बीडचा धर्माजी प्रतापराव, नांदेड जिल्ह्यातील हटकर यांचे होत. कित्तूरकर देसाईची सावत्र आई चन्नम्मा हिच्या चिथावणीवरून कित्तुरात बंड झाले.

महाराष्ट्रात जे आदिवासी बंडखोर होते त्यात खानदेशातील भिल्ल व पुणे सातारा जिल्ह्यांतील रामोशी प्रमुख होत. इंग्रजांनी खानदेशावर इ. स. १८१८ मध्ये ताबा मिळवला. तेव्हा भिल्लांनी उठाव करण्यास सुरुवात केली. संधी मिळेल तेव्हा सपाटीवरच्या प्रदेशात येऊन लुटालुट करणे, सक्तीने पैसे वसूल करणे, गुरे पळवून नेणे, प्रवाशांना लुटणे अशी कृत्ये ते करू लागले. त्यांनी ठिकठिकाणी उठाव केले व धुमाकूळ घातला. प्रत्येक उठावाच्या वेळी इंग्रजांनी त्यांच्याशी सलोख्याचे संबंध जोडले. त्यांची सैन्यात भरती करविली. असे असले तरीही संधी मिळेल त्यावेळी भिल्लांनी १८१८ ते १८३१ पर्यंत इंग्रजांविरुद्ध उठाव केले. १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धात भिल्लांनी खानदेश, नाशिक व अंबापाणी आदि ठिकाणी ठराव केले. त्यांची इंग्लिश रेकॉर्डवरून दिलेली माहिती ह्या पुस्तकात दिली आहे.

पुणे-साताऱ्याकडील रामोशांना इंग्रजी राजवट आल्यानंतर कामावरून कमी केले. त्यांची इनामे जप्त केली. त्यामुळे त्यांनी चिडून जाऊन इंग्रजांविरुद्ध सशस्त्र उठाव केले. त्यांनी उमाजी नाइकाच्या नेतृत्वाखाली इंग्रजांना घालवून देण्यासाठी बंड उभारले. ते गोरगरिबांस व रयतेस छळीत नसत. प्रसंगी गरीबांना अंगावरची वस्त्रे सुद्धा दान करीत. ब्राह्मणांना दक्षिणा देत. उमाजी नाईकास पकडणाऱ्या कॅ. मॅककिन्टॉश याला असे समजले होते की, उमाजीच्या दृष्टीपुढे नेहमी शिवाजीचे उदाहरण होते. शिवाजीप्रमाणे आपण मोठे राज्य कमवावे अशी त्याची उमेद होती. असा हा स्वातंत्र्यप्रेमी शूर पराक्रमी रामोशी इंग्रजांच्या प्रचंड सामर्थ्याखाली चिरडला गेला.

सावंतवाडी व कोल्हापूर येथे गडकऱ्यांचे उठाव झाले. इंग्रजी राज्य झाल्यावर इंग्रजांनी गडकऱ्यांच्या किल्ल्याजवळील जमिनी काढून घेतल्या. काहींना कामावरून कमी केले. तेव्हा गडकऱ्यांनी सशस्त्र बंडे केली. कोल्हापूर गडकऱ्यांच्या बंडांत दरबारांतील बडी मंडळी सामील होती. हा उठाव कंपनी सरकारने सैन्य बळावर चिरडून टाकला. सावंतवाडीच्या दरबारी मंडळींनी गडकऱ्यांशी हात मिळवणी करून इ. स. १८२८, १८३८ व १८४४-४५ मध्ये बंडाळी सुरू केली. वाडीचा किल्ला ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. इंग्रजी सैन्यानं ह्या बंडखोरांस गोव्यात पळवून लाविले. काहींना पकडून काळ्या पाण्याच्या शिक्षा ठोठावल्या. अशा रीतीने इंग्रजांनी गडकऱ्यांच्या या उठावाचा बीमोड केला.

हा हा म्हणता इ. स. १८५७ उजाडले. उत्तर हिंदुस्तानात एतद्देशीय सैनिकांच्या सशस्त्र उठावाने पेट घेतला. नानासाहेब पेशवे ह्या उठावाचे सूत्रधार होते. त्यांनी आपली माणसे कोल्हापुरास पाठविली. कोल्हापूर सैन्यात फितुरी झाली, त्यांनी उठाव केला पण इंग्रजांनी बंडखोरांचा पराभव केला. संशयावरून

अनुक्रमणिका

धाकटे राजे चिम्मासाहेब यांना पकडून कराचीस नेऊन ठेविले. साताऱ्याच्या गेंडामाळावरील उठाव रंगो बापूजीच्या प्रेरणेने झाला. तेव्हा रंगो बापूजीच्या पुतण्यासह सर्व संशियतांस पकडून इंग्रजांनी फाशी दिले. रत्नागिरी, बेळगाव येथेही तुरळक उठाव झाले. त्यांचाही बंदोबस्त इंग्रजांनी केला. मुंबईत सैन्यामध्ये फितुरी सुरू झाली. १५ ऑक्टोबर १८५७ च्या रात्री इंग्रज लोकांवर हल्ला करून मुंबई ताब्यात घ्यावयाची असे ठरले, पण ही बातमी वेळीच इंग्रज अंमलदारांस समजल्याने त्यांनी फितुरांस पकडून आझाद मैदानात प्रेक्षकांसमोर फाशी दिले व बंडाचा बीमोड केला. नागपूर, औरंगाबाद या ठिकाणी सैन्याने केलेले उठाव इंग्रजांनी फितुरांस तोफेच्या तोंडी देऊन उधळून लावले. नरगुंद संस्थानिक भावे हे स्वातंत्र्य लालसेने भारावून गेले. त्यांनी इंग्रजांविरुद्ध उठाव केला. ह्या उठावात त्यांनी व त्यांच्या बायकांनी हौतात्म्य पत्करले. इंग्रजांनी त्यांचे नरगुंद संस्थान खालसा केले. खानदेश, अंबापाणी व नाशिक येथील भिल्लांनी इंग्रजांविरुद्ध उठाव करून ह्या उठावाच्या पर्वणीत हात धुवून घेतले. पण त्यांच्या बंडाचा बीमोड बंडोखोर भिल्लास कठोर शिक्षा देऊन केला, सर्वत्र शातंता प्रस्थापित केली. ह्या सर्व उठावांची माहिती अस्सल कागदपत्रांवरून ह्या पुस्तकांत दिलेली आहे.

## राष्ट्रीय जागृती

१८५७च्या स्वातंत्र्य संग्रामात पराभव पत्करल्यानंतर हिंदी जनता खडबडून जागी झाली. इंग्रजांनी आपली पकड हिंदी जनतेवर घट्ट करण्यासाठी निःशस्त्रीकरणाचा कायदा करून सरदार, दरकदार व आदिवासी जनतेकडून शस्त्रे गोळा केली व त्या शस्त्रांचा नाश केला. त्याबरोबरच देशात युनिव्हर्सिट्या स्थापून उच्च इंग्रजी शिक्षण देण्याचा झपाटा सुरू केला. त्यामुळे युनिव्हर्सिटीचे शिक्षण घेतलेल्यांची संख्या पुष्कळच वाढली. देश विदेशातील राजकारणाचे ज्ञान देणारी, त्याचा साधकबाधक खल करणारी देशी व इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रे वाढत्या संख्येने लोकमताला जागृत करण्याचे काम करीत होती. ह्या इंग्रजी शिक्षणाने डॉक्टर, वकील, बॅरिस्टर व कारकून मंडळी तयार झाली. हिंदी राजकारणाची सूत्रे ह्यांच्या हाती आली. त्यांनी बंगालमध्ये सुरेंद्रनाथ बॅनर्जीच्या नेतृत्वाखाली इ. स. १८७६ मध्ये इंडियन असोसिएशन स्थापन केली. मुंबईस बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएन्स इ. स. १८८५ मध्ये स्थापन झाली. पुण्यातील जागृत लोकांनी सार्वजनीक सभेची स्थापना १८७० मध्ये केली. याच सुमारास महात्मा फुले यांचे वादळी व्यक्तिमत्व पुढे आले. त्यांनी स्त्रियांच्या आणि कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणाची, सामाजिक समतेच्या नि समानतेच्या हक्काची व समाजक्रांतीची तुतारी फुंकली. न्यायमूर्ती रानडे हे राजकारणाला नितीचे अधिष्ठान देऊ पाहणारे आणि देशाभिमानाच्या चळवळीला स्वदेशाचा पाया घालून देणारे थोर सुधारक व विचारवंत होते. याच काळात हिंदी राष्ट्रीयत्वाच्या भावनेला धर्माभिमानाचे पुट चढलेले आर्थ समाज, थिऑसॉफी यासारख्या संस्था उदयास आल्या. महाराष्टारात रानडे – भांडारकर यांनी प्रार्थना समाजाचा पुरस्कार केला. इंग्रजी शिक्षणाने होऊ घातलेल्या धार्मिक ऱ्याहासाला अडवून लोकांना वैदिक तत्त्वज्ञानाची शिकवण देण्याचे कार्य स्वामी दयानंदांनी स्थापिलेला आर्य समाज करू लागला. अशा रीतीने राजकीय जागृती होत असता इंग्रजांनी प्रतिगामी धोरणास जोराची चालना दिली. प्रेस ॲक्ट काढून वृत्तपत्र स्वातंत्र्याची मुस्कटदाबी केली. याच सुमारास आपण गुलाम आहोत, त्या गुलामगिरीचे पाश तोडण्यासाठी साधने सोधणारा सुशिक्षित वर्ग तयार झाला. त्याचे नेतृत्व वासुदेव बळवंत फडके या तरूणाने केले. इ. स. १८७० पर्यंत आयरिशांनी पार्लमेंटमध्ये बसून आपल्या राजकीय आकांक्षेची जोपासना चालविली होती. हे वृत्तपत्रांतून वाचून ह्या तरूण मंडळींस समजले होते, त्यानंतर आयरिशांनी होमरूलची चळवळ सुरू केली.त्याची वाच्याता इ. स. १८७५-७६ साली हिंदी वृत्तपत्रांतून चालली होती. या अगोदर इ. स. १८७४ साली आयरिश सभासदांच्या मदतीने हिंदी गरजांसंबधात न्याय प्राप्त करता येईल या आशेने हिंदुस्थानातून

प्रातिनिधिक राज्याच्या मागणीचा अर्ज हजारो सह्यांनिशी पार्लमेंटसमोर गुदरला गेला होता. याच सुमारास महाराष्ट्रात दुष्काळ पडला. त्या दुष्काळाने पश्चिम महाराष्ट्रात थैमान घातले. हजारो लोक उपाशीपोटी मेले, गुरे मेली, लोक देशोधडीस लागून अन्नासाठी वाट फुटेल त्या दिशेने चालू लागले. लोकांना जगवण्यासाठी इंग्रजांनी कोणतीच उपाययोजना केली नाही, हे सर्व भकास चित्र पाहून वासूदेव बळवंत फडकेचा देह रागाने लालबुंद झाला. इंग्रजांवर सूड घेऊन त्यांना इथून घालविण्याचा उद्योग त्याने रामोशांच्या मदतीने आरंभिला, इंग्रजांच्या बलाढ्या सत्तेने वासुदेव बळवंताच्या उर्मीचा त्याला जन्मठेपेची सजा देऊन शृखंलांनी बद्ध करून चोळामोळा केला. त्यास एडनला जानेवारी १८८१ मध्ये रवाना केले. इ. स. १८६० – १८८० ही वर्षे जुलमी कायदे, दुष्काळ, हिंदी जनतेच्या उपमर्दाचे प्रसंग यांनी भरलेली आहेत. या कालखंडाच्या अखेरीस सबंध देशात रक्तपात, जाळपोळ, लुटालूट यांचा धूमधडाका गाजण्याचा संभव ब्रिटिश राज्यकर्त्यांना दिसू लागला होता. हा लोकांचा असंतोष कमी करण्यासाठी ह्यूम साहेबांनी सनदशीर मार्गाने हिंदी लोकांनी आपल्या मागण्या इंग्रजांकडे मागाव्या हा उद्देश डोळ्यापुढे ठेवून इ. स. १८८५ मध्ये काँग्रेसची स्थापना केली. हिंदी जनतेने ह्या काँग्रेसद्वारा स्वातंत्र्य लढे देऊन इ. स. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळविले. इ. स. १८८५ पूर्वी स्वातंत्र्यासाठी निरनिराळ्या वेळी जे एकाकी उठाव झाले त्याचे साधार विवेचन करून वाचकांपुढे ठेविले आहे.

**साधन परिचय**

या विषयावरील प्रसिद्ध व अप्रसिद्ध साधनांची माहिती अभ्यासूंसाठी देत आहे. महाराष्ट्रारात इंग्रजी सत्ता आल्यानंतर म्हणजे १८१८ पासून १८८५ पर्यंत ठिकठिकाणी सशस्त्र उठाव झाले. त्यांत १८५७ चा उठाव सर्वांत मोठा होता. त्या अगोदर खानदेशातील भिल्ल, पुणेसाताऱ्याकडील रामोशी यांच्या ७/८ वर्षे सतत चाललेल्या उठावांनी इंग्रजांना त्रस्त केले. कित्तुरचे बंड, सावंतवाडी, कोल्हापूर येथील गडकऱ्यांचे उठाव हेही सशस्त्र होते. ब्रिटीशांनी हेही उठाव वेळीच निपटून काढले. १८५७ साली कोल्हापूर, सातारा, मुंबई, नागपूर, खानदेश, नाशिक, औरंगाबाद, जमखिंडी, सुरपूर या ठिकाणी सशस्त्र उठाव झाले. तेथील एतद्देशिय सैनिकांनी इंग्रजी सत्तेविरुद्ध हे सशस्त्र उठाव केले. ह्या उठावांच्या इतिहासाची साधने शोधून प्रसिद्ध करण्यासाठी त्यावेळचे केंद्रिय शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांच्या आध्यक्षतेखाली इतिहास तज्ञांची एक समिती नेमली होती. त्या समितीकडे १८५७ च्या इतिहासाच्या लेखणानाचे काम सोपविण्यात आले, तसेच केंद्रशासनाने मुंबई, मध्येप्रदेश, उत्तरप्रदेश, पंजाब इत्यादी सर्व राज्यांना राज्यस्तरीय इतिहास समित्या नेमण्यास सांगितले. त्याप्रमाणे प्रत्येक राज्याने इतिहास समित्या नेमल्या. त्यावेळच्या मुंबई सरकारने जी इतिहास समिती नेमली होती त्या समितीने मुंबई दप्तरखान्यातील ह्या विषयावरील कागदपत्रे तपासून "सोर्स मटिरियल फॉर द हिस्टरी ऑफ फ्रीडम मोव्हमेंट इन इंडिया" नावाचा १८१८ ते १८८५ या कालखंडातील अप्रसिद्ध कागदपत्रांचा खंड प्रसिद्ध केला. ही सर्व कागदपत्रे पूर्वी कॉन्फीडेन्सीयल म्हणजे गुप्त होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासनाने त्यांची गुप्तता काढून टाकली. या रेकॉर्डमधून सरकारी दप्तरखान्यातील हस्तलिखित ग्रंथ विशेषतः पोलिटिकल डिपार्टमेंटचे व्हॉल्यूम्स तसेच पुणे येथील दप्तरखान्यातील पत्रव्यव्हार ही निरनिराळ्या वेळच्या उठावाची माहिती पुरवितात.

नागपूर उठावाच्या माहितीसाठी श्री. या. मा. काळे यांचा नागपूर प्रांताचा इतिहास व वऱ्हाड प्रांताचा इतिहास तसेच नागपूर रेसिडेन्सी कॉरस्पॉडन्स् भाग ३ हे उपयोगी आहेत.

अनुक्रमणिका

इनाम कमिशन स्थापून इंग्रज सरकारने इनामदारास कसे लुबाडले याची माहिती “मुंबई इलाख्यातील इनाम कमिशन खात्यातील गैर इन्साफ” या सन १८५९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत मिळते. लोकहितवादींचे लेखसंग्रहही या बाबतीत खूप माहिती देतात.

महाराष्ट्रातील व्यापर धंदे इंग्रजांनी कसे नष्ट केले या संबंधीची माहिती पुणे येथील डेक्कन कमिशनर्स रेकॉर्डस्, सिलेक्शन ऑफ पेपर्स फ्रॉम द रेकॉर्डस ऑफ इंडिया हाऊस, व्हॉ. ३, ४, १८३१- ३२ चे पार्लमेंटरी पेपर्स चॅप्लीन व एल् फिन्स्टनचे रिपोटर्स, मुजुमदारकृत पेशवाईनंतरचा पुण्याचा इतिहास इत्यादी प्रसिद्ध अप्रसिद्ध साधने देतात. खानदेशातील भिल्लाचे उठाव हा एका स्वतंत्र ग्रंथाचा विषय होईल. भिल्लांनी १८१८ ते १८३१ पर्यंत सशस्त्र उठाव करून ब्रिटीशांना हैरान केले. त्यासंबंधीचे पोलिटिकल डिपार्टमेंटचे ह्या १० वर्षाचे सुमारे ५० व्हॉल्यूममध्ये या हकीकती विखुरलेल्या आढळतात. भिल्लांच्या बंदोबस्तास नेमलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांनी जे रिपोर्ट लिहिले तेही मोलाचे आहेत. विशेषतः क. ब्रिग्ज, सिमकॉक्सकृत मेमॉयर ऑफ द खानदेश भील कॉपर्स, ग्रॅहमने लिहिलेला हिस्टॉरिकल स्केच ऑफ दी भील ट्राईब्स ऑफ दी खानदेश हे रिपोर्ट महत्वाच्या माहितीने भरलेले आहेत. कित्तूरच्या उठावाची माहिती १८२४ ते १८३० या कालखंडातील पोलिटिकल डिपार्टमेंटचे व्हॉल्यूमस् देतात.

**रामोशी**

पुणे- सातारा जिल्ह्याह्यातील रामोशांनी १८२४ ते १८३१ पर्यंत इंग्रजांविरुद्ध सशस्त्र उठाव करून इंग्रजांस जेरीस आणले. रामोशांच्या बंडातील प्रमुख उमाजी नाईक यास ज्या कॅप्टन मॅकिन्टॉशने पकडले त्याने रामोशांचा इतिहास इंग्रजीमध्ये लिहून ठेवलेला आहे. त्याचे हस्तलिखित ज्युडिशियल डिपार्टमेंटच्या १८३३ च्या व्हॉल्यूम नं. २१/ २८६ या क्रमांकाच्या व्हॉल्यूममध्ये महाराष्ट्र सरकारच्या दप्तरखान्यांत आहे. तसेच त्या त्या वर्षीच्या पॉलिटिकल डिपार्टमेंटच्या व्हॉल्यूममध्ये या रामोशांच्या ठिकठिकाणच्या उठावांची माहिती सापडते. सावंतवाडी व कोल्हापूर येथील गडकऱ्यांनी केलेल्या उठावांची माहिती त्या त्या वर्षीच्या पोलिटिकल डिपार्टमेंटच्या व्हॉल्यूममध्ये तसेच कोल्हापूर व पुणे येथील दप्तरखान्यात सापडते.

१८५७ मध्ये महाराष्ट्रात सातारा, कोल्हापूर, मुंबई, नागपूर व इतर ठिकाणी एतद्देशीय सैनिकांनी जे सशस्त्र उठाव केले त्याची माहिती मुंबई दप्तरखान्यातील पोलिटिकल डिपार्टमेंट व्हॉल्यूममध्ये सापडते.

वर सांगितलेल्या स्वातंत्र्य आंदोलन इतिहास समितीने या उठावांची माहिती देणारी साधने सोअर्स मटेरियल फॉर दी हिस्टरी ऑफ फ्रिडम मोव्हमेंट, व्हॉल्यूम १ ते ३ प्रसिद्ध केले. १८५७ मध्ये महाराष्ट्राखेरीज इतर प्रांतात झालेल्या उठावांची माहिती इंग्रजी लेखकांच्या ग्रंथातून उदा. केई, मॅलिसन, जॅकब, मार्टिन, टेलर, शेफर्ड, विल्सन इ. ग्रंथकारांनी लिहून ठेवलेली आढळते. तसेच हैदराबादमध्ये नेमलेल्या स्वातंत्र्य / आंदोलन इतिहास समितीने हस्तलिखीत साधने “सोअर्सस फॉर द हिस्ट्री ऑफ फ्रिडम मोव्हमेंट इन हैद्राबाद” व्हॉल्यूम १ ते ४ आंध्र सरकारने प्रसिद्ध केले आहेत. याच विषयावरील उत्तर प्रदेश सरकारने १८५७ ते १९०० या कालखंडातील तीन व्हॉल्यूम्स प्रसिद्ध केले. बिहार सरकारने तीन व्हॉल्यूम्स प्रसिद्ध केले आहेत. मध्यप्रदेश सरकारने “हिस्ट्री ऑफ फ्रिडम मोव्हमेंट इन् मध्यप्रदेश” या नावाने एक व्हॉल्यूम प्रसिद्ध केला आहे.

अनुक्रमणिका

१८५७ उठाव झाला त्यावेळी ब्रिटीस सरकारची टेलिग्राफ यंत्रणा चालू होती. कलकत्त्यास त्यावेळी हिंदुस्थानची राजधानी होती. गव्हर्नर जनरल कॅनिंग हा त्या वेळी कलकत्त्यास रहात होता. मीरत, दिल्ली, कानपूर, लखनौ, काल्पी, अंबाला येथे झालेल्या उठावांची माहिती इंग्रज सेनानी कलकत्त्यास पाठवत असत. पण स्वातंत्र्य सैनिकांनी कलकत्त्यास जाणाऱ्या तारा तोडून टाकल्यामुळे उत्तरेतील सर्व इंग्रज अधिकारी या उठावासंबंधीची माहिती कलकत्त्यास पाठवितांना ती मुंबई सरकारद्वारा पाठवित असत. अशा माहितीचे सुमारे ७० हॉल्यूम्स नॉर्थ वेस्ट प्रॉव्हिन्स असा शिक्का असलेले मूबईच्या दप्तरखान्यात आहेत. त्यावरूनही उत्तर हिंदुस्थानांतील १८५७ च्या समराची सविस्तर माहिती मिळते. ही सर्व साधने अद्याप अप्रकाशित आहेत. मात्र इंडियन म्युटिनी इन् १८५७ N. W. P. ह्या नावाने इंटलिजन्स रेकॉर्डचे दोन खंड विल्यम मूरने प्रसिद्ध केलेले आहेत.

१९५७ साली १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाची शताब्दी होत म्हणून भारत सरकारने त्यावेळचे नॅशनल आर्काइव्हचे डायरेक्टर डॉ. सेन यांजकडे १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाचा इतिहास लिहिण्याचे काम १९५३ मध्ये सोपविले तो इतिहास इंग्रजीत "एटिन फिफ्टी सेवन" ह्या शीर्षकाखाली भारत सरकारने प्रसिद्ध केला. दुसरी बाजू सांगणारा इतिहास "सिव्हील रिबेलियन इन द इंडियन म्युटिनी "या नावाने एस. बी . चौधरी या बंगाली विद्वानाने कलकत्त्याहून प्रसिद्ध केला. दुसरे एक सुप्रसिद्ध बंगाली विद्वान डॉ. आर. सी. मुजूमदार यांनी "हिस्टरी ऑफ द फ्रिडम मोव्हमेंट इन इंडिया" भाग १ ते ३ इ. स. १९६३ मध्ये प्रसिद्ध केले. यांत हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा इतिहास १९४७ पर्यंत दिलेला आढळतो. प्रत्येक भाग सुमारे ८०० पृष्ठांचा आहे. दुसरे एक विद्वान डॉ. ताराचंद यांच्या अध्यक्षतेखाली भारत सरकारने याच कामासाठी इतिहास समिती नेमली होती त्या समितीने १७५७ पासून १९४७ पर्यंतचा समग्र इतिहास ४ व्हॉल्यूममध्यये इंग्रजीत दिलेला आहे.

उत्तर प्रदेश सरकारने आनंद स्वरूप मिश्रा यांनी लिहलेला "नानासाहेब पेशवा अँड द फाइट फॉर फ्रिडम" या नावाचा ग्रंथ १९६१ मध्ये प्रकाशित केला. यांत सन १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाविषयी सर्व उपलब्ध माहिती एकत्रित केलेली आहे. नानासाहेब पेशव्यांचा शेवट, शिवपुरीला फाशी देण्यात आलेले तात्या टोपेच होते की आणि कोणी होते इत्यादी अद्यापही गूढ असलेल्या विषयांवर बरीच माहिती उपलब्ध साधन सामग्रीच्या आधारे या ग्रंथात दिलेली आहे. या ग्रंथाचा मराठी अनुवाद महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने डॉ. वा. रा. ढमढेरे यांच्याकडून करवून घेऊन तो "नानासाहेब पेशवे आणि १८५७ चे स्वातंत्र्य युद्ध" या शीर्षकाने १९७३ मध्ये प्रसिद्ध केला आहे.

मराठीमध्ये १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धावर मोजकी पुस्तके आहेत. त्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांचे "१८५७ चे स्वातंत्र्य समर", प्रो. ना. कृ. बेहरे यांचे "सन १८५७", विनायक कोंडदेव ओक याचे "शिपायांचे बंड", पारसनीकृत "झाशीच्या राणीचे चरित्र", वैद्य यांनी प्रकाशित केलेले "गोडसेकृत माझा प्रवास", "१८५७ चा महाराष्ट्र" हे वि. पा. गोखले यांचे पुस्तक, प्रा. न. र. फाटक यांचे "१८५७ ची शिपाई गर्दी" हा ग्रंथ, श्री. वसंत नगरकर यांचे "भारतीय स्वातंत्र्य संग्राम" तसेच वंसत वरखेडेकर यांचे "सत्तावनचा सेनानी" हे तात्या टोपे यांच्या जीवनावरील पुस्तक प्रसिद्ध आहे. तत्कालीन १८५७ चे प्रत्यक्ष साक्षीदार गोडसे, बेलसरे व बयाबाई आपटे. त्यापैकी बेलसरे लिखित तत्कालीन हकीकत महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र आर्काइव्हज बुलेटिन नं. १" मध्ये मराठीत प्रसिद्ध केलेली आहे. बेलसरे तात्या टोपेंच्या सैन्यात सापडले, त्यांना इंग्रजांनी धरले. बंडवाले समजून फाशीची शिक्षा फर्मावली. पण ते दैवयोगाने सुटले. ही हकीकत मोडीमध्ये लिहून ठेवलेली महाराष्ट्र सरकारने बाळबोधीत छापली आहे. बयाबाई आपटे या

अनुक्रमणिका

दुसऱ्या बाजीरावाच्या कन्या. त्या नानासाहेब पेशव्यांबरोबर नेपाळात गेल्या. १९१३ च्या सुमारास त्या पुण्यातस आल्या होत्या. त्यांची मुलाखत इतिहासाचार्य कै. वि. का. राजवाडे यांनी घेतली. ती त्या वर्षीच्या "केसरी"त प्रसिद्ध झाली आहे [केसरी ११ फेब्रुवारी १९१३.] नानासाहेब पेशव्यांचा मृत्यू व त्यांचे और्ध्वदेहिक याबद्दल त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेली माहिती सांगितली [इतिहास संग्रह ऐतिहासिक स्फुट लेख नं. ४६ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य व्हा. ७.]. बयाबाई आपटे संबंधीचा पत्र व्यवहार आर्काइव्हज बुलेटीन नं. ८ मध्ये शासनाने प्रसिद्ध केला आहे. "डिस्टर्बन्सेस इन् गुजरात, १८५७ ते १८६४" हा मी संपादीत केलेला मराठी व गुजरात कागदपत्रांनी भरलेला साधनग्रंथ गुजरात सरकारने प्रसिद्ध केला आहे.

१८५७ च्या धुमश्चक्रीनंतर २४ सप्टेंबर १८५९ रोजी नानासाहेब पेशवे मृत्यू पावल्याच्या वंदता इंग्रजांस समजल्या पण नेपाळचा राणा जंग बहाद्दूर याने "नाना खरोखरीच मेला काय याबद्दल मलाही संशय वाटतो" असे विधान खाटमांडू येथील रेसिडेंट सर्जन याजकडे केले. यावरून ब्रिटीशांना नानासाहेब जिवत असल्याचा संशय वाटू लागला. त्यांनी आपली पोलादी राज्य यंत्रणा राबविली व या संशयाचा एकदाचा सोक्षमोक्ष करावयाचा असे ठरविले. नानासाहेब पेशव्यासारखा जो जो म्हणून दिसेल त्याला पकडण्यासाठी इंग्रज सरकारने एक लाखाचे बक्षीस लावले. सर्व प्रांतात, शहरात, मोठ्या गावात, हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यात हुकूम पसरविले. इंग्रज सरकारने ३० नोव्हेंबर १८६१ मध्ये नानासाहेब पेशवे समजून हरजीभाईंना अटक व नंतर सुटका केली. तसेच सरकारने २२ जून १८६३ मध्ये अजमीर येथे संशयावरून आप्पारामाला अटक केली व पुढे सोडून दिले. नानासाहेब तिबेटात किंवा आसामात गेला असावा असा संशय व्यक्त करणारी पत्रे मुंबई सरकारकडे आली. इ. स. १८६४ मध्ये तो ग्वाल्हेरच्या आसपास असल्याच्या बातम्या वृत्तपत्रात झळकल्या. तद्नंतर १० वर्षांनी त्यांचे अस्तित्व राजकोट येथे असल्याचे प्रसिद्ध झाले. १८७४ मध्ये अजमीर येथे जमनादास यास संश्यावरून अटक करून पुढे त्याची सुटका केली. इ. स. १८९७ मध्ये रशियामध्ये नानासाहेब मृत्यू शय्येवर असल्याच्या बातमीने मुंबईला बराच धक्का दिला होता. १८९४ मध्ये संशयित नानासाहेब यास काठेवाडात पकडले असे काटेवाडचे पोलीस सुपरिटेंडेंट मुंबई सरकारला कळवितात. नानासाहेब बाजीरावाच्या श्राद्धदिनी दरवर्षी पुण्यास गुप्तपणे यावयाचा असे पुण्यातील वयोवृद्धलोक त्यावेळी सांगत असत हे विशेष. हेही रेकॉर्डवर आहे. बनासकाठा जिल्ह्यात कोटेश्वर गावी नानासाहेब दुधा हरी महाराज या नावाने रहात होता. तो इ. स. १९१७ मध्ये मृत्यू पावला अशा प्रकारची बातमी जिल्हाधिकाऱ्याने मुंबई सरकारला कळविल्याचे नमूद आहे. नानासाहेब जिवंत असल्यासंबंधीच्या ज्या बातम्या वृत्तपत्रातून आल्या व मुंबई सरकारच्या फायलीमधून पसरल्या त्या सर्व मुंबई रेकॉर्ड ऑफीसमध्ये एकत्र केल्या आहेत. अशा फायली सुमारे १५ आहेत. त्या फाईलीतील माहिती "लीजंड ऑफ नानासाहेब" या शीर्षकाखाली महाराष्ट्र आर्काइव्हज बुलेटिन नंबर १. ४. ८. ९. १० यांत प्रसिद्ध झाली आहे.

नानासाहेब पेशव्यांचा पुतण्या रावसाहेब यास इंग्रजांनी पकडून विठूरला त्याचे वाड्यासमोर २० ऑगस्ट १८६२ रोजी फाशी दिले. त्याच्या संश्याचा रावसाहेब हैदराबादेस व महाराष्ट्रात दिसल्याचे व त्यास पकडून देणाऱ्यास सरकारी बक्षीस रु. ५.००० देण्याचे सरकारी कागदपत्रांच्या फाईलीत दिसून आले. सरकारी अधिकाऱ्यांनी खोट्या बातम्या उठविणे व त्या पडताळून पाहण्यासाठी साक्षी पुरावे गोळा करणे व शेवटी पकडलेला माणूस रावसाहेब नव्हे असे जाहीर करणे व सरकारला कळविणे असे प्रकार प्रमोशन मिळण्यासाठी उच्च सरकारी अधिकारी करतात असा ठपका टाईम्स ऑफ इंडिया वृत्तपत्राने आपल्या दि. २१ मे १८६३ च्या अग्रलेखांत सरकारी अधिकाऱ्यांवर ठेवलेला आढळतो.

अनुक्रमणिका

**तात्या टोपे**

बंडासंबंधीचे बडोदे दप्तरांतील कागदपत्र मी संपादित केले आहेत. त्यांतील हकिकत अशी: तात्या टोपे आणि रावसाहेब पेशवा यांनी दहा हजार सैन्यासह छोटा उदेपूरवर दि. ४ डिसेंबर १८५८ रोजी चाल केली. मेजर बकल यांजशी मुकाबला झाला. दोन्ही बाजूस मनुष्यहानी झाली. बंडखोर लोक एक हत्ती व दोन उंट घेऊन गेले. जाताना मोराचे वगैरेचे मोठे आवाज काढत ते रानात निघून गेले. ह्या बंडखोरांनी २ एप्रिल १८५९ पर्यंत छोटा उदेपूर, तेजगड, जैतपूर आणि बुजंगांव या ठिकाणाना त्रास दिला. दि. २ एप्रिल रोजी मानसिंग हा शिंदे दरबारचा बंडखोरांस मिळालेला सरदार सर रिचर्ड मेडे यास माहूदारा येथे शरण आला. त्यानेच तात्या टोपे झोपलेला असता त्यास इंग्रजांना पकडून दिले. तात्या टोपेस १८ एप्रिल १८९९ रोजी सिप्रीला फाशी दिले.

तात्या टोपेचा सावत्र भाऊ रामकृष्ण बिन पांडुरंग यास बडोद्यास नोव्हेंबर १८६२ मध्ये कैद केले. त्याची तपासणी होऊन त्यास १५ डिसेंबर १८६३ मध्ये सोडून दिले. याबद्दलचा पत्रव्यवहार आर्काइव्हज बुलेटिन नं.८ मध्ये प्रसिद्ध केला आहे. हा सर्व अप्रसिद्ध पत्रव्यवहार शासकीय फायलीतच आहे. अशा सर्व फायली मुंबई दप्तरखान्यात राखून ठेविल्या आहेत. यातील वर निर्देशिलेला पत्रव्यवहार मी मुंबई दप्तरखान्यात असता माझ्या संपादनाखाली निघालेल्या आर्काइव्हज बुलेटिन्स् ह्या पुस्तिकेत प्रसिद्ध केलेला आहे. तो वाचनीय आहे. तसेच डॉ. य. दि. फडके यांनी आपल्या “२० व्या शतकातील महाराष्ट्र” (१९०१ – १९१४) ह्या ग्रंथात १९ व्या शतकातील सशस्त्र चळवळीची त्रोटक माहिती दिलेली आहे तीही उपयुक्त आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. य. दि. फडके आणि त्यांचे कार्यालयीन सहकारी यांनी ग्रंथ प्रकाशित होण्यासाठी केलेल्या सहाय्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

वाई येथील शासकीय मुद्रणालयाने या ग्रंथाची छपाई सुबक करून दिली याबद्दल त्या मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री . यु. एस्. सोनावणे व त्यांचे सहाय्यक यांचा मी आभारी आहे.

*वि. गो. खोबरेकर*

अनुक्रमणिका

# निवेदन

*१८१८ साली पेशवाईचा अस्त होऊन महाराष्ट्रात इंग्रजी राजवट प्रस्थापित झाली. गुलामगिरीची चीड असलेल्या नागपूरच्या अप्पासाहेब भोसल्यांनी अयशस्वी प्रतिकार केला आणि दोन वर्षे त्यांचा पिच्छा पुरवणाऱ्या इंग्रजांच्या फौजेच्या हाती तुरी देऊन ते निसटले. खानदेशातील भिल्लांनीही तेरा वर्षे इंग्रजांशी झुंज दिली. बीडचे धर्माजी प्रतापराव, नांदेड जिल्ह्यातील हंसाजी नाईक हटकर, कित्तुरची रणरागिणी चन्नम्मा, कित्तुरचे रायप्पा या शूर स्त्रीपुरषांनीही इंग्रजांविरुद्ध निकराचा लढा दिला. उमाजी नाईक, सावंतवाडीचे आत्मा चौकेकर, राम सावंत, फोंडसावंत कोल्हापूरचे गडकरी तसेच चिमासाहेब भोसले यांनीही इंग्रजांना निमूटपणे शरण जाण्याचे नाकारले आणि पराक्रमाची शर्थ केली.*

*सातारकर छत्रपतींचे निष्ठावंत सेवक रंगो बापूजी यांनी छत्रपतींचे वकील म्हणून १५ वर्षे विलायतेत वास्तव्य केले. सनदशीर उपाय निष्फळ ठरलेले पाहून रंगो बापूजी हताश झाले नाहीत. १८५७ च्या उठावात रंगो बापूजी गुप्ते आणि त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या लढ्यास अपयश आले. काहींना आज्ञातवास किंवा कारावास पत्कारावा लागला तर काहींना फासावर चढवण्यात आले. १८५७ साली मुंबईतही उठावाचे पडसाद उमटले तसेच खानदेशातील काजीसिंग या भिल्ल नेत्यानेही सशस्त्र लढा दिला. नागपूर, औरंगाबाद येथेही इंग्रजांना प्रतिकारास तोंड द्यावे लागले. नरगुंदचे संस्थानिक बाबासाहेब भावे यांना इंग्रजांनी फाशी दिले तर जमखंडीचे संस्थानाधिपती रामचंद्रपंत पटवर्धन यांना नजरकैदेत पडावे लागले.*

*१८५७ च्या अयशस्वी उठावानंतर महाराष्ट्रात दोन दशके सर्वत्र सामसूम झाल्यासारखे वटले. पण दुष्काळ आणि साथीचे रोग यांनी थैमान घातल्यामुळे वासुदेव बळवंत फडके आणि त्यांचे शूर रामोशी सहकारी यांनी १८७९ मध्ये सशस्त्र उठाव केला. वासुदेव बळवंत फडके पकडले गेले. त्यांना १८८० च्या सुरूवातीस एडन येथे दीर्घमुदतीची सजा भोगण्यासाठी पाठण्यात आले. तेथेच हा विरपुरुष १७ फेब्रुवारी १८८३ रोजी मृत्यूच्या स्वाधीन झाला.*

*डॉ. वि. गो. खोबरेकर यांनी लिहिलेल्या या पुस्तकात १८२८ ते १८८४ या काळातील महाराष्ट्रातल्या स्वातंत्र्यालढ्यांची कहाणी सांगितलेली आहे. ती प्रेरणादायी ठरेल असे वाटते.*


**डॉ. य. दि. फडके**

२३ मार्च १९९५

अध्यक्ष

महाराष्ट्रात राज्य साहित्य संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका




वरील नकाशात महाराष्ट्रातील उठावाची ठिकाणे + अशा चिन्हाने दाखविण्यात आली आहेत.

अनुक्रमणिका

# प्रकरण पहिले

# महाराष्ट्रावर इंग्रजी सत्ता

### महाराष्ट्र

या भरतभूमीचे मुख्य नैसर्गिक विभाग दोन. आर्यावर्त आणि दक्षिणापथ. भूस्तरशास्त्रानुसार दक्षिणापथाचे दोन पोटभाग पडतात. सह्याद्रीच्या ढालीचा कृष्णप्रस्तर (Deccan Trap) प्रदेश आणि प्राचीन प्रस्तरांचा द्राविड प्रदेश. कृष्णप्रस्तर म्हणजेच महाराष्ट्र. डॉ. केतकर म्हणतात, "जेथे महाराष्ट्रीय भाषा बोलली जाते तो महाराष्ट्र."

### महाराष्ट्राच्या सीमारेषा[१]

महाराष्ट्राची उत्तर मर्यादा पश्चिम समुद्राला मिळणारी दमणगंगा नदी येथून पुढे घाटमाथ्यापासून ही सीमारेषा नर्मदा नदीपर्यंत उत्तरेस जाते. या प्रमाणे नर्मदा नदीच्या अनुरोधाने पूर्वेकडे सिवणी बालाघाटपर्यंत ही सीमारेषा जाते. नंतर पुर्वेकडे भंडारा जिल्हा अंतर्विष्ट करून पश्चिमेकडे जाऊ लागते. नंतर पैनगंगेच्या बाजूने माहूरावरून गोदावरीपर्यंत जाऊन नागमोडी मार्गाने ती नैर्ऋत्य दिशेस विजापूरला स्पर्श करून दक्षिणेस गोव्याकडे वळते व कारवारपर्यंत पोहोचते व तशीच खाली समुद्रकिनाऱ्याने जाऊन अरबी समुद्रास मिळते. या महाराष्ट्रात खालील भाग येतात.

(१) मुंबई महाराष्ट्र, (२) मराठवाडा, (३) विदर्भ.

यांपैकी मुंबई महाराष्ट्रावर पेशवे, मराठवाड्यावर निजाम, विदर्भावर नागपूरकर भोसले या एतद्देशीय सत्ताधाऱ्यांचा अंमल इ. स. १८०० च्या सुमारास होता. यावर्षी निजाम इंग्रजांचा मांडलिक बनला. पुढे पेशवाई लयास गेली. नागपूरकर भोसले उघडे पडले. त्यांची राज्ये इंग्रजांनी खालसा केली, महाराष्ट्रावर इंग्रजी सत्ता आली . ती कशी ते पाहू.

### पेशवाई

१७५० च्या सांगोल्याच्या [इ. स. १७५० मध्ये पेशव्यांनी छत्रपती रामराजांकडून एक करारनामा लिहून घेतला की पेशव्यांनी छत्रपतींच्या नावे मराठी दौलतीचा कारभार करावा. हा करारनामा सांगोल्यास झाला म्हणून त्यास सांगोल्याचा तह म्हणतात.] तहानंतर मराठेशाहीची सर्व सूत्रे पुण्याहून हालू लागली. पुणे हे मुंबई महाराष्ट्राच्या राजधानीचे ठिकाण बनले. या राजधानीचे रक्षण महाराष्ट्राभोवतील शेकडो संस्थानिक, मांडलिक आणि जहागिरदार करीत होते. त्यांना बाजीरावापासून फोडण्याचे काम इंग्रजांनी १८१७ च्या जूनच्या तहाने केले.[२] या नव्या तहाने महाराष्ट्राबाहेरील सर्व प्रदेश इंग्रजांनी आपल्या कबजांत घेतले. तहाप्रमाणे शिंदे, होळकर आदींचे बाजीरावाजवळ असलेले वकील पुण्याहून काढून त्याच्याजवळ असलेले पेशव्यांचे वकील परत बोलवावे लागले. यामुळे मराठे सरदारांशी बाजीरावाचा संबंध कायमचा तुटला. या तहामुळे बाजीराव उघडा पडला. त्याला एखाद्या लहानशा संस्थानिकाचा दर्जा राहिला. एवढ्या अपरंपार राज्याचा स्वामी यःकश्चित् इंग्रजांचा आश्रित बनला. आपल्याला क्षुद्र संस्थानिकाचा दर्जा प्राप्त झाला हे पाहून तो हळहळला,

अनुक्रमणिका

तडफडला आणि ऑक्टोबर १८१७ च्या एल्फिन्स्टनशी झालेल्या भेटीत तो त्याला दुःखातिशयाने म्हणाला, “मी मूळ मंत्रावेगळा तुमचे करण्याने झालो. जो मी होतो तो आज नाही तुमचे स्नेहाची जोड मात्र केली आणि जी कला अंगी होती ती दडवून बसलो.”[३] शेवटी इंग्रजांशी दोन हात करण्याचे बाजीरावाने ठरविले आणि त्याप्रमाणे इंग्रजांना दोन महिने चक्राकार फिरविले. अखेरीस राज्यावर पाणी सोडून जून १८१८ मध्ये शरणागती पत्करुन त्यास विठूरला ८,००,००० रु. मुशाहिऱ्यावर रहावे लागले.[४]

**छत्रपती सातारकर**

महाराष्ट्रावर इंग्रजी सत्ता सुरू झाली ती इंग्रजांच्या कपटचातुर्यामुळे मराठे लोकांना धनी नसता राजारामकाळी ते युद्ध कसे खेळले हे साहेबाला ठाऊक असावे. मराठी निष्ठा स्वातंत्र्याचे अधिष्ठान जे छत्रपती त्यावर, तेव्हा त्यासच इंग्रजांनी ताब्यात घेतले. छत्रपतीच्या वंशांतील प्रतापसिंह आपल्या सल्लागारांच्या सांगण्यावरून गोपाळअष्ट्याच्या लढाईत इंग्रजांना सामील झाला.[५] कॅ. स्मिथने त्याला आपल्या कॅम्पमध्ये नेले. एल्फिन्स्टनच्या सूचनेबरहूकुम हे काम झाले. साहेबाने याचा फायदा पुरेपूर घेतला. प्रतापसिंहास छत्रपती बनविले आणि सातारला छत्रपतीची स्थापना केली.[६] मराठी लोकांस इंग्रजांचे राज्य एकदम पेलणार नाही तेव्हा ते त्याविरुद्ध बंड करून उठतील हे एल्फिन्स्टनला ठाऊक होते म्हणूनच त्याने एक नवीन शक्कल काढली. एल्फिन्स्टन म्हणतो, “मराठ्यांची भक्ती छत्रपतीकडे लागावी म्हणून हा छत्रपती निर्माण केला.”[७] त्याप्रमाणे त्याने छत्रपतीच्या नावाने द्वाही फिरवली.

बाजीरावाशी युद्ध सुरू होताच “आमचे युद्ध फक्त बाजीरावाशी आहे. आम्हाला छत्रपतीचे राज्य कायम ठेवायचे आहे.” असा जाहीरनामा एल्फिन्स्टनने काढला.[८] लोक बाजीरावाच्या नादान कारभाराला कंटाळलेले होते. “बरे आहे छत्रपती येत आहे तर.” अशीच जणूं सामान्य जनांची समजूत झाली. प्रतापसिंह इंग्रजांना जाऊन मिळाल्यावर “बाजीराव बंड आहे; सबब आम्ही त्याला नोकरीतून दूर केले आहे.” असा जाहीरनामा एल्फिन्स्टनने प्रतापसिंहाकडून काढविला.[९] तसेच त्याच जाहीरनाम्यांत “बाजीरावास कोणी मामलेदाराने मदत करू नये, इंग्रजांस अडथळा करू नये,” अशा प्रकारचा मजकूर छापवला.[१०] अशा रीतीने इंग्रजांनी लोकांना व प्रतापसिंहास असे दोघांनाही फसविले. कॅ. ग्रॅन्ट हा छत्रपतीच्या सल्लागार म्हणून निवडला.[११] त्याला या धूर्त एल्फिन्स्टनने अशा सूचना दिल्या की, “राजाला स्वतःला सार्वभौम असे वाटत आहे, तेव्हा त्याच्याशी अशी भाषा ठेवायची की त्याला आपण मांडलिक आहोत की सार्वभौम याचा सुगावा लागता कामा नये. मात्र त्याच्याशी वागताना त्याला न दुखवता व मान राखूनच वागायचे.”[१२] ग्रॅन्टने हे बरोबर पाळले आणि दोन वर्षाच्या आत प्रतापसिंहास आपण कोण हे कळून आले. एल्फिन्स्टन साहेबाने आपले खरे दात दाखविले आणि प्रतापसिंहाने तगादा लावFल्यावर १५ सप्टेंबर १८१९ मध्ये कंपनी सरकारने प्रतापसिंहाशी तह करून त्याला १४ पेट्यांचे संस्थान दिले.[१३] त्यात निरा व वारणा या नद्यांमधील भीमा व कृष्णा यांच्या संगमापावेतो मुलुख आला. प्रतापसिंहास यावेळी कंपनी सरकारचा हेतु कळून चुकला. पण स्वतःला एवढ्या अवाढव्य शक्तीशी भांडणे शक्य नसल्यामुळे त्याने असेल त्यात समाधान मानून राहावयाचे असे ठरविले. त्याने पुढील दहा वर्षे राज्यकारभार शहाणपणाने व अक्कलहुशारीने चांगला केला. बाळाजीपंत नातूस हे पाहावेना. त्याने आणि नंतरच्या रेसिडेंटांनी राजाविरुद्ध कुभांड रचिले.[१४] याचा शेवट राजास १८३९ मध्ये पदच्युत करून बनारसला पाठविण्यात झाला.[१५]

तदनंतर अप्पासाहेबांची कारकीर्द सुरू झाली. ती १८४७ मध्ये संपली.[१६] अप्पासाहेब आणि प्रतापसिंह दोघेही निपुत्रिक वारले. त्यामुळे औरस वारस नाही आणि दत्तक विधान नामंजूर या दोन्ही

सबबींवर हे राज्य १८४८ मध्ये डलहौसीने खालसा केले.[१७] राज्य खालसा केल्याने इंग्रजांचा अंमल साक्षात चालू झाला. राज्य उत्पन्न कां केले आणि ते खालसा कां करावयाचे याबद्दल डलहौसी आपल्या ता. ३० ऑगस्ट १८४८ च्या खलित्यांत म्हणतो "१८१८ साली पेशवाईचा नुकताच लोप झाल्यामुळे इंग्रजी सत्तेला महाराष्ट्राचा पाठिंबा मिळावा म्हणून त्यावेळी सातारचे राज्य अबाधित राखणे अत्यंत जरूर व शहाणपणाचे असेल—नव्हे होतेही. त्याकरिता त्या वेळचे अधिकारी प्रशंसेस पात्र आहेत. पण पेशवाई ताब्यांत घेऊन आतां वीस वर्षे लोटली. प्रजाही दंगाधोपा न करता शांतपणे नांदत आहे यामुळे इंग्रज राज्य आता मजबूत झाले असून शिंदे होळकर हे निरुपद्रवी बनले आहेत. तेव्हा शिवाजीच्या वंशाचे हे बुजगावणे यापुढे ठेवण्यात काहीच मतलब नाही."[१८]

डलहौसीने आपल्या मनाप्रमाणे सातारची गादी बुडविली. पण त्यामुळे एकंदर सारा देश हळहळला. कारण सातारा हे मराठी साम्राज्याचे आदिपीठ होते. अशा रीतीने हे संस्थान बुडविल्यावर त्यांचेवर अवलंबून असणाऱ्या शेकडो हजारो आश्रितांना बेकार व्हावे लागले. सैनिक व शिपाई बेकार होऊन भिकेला लागले.

**मराठवाड्यावर इंग्रजी सत्तेची छाया**

१२ ऑक्टोबर १८०० च्या तहाने[१९] स्वतंत्र निजाम इंग्रजांचा मांडलिक बनला. तैनाती फौजेचा स्वीकार करणे त्याला भाग पडले. तहाप्रमाणे इंग्रजी पथके निजामाच्या राज्यात राहू लागली. युरोपियन रेसिडेंटाच्या संमतीने राज्यकारभाराची सूत्रे हालू लागली. शिकंदराबाद, हैदराबाद वगैरे ठिकाणी युरोपियनांच्या वसाहती सुरू झाल्या. ब्रिटिशांची पडछाया संस्थानच्या राजकारणावर पडू लागली. या संस्थानात मराठी पाच जिल्हे औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी व उस्मानाबाद हे होते. यांनाही या इंग्रजांच्या राजकीय मालकीचा प्रसाद हळूहळू मिळू लागला. वऱ्हाड हातचे गेले.

बुलढाणा, अकोला, अमरावती व यवतमाळ असे वऱ्हाडचे चार जिल्हे. हा नागपूरकर भोसल्यांचा प्रदेश. पण भोसले व कंपनी सरकार यांमध्ये झालेल्या ता. १७ डिसेंबर १८०३ च्या तहान्वये भोसल्याने वऱ्हाड इंग्रजांस दिले.[२०] याच सुमारास इंग्रजांचे मराठ्यांशी युद्ध सुरू होते. निजामाने इंग्रजांची बाजू बरीच सावरून धरली. इंग्रजांस यश आले. मैत्रीचे फळ म्हणून इंग्रजांनी वऱ्हाड प्रांत निजामास ता. २८ एप्रिल १८०४ च्या तहान्वये देऊन टाकला.[२१]

**वऱ्हाडाला निजामी प्रसाद**

निजामाच्या ताब्यांत हा प्रदेश आल्यानंतर त्याने त्यापूर्वीची जमीनधाऱ्यानी सुरक्षित पद्धती मोडून मक्तेदारी सुरू केली. मक्तेदार नफ्याकरिता मक्ता करीत असे. त्याला रयतेच्या कल्याणाची फिकीर नसे. राज्य हे पैसा मिळविण्याचे साधन एवढाच अर्थ मनांत ठेवून हे मक्तेदार, पोटमक्तेदार व त्यांचे हस्तक प्रजस फार त्रास देऊ लागले. निम्मे प्रांत निरर्थक जहागिरींनी अडविल्यामुळे उत्पन्न थोडे आणि खर्च फार अशी स्थिती झाली. यामुळे राज्यकारभारांत गोंधळ सुरू झाला. राज्यकारभार नीट चालविण्यासाठी निजामाने ब्रिटिश सरकारकडून वारंवार कर्ज घेतले ते १८५० मध्ये ७० लाखांवर आले. तैनाती फौजेचा पगारही तुंबला. रयतेवरचा जुलूम चालूच राहीला. शेवटी इंग्रजी खजिन्यांतून सैनिकांना पगार देणे सुरू झाले. सर्व रक्कम परत करण्याचा तगादा ब्रिटिश सरकारने निजामास सारखा लाविला. त्यामुळे निजामाने सदरहू

अनुक्रमणिका

कर्जाकरिता वऱ्हाड प्रांत इंग्रजांना १८५३ मध्ये देऊन टाकला.[२२] तिथून वऱ्हाड हे मध्य प्रदेश सरकारच्या ताब्यांत शेवटपर्यंत राहिले.

**नागपूरकर भोसले**

नागपूरकर भोसले हे मध्यप्रांताचे धनी. त्यांच्या ताब्यांत महाराष्ट्रापैकी वऱ्हाड व वर्धा, नागपूर, भंडारा व चांदा एवढा प्रदेश होता. पैकी वऱ्हाड इंग्रजांच्या ताब्यांत कसा गेला हे ठाऊक झाले. बाकी चार जिल्हे नागपूरच्या इतर राज्यप्रदेशाबरोबरच इंग्रजांनी आपल्या घशाखाली उतरवले.

नागपूर राज्याचा सर्वाधिकार दुसरा रघोजी ता. २२ मार्च १८१६ मध्ये वारला.[२३] तदनंतर अप्पासाहेबाने इंग्रजांचा आधार आपणांस अनेक दृष्टीने आवश्यक आहे असे समजून त्यांजबरोबर ता. २८ मे १८१६ रोजी तैनाती फौजेचा तहनामा केला.[२४] या तहाने नागपूरकर भोसले हे इंग्रजांच्या छत्राखालील एक मांडलिक संस्थानिक झाले. अशा स्थितीत अप्पासाहेब २१ एप्रिल १८१७ रोजी गादीवर बसला.[२५] गादीवर आल्यानंतर त्यास इंग्रजांचे पाशातून मोकळे होण्याची इच्छा झाली. त्याकरितां त्याने आपल्या परीने खूप धडपड सुरू केली. पेशवे, शिंदे, होळकर वगैरेंशी गुप्त पत्रव्यवहार सुरू केला. पण हा सर्व गुप्त पत्रव्यवहार फितुरीमुळे इंग्रजांचे हाती जाई. वकिलांची गुप्त खलबते हेरांकडून इंग्रजांना कळत.[२६]

**अप्पासाहेबांचा इंग्रजांवर दांत**

पेशव्यांशी इंग्रजांची लढाई ता. ५ नोव्हेंबर १८१७ रोजी सुरू झाली व त्याच दिवशी शिंद्यांचा इंग्रजांशी ग्वाल्हेर येथे तह झाला. या दोन्ही बातम्या नागपूरचे रेसिडेंटास १४ नोव्हेंबर रोजी समजल्या.[२७] तत्पूर्वी अप्पासाहेबाने "सेनासाहेबसुभा" या पदवीची वस्त्रे आपले वकील पुण्यास पाठवून बाजीराव पेशवे यांजकडून मिळवली. अप्पासाहेबाने ती वस्त्रे व किताब घेण्याचा जाहीर दरबार सुमुहूर्ताने ता. २४ नोव्हेंबर १८१७ रोजीच ठरविला.[२८] त्याप्रमाणे समारंभ करवूनही घेतला. रेसिडेंटास बोलविणे पाठविले ते नाकारून त्याने "तुम्ही आमच्या शत्रूकडून अशी वस्त्रे घेऊ नयेत" असे बजावले. आपल्या इच्छेविरुद्ध समारंभ पार पाडलेला पाहून इंग्रजांस राग आला आणि समारंभास आमत्रंण पाठवूनही इंग्रज हजर राहिला नाही म्हणून अप्पासाहेबाने थोडी कच खाल्ली. तेव्हा त्याचा पराभव होऊन इंग्रज ता. ३० डिसेंबर १८१८ रोजी राजवाड्यांत घुसले आणि त्यांनी राजवाड्यावर इंग्रजी निशाण चढविले.[२९] अप्पासाहेबास इंग्रजांच्या सर्व शर्ती पुऱ्या कराव्या लागल्या. अप्पासाहेब अशा रीतीने इंग्रजांचा पूर्ण मांडलिक बनला.

**अप्पासाहेबास कैद**

राजवाडा व सर्व शहर इंग्रजांच्या ताब्यांतच राहिले. अशा स्थितीत अप्पासाहेबांवर फितुरीचा आरोप ठेऊन त्याला ता. १५ मार्च १८१८ रोजी कैद केले[३०] आणि त्याची रवानगी प्रयागास करण्याचे ठरले.[३१]

**अप्पासाहेब कैदेतून निसटतो**

प्रयागास बंदी म्हणून घेऊन जात असतां रायपूर मुक्कामी ता. १३ मे रोजी अप्पासाहेबाने आपली शिवाजीसारखी विस्मयकारक सुटका करून घेतली.[३२] तो जो तिथून निसटला तो नेमाडात महादेवाचे

अनुक्रमणिका

डोंगरांत गोंड राजाचे आश्रयास जाऊन राहिला. त्याने इंग्रजांस तेथे राहून दोन वर्षे दमविले. त्याला पकडण्याकरिता लाखो रुपायांची बक्षिसे जाहीर करूनही तो दोन वर्षे पावेतो इंग्रजांच्या हातास लागला नाही.[३३] नागपूरचे गेलेले राज्य कसे मिळवावे ही एकच चिंता अहर्निश अप्पासाहेबांना लागली होती. विनाशकालाच्या त्या अंधारांत अप्पासाहेब राष्ट्रोद्धाराच्या तेजस्वी बाण्याने फार दिवस चमकत राहू शकला नाही. देशांत इंग्रजी सत्ता वाढीला लागली होती. त्याचा पाठलाग सारखा चालू होता. अखेरीस जोधपूरच्या राजाने त्यास आश्रय दिला आणि जोधपूरमध्येच हा शेवटचा शूर मराठा राजपुरुष ता. १५ जुलै १८४० रोजी निधन पावला.[३४]

## नागपूर राज्य खालसा

अप्पासाहेबांस नागपूरांतून काढून बाहेर पोहोचविल्यावर रेसिडेन्टाने तिसऱ्या रघुजीस गादीवर बसविले व राज्यकारभार आपल्याकडे घेतल्याबद्दल जाहीरनामा काढला.[३५] नवीन राज्याच्या नावाने जरी जाहीरनामा काढला तरी संस्थानांतील सर्व अधिकाऱ्यांनी रेसिडेंटाच्या हुकुमाप्रमाणेच वगायचे असे ठरले. अशा रीतीने रेसिडेंट जेकिन्सने सर्व अधिकार आपल्याकडे घेऊन संस्थान खालसा केल्यासारखेच केले होते, तरीपण नावाला राजा म्हणून तिसरा रघूजी होता. तो राजवाड्यांत ता. ११ डिसेंबर १८५३ रोजी निधन पावला.[३६] इंग्रजाने रघुजीस पुत्रसंतान नाही या सबबीवर हे चिमुकले संस्थान खालसा केले.[३७]

## राजवाड्यांतील सामानाची लूट

राणी बांकाबाई पहिल्यापासूनच इंग्रजांस अनुकूल होती. म्हणून तिला इंग्रजांनी नेमणूक करून दिली आणि राज्य खालसा झाल्यावर राजवाड्यांतील व इतर ठिकाणचा माल इंग्रजांनी जप्त करून नेला. भोसल्यांनी पूर्वी दिग्विजय करून आजवर जी अपार संपत्ती मिळवून ठेवली होती तिची त्यांनी राजरोस लूट केली.[३८] त्यांत अत्यंत मौल्यवान राजरत्ने असून त्या संपत्तीची किंमत सुमारे ८० लाख पौंडावर असावी. बांकाबाईच्या समोर तिच्या वाड्यांतील माल हत्ती, घोडे व इतर जनावरे, खजिना व जवाहीर नेऊन भराभर विकू लागले. १०० रुपायांची वस्तू ५ रुपायांस विकली जाई. तिची अत्ता फारच केविलवाणी स्थिती झाली. तिने अर्जविनंत्या करून पाहिले. निदान राजवाड्यांतील फर्निचर तरी हलवू नका म्हणून विनविले तरी तिच्या विनंतीस कोणीही जुमानले नाही. जवाहीर नागपूरास विकले जाईना म्हणून कलकत्त्यास नेऊन विकले. त्यासंबंधीची लिलावांची जाहिरात ता. १२ ऑक्टोबर १८५५ च्या कलकत्ता मॉर्निंग क्रॉनिकलमध्ये दिली व लाखो रुपयांचे जवाहीर कवडीमोलाने विकून काढले. भोसल्यांच्या राजलक्ष्मीचा एखाद्या नादार इसमाच्या सामानाप्रमाणे जाहीर लिलाव करण्यात आला.[३९]

## इनाम कमिशन नेमले

पेशवे, सातारकर, नागपूरकर यांची अशी वासलात लागली. त्यांच्या पदरचे आश्रित, सैन्यांतील शिपाई व अधिकारी रस्त्यावर पडले. त्यांच्या जोडीला इंग्रजांनी, संरजाम-जहागिरदारांनाही भिकेस लावले, ते सारे काही कायद्याच्या अधिकारावर. इंग्रज सत्ताधीश झालेले. त्यांची सत्ता कायद्यावर चाललेली व कायद्याने आधारलेली, तेव्हां येथील राजेरजवाड्यांनी व सरंजामदारांनी आपले हक्क शाबीत करावे याकरितां इनाम कमिशन नेमले[४०] व कायदेशीर लुटीला सुरुवात झाली.

अनुक्रमणिका

**इनाम कमिशनची कामगिरी**

इनाम कमिशन १८४३ मध्ये बसल्यावर सरदार व इनामदारांच्या हक्क तपासणीस सुरुवात झाली. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यास आपआपल्या जिल्ह्यांतील इनामदार व जहागिरदार यांची तपशिलवार यादी पाठविण्यास सांगितले. या याद्या गोळा झाल्यावर इनाम कमिशनकडून इनामदारांच्या हक्क तपासणीस सुरुवात झाली. पेशवाई दप्पर लावण्याच्या मिशाने अमुक मुदतीत सर्वांनी आपले जुने कागद आणून हजर करावे असा हार्ट साहेबांनी जाहीरनामा लावला व काही कागद येण्यास सुरुवातही झाली. तो दुसरीकडे एका अधिकाऱ्याने त्यांतील कागद जाळण्यास सुरुवात केली. त्यामुळे लोक अग्नीच्या भयाने कागद हजर करीनात. तेव्हा लोकांची घरे जप्त करावी, मुसलमान व मराठे लोक घरांत घालून दंगा मांडावा, दिवसा मशाली लावून घरांतून कागदांचा पुर्जानपुर्जा सरकारकचेरीत न्यावा, इमारतीत खणत्या लावाव्या असे सक्तीचे उपाय योजले जाऊन होळकरांच्या दंग्याची पुणेकरांना आठवण झाली. कागद मागून न्यावे व ते पुन्हा देऊ नयेत अशी उदाहरणे पुष्कळ घडली. यामुळे इनामकमिटीच्या कारभारसंबंधाने लोकांत अविश्वास उत्पन्न झाला होता.[४१] "वंश नाही" म्हणून इनामकमिटीने मुंबई लगतचे आंग्रे संस्थान बुडविले त्यामुळे त्या बिचाऱ्यांचे खाजगी इनाम, वतन, देशमुखी, पाटिलकी सर्व घेतले. खाजगी मिळकत सरकारने घ्यावयाचे कारण नाही पण तिचाही चुराडा झाला. असे उदाहरण शेवटचे बाजीराव पेशवे यांची जी अगदी वाईट कारकीर्द त्यातही आठवणार नाही. काही तरी निमित्ताने संस्थान खालसा करावे व त्याजबरोबर खाजगी मिळकत घशांत उतरावी असा क्रम चालला होता.[४२]

इनाम कमिशनने बत्तीस हजार इनामांची चौकशी केली आणि त्यांतही एकवीस हजार वतने मालकीचा पुरावा नाही म्हणून जप्त केली. मूळ पुरुषाच्या हयातीपर्यंत इनाम चालावे असे जेव्हा फैसले झाले त्याच्यापूर्वीच ते पुरुष मेले होते. सबब त्यांचे पुत्रापासून ती इनामे हिसकावून घेतली. त्यावेळी त्यांची अकस्मात आकाश कोसळावे अशी स्थिती झाली. ते सर्व नाहीसे झाले. "ज्यांच्यावर अनेक आश्रित अवलंबून असून ज्यांचे आयुष्य सुखांत व ऐश्वर्यात गेले होते त्यांचेवर एकाएकी खडकावर उभे राहाण्याची पाळी आली." वतन आणि जमीन या दोन गोष्टी मराठ्यांना आजवर प्राणाहून प्यार होत्या. महादजी शिंदे दिल्ली पदपादशाहीचा वजीर स्वतःस पाटीलबाबा म्हणून घेण्यांत भूषण मानीत असे हे सर्वांस ठाऊक आहे. वतने मिळविण्याकरितां आणि त्यांचे रक्षण करतांनाही कित्येकांनी आपले रक्त सांडले होते पण सर्व इंग्रजांच्या विश्वासघातकी स्वभावामुळे फुकट गेले आणि यापुढे इंग्रजांची जातच विश्वासघातकी आहे हे लोकांना कळून चुकले.

आधार : (१) Bhandarkar, Early History of the Deccan (Collected Works of Shri. R. G. Bhandarkar, Vol. III) pp. 5-6. Kane, Ancient Geography and Civilisation of Maharashtra, J.B.B. R A S 24, pp. 613-657. (२) Aitchison, Treaties Engagements and Sanads, Vol. III, article IV, p. 63. (३) सरदेसाई मराठी रियासत, उत्तर विभाग, भा. ३. पृ. ४८३. (४) Poona Residency Correspondence, Vol. III, p. 373. (५) Poona Residency Correspondence, Vol. III, p. 309. (६-७) Poona Residency Outward, Vol. 52, pp. 13-38. (८) Selection from the Records of Bombay Government, XLI New Series, pp. 46-48. (९-१०) Memorial to H. M. the Queen from H. H. Sagunabai Saheb, pp. 342-43, Extract 248. (११) Memorial to H. M. the Queen from H. H. Sagunabai Saheb, pp. 343, Extract 249. (१२) P. R. O. Vol. 52, pp. 13-58 (१३) Aitchison, Vol. VIII, pp. 391-

अनुक्रमणिका

93. (१४) Satara Residency Records, Vol, 3. Poona Daftar. (१५) Political Deptt. 1839, Vol. 17. (१६) Parliamentary Papers Relative to the Raje of Satara, p. 64. (१७) Parliamentary Papers Relative to the Raje of Satara, P. 4, Notification of 16th May 1849. (१८) Parliamentary Papers No. 51-54, p. 80. (१९) Aitchison, Vol. IX, pp. 62-68. (२०) काळे, वऱ्हाडचा इतिहास, पृ. ४१८-४१९. (२१-२२) काळे, वऱ्हाडचा इतिहास, पृ. ४२०. (२३) काळे, नागपूर प्रांताचा इतिहास, पृ. ३८६. (२४-२८) Nagpur Residency Records, Part III, p. 59. (२९-३१) Nagpur Residency Records, part III, pp. 53-56. (३२-३३) Nagpur Residency Records, Part III, Vol. 4, p 283 (३४) काळे, नागपूर, पृ. ४६५. (३५) काळे, नागपूर, पृ. ४८३. (३६-३७) काळे, नागपूर, पृ. ५०७. (३८-३९) काळे, नागपूर, पृ. ५२५-५२७. (४०) Selection from the Records of Bombay Government XXXI-New Series, Correspondence exhibiting the results of the Scruiny by the Inam Commission (1856.) (४१) मुंबई इलाख्यांतील इनाम कमिशन खात्यांतील गैरइन्साफ (१८५९), पृ. ६१-६३. (४२) प्रा. प्रियोळकर-लोकहितवादीकृत निबंधसंग्रह (प्रथमांश) पृ. ५६८.

# प्रकरण दुसरे

# महाराष्ट्राचा आर्थिक व सामाजिक अपकर्ष

## असंतुष्टता व अप्रीती

मराठी राज्य खालसा झाल्यामुळे त्यावर अवलंबून असणारे हजारो लोक उघडे पडले. महाराष्ट्रीयांचे जीवन त्यावेळी मुख्यतः सैन्यांतील बारगिरी व शेतीवर अवलंबून असे. कुटुंबांतील निम्मे लोक नोकरीवर व निम्मे शेतीच्या उत्पन्नावर जगत असत. इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर बारगिरी बंद पडली. कुटुंबाचे निम्मे उत्पन्न बंद झाले. घरची तट्टे विकावी लागली आणि घरी करीत असलेल्या तुटपुंज्या शेतीवरच सर्वांना उदरनिर्वाहाकरिता अवलंबून राहावे लागले. चॅपलिनच्या [डेक्कन कमिशनर एल्फिन्स्टन याची नेमणूक मुंबईच्या गव्हर्नरपदी दि. १ नोव्हेंबर १८१९ रोजी केल्यावर डेक्कन कमिशनरच्या जागी कॅ. चॅपलीनची नेमणूक झाली.] मताप्रमाणे त्यावेळे सुमारे तीस हजार लोक सैन्यांतून कमी केले.[१] या तीस हजारांना घरच्या शेती उत्पन्नावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या घासांत वाटेकरी व्हावे लागले.

## शेतकऱ्यांचे हाल

बरे शेती तरी त्यावेळी उत्तम चाले असेही नाही. इंग्रजी अंमल आल्यावर जास्तीत जास्त नुकसान कोणाचे झाले असेल तर ते शेतकऱ्यांचे मराठी राज्यांत आपल्या मालाची किंमत ते जिन्नसांत घेत असत आणि त्यामुळे त्यांचे नुकसान होत नसे. परंतु नव्या जमान्यातं त्यांना शेतसारा पैशाच्या रूपाने सरकारला आणि व्याजही पैशाच्या रूपाने सावकाराला द्यावे लागू लागले. सरकारने पिकांची पाहणी करून जमीन महसुलाचे कमाल आकार ठरविले. हे ठरवितांना अवर्षण, दुष्काळ अगर इतर आपत्ती याचा विचार सरकारने बिलकूल केला नाही. जास्तीत जास्त उत्पन्न काढण्याच्या या सरकारी ससेमिऱ्यामुळे लोक हवालदिल झाले. त्यातच धान्याचे भाव उतरू लागल्यामुळे चढत्या दराने ठरविलेला शेतसारा भरायला शेतकऱ्याकडे पैसे मिळेनात. चलनांत व्यवहार सुरू करूनही चलनबाजारांत भरपूर चलन नसल्यामुळे ते वापरण्यास मिळण्याची टंचाई पडू लागली. त्यांतच १८२४ मध्ये महाराष्ट्रांत दुष्काळ पडलेला. या दुष्काळी स्थितीतही शेतकऱ्यांकडून सारा वसूली तीच कायम ठेवली. त्यामुळे लोकांवर मोठा घोर प्रसंग गुदरला. शेतकरी आपली घरेदारे सोडून वाट फुटेल तिकडे जाऊ लागले. एकट्या इंदापूर तालुक्यांत ५७ गावे सोडून गावांतील कुटुंबे गेल्याचे पुण्याचा कलेक्टर रॉबर्टसन कळवितो.[२]

या दुष्काळी स्थितीवर कलेक्टर व डेक्कन कमिशनर यांमधील पत्रव्यवहार खूपच आहे तो सर्वच्या सर्व वाचून हृदयाला पीळ पडतो, मन विषण्ण होते. अवर्षणामुळे पीक नाही; पीक नाही म्हणून धान्य नाही आणि धान्य नाही म्हणून लोक अन्नान्नदशेला पोहोचलेले. त्यातच कॉलऱ्यासारख्या रोगाने आपल्या कराल दाढा उघडल्याने कैक लोकांचे बळी घेतले. ना औषध ना पाणी. कडबा आणि पाण्याच्या टंचाईमुळे जनावरेही मेली. त्यामुळे जे थोडे लोक या आपत्तीतून राहिले तेही परागंदा झाले. बाकीचे मुत्यूमुखी पडले. यामुळे गावेच्या गावे ओस पडली. लागवडोपयोगी शेकडो जमिनी उजाड राहिल्या. जे लोक घरेदारे सोडून गेले त्यांच्या घरांवर छपरेसुद्धा राहिली नाहीत. अहमदनगरच्या कलेक्टरला त्याच्या दौऱ्यांत फक्त घरांच्या भिंती उभ्या असलेली शेकडो गावे दिसली.[३]

अनुक्रमणिका

### जमीनधाऱ्याची जाचक पद्धत

अवर्षण आले. लोक भिकेस लागले म्हणून सरकारने कमाल जमीनसारा वसूल करण्यामध्ये ढिलाई केली की काय? बिलकूल नाही. सरकारी अधिकाऱ्यांची आपली कमाल उत्पन्नावर भर आणि कमाल वसुलाची जाचणी. त्यामुळे लोकांना ही पद्धत एवढी जाचक झाली की शेतकऱ्यांमध्ये हाहाःकार उडाला. याबाबतीत गव्हर्नर मालकम स्वतः १८३० च्या सुमारास लिहीतो, "या पद्धतीमुळे पुष्कळ जिल्ह्यांतील व गावांतील सर्वसाधारण रयतेने सरकारने सुरू केलेल्या या खर्ची करणाऱ्या अन्यायी पद्धतीविरुद्ध जोरदारपणे तक्रार केली आणि पुष्कळ उदाहरणे अशी आहेत की जिल्ह्यांतील व गावांतील रहिवाशांनीही कित्येक महिने आपली घरेदारे सोडून, मुलाबायकांना टाकून याबाबतीत न्याय मिळण्याकरिता गव्हर्नरची गांठ घेण्याचा प्रयत्न केला."[४]

### धान्यमहागाईमुळे दंगा

असे असूनही सरकारच्या आटोक्यांत धान्यपरिस्थिती आली नाही असे दिसते. कारण १८३२ मध्ये पुण्यांत या धान्यमहागाईमुळेच दंगा झाल्याचे वृत्त कलेक्टरने सरकारला कळविले आहे. "१८३२ मध्ये खरीप पीक आले नाही, सरकारने बाहेरून धान्य आणण्याची व्यवस्था करायला हवी होती तीही केली नाही. धान्यआयात परप्रांतातून न झाल्यामुळे व्यापारी लोकांनी त्याचा फायदा घेतला. धान्याचे दर भराभर वाढले. ऑक्टोबर १८२६ मध्ये १ रुपयास प्रत्येकी बाजरी २५ शेर, ज्वारी ३२ शेर, गहू २२ शेर, चणा १७॥ शेर, तांदूळ १३ शेर असा धान्याचा भाव होताच तोच ६ नोव्हेंबरला १ रुपयास प्रत्येकी शेर बाजरी, १० शेर ज्वारी, १५ शेर गहू, ८ शेर चणे, व ८ शेर तांदूळ असा झाला. अशी दुप्पट महागाई झाल्यावर दंगा नाही झाला तरच नवल. ६ नोव्हेंबरला सर्व जातीचे आणि सर्व वर्गाचे हजारो लोक बाजारांत एकाएकी जमले आणि त्यांनी मोहल्या मोहल्यांतून असलेल्या धान्य दुकानदारांवर हल्ले चढविले. दुकाने लुटली. धान्य रस्त्यावर आणले. काही दुकानदारांना बेदम मारलेही."[५] अर्थात सरकारने पोलिसी बडगा उचलून या दंगलखोरांना वठणीवर आणले हे सांगावयास नकोच.

### कायमधाऱ्याच्या पद्धतीमुळे दंगल

ही पद्धत लोकांना एवढी जाचक वाटत होती की बोलता सोय नाही. त्यावेळी जमीन पहाणी करण्याकरिता व सीमा ठरवून दगड लावण्याकरिता सरकारी अधिकारी आले म्हणजे लोकांच्या अंगाचा थरकाप व्हायचा. आपणांस आतां डोईजड सारा भरावा लागणार या चिंतेने लोक व्याकूळ व्हायचे. त्यांच्या रागाची परमावधी व्हायची. १८५२ मध्ये खानदेशची जमीन पाहणी करण्याकरिता गेलेल्या अंमलदारांवर तेथील रयतेने हल्ला चढविला. खानदेशमधील शाहडा, यावल आणि चोपडे अशा तीन तालुक्यांची जमीन पहाणी करून सीमा ठरवून दगड लावण्याचे काम करण्याकरिता दाविडसन नावाचा अंमलदार शाहडा तालुक्यांत आपल्या लव्याजम्यासह गेला. पाहणी करायला सरकारी अधिकारी येणार ही बातमी ऐकून लोक बिथरले होतेच. तेव्हा अधिकारी व त्याचे लोक पाहून जनतेचा तोल गेला. त्यांनी जमाव केला. एका शिपायास मारले व तुडविलेही, पण एवढ्यावरच ही गोष्ट थांबली नाही. याच जमावाने दुकानदारांना या सरकारी अंमलदारांस व त्याच्या माणसांस धान्य न देण्याबद्दल बजाविले. तसेच तालुक्यांत सापडणारे दगडही लांबविले. त्यामुळे दगड आणण्याचे काम एवढे महागले की १२ दगडांना २७ रुपये मजुरी ते दगड

शेतांत आणण्याकरिता द्यावी लागली. यावर उपाय म्हणून त्या वेळच्या एल्फिन्स्टन कलेक्टरने सरकारला नवीन सारापद्धती बंद करण्यास सांगितले. हा प्रकार नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात झाला.[६]

**डोईजड कर**

१८३३ च्या चार्टर ॲक्टपासून कंपनी सरकारला आपली सत्ता वाढविण्याची हाव सुटली. हिंदुस्थानचा अवाढव्य प्रदेश हा हा म्हणता त्याच्या भक्ष्यस्थानी पडल्यावर त्यांना आजूबाजूचा प्रदेश आपल्या ताब्यात आणण्याची हाव न सुटली तरच नवल. त्याकरिता त्यांना युद्धे करावी लागली. (१८३३ पासून १८५७ पर्यंत) म्हणजे २४ वर्षे इंग्रज सरकार जणू काय "युद्ध स्थितीतच" होते. पण ही साम्राज्यपिपासू युद्धे हिंदुस्थानाच्या सीमेबाहेरील जगाशी होती. त्यामुळे झाले काय की, सरकारने आपल्या अंमलाखाली आणलेल्या प्रदेशांतील लोकांना जी आश्वासने प्रथम दिली होती ती आश्वासने कायमची बदलली आणि या युद्धांकरिता जो खर्च आला त्याचा भुर्दंड हिंदुस्थानच्या माथी आला. कुसपट काढून युद्ध ओढवून घ्यायचे, ती जिंकण्याकरिता जीत घ्यायची, त्याकरिता आपल्या लोकस्थिती सुधारणेच्या पूर्वीच्या योजना बदलायच्या, युद्धाकरिता प्रथम जय्यत तयारी करायची, त्याकरिता जी युद्धसामग्री पाहिजे तिचा खर्च हिंदुस्थानच्या उत्पन्नांतूनच भागवावयाचा, असे सारखे चालले होते. यामुळे उत्पन्न वाढविण्याकरिता निरनिराळे कर आले आणि लोकांच्या क्रयशक्तिवर परिणाम झाला. कोणतेही सरकार आणि त्यातूनही परकीय देशांतील लोकांचे नुकसान, त्यांचे हाल, युद्धाचा बोजा ठेवून करू शकणार नाही. पण इंग्रजांनी ते केले. लोकांमध्ये असंतोष पसरला.

**व्यापारधंदे मारले**

प्रथम परकीय व्यापारी हे हिंदभूमीतून सोने नेण्याकरिता येत असत. हिंदुस्थानवर सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर त्यांनी मुद्दामच हिंदमधील तयार होणारा माल, हातधंदे नाहीसे केले. १८१९ पासून युरोपियन वस्तूंवरील आयात कर माफ केला.[७] त्यामुळे त्या वस्तू बाजारांत कमी किमंतीने मिळू लागल्या. युरोपियन मालाला मागणी येऊ लागली. पुण्यांतील जरीचे व रेशमी कापडाचे व्यापारी व मागवाले जे पैठणच्या व्यापाराची बरोबरी करत असत त्यांच्याकडे रेशमी माल व भरजरी कपडे यांची मागणी कमी झाल्याने ते दरिद्र दशेला आले.[८]

सहा महिने शेती करून उरलेल्या सहा महिन्यांत शेतकरी ग्रामोद्योग करीत असे. जाडेभरडे कापड विणणे हे त्याचे मुख्य काम. पण आंग्लाई आल्यानंतर हे जाडेभरडे कापड बाजारांत न दिसता त्याऐवजी तलम कापड दिसू लागले.[९] त्यामुळे हा ग्रामद्योग बसला, लोक भिकेस लागले. हिंदचा कापडाचा व्यापार तर इंग्रजांनी साफच बुडविला. १८१६-१७ मध्ये सबंध हिंदुस्थानला पुरेल एवढे कापड हिंदमध्ये पैदा होऊन आणखीन् १६.५० लक्ष पौंड किंमतीचे कापड बाहेर जात होते. पण पुढील तीस वर्षात कापड बाहेर जाणे तर सोडाच परंतु चार लक्ष पौंड किंमतीचे कापड दरवर्षी आयात होऊ लागले.[१०] तसेच मौल्यवान धातूंची आयात बंद केली. त्यामुळे जुन्या दागिन्यांच्या व्यापारास ऊत आला. याच कारणामुळे लोकहितवादी म्हणतात "इंग्रजी झाल्यावर वीस वर्षेपर्यंत अतिशय दरिद्र स्थिती होती. सस्ताआी फार... जमिनी सस्त, घरे सस्त, सोने रुपे सस्त, जुन्या काळचे दागिन्यांनी सर्व बाजार भरलेला असे. वाई साताऱ्याकडे रुपयाचे ७ शेर लोणी पण पैसा नाही. अशी स्थिती होती. मामलेदारांनी वसूल करतां करतां बेजार व्हावे. पडीत जमीन

अनुक्रमणिका

पुष्कळ. जमीनदारांचे जुलूम फार. नानाप्रकारचे रयतेवर कर बसविलेले असत. त्यामुळे पाटील-कुळकर्णी, देशमुख-देशपांडे रयतेस नकोत असे झाले."

यामुळे शेतीवर वाईट परिणाम झाला. शेतकरी हवालदिल झाला. व्यापार बसला म्हणून व्यापारी लोक खंगले. पेढीवाले मेले, त्यावर अवलंबून असणाऱ्या शेकडो हजारो कारकुनांनी घरी बसल्या तडफडून मरण्याचा समय येऊन ठेपला. "लक्षावधि लोक आहेत ते हल्ली चोरासारखे मुकाट्याने बसले आहेत. त्यांनी कोठे व कोणत्या कामांत प्रसिद्ध व्हावे?" असे हृदयविदारक उद्‌गार लोकहितवादी १८४९ मध्ये काढतात.[११] हे उद्‌गार बंडापूर्वी १० वर्षे अगोदर काढले आहेत. त्या अर्थी आर्थिक आपत्ती किती जाणवत असेल याची कल्पना केलेली बरी.

**न्यायनिवाड्याची जाचक पद्धती**

पुण्यांतील डेक्कन कमिशनरचा अंमल १८२७ मध्ये संपल्यानंतर इंग्रज सरकारने जिकडे तिकडे अदालती स्थापून नवी न्यायपद्धती सुरू केली व कायदे करण्यास सुरुवात केली. कायद्याची भाषा इंग्रजी, लोकांना ती अपरिचित, त्यामुळे लोक बुचकळ्यांत पडू लागले. शिवाय पेशवाईत व तत्पूर्वी शेकडो वर्षे दिवाणी कामे ग्रामपंचायती निकालांत काढीत. चोऱ्या वगैरे फौजदारी गुन्हेही पंचायतीच मिटवीत असत. मराठी राज्यांत चोरीस गेलेला माल न सापडल्यास गावच्या पाटलाला तो भरून द्यावा लागत असे. या कारणामुळे राज्यसत्तेने लक्ष घालण्यासारखे गुन्हे थोडे घडत. या ग्रामसंस्था म्हणजे ग्रामराज्ये होत. त्यांनीच गावांतील सर्व व्यवहार भांडणतंट्याचे पाहायचे, मिटवायचे. अशी ही उपयुक्त संस्था मोडू नये असे चॅपलीनने आपल्या रिपोर्टात म्हटले होते.[१२] एलफिन्स्टननेही तेच मत दिले होते.[१३] पण ते न ऐकतां इंग्रजांनी अदालती स्थापन केल्याच. त्यामुळे, सामान्य लोकांमध्ये जो व्यवहार आजवर शेकडो वर्षे बिनबोभाट चालला होता त्याचे मात्र दिवाळे निघाले. यामुळे लोकांत सरकारबद्दल संशय निर्माण झाला.

**सामाजिक आणि धार्मिक कारणांमुळे असंतोष**

१८१८ तील राजकीय स्थित्यंतराच्या पाठोपाठ महाराष्ट्रात समाजक्रांतीचीही मुहूर्तमेढ रोवली गेली. सती, बालहत्या यांसारख्या अमानुष चालींना त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला हे खरे, आपल्या उदार तत्त्वांना मुरड घालून बहुजनसमाज्याच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले ते वरिष्ठ वर्गाची राजनिष्ठा ढळू नये म्हणून. इ. स. १८२८ च्या सुमारास धाकजी दादाजी परभु ह्या सनातनी पुढाऱ्याच्या इच्छेखातर मुंबईच्या सरकारी मराठी शाळेतून मराठे, कोळी, कुळंबी, भंडारी या जातीच्या मुलांना काढून टाकण्यात आले.[१४] पुण्याच्या पाठशाळेतही इ. स. १८५१ पर्यंत फक्त ब्राह्मण विद्यार्थीच घेतले जात असत. या भंदनीतीमुळे एकाच प्रदेशांत एक प्रकारचा दुजाभाव निर्माण झाला. मूठभर सुशिक्षितांचे एक व खेड्यापाड्यांतील अशिक्षित बहुजनसमाजाचे एक अशी दोन भिन्न जगे अस्थित्वांत आली. त्यामुळे खेड्यातील लक्षवधि लोकांचे जीवन परंपरागत रुढींच्या ठराविक चाकोरीतून दीर्घकाळ रेंगाळत राहिले. अनेक व्यवहाराचे निर्बंध प्रत्येक जातीत काटेकोरपणे पाळले जात. प्रारब्ध, पूर्वावार वहिवाट, जन्मसिद्ध उच्चनीच भाव, भुतेखेते, मंत्रतंत्र यांच्यातच त्यांच्या जाणीवा गुरफटलेल्या होत्या. त्यामुळे प्राप्त परिस्थितीपुढे त्यांनी असहायतेने मान तुकविली. त्यांचे जीवन या काळांत तरी जडतेने व प्रवाहपतित्वानेच होते.

अनुक्रमणिका

**ख्रिस्तधर्म प्रचार**

ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा प्रचार राज्यसत्ता पाठीशी असल्यामुळे धुमधडाक्याने सुरू झाला. विल्सन, निज्विट प्रभूती धर्मोपदेशकांनी हिंदुधर्मग्रंथातील मूर्तिपूजा, जातिभेद, वर्णवर्चस्व यांवर चौफेर हल्ला चढवून बहुजनसमाजाचा बुद्धिभेद करण्यास प्रारंभ केला. भर चव्हाट्यावर उभे राहून ते कुराण व पैगंबर यांची अभद्र निंदा करू लागले.[१५] यामुळे सामान्य लोकांना वाटू लागले, की इंग्रज आपला धर्मही आपल्याजवळ राहू देत नाहीत. तो ते बुडविणार.

**सैनिकांबद्दलचा इशारा**

सैनिक हे त्यावेळच्या समाजाचे प्रतिनिधी होते हे इंग्रज अधिकाऱ्यांनीही कबूल केले आहे. १८४९ मध्ये सातारचे राज्य बुडाल्यावर ब्रिग्ज म्हणतो, "नेटिव्ह शिपाई झाले तरी तेही कोणत्या खाणीतील माती आहे हे विसरू नका, लोकांचा असंतोष सैन्यांत पसरणारच आणि सैनिकांतला इंग्रज सरकारवरचा विश्वास नष्ट होऊन त्यांच्यात एकदा बेदिली उत्पन्न झाली की ब्रिटिशांचे राज्य नष्ट होण्यास मुळीच उशीर नाही."[१६]

**सैनिक**

१८५७ च्या पूर्वीचा काळ हा सरंजामशाहीचा काळ होय. त्यावेळच्या सर्व राष्ट्रांचा इतिहास हा सरंजामशाहीचाच इतिहास आहे. त्या सरंजामशाहीच्या रक्षणार्थ उठलेले लोक स्वार्थी होते असे आज म्हणणे म्हणजे त्यावेळच्या राजकीय परिस्थितीचा अर्थच समजून न घेण्यासारखे आहे.

या सर्व उठावांत शस्त्रधारी हिंदी माणूस आढळतो. मग तो इंग्रजांच्या सैन्यांत असो अगर बेकार असो. पण सैनिकी पेशाचा हा माणूस उठावांत हिरीरीने भाग घेतो हे सैनिक लोकच त्यावेळच्या जनतेचे प्रतिनिधी. जनतेमधील जास्त ताकदवान आणि हुशार अशी ही माणसे अन्यायाशी झगडतांना पाहिली म्हणजे हे जनतेचे खरेखुरे प्रतिनिधी असे कोण म्हणणार नाही? आयर्लंडमधील क्रांती सर्व राष्ट्रव्यापी होती काय? उटाव यशस्वी झाला म्हणजे त्याला क्रांती म्हणावयाची. अयशस्वी झाले म्हणजे त्याला बंड म्हणावयाचे एवढेच.

आधार : (१) Selection of papers from the Records at the East India House, Vol. IV, p. 511. (२) Deccan Commissioner's Records Poona Inward letter 557, dt 31-8-1824. (३) D C R Ahmednagar Inward letter 2111 of 29th Oct. 1824; 2035 of 19th August 1824; 2208 of 8th Feb. 1825. (४) Parliamentary Papers 1831-32, Vol. XIV, paper 735-VI, pp. 37-38. (५) 1832-33, Vol. 21/547 A, pp. 4-7. (६) R. D. 1852, Vol. 178, pp. 3-11. (७) D C R letter No. 506 of 19th July 1819. (८) मुजुमदार, पेशवाईनंतरचा पुण्याचा इतिहास, पु. ४५. (९) East India papers, Vol, III. (१०) Dutt, India in Victorian Age, p. 128. (११) लोकहितवादीकृत ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती, भा. १ ला, पृ. ८४. (१२) Chaplin's Report. (१३) Elphinstone's Report on the territories conquered from the Peshwa. (१४) प्रियोळकर, दादाबा पांडुरंग आत्मचरित्र व चरित्र, पृ. २३०-२४०. (१६) Morning Herald, 21st December 1848.

अनुक्रमणिका

# प्रकरण तिसरे

## सशस्त्र उठाव

### खानदेशातील स्वातंत्र्येच्छू आदिवासी : १८१८-३१

खानदेशातील जमातीत भिल्लांची संख्या मोठी आहे. हे लोक राजपुताना, माळवा, गुजरात व वायव्य महाराष्ट्रभर पसरले आहेत. यांचे अधिष्ठान रानांत, डोंगरकपारीत, सह्याद्रि-सातपुड्याच्या अगदी कुशीत यांची वस्ती. सह्याद्रीच्या टेकड्यांची साखळी विंध्य अगर सातपुड्याला उत्तेस जाऊन भिडते त्या साखळीचे दुवे हे भिल्ल होत. हाच घाटमाथा खानदेश जिल्हा वेष्टून आहे. पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश व नाशिक या तिन्ही जिल्ह्यांत या आदिवासी जमातीची संख्या मोठ्या प्रमाणांत होती व आजही आहे.

ह्या जमातीच्या उदरनिर्वाहास स्वतःचे असे कायम स्वरूपाचे काही साधन नाही. बहुसंख्य लोक हल्ली शेतमजूर म्हणून कुणातरी शेतकऱ्याजवळ तात्पुरते काम करतात. काही लोक गवत, जळाऊ लाकूड वगैरे जंगलांतील उत्पन्नावर काही काळ उपजीविका करतात, तर काही शहराच्या आसपास राहून मजुरी करतात. पण डोंगरकपारीत राहणाऱ्यांची श्रीमंत जमीनदारांपासून मिळालेल्या लुटीवरच गुजराण असते.

इंग्रज लोकांनी या प्रदेशाचा ताबा मिळवण्यापूर्वी हा प्रदेश पुष्कळ लोकांनी उद्ध्वस्त केला होता. अरब लोकांनी याचा स्वतःच्या फायद्याकरिता गैरउपयोग करून घेतला होता आणि त्या वेळचे अधिकारी तर मन माने तैसे चरले होते. त्रिंबकजी डेंगळे, यशवंतराव होळकर यांनी तर भिल्लांना त्राही भगवान करून सोडले होते.

१८१६ मध्ये पेंढाऱ्यांची टोळधाड आली ती पूर्वेकडील टेकड्यांतील मुसलमान भिल्लांच्या मदतीनेच. त्यांनी भिल्लवस्तीच्या प्रदेशाची जाळपोळ आणि लुटालूट करून पूर्वीच्या अरब व मराठे या आक्रमकांवर मात केली.[१] या सर्व घटनांमुळे सबंध खानदेश यादवीप्रत जाऊन पोहोचला तो इतका की एल्फिन्स्टनने या यादवीची तुलना आशियातील कोणत्याही यादवीशी होऊ शकत नाही असे म्हटले आहे.[२]

वारंवार येणाऱ्या संहारक संकटांमुळे भिल्ल जमात फारच हवालदील झाली. त्यांना संरक्षक कोणीच राहिले नाहीत. त्यांचा त्राता कोणीच नव्हता. त्यांनी स्वसंरक्षणाकरिता डोंगरांत राहण्याचे ठरविले. डोंगरांतील टेकड्यांवर प्रत्येक वस्तीच्या भोवती मजबूत तटबंदी उभारली आणि ही जमात एकोप्याने टोळ्याटोळ्यांना आपल्या मुख्याच्या नेतृत्वाखाली राहू लागली.

१८१८ मध्ये इग्रजांनी खानदेशावर पूर्ण ताबा मिळविला. नवी विटी नवे राज्य या न्यायाने प्रत्येक नवीन सत्ताधीशांच्या कारकीर्दीचा प्रसाद भिल्लांना मिळत असल्यामुळे, या आंग्ल राजवटीबद्दलही त्यांच्या मनांत तिरस्कार व घृणाच उत्पन्न झाली. ते खुशीने या राजवटीपुढे नमायला तयार होईनात. त्यांनी या गोऱ्या लोकांना आपला इंगा दाखविण्याचे ठरविले. यासाठी सातपुडा, सातमाळा आणि अजंठाच्या कुशीत वावरणारे सर्व भिल्ल एक झाले. त्याचे नेतृत्व बत्तीस भिल्लांनी स्वीकारले.[३] हा सर्व भिल्लांचा जमाव हातांत तलवारी आणि बनोट्या घेऊन बाहेर पडला. याच सुमारास सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत राहणाऱ्या भिल्लांनी जवळपासच्या खेड्यांत आपल्या भयानक कृत्यांनी बराच घबराट निर्माण केला.[४] पण त्यांना ब्रिटिशांविरुद्ध

उठविण्याचे काम दुसऱ्या बाजीरावाचा दोस्त सरदार त्रिंबकजी डेंगळे याचे. ठाण्याच्या तुरुंगातून इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन पलायन केलेल्या या बिलंदराने फिरंग्यांना त्राही भगवान करण्याचे शस्त्र शोधून काढले. तो भिल्ल जमातीत शिरला.[५] भिल्लांना इंग्रजांविरुद्ध चिथवले आणि तुम्हाला कायमचे गुलामीत टाकणाऱ्या या फिरंग्यांचे मुडदे पाडा असा आदेश दिला. या उठावाची सर्व सूत्रे त्याने आपले दोन पुतणे गोदाजी डेंगळे आणि महिपा डेंगळे यांच्या हाती सोपविली. या उठावांत सुमारे ८,००० भिल्लांनी भाग घेतला.[६]

पण यामुळे इंग्रज घाबरला नाही. त्याने दडपशाहीचे धोरण स्वीकारले. स्वतः कॅ. ब्रिग्जने त्यांच्या पुष्कळ पुढाऱ्यांचे मुडदे पाडले.[७] त्यांच्या हालचालींना आळा घालण्याकरिता डोंगरांतील घाटवाटांवर सैन्य ठेवण्यात आले आणि त्यांना मिळत असलेली रसद बंद केली.[८]

याबरोबरच एल्फिन्स्टनने औदार्याचे धोरण स्वीकारले. चोरांच्याच हाताने चोख बंदोबस्त करण्याची शक्कल साहेबाने काढली. काही भिल्लांना वेतन देऊन त्यांच्याच रक्ताच्या लुटारू लोकांपासून घाटांत वाटसरुंचे संरक्षण करण्याचे काम त्यांजवर सोपविले. घाटांत चोरी झाल्यास त्यांनाच जबाबदार धरण्याची प्रथा सुरू केली.[९] आपल्याच जातीचे लुटारू व मारेकरी लोक यांजवर देखरेख करण्याकरिता काहींची नेमणूक केली.[१०] तर काहींना रखवालदाराच्या नोकऱ्या दिल्या. काहींना पेन्शनी दिल्या. शिवाय त्यांच्या हिताकरिता बऱ्याच गोष्टी करण्याचे ठरले. अशा रीतीने या बंडखोर प्रतिकात्मक पेशींच्या तडाख्यांतून त्या भागातील लोकांची तात्पुरती सुटका केली.[११]

या भिल्लांच्या बाबतीत अनुभवानेच इंग्रज शहाणा झाला. त्याने हेरले की या लोकांवर यांच्या मुख्याचाच अधिकार पाहिजे. त्या मुख्यास आपल्या दावणीस जुंपून घेतले म्हणजे झाले आपले काम. एल्फिन्स्टनने या तत्त्वप्रणालीस उचलून धरले.[१२] साहेबाने भिल्लांची भरती लष्करांत करून त्यांची एक निराळी तुकडी बनविण्याचे ठरविले. कां तर या उपायाने तरी ते आपल्याकडे आपुलकीने पाहतील. हा अंदाज अगदीच चुकीचा नव्हता. त्याच उपायाने नादिरसिंह नावाचा प्रख्यात भिल्ल डाकू त्याच्याच सहकाऱ्यांच्या साहाय्याने पकडण्यात इंग्रजांनी यश मिळविले.[१३]

भिल्लांना आळविण्याचे इतके उपाय केल्यावरही त्यांनी १८१९ मध्ये पुन्हा सगळीकडून उठाव केला. त्यांच्या म्होरक्यांनी डोंगरांतील महत्त्वाच्या लष्करी नाक्यांचा कबजा मिळविला व लहान लहान तुकड्या जवळपासचे उतरणीवरील गाव लुटण्यास पाठविण्याचा सपाटा चालविला.[१४] यामुळे लोक अगदी हैराण झाले. इंग्रज सरकारनेही आपली लष्करी शक्ती पणास लावली.[१५] कितीतरी लष्करी तुकड्या या उन्मत्त भिल्लांचा बंदोबस्त करण्याकरिता खपत होत्या. पर्वतांतील त्यांच्या वस्तीकडे जाणाऱ्या काही मोक्याच्या डोंगर वाटांवरील नाकी इंग्रज सैनिकांनी जिंकून घ्यावी की लागलीच तिथे नवीन पुढारी निर्माण होई आणि ते नाके जिंकून तो आपल्या ताब्यात घेई.[१६] अशा रीतीने हे "अरण्य युद्ध" चालू होते. इंग्रज सरकारच्या माफीच्या जाहीरनाम्यालाही त्यांनी भीक घातली नाही.[१७] इंग्रजांनी देऊ केलेल्या सवलती आणि त्यांना होणारा ज्ञातीचा फायदा याचीही त्यांनी तमा बाळगली नाही.[१८]

सामदामाने निकाल लागेना तेव्हा कंपनी सरकारने दंडाची उपाययोजना जारी केली. सरकारकडून एकामागून एक अशा स्वाऱ्या पाठविण्यास सुरुवात झाली. त्यांच्या म्होरक्यापैंकी एक सातमाळ्याचा भिल्ल नाईक याला पकडले आणि फाशी दिले.[१९] पण सबंध भागच गोंधळलेल्या स्थितीत होता. कॅ. ब्रिग्ज मुंबई सरकारास येथील परिस्थितीसंबंधीचे रिपोर्ट पाठवायचा.[२०-२१] निरनिराळे उपाय

अनुक्रमणिका

सुचवायचा. गव्हर्नर आणि कौन्सिलचे सभासद मुंबईपासून कलकत्त्यापर्यंत ब्रिग्जच्या सूचनांचे कौतुक करीत.[२२] पण प्रत्यक्षांत वस्तुस्थितीचा पालट निराळाच होई. १८२० मध्ये या सर्व गडबडीने उग्र स्वरूप धारण केले. डसरत व धानजी या लासूरच्या मुख्यांनी सर्रास सर्वांची घरे बेचिराख करण्याचे सत्र आरंभिले.[२३] तापी व सातपुडा यांमधील सुपीक प्रदेश बेचिराख केला.[२४] त्यांच्या जोडीला शेख दुल्ला हा पेंढारी पुढारी मिळाला. या सर्वांनी संधी मिळेल तो गाव उद्‌ध्वस्त करण्याचा धुमधडाका चालविला.[२५] पण लवकरच या गोष्टींना आळा पडला. मेजर मोरिनने शंभर मैलावरील टापूंतील महत्त्वाच्या जागा जिंकून घेतल्या आणि दक्षिणेतील भिल्ल प्रमुखांना शरण येणे भाग पाडले.[२६]

### हरियाचा उठाव

१८२२ मध्ये हरिया नावाच्या भिल्लांच्या प्रसिद्ध म्होरक्याने उठाव केला. तो इतका परिणामकारक झाला की सबंध देशच मुळी अराजकात सापडला.[२७] अंदाधुंदी, बलात्कार, शोषण यांना तर सीमाच राहिली नाही.[२८] भिल्लांच्या टोळ्या सर्व बांजूनी लूटालूट करू लागल्या. त्यामुळे ठिकठिकाणचे मामलेदार लोकांमध्ये पसरलेल्या अतिघबराटासंबंधीचे खलिते सरकारला पाठवू लागले[२९] व त्यामध्ये कॅ. रॉबिनसनने त्यांच्या टोळ्यांना पळवून लावण्यात आणि त्यांच्या वस्तीवर हल्ले करून त्यांचा पिच्छा पुरविण्यात थोडे यश मिळवले.[३०]

पुढील दोन वर्षांत भिल्लांच्या बाबतीत कं. सरकारने सर्पसत्राच्या स्वरूपाचे हत्याकांड चालू केले.[३१] धर तो मार अशा रीतीने पुष्कळांचे जीव घेतले, काहींना अतिकठोर शिक्षा ठोठावल्या पण म्हणून हे गिरीजन नमले का? मुळीच नाही. १८२५ मध्ये या भिल्ल उठावाने महत्त्वाचा टप्पा गाठला.[३२] आता त्याला वेगळेच स्वरूप यायला लागले. काही राजकारणी लोक या भिल्ल लोकांचा उपयोग करू लागले. सेवाराम नावाच्या सोनाराने सातारा राजाच्या नावाची बनावट पत्रे तयार करून राजाच्या हुकुमाप्रमाणे बागलाण तालुक्यातील भिल्लांना उठावाचे प्रोत्साहन दिले.[३३] त्यांनासुद्धा निमित्तच हवे होते. ८०० भिल्लांनी उनापूरवर हल्ला केला आणि मिळेल ती लूट ते मुरली महाल किल्ल्यात घेऊन गेले.[३४] पण लागलीच ले. औटरॅमने अचानक हल्ला करून त्यातील काही लूट परत मिळविण्यात यश मिळविले.[३५] सेवाराम आणि त्याचे हस्तकही कालांतराने पकडले गेले. पण त्या सर्वांसच यावेळी यमसदनास पाठविले नाही. त्यांपैकी बहुतेकांना माफी देऊन शेतीच्या धंद्यास लावले. भिल्ल शांत व्हावेत म्हणून इंग्रज सरकार प्रयत्न करीतच होते. त्यांना शेतमजूर म्हणून कामास लावणे, जमिनी देणे, तसेच तगाई देणे या गोष्टी सुरू केल्या.[३६] पण पंड्या, बंदी, सूखा यांसारखे भिल्लांचे म्होरके धुमाकूळ घालतच होते.[३७] या सर्व गोष्टी थांबविण्याकरिता भिल्लांना माणसांत आणण्याचे ले. औटरॅमचे उद्योग चालूच होते. तो त्या लोकांत राहू लागला.[३८] त्यांच्याबरोबर खाऊ पिऊ लागला. नाचू लागला. थोडक्यात त्यांच्याशी एकजीव झाला आणि त्याने त्या लोकांना इंग्रज लोक ही किती प्रामाणिक असतात हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. इंग्रज लेखक यामुळे या माणसाचे गुणगान गातात.

माफीचे जाहिरनामे, त्यात भिल्लांना जमीन देण्याचं, तगाई देण्याचं आश्वासन, मागील गुन्ह्यांची माफी आणि त्यांची सैन्यात भरती या गोष्टी त्यांना नरम करण्यास कारणीभूत झाल्या. हळूहळू सामाजिक संस्थांत कार्य करण्याकरिता त्यांना उद्युक्त करण्यात येऊ लागले. डोंगरांतील वाटांचं रक्षण करणं हा त्यांचा पारंपरिक हक्क मान्य करण्यात आला[४०] तरी पण १८२६ मध्ये डांगचे प्रमुख आणि लोहारा भिल्ले यांनी उचल खाल्लीच आणि लुटीचा सपाटा चालू केला.[४१] पण त्यांना लौकरच शरण यावं लागलं. चौकशीअंती

अनुक्रमणिका

आढळून आलं की या उद्योगांत देशमुख लोकही भिल्लांना मदत करीत असत. १८२७ मध्ये ले. औटरॅमने भिल्ल लष्कर तुकडीच्या सहाय्याने एका भिल्ल टोळीला चकविलं आणि फडशा पाडला.[४२] आणि म्हणूनच १८२८ मध्ये या भिल्ल प्रदेशांत शांतता नांदू लागण्याची चिन्हे दिसू लागली. या वर्षीच्या पहिल्या सहामाहीत वीस वर्षांनंतर त्या भागात शांतता होती असे त्या वर्षाच्या रिपोर्टात आढळते.[४३] तरी पण पुढील काही वर्षे बंडवाल्यांचे हस्तक डाके घालण्याची कामे करीतच होते.[४४]

**आधार :** (१) Elphinston's Report (2nd Edition), p. 2 (२) कित्ता, p. 4. (३) S. P. D. 1818, Diary 441, pp. 392-397. (४) S. P. D. 1819. Diary 473, pp. 57, 79-85, 474, pp. 6458-60. (५-६) Simcox, A Memoir of the Khandesh Bhil Corps, p. 24. (७) S. P. D. 1818, Diary, 447, pp. 2539-46. (८) S. P. D. 1818, Diary 456, pp 6341-43. (९) S. P. D. 1818, Dairy 467, pp. 3196-3203. (१०) Simcox, Memoir, p. 30. (११) Forrest official writings, pp. 255-6. (१२) D. C. R. Khandesh Inward. Letter 367 of 8th Jan. 1819, pp. 253-57. (13) Mill, History of India, VIII, p. 267 footnote. (१४) D. C. R. 1819, File 175 Letter of 4th Fed. 1819, p. 70. (१५) S. P. D. 1819, Diary 473, pp. 5779-85; 5852-57. (१६) Graham, Historical Sketch of the Bhil Tribes of Khandesh, p. 5. (१७) D. C. File 175 Proclamation of last week of March 1819 and of 9th June, pp. 359-60; File 176. pp. 229-240 (१८) D. C. File 176, letter 8-5-1819, pp. 181-183 (१९) P. D. 1819, Diary 475, pp. 6458, 6460. (२०-२१) Briggs Report, D. C. File 173, pp. 263-275, dt. 19-11-1818, D. C. File 174, pp. 253-70. dt. 8-1-1819. (२२) D. C. File 356, letter 332, dt 17-4-1819. (२३) D. C. File 133 letter 634; S. P. D. 1820, Diary 477, pp. 781-802. (२४) P. D. 1820, Diary 480, pp. 1928-1932. (२५) P. D. 182, Diary 481, pp. 2195-2216. (२६) P. D. 1820, Diary 484, pp 3203-3225; Graham, Historical Sketch of the Bhil, p. 15. (२७) P. D. 1822, Vol. 89/1. pp.1-35 (२८) P. D. 1823, pp. 59-71. (२९) Kitta. (३०) P. D. 1822, Vol. 89/1, pp 61-82, 124. (३१) P. D. 1823, Vol. 100/105, pp. 73-99. 100-112. (३२) P. D. 1826, Vol. 5/228, pp. 1-26. (३३-३५) Graham, Historical Sketch of the Bhil Corps, pp. 52-21. (३३-३८) Simcox, A Memoir of the Khandesh Bhil Corps, pp. 52-61. (३९-४०) Graham, Historical Sketch of the Bhil, p. 8-10. (४१) P. D. 1826, Vol. 5/228, pp. (४२) P. D. 1827, Vol. 6/261, pp. 100-174. (४३) Simcox, A Memoir of Khandesh Bhil Corps, p. 173. (४४) District Gazetteer Khandesh, p. 260; Simcox, p. 110-115.

अनुक्रमणिका

## धारचा उठाव

१८३१ मध्ये धारच्या राजाविरुद्ध उचेतसिंगाच्या नेतृत्वाखाली भिल्लांनी उठाव केला. उचेतसिंगाने आपण मुरारीराव पवाराचा मुलगा अशी ग्वाही दिली.[१] मुरारीराव हा पानिपतावर गारद झालेल्या जसवंतराव पवाराचा नातू. तेव्हा लोकांना उचेतसिंगाचे सांगणे खरे वाटू लागले.[२] मुरारीरावाने भिल्लांच्या सहाय्याने धारच्या पवारांकडून गादी मिळविण्याकरिता हल्ला केला. लढाई जुंपली पण जसवंतराव होळकरांच्या वेळीच येण्यामध्ये त्याला माघार घ्यावी लागली होती.[३] या खेपेसही उचेतसिंगाने धार संस्थानातील खेड्यापाड्यांवर हल्ले करून धुमाकूळ उडवून दिला.[४] कंपनी सरकार मग या नेटिव्हांच्या साहाय्याने गेले. त्यांना शरण आणिले. शरण आलेल्यांना अभय द्यायचे राजाने कबूल केले होते. त्याप्रमाणे त्यांच्या बाबतीत उदार धोरण आखले.[५]

**आधार :** (१-४) Mill, ix-x-288-9. (५) Simcox, A Memoir of the Khandesh Bhil Corps, p. 174.

अनुक्रमणिका

# एकतीस

## बीडचा धर्माजी प्रतापराव : १८१८

इ. स. १८१८ मध्ये प्रतापरावाने फार दिवस निजाम सरकारला त्रास दिला होता. त्याचा उठाव सरकारविरुद्ध होता. त्याचा पाठलाग करण्याकरिता सैन्याची तुकडी सोडली होती. तो बीड जिल्ह्यात आहे याचा सुगावा लागल्यावर सरकारने तारीख ११ जुलै १८१८१ रोजी नवाब मुरतझा यारजंग यास ले. जॉन सौदरलंड याच्या हाताखाली देऊन त्याजवर रवाना केले. सौदरलंडला ता. ३० जुलैच्या रात्री धर्माजीच्या स्थळाचा पत्ता लागला. त्याने आपल्या धाव्यांची चाल बदलली आणि तो दाडेगावहून दिबे या गावी दौडत ११ जुलैला येऊन पोहोचला.[१]

धर्माजीने या गावातील किल्ल्यामध्ये आपला तळ दिला होता. हा किल्ला बराच बळकट आणि दंगेखोरास राहण्यास सुरक्षित असा होता. याची लांबीरुंदी १९० यार्ड असून यास बुरुज होते. या दौडत आलेल्या सैनिकांसह सौदरलंडने किल्ल्याला वेढा दिला. ३० फूट उंचीच्या दोन शिड्या दुपारी ३ वाजेपर्यंत बनविल्यावर किल्ला सर करण्याची तयारी पूर्ण झाली. आठजणांची एक अशा आठ टोळ्या बनविल्या आणि किल्ल्यातील बंडवाले पळून जाऊ नयेत म्हणून त्या टोळ्या निरनिराळ्या मोक्याच्या जागी ठेवल्या.[२] ५० मॅचलॉकमेन डोंगरावर टेहळणीसाठी पाठविले आणि जमादार सर्दाखानाच्या हाताखाली एक व सौदरलंडच्या हाताखाली दुसरा अशा दोन तुकड्यांनी किल्ल्यावर जोराचा हल्ला चढविला. किल्ल्यातून प्रतिकार होतच होता. सौदरलंडला त्याचा प्रसादही मिळाला. पण त्याने चिकाटी सोडली नाही आणि बंडखोरांनीही आपल्याकडून कसूर होऊ दिली नाही. प्रत्येक बुरुजावरच्या बंडवाल्यांनी सौदरलंडशी दोन हात केले. पण अखेरीस त्यांना मागे व्हावे लागले. आणि शेवटी धर्माजी आपल्या भावासह कं. सरकारचा कैदी बनला. वंजारी जातीचे जे लोक किल्ल्याच्या लष्करांत होते त्यांनी मात्र आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली. याबद्दल सौदरलंड प्रशंसोद्‌गार काढतो. त्यांचा आवेश आणि पराक्रम एवढा होता की त्यांनी एका जमादारास आणि घोडेस्वारास कापून काढले. एका लेफ्टनंटला व २२ घोडेस्वारांस जखमी केले.[३]

### औरंगाबाद जिल्ह्यातील अंबडवर हल्ला

११ ऑक्टोबर १८१८ मध्ये कॅप्टन वेल्सच्या हाताखालील रिफॉर्मड् हॉर्स या तुकडीने अंबड शहरावर हल्ला चढविला.[४] त्या हल्ल्यात कॅप्टन वेल्सला जखमा झाल्या, कारण त्याच्या सैनिकांपैकी काहीजण फितूर झाले. कॅ. वेल्सने शहर दरवाज्याचा ताबा मिळविल्यावर त्याला कळून चुकले की आपली माणसे आपल्याबरोबर नाहीत. आणि या विषादातच त्याला माघार घेणे भाग पडले. यानंतर रेसिडेंटने कॅ. वेल्सबरोबर ज्या थोड्या लोकांनी हल्ला करण्यात भाग घेतला होता त्यांचा गौरव केला[५] आणि ज्यांनी वेल्सचा हुकूम मानला नाही त्यांची कडक शब्दांत निर्भत्सना केली. या फौजेतील लोक धैर्यामध्ये कोणासही हार जाणारे नव्हते.

**आधार :** (१-३) Burton, A History of the Hyderabad Contingent. (४-५) Burton, A History of the Hyderabad Contingent, pp. 75-76.

अनुक्रमणिका

# तेहतीस

## नांदेड जिल्ह्यातील हटकरांचा उठाव : १८१९ - २०

हंसाजी नाईक हटकर यांचे एक चिमुकले स्वतंत्र राज्य नांदेड जिल्ह्यात होते. निजाम इंग्रजांचा मांडलिक झाला, तरी हटकर स्वतंत्रतेने आपले राज्य चालवतच होता. त्याने वीस वर्षेपर्यंत निजामाला दाद दिली नाही आणि हाड व नांदेड भागातील कित्येक किल्ल्यांचा ताबाही मिळविला. १८१९ च्या सुमारचा हा प्रसंग आहे. हंसाजीचे हे वागणे निजामाला पसंत नव्हते. त्याने हंसाजीचा पाडाव करण्याचा चंग बांधला. हंसाजीच्या वर्तणुकीत शौर्याबरोबर वावरणारे अनेक सद्‌गुण होते. नोव्हाचा किल्ला हा त्याचा सर्वांत मजबूत असा आधार होता लहानमोठ्या गढ्यांवरही त्याची मालकी होतीच. नोव्हाचा किल्ला चौकोनी होता. प्रत्येक कोपऱ्यावर मजबूत बुरुज होते. प्रवेशद्वार मजबूत व दुर्गम होते. किल्ल्याभोवती खंदक व नंतर उंचवटे ही सारी किल्ल्याची सांगयोजना होती. त्याच्या जवळच्या सैन्यांत नेमबाजीत तरबेज असलेले अरब व रोहिलेही होते. नौसाजी नाग्याजवळ नक्की किती फौज होती हे सांगता येत नाही. मेजर पिटमन, कॅप्टन इव्हान्स, डेव्हिड, कॅप्टन टेलर या इंग्रज अधिकाऱ्यांकडे चार हजारांपेक्षा अधिक फौज होती. तरी हंसाजी नायकाने २०-२५ दिवसपर्यंत इंग्रजांना दाद दिली नाही. इंग्रजांकडे तोफा असून बातेया उभ्या केल्या तरी हंसाजी जेरीस येईना. (या प्रसंगाचे तारीखवार वर्णन आहे.) नोव्हा इंग्रजांच्या ताब्यात गेल्यावर उमरखेड्यावरून हंसाजीने लढत दिली. येथेही त्याचा पराभव झाला. या भागांत हंसाजीविषयी अनेक दंतकथा आहेत. यांतील एका कथेत एक चिंतनीय घटना वर्णिली आहे. नोव्हामध्ये एक दुष्ट घराणे नांदत होते. यांतील पुरुषांजवळ अगणित संपत्ति आहे असे असफजहांना वाटे. त्यांनी असे जाहीर केले होते की या काचर घराण्याचा जो नाश करील त्याला मी नोव्हाची जहागिरी देईन. हंसाजी नाईकाने त्या घराण्याचा नायनाट केला, म्हणून तो स्वतःला तेथला जहागिरदार म्हणत असे.
म. स्वा. ल. — ३

**आधार :** Blacker, A Memoir of the Operations of the British Army in India during the Maratha War of 1817, 1818 and 1819, pp. 480-483. Burton, A History of the Hyderabad Contingent, pp. 78-76.

अनुक्रमणिका

# पस्तीस

## कित्तूरचे बंड : १८२४ व १८२९

एल्फिन्स्टन आपल्या ऑक्टोबर १८१९ च्या प्रसिद्ध अहवालांत स्वतंत्र देसायांचा उल्लेख करतो.[१] यांतील बहुतेक देसायांवर मराठ्यांनी आपली सत्ता प्रस्थापित केली होती. परंतु कित्तूरच्या देसायांनी मात्र आपले स्वतंत्र संस्थान राखले होते. मराठ्यांशी झालेल्या तिसऱ्या युद्धात या जहागिरदारांनी इंग्रजांना साह्य केलेले होते व त्या साह्याची परतफेड म्हणून त्यांची वतने युद्धानंतर कायम राखली गेली. कित्तूरच्या देसायाला स्वतंत्र संस्थानिकचा दर्जा प्राप्त झाला होता. त्याजकडे संपगाव व बेळगाव जिल्ह्यांतील बिदीचा [बिंदी: बेळगाव जिल्ह्यातील कित्तूर विभागातील एक उपविभाग. ह्यांतील गावांची क्षेत्रमोजणी १८५३-५४ मध्ये झाली. पहा : बेळगाव गॅझेटिअर (जुनी आवृत्ती), पृ. ४४५-५०.] प्रदेश होता.[२] ता. १ नोव्हेंबर १८१९ रोजी एल्फिन्स्टन मुंबईचा गव्हर्नर झाला व जिंकलेल्या मुलखाचा कमिशनर म्हणून चॅप्लिन रुजू झाला.

कित्तूरचा देसाई शिवलिंग रुद्र सरकारशी एकनिष्ठ होता तरी त्याने दरोडेखोरांच्या टोळ्यांना आपल्या प्रदेशांत आश्रय दिला होता. शेजारच्या प्रदेशांना तो उपद्रव सहन करावा लागला होता. धारवाडचा कलेक्टर थेकरे याला कित्तूरचा देसाई मृत्युपंथावर असल्याची व त्याने दत्तकपुत्र घेतल्याची बातमी दि. १२ सप्टेंबर १८२४ रोजी[३] लागली. हा दत्तकपुत्र घेण्याबाबतची परिस्थिती संशयास्पद होती असे थॅकरेला वाटत होते. चौकशीअंती असे आढळून आले की देसाई ११ तारखेला रात्रीच वारला व त्याने दत्तक घेतला नव्हता.[४] परंतु देसायाच्या मृत्यूनंतर त्याचा व्यवस्थापक कोनूर मुल्लापा व इतर नोकर यांनी देसायांच्या गादीवर एका मुलाची स्थापना केली.[५] म्हणून सरकारने संस्थान खालसा केले नाही तरी दत्तकाला मात्र मान्यता दिली नाही. सरकारतर्फे व्यवस्थापक म्हणून कोनूर मल्लापाची तात्पुरती नेमणूक झाली होती ती रद्द केली.[६] मूळच्या देसायांचा वंशज या नात्याने या दत्तकाचा काहीही संबंध नव्हता. किंबहुना स्त्रियांच्या बाजूने सुद्धा त्याचा देसाई घराण्याशी काही संबंध पोहोचत नव्हता.[७]

हे दत्तकासंबंधीचे वादळ शामल्यासारखे वाटले. थॅकरेने सुद्धा शासनाला शांतता नांदत असल्याचे कळविले. खजिन्याकडील पहारेकऱ्यांकडून सुरक्षिततेबद्दलची हमी २१ ऑक्टोबरला थॅकरने मागितली[८] तेव्हा त्यांनी नकार दिला. हे बहुधा माजी देसायाची सावत्र आई चन्नम्मा हिच्या चिथावणीवरून झाले असावे. याचा अर्थ असा की चिन्नाम्माला आपल्या हातात सत्ता हवी होती, तिला माजी देसायाच्या पत्नीस न जुमानता खजिन्यावर डल्ला मारावयाचा होता. तिला व कुटुंबातील इतर स्त्रियांना भेटावे व त्यांना सर्व गोष्टी समजून सांगाव्या असे थॅकरेच्या मनात होते. परंतु या मंडळींनी त्याला टाळले. म्हणून थॅकरेचा संशय दुणावला. त्याने कित्तूर किल्ल्याच्या प्रवेशद्वाराशी दोन तोफा ठेवण्याची व्यवस्था केली.[९] तरीही राणी चन्नम्मा हिने २३ ऑक्टोबरला किल्ल्याचा ताबा घेतला व दरवाजे बंद करून टाकले. तेव्हा थॅकरेने गंभीर उपाययोजना करण्याची धमकी दिली. तरीही दरवाजे उघडले गेले नाहीत. थॅकरेने तोफा डागून किल्ला उडवून लावण्याचा हुकूम दिला. परंतु आश्चर्य! किल्ल्यातील शिबंदीनेच अकस्मात हल्ला केला व तोफा हस्तगत केल्या आणि कॅ. ब्लॅक, सेवेल व ले. डायटन या गोलंदाजांचे तुकडे तुकडे केले. थॅकरे घोड्यावर बसून व्यवस्था लावू पहात होता. त्याच्या शरीरात गोळी घुसली व तो खाली पडताना त्याच्या शरीराचे तुकडे झाले.[१०] बाकीची फौज विस्कळीत होती. स्टीव्हनसन व इलियट हे देशी अधिकाऱ्यांसमवेत कैद झाले. नंतर कळले की, गुरुसिदप्पा व चन्नाम्मा यांनी एक होऊन ब्रिटीश राज्य उलथून टाकण्याचे कारस्थान रचले होते.[११] बंडखोरांची स्थिती भक्कम होती. किल्ल्यात ५,००० जीवावर उदार झालेल्यांची

अनुक्रमणिका

शिबंदी होती. शरणागतांना माफी मिळेल असा जाहीरनामा इंग्रजांनी काढला. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. असंतुष्ट बंडखोरांनी कोल्हापूर दरबाराशी बोलणी चालू करून आपली स्थिती बळकट करण्याचा प्रयत्न केला. थॅकरेच्या कृत्यांबद्दल नापसंती दर्शविणारी पत्रे त्यांनी सरकारला लिहिली. संस्थानचे स्वातंत्र्य अबाधित राखावे अशी मागणी केली. २० नोव्हेंबर १८२४ रोजी ले. क. डिकॉन याने कित्तूरला वेढा घातला. तेव्हा २ डिसेंबरला आतली शिबंदी शरण आली. इंग्रजांनी कित्तूरची जहागीर ब्रिटिश राज्यात विलीन केली. देसाई घराण्यातील स्त्रियांना बैलहोगलच्या किल्ल्यात नजरकैदेत ठेवले.[१२]

इ. स. १८२९ मध्ये कित्तूर येथे पुन्हा व्यापक बंड झाले.[१३] या बंडाचा नेता रायप्पा होता. हा रायप्पा सांगोलीचा शिपाई. १८२४ च्या बंडात त्याने भाग घेतला होता. परंतु त्याला त्यावेळी माफी दिली होती. त्याची मूळ तक्रार म्हणजे त्याची जमीन जप्त झाली होती. परंतु त्यावेळचे वातावरणच इतके तंग होते की, त्याच्यासारख्याला सुद्धा अनेक असंतुष्ट माणसे गोळा करता आली. आपली बाजू बळकट करण्यासाठी त्याने दिवंगत देसायाच्या दत्तक पुत्राचे निमित्त पुढे केले. नंतर त्याने कित्तूरच्या स्वातत्र्य संपादनाची घोषणा केली. कित्तूरमध्ये देसाई अतिशय लोकप्रिय होते. म्हणून या घोषणेचे स्वागत झाले. १८२९ च्या प्रारंभ कालातच रायप्पाने बिडी येथील मामलेदार कचेरी जाळून टाकली आणि आपल्या उठावाची सुरुवात केली. दिवसा दडी मारावी व रात्री लुटारू टोळ्यांनिशी बाहेर पडावे असा क्रम त्याने चालवला आणि अशा तऱ्हेने तो आजूबाजूचा प्रदेश उद्ध्वस्त करून टाकू[१४] लागला. रायप्पाने बेळगावावर आकस्मिक धाड घातली व किल्ला घेण्याचा प्रयत्न केला पण तो अयशस्वी ठरला. जसजशी अशांतता पसरत गेली त्याबरोबर कित्तूरच्या शिलेदारांनी इंग्रजांबरोबर काम करायचे नाकारले. तेव्हा लष्कर बोलाविले परंतु लुटांरुचा पाठलाग करण्याच्या कामी कित्तूरसारख्या चिंचोळ्या अवघड प्रदेशात तद्देशीय लोकच उपयुक्त. संपगावचा मामलेदार कृष्णराव याने रायप्पाचा पाठलाग करीत ठिकठिकाणची जंगले धुंडाळली, पण व्यर्थ. त्याला फार करून एखाद-दुसऱ्या बंडखोरांच्या टोळीचा बंदोबस्त करण्यात आला. अशा हालचाली चालू असतानाच सरकारने दिवंगत देसायाच्या विधवेला बैलहोगलहून धारवाडला हलविले. पण ही बातमी फुटली व जमावाने या बदलीला विरोध केला. परंतु हा विरोध आटोक्यात आणला. त्या विधवेला धारवाडला धाडले व तेथेच ती जुलै १८२९ मध्ये मृत्यू पावली.[१५] हा मृत्यू बहुधा विषबाधेमुळे झाला. रायप्पाचा पाठलाग कृष्णराव करीतच होता. त्याने आता एक नवीन डाव रचला. रायप्पाचा एक विरोधक बाह्यतः मित्रत्व दाखविणारा होता. त्याला कृष्णरावाने हाताशी धरले. या विरोधकाने आपण बंडखोरांपैकीच आहोत अशी हूल उठविली. तो रायप्पाला आपल्या साथीदारांसह मिळाला व त्याचा विश्वासही संपादन केला. कोणीही पाठीराखे जवळपास नाहीत असा एकांतात रायप्पा बसला असता या विरोधकाच्या साथीदारांनी रायप्पाला पकडले व धारवाडला धाडून दिले. त्याला फाशी दिल्यावर नंदगड येथे पुरण्यात आले.[१६]

१८३० च्या सातव्या कायद्यान्वये मुंबई सरकारने निरनिराळ्या तऱ्हेने मिळविलेला मुंबई-कर्नाटकातील भाग मिळून धारवाड जिल्हा झाला.[१७]

**आधार :** (१) Elphinstone's Report, p. 8. (२) Nagpur Residency Records, Vol. IV, p. 383. (३) P. D. 1824, Vol. 18/62, p. 3. (४) P. D. 1824, Vol. 18 62, p. 1-2 (५) P. D. 1824, Vol 18/62, p. 58. (६) P. D. 1824, Vol. 18/62, p 69, Va pp. 219-242 (७-८) P. D. 1824, Vol. 18/62, pp. 69-72. (९-१२) P. D. 1824, Vol. 18/62, pp. 220-276. (१३-१७) P. D. 1830, Vol. 38/419, pp. 173, 181, 190 etc.

अनुक्रमणिका

# विजापूरचे उठाव : १८२४ -४०

कित्तूरच्या बंडात थॅकरे हा कलेक्टर मारला गेला. त्यानंतर थोड्याच दिवसांत १८२४ च्या डिसेंबर महिन्यात दिवाकर दीक्षित ब्राह्मणान रादजी रास्ते व बाळाप्पा ठाकलकी या दोन सहकाऱ्यांच्या साहाय्याने काही अनुयायी गोळा केले व विजापूरच्या पूर्वेस ४० मैलांवर असलेली सिंदगी लुटली. त्याने एक लहानसा किल्ला घेतला व तेथे ठाणे स्थापन केले व जमीनमहसूल गोळा करण्याची व्यवस्था केली. आजूबाजूची काही खेडीही लुटली. अनापा पाठके हा सिंदगीजवळच्या बुंदल गावचा रहिवासी. त्याने ही बातमी सरकारला कळविण्याचा प्रयत्न केला. पण प्रयत्न फसला व बंडखोरांच्या हातून तो मारला गेला. धारवाड हे त्यावेळचे जिल्ह्याचे ठाणे. ही बेकायदेशीर हालचालींची बातमी तेथे जाऊन पोहचली. त्याबरोबर लष्कराची लहानशी तुकडी सिंदगीकडे रवाना झाली. गाव हस्तगत झाला. बंडाचे प्रमुख पुढारी पकडले गेले. त्यांना शिक्षा झाल्या व पुन्हा स्थिरस्थावर झाले.

असेच एक बंड १८४० साली उद्‌भवले. या बंडाचा नायक नरसिंह दत्तात्रय हा अंध ब्राह्मण होता. निजामाच्या हद्दीतील १२५ बंदूकधारी अरब बरोबर घेऊन हा बदामीवर चाल करून गेला. दरवाजावरील १०—१२ बेरड पहारेकऱ्यांनी विरोध केला तेव्हा त्याने त्यांना ठार केले व किल्ला ताब्यात घेतला. सर्व गाव हस्तगत केला व छत्रपती नरसिंह, राजा नरसिंह अशी द्वाही फिरविली. आपले निशाण उभारले, सरकारी खजिना व बाजार लुटला आणि सर्व लूट निजामी हद्दीत घेऊन गेला. नंतर तो बदामीस परत येऊन त्याने शेतकऱ्यांना खंडाने जमिनी दिल्या व आपला कारभार सुरू केला, परंतु नरसिंहाला राजपद प्राप्त होऊन एक आठवडा लोटण्याच्या आतच बेळगावचा कलेक्टर ए. एम. शॉने ए. बेटिंग्टनच्या नेतृत्वाखाली एक लहानशी तुकडी बदामीला पाठविली. बदामीला वेढा पडला. लहानशी चकमक झडली. नरसिंह व त्याचे सहकारी पकडले गेले. अरबांना निःशस्त्र करण्यात आले. शांतता प्रस्थापित झाली. कैद्यांना बेळगावला नेले. त्यांच्यावर खटले भरले व कित्येकांना जन्मठेपीच्या शिक्षा झाल्या.

**आधार :** Gazetteer of the Bombay Presidency XXIII-Bijapur (1884), p.452.

अनुक्रमणिका

# रामोशांचा उठाव : १८२६ – २९ – ३० – ३१

रामोशी ही महाराष्ट्रातील वन्य जमातींपैकी एक जात. यांची एकंदर संख्या १८,००० होती. नुसत्या पुणे व सातारा जिल्ह्यांत त्यावेळी यांची संख्या सुमारे १,७०० – १,८०० असावी. डोंगरकपारीतच यांची वस्ती असायची. पण परिसराच्या संसर्गाने लोखंडाचे सुवर्ण बनावे तद्वत या रामोशांना शिवछत्रपतींचा सहवास लाभला व हिंदवी स्वराज्य संस्थापनेत त्यांचा उपयोग झाला. आजच्या पोलीसांचे काम त्यावेळी रामोशी करीत असत.[१] शिवप्रभूंनी चेतविलेला स्वातंत्र्याचा स्फुल्लिंग त्यांच्या अंतःकरणात धगधगत होता. शिपाई बाण्याचे हे गडी स्वराज्याचा नाश झालेला उघड्या डोळ्यांनी व स्वस्थ चित्ताने पाहायला त्यांची मने काही भुर्दाड झाली नव्हती. इंग्रजी राज्य म्हणजे ईश्वरी योजना मानायला लावणारी विद्वत्ताही त्यांच्या अंगात नव्हती. त्यातच इंग्रजांच्या राज्यात घरी बसण्याची पाळी आलेली. ना उद्योग ना धंदा. गुलामगिराच्या द्वेषाग्नीला क्षुधाग्नी मिळाला. इंग्रज परके राजे म्हणून ते आम्हांस नकोत. त्यांचा जन्म येथे बसू देणार नाही. अशी भावना कैक वर्षे त्यांच्या मनात घर करून होती. अशा स्वातंत्र्याकांक्षी लोकांनी मरणोन्मुख मराठेशाही जगावी म्हणून शेवटच्या बाजीरावाच्या शेवटच्या प्रयत्नात प्राणापर्ण करण्याची तयारी दर्शविली आणि मग तेथूनच असा धुमाकूळ मांडला की, काही वर्षे त्या भागात इंग्रजी अंमलाची साक्षसुद्धा पटेनाशी झाली.

चितूरसिंग या म्होरक्याच्या निशाणाखाली सातारा जिल्ह्यांत त्यांनी लुटालूट केली आणि काही किल्लेही पाडले.[२] तसेच सासवडचा सत्तू नाईक व पुरंदरचा उमाजी नाईक हे त्यांचे नामांकित म्होरके. दोघेही लुटीच्या कामात महाअट्टल. एकदा पुण्याहून एका सावकाराचा भला मोठा ऐवज मुंबईस जात होता. त्यावर या दोघांनी पाळत ठेऊन एकदम छापा घातला आणि ऐवज लांबविला. कलेक्टरने कैक दिवस खपून या चोरीचा शोध लावला. उमा व त्याचे साथीदार यांस एक वर्ष शिक्षा झाली. उमाने कैदेतून सुटल्यावर दुप्पट जोमाने पुन्हा तोच उद्योग चालू केला. १८२३ च्या एप्रिल महिन्यातील कुठल्या यात्रेत त्याने कोतवालाचे तलवारीने तुकडे केले आणि पोलिसांना दहशत बसविली. वर्ष सहा महिन्याच्या अवधीत उमाजी आपल्या साथीदारांसह उघड हिंडू लागला. रामोशांच्या या दंगलीने सरकारी अधिकारी रंजीस आले.[३]

१८२४ च्या फेब्रुवारीला उमाजीने पुण्याजवळील भांबुर्डे येथे कडेकोट पहाऱ्यात असलेली तिजोरी लुटली.[४]

मिरजकर पटवर्धनांची काही मंडळी मिरजेहून पुण्यास लग्नासाठी जात होती. जेजुरीच्या वाटेने येत असता शेजारच्या डोंगरातून उमाजीने त्यांजवर रात्री एकदम छापा घातला. त्यावेळी त्या मंडळींनी आपणहून दोन हजारांची मालमत्ता त्याच्या स्वाधीन केली आणि जीव बचावले.[५] १८२६ च्या एप्रिलात पंढरपूरहून पुण्यास जाणाऱ्या सावकारास लुटले व त्याची मालमत्ता काढून घेतली.[६]

पुण्याच्या आग्नेय टापूत तर या रामोशांची इतकी दहशत बसली होती की, सरकारचे अधिकारी देखील त्या बाजूस फिरकेनासे झाले. रामोशांच्या दंग्यांनी सरकारला भंडावून सोडले. दररोज उठावे तो रामोशांची नवीनच बातमी बाहेर यावी. रामोशांची हकलपट्टी करण्यासाठी जवाहीरसिंग रामोशी सासवडचा अंमलदार झाला. त्याच्या मुलांसकट मुसक्या बांधून २६ जुलै १८२६ रोजी त्यास कैद केले. तो अर्धमेला झाला. तेव्हा नोकरी सोडून जीव बचावण्याकरिता तो घरी बसला. फलटणच्या निंबाळकरांचा ऐवज पुण्यास

येत होता तोही रामोशांनी दौंडच्या आसपास लुटला.[७] १८२६ च्या ऑक्टोबरात जेजुरीच्या पोलीस चौकीवर हल्ला करून पोलीसांना तलवारीने तोडून त्यांची हत्यारे व बंदुका लांबविल्या. उमाजीस पकडून देण्याचा विडा उचलणारा शिवनाक महार रामोशांच्या तलवारीस बळी पडला व त्याचे शव ओळखता येऊ नये इतके छिन्नविच्छिन्न त्यांनी केले. कलेक्टरने एक लष्करी तुकडी जेजुरी व वालवे या रस्त्यावर ठेवली होती. म्हणून उमाजी व त्याचे साथीदीर यांनी आपले बेत बदलले. बोरघाटातून येणारा मुंबई-पणे रस्ता लक्षात घेऊन त्या रस्त्यावर लोकांची लूट चालविली. कधी रेशमी कापड, कधी कोण्या सावकाराचा खजिना लुटावा असा रामोशांनी कहर उडवून दिली.[८]

पुण्याचा कलेक्टर रॉबर्टसन् रामोशांच्या या उठावाबद्दल मुंबई सरकारला लिहितो, "सर्व जनता कोणत्या तरी राजकीय बदलाची वाट पहात आहे. युरोपिअनांविषयी असंतोष, तिरस्कार उत्पन्न करणे व नंतर त्यांना देशांतून घालवून देण्यास मदत करणे असा लोकांचा मानस दिसतो. पुण्याचे लोक तर महाकारस्थानी व अफवा उठविणारे. ते उघड बोलतात," कुठे इंग्रजांचे राज्य? समरांगणावर ते लढतील पण रामोशांपुढे त्याचा निभाव लागणार नाही. कुणी सांगावं उद्या हा उम्याच शिवाजीसारखा बंडखोर होऊन पुन्हा मराठी राज्य चालू नाही करणार कशावरून? देवाच्या मनात असेल तर काय होणार नाही?"[९]

रामोशांवर अन्याय झालेला आहे व म्हणूनच ते भडकून उठले आहेत असा समज युरोपिअन लोकांमध्ये प्रचलित होऊ लागला होता आणि हे भाकित पुढे काही अंशी खरेही ठरले. उमाजीच्या नेतृत्वाखाली रामोशांनी आपले राज्यच स्थापिले. त्यांनी जिल्ह्यातील कर्जत तर्फेतून ६,००० ची खंडणी गोळा केली.[१०] सरकारने जाहीरनामे लावून ६ मुख्यांस पकडण्याकरिता ५—५ हजारांची बक्षिसे जाहीर केली.[११] त्यांतील चौघेजण म्हणजे भुजबा पांड्या, उम्या व येसाजी हे होत.

नोव्हेंबर १८२७ मध्ये रामोशांच्या राजकीय कटाचा सुगावा सरकारला लागला. पदच्युतीमुळे ज्या राज्यांवर अन्याय झाला होता त्यांना पुन्हा गादीवर बसविणे हा रामोशांचा मानस होता. याबाबतीत कोल्हापूरच्या राजांचा त्यांना पाठिंबा होता. भोरच्या पंतसचिवांच्या कारभाऱ्याची फूस असावी असा संशय होता. स्वतःला राजा समजून उमाजीने ब्राह्मणांना दक्षिणा वाटल्या आणि जनतेस उद्देशून एक फर्मान काढले. "सरकारचे मामलेदारास वसूल देऊ नये. एक पै देखील मामलेदाराकडे भरल्यास घरे जाळून राखरांगोळी करण्यांत येईल." आपणांस व आपल्या झेंड्यास लोकांनी मान द्यावा असे त्याला वाटे.

शिंदे-होळकरांकडे आपले वकील पाठविण्याचाही त्याचा मानस होता[१२] आणि याबाबतीत सर्व सूचना त्याला वाईच्या ब्राह्मणांकडून मिळत होत्या असा लोकसमज होता तो कलेक्टरने सरकारला विदित केला.[१३]

रामोशी जंगलांत स्वतंत्र झाले. उमाजी नाईक त्यांचा राजा बनला व तो नियमित दरबार भरवू लागला. या दरबारचे वर्णनही साहेब छान करतो.[१४] इंग्रजांशी राजनिष्ठा दाखविणाऱ्यांना हे बंडखोर रामोशी शासन करीत पण इतरांना चांगले वागवीत. बायकांवर ते कधीच हात टाकत नसत. त्यांचे सहाय्यक हे कनिष्ठ जातीतील असत.[१५]

कं. सरकारच्या राज्याचा हा प्रारंभ होता व या प्रारंभकालीच जननेत असुरक्षिततेची भावना प्रबल होणे राज्याच्या स्थैर्याच्या दृष्टीने धोक्याचे होते. इतकेच नव्हे तर रामोशांचा पुंडावा फारच माजला तर

अनुक्रमणिका

इंग्रजांच्या हातातील सत्ता जाण्याची शक्यता होती. तेव्हा रामोशांचा बंदोबस्त करणे इंग्रजांना भागच होते. प्रथम प्रथम जे अधिकारी नेमले त्यांच्याकडून रामोशांचा पुरेसा बंदोबस्त होऊ शकला नाही. याचे कारण तर मनुष्यबळाचा तुटवडा व दुसरे म्हणजे रामोशांना असलेला लोकाश्रय. लष्कराच्या हालचालीची बातमी रामोशांना अगोदर मिळे. इतकेच काय पण रामोशांना भाकऱ्यांचा पुरवठा व वेळ पडल्यास घरादारांचा आश्रयही सर्रास मिळे. म्हणूनच रामोशी हे जनतेपासून अलग काढणे भाग होते व त्यासाठी कलेक्टरने गावोगाव फर्माने सोडली की "गावांतील लोकांनी या बंडवाल्याच्या कृत्यांत कोणत्याही तऱ्हेने सहभागी होऊ नये. त्यांना अन्न, निवारा वा पैसा देऊ नये. हे साह्य असेच चालू राहीले तर जबर शिक्षा भोगावी लागेल. वतने जप्त होतील.[१६] तसेच कॅ. रॉबर्टसनने गावच्या पाटील-कुलकर्ण्यांना आवाहन करून सांगितले की गावाची लुटालूट झाल्यास सरकारकडून नुकसानभरपाई मिळणार नाही.[१७] गावकऱ्यांनी रामोशांच्या वास्तव्याची, हालचालीची बातमी जवळपासच्या लष्करी ठाण्याकडे आगाऊ पोहोचवावयास हवी. आपआपल्या खेड्यांचे संरक्षण सरकारी सैन्य येईतो करावयास हवे.

रामोशांनी लूट केल्यामुळे आपल्याला सरकारी सारा भरता येत नाही अशी जी शेतकरी लोकांची सबब असे व ते आपली असहायता व्यक्त करीत. तिला पायबंद घालावा व रामोशांपासून त्यांना फोडावे यासाठी त्यांना नोव्हेंबर-डिसेंबरचा सारा तहकूबही केला. रामोशांच्या स्त्रिया आपल्या नवऱ्यांना सहाय्य करताना आढळून आल्या म्हणून त्यांना अलग करण्यात आले. शरण येणाऱ्या रामोशांना सार्वत्रिक माफी जाहीर केली.[१८]

त्याचबरोबर इंग्रजांनी लष्करी डावपेचाचीही योजना केली. कॅ. डेव्हिसच्या मदतीला कॅ. स्पिलरचे घोडदळ दिले. कोल्हापूरचे ५ कंपनी सैन्य जेजुरीला रवाना केले व साताऱ्याहून काही सैन्य पाठवू असे आश्वासन दिले. रामोशांची अशी नाकेबंदी केल्यानंतर ते दक्षिण कोकणात उतरले तर तेथील कलेक्टरला स्थानिक सैन्याधिकाऱ्यांच्या साहाय्याने त्यांचा बंदोबस्त करण्याचा हुकूम दिला.[१९]

पाटील-कुलकर्ण्यांवर गावच्या संरक्षणाची व रामोशांची बातमी देण्याची जबाबदारी येऊन पडली तेव्हा त्यांनी व रामोशी जागले यांनी सरकारला एक विनंतीपत्र सादर केले ते असे, "पूर्वपरंपरेनुसार राजनिष्ठेचे धोरण आम्ही चालू ठेवू व सरकारशी सहकार्य करू, परंतु रामोशी जर घरादारांची राखरांगोळी करतील तर त्यावेळी सरकारने मदत द्यावी व जनतेच्या अडचणींचे निवारण करावे. सरकारने १,००० लोक निरनिराळ्या ठिकाणी सारखे फिरते ठेऊन लोकांतील घबराट घालवून त्यांच्या सुरक्षिततेची हमी द्यावी. रामोशांना जरब बसवावी. सरकारला रामोशांची बातमी देऊनही ते जर हाती न सापडले तर त्याबद्दल जनतेला जबाबदार वा दोषी ठरवू नये.[२०]

कॅ. रॉबर्टसनने यावर त्यांना तोंडी आश्वासन दिले की सरकारला असे साह्य करताना कोणाला इजा झाली अगर काही नुकसान झाले तर सरकार चौकशी करून योग्य तऱ्हेने व पुरेशी मदत देईल. कोणी मृत्यू पावल्यास सरकार विधवेला उदरनिर्वाहार्थ पेन्शन अगर जमीन देईल.[२१]

परंतु याचा काही उपयोग झाला नाही. रामोशांना विरोध करण्यास कोणी धजलाच नाही.

रामोशांचे उद्योग अविरत चालू राहिले. पुणे, सातारा हे जिल्हे व भोर संस्थान यांतून रामोशांनी मोठमोठाल्या रकमा उकळल्या. गावचा वसूल नेला आणि सरकारला आपल्याशी तह करण्याकरिता

अनुक्रमणिका

पाचारण केले. “पादशाही, महाराजे (सातारचे राजेसाहेब) व पेशवे यांनी आम्हांस नेमणुका दिल्या होत्या व त्याप्रमाणे आमचे हक्क आतापर्यंत चालू आहेत व तेच जर आमचेकडे पूर्ववत चालू राहतील तर तहाची कलमे आमचेकडे पाठवावी. परंतु ती जर न पाठवाल तर आज जे बंड एकाच ठिकाणी दिसते आहे अशी हजार बंडे उभी राहतील व सातपुड्यापासून परशरामपर्यंत त्याचा फैलाव होईल आणि सारा देश उजाड बनेल.” (ता. ३०-११-१८२७).[२२] रामोशांच्या या उच्छेदाने सरकार कुंठित झाले. कोकणात, देशावर, सातारा-वाई-भोरपासून कोल्हापुरपर्यंत रामोशांनी सारखी धुमश्चक्री उडवून दिली. त्यांचा पाठलाग करण्यासाठी इंग्रज सरकारने कॅ. डेव्हिस, कॅ. स्पिलरचे घोडदळ व कोल्हापूर-सातारा येथील सैन्य धाडले. त्यांनी कैक वर्षे सर्व प्रदेश वेढून टाकला होता. कॅ. डेव्हिसला तर क्षणाची उसंत नव्हती व या खर्चाखाली सरकार बेजार होऊन गेले. परंतु रामोशांनी दक्षिण पादाक्रांत करणाऱ्या इंग्रज मुत्सद्दी एल्फिन्स्टनला दाद दिली नाही, माल्कमलाही नमविले. लोकांना व सरकारला जरब बसविण्याकरिता त्यांनी जांभूळपाड्याजवळील चौकीवरील चार शिपायांची शिरे गव्हर्नरकडे पत्रासोबत पाठवून दिली. आपल्या पराक्रमाचे गोडवे गाणारे जाहीरनामे त्यांनी आसपासच्या खेड्यांत वाटले. या धाडसी कृत्याने सर्व लोक थक्क व भयचकित झाले. त्यांच्या वाटेस कोणी जाईना.

पण उम्याला माहीत होतं की आपला हा खेळ तलवारीच्या धारेवरील नाचासारखा आहे. म्हणून त्याने सरकारशी समझोता केला. इ.स. १८२९ मध्ये सरकारने त्यास १२० बिघे जमीन साकुरडी येथे इनाम दिली. बाकीच्या रामोशांना बक्षिसी व नोकऱ्या दिल्या.[२३]

तिथून एक वर्षे काम सुरळीत चालले. उमाजी सरकारी हुकमाचा बंदा बनला. पण स्वतः हुकमत गाजवून जन्मभर प्रचंड उलाढाल्या करणाऱ्यास हे वेसण घातलेले जिणे रुचले नाही. पुन्हा काही निमित्त होऊन या रानसिंहाने रानात धूम ठोकली.[२४]

पुन्हा एकदा मुलखांत पुंडाई माजली. इंग्रज सरकारने मात्र या वेळेस रामोशांचा संपूर्ण उच्छेद करावयाचाच असे ठरविले. कॅ. मॅकीन्टोशच्या हाताखाली इंग्रज फौज रामोशांच्या पाठलागास लागली. उमाजी व त्याचे साथीदार यांनीही सरकारचा पिच्छा पुरवण्यास कमी केले नाही. ता. १६ फेब्रुवारी १८३१ रोजी त्यांनी सर्व प्रांतांतील रहिवाशांस व राजेरजवाड्यांस उद्देशून एक जाहीरनामा काढला, “युरोपियन लोक मग ते अधिकारी वा शिपाई कोणीही असोत जेथे सापडतील तेथे पकडून ठार मारावे. साहेबास मारण्याचे काम जे उत्कृष्टपणे बजावील त्यास नव्या सरकारांतून रोख बक्षिसे, इनामे व जहागिरी वगैरे देण्यात येतील. इंग्रजी राज्यांत ज्यांची वतने, हक्क व मिळकती बुडाल्या असतील त्यांना आपले गेलेले हक्क परत मिळविण्याची संधी आली आहे तिचा उपयोग करून घ्यावा. कं. सरकारच्या फौजेत हिंदी शिपाई, स्वार, पायदळ वगैरे आहेत त्यांनी नोकऱ्या सोडून बाहेर निघावे. साहेबाचे हुकूम पाळू नयेत. ही आज्ञा न मानल्यास नवीन सरकार त्यांना शिक्षा करील. फिरंग्याचे बंगले जाळावे. सरकारी तिजोऱ्या लुटाव्या. लुटीचा पैसा त्यांना माफ केला जाईल. सरकारास वसूल भरू नये. हिंदु-मुसलमान कोणी असोत त्यांनी हा आमचा हुकूम मानावा. इंग्रजी राज्य बुडणार असे जे भाकीत आहे ते खरे होण्याची ही वेळ आहे.”[२५]

याप्रमाणे जाहीरनामे लावून रामोशांनी मुलाखात धुमाकूळ सुरू केला. निजाम हद्दीपासून ते थेट कोकणापर्यंतच्या मुलखांत रामोशी आणि इंग्रज सेना यांच्या झटापटी सुरू झाल्या. अखेरीस रामोशांच्या ह्या म्होरक्यास ता. १६ डिसेंबर रोजी भोरजवळ इंग्रजांनी विश्वासघाताने पकडले. यावेळीसुद्धा

अनुक्रमणिका

हिंदवासियांतील फितूर इंग्रजांच्या सहाय्यास गेला. उमाजीवर रीतसर खटला भरून त्यास फाशी दिले आणि इंग्रजांस जंगजग पछाडणाऱ्या रामोशांस स्वस्थ बसावे लागले.

या त्यांच्या बंडात रामोशांचा स्वार्थ होताच. त्यांना आपल्या जमिनी मिळवावयाच्या तर होत्या. इंग्रज सरकारशी मुकबाला सर्व लोकांनी करून हे परकीय सरकार घालवून द्यावे अशीही त्यांची इच्छा होती. ते गोरगरिबांस व रयतेस छळीत नसत. प्रसंगी अंगावरची वस्त्रेसुद्धा ते गोरगरिबांना दान करीत. ब्राह्मणांना दक्षिणा देत. आपल्या निशाणाला व स्वतःला लोकांनी मान द्यावा असे उमाजीला वाटे. ही लक्षणे काही केवळ पोटभरू लुटारू रामोशांची नव्हती. उम्याला पकडणारा कॅ. मॅकिन्टोश [रामोशांचा इतिहास कॅ. मॅकिन्टोश याने लिहून १८३३ मध्ये प्रसिद्ध केला. त्याचे हस्तलिखित जे. डी. व्हॉल्यूम क्रमांक २१/ २८६ स. १८३३ हे महाराष्ट्र शासनाच्या दप्तरखान्यांत आहे.] लिहितो "मोठमोठ्या लोकांनी मला स्वतः खात्रीपूर्वक सांगितले की हा उम्या रामोशी काही असला तसला भटक्या नव्हे. त्याच्या दृष्टीपुढे नेहमी शिवाजीचे उदाहरण होते. शिवाजीप्रमाणे आपण मोठे राज्य कमवावं अशी त्याची उमेद होती."[२६] उम्या म्हणजे सर्वांचा प्यारा. तो हलक्या जातीचा असला तरी त्याची बुद्धि, शहाणपण व उद्योग काही लहान नव्हता. माणसे त्याला चिकटून रहात व देवासारखी भजत. परंतु आता काळ फिरला होता. लढाईचे तंत्र बदलले होते. केवळ गमिनी काव्याने डोंगरांतून लढून सरकारला सतावता आले तरी स्वतंत्र राज्य स्थापणे शक्य नव्हते. त्यासाठी इंग्रज सत्ताधाऱ्यांचे लढाईचे तंत्र आत्मसात करून त्यांच्याशी उघड उघड सामना देणे आवश्यक होते. ठिकठिकाणी इंग्रज राजसत्तेशी इमान राखणारे संस्थानिक, वतनदार यांची एकजूट घडवून आणण्यास चाणक्यासारख्या एखाद्या मुत्सद्याचीच योजना व्हावयास हवी. केवळ स्वातंत्र्यलालसा ही अपुरी पडली असती. म्हणूनच उम्याचे कौतुक करावयाचे ते त्याच्या स्वातंत्र्याच्या लालसेचे. सारे संस्थानिक, सरदार स्वत्व विसरून स्वार्थाच्या, विषयोपभोगांच्या गर्तेत लोळत पडलेले असतांना उम्यासारखा एक स्वातंत्र्यप्रेमी रामोशी आपल्या तुटपुंज्या सामर्थ्यानिशी का होईना इंग्रजांविरुद्ध दंड थोपटून उभा रहावा यातच महाराष्ट्र भूमीचे वैशिष्ट्य आहे. सगळीकडे पराक्रमाचा लोप होऊन अखिल भारतभूमीवर पारतंत्र्याचा अंधःकार पसरू लागला असता उम्याच्या रूपाने पराक्रमाची उल्का तुटून पडली व तिच्या तेजाने दिपून जाऊन पसरणाऱ्या अंधःकाराची भयानकता अधिकच वाढली.

**आधार :** (१) Forest official writings of Elphinstone, pp. 306-7. (२) Peswaichi Akher bakhar, p 173. P. S. D. 1819 Diary 461, pp. 213-30. (३-८) D. C. R Inward Poona Daftar; J. D. 1833, Vol. 21/286. (४) रियासतकार सरदेसाई, उमाजी नाईक, पृ. १४. (९) P. D. 1827, Vol. 15/270 pp. 55-59 (१०) P. D. 1827, Vol. 15/270, p 14 (११-१२) P. D. 1827. Vol. 15/270, pp. 91-93. (१३) P. D. 1827, Vol. 15/270, pp. 216-17. (१४) P. D. 1827, Vol. 15/270, pp. 37-40. (१५) P. D. 1827, Vol. 15/270, pp. 43-44. (१६-१८) P. D. 1827, Vol. 15/270, pp. 45/47 (१९) P. D. 1830-31, Vol. 38/419, (२०-२१) P. D. 1830 -31, Vol. 38/419, pp. 48-50. (२२) P. D. 1830 -31, Vol. 38/419, pp 61-62. (२३) R. D. 1829, Vol. 13. (२४) J. D. 1830, Vol. 3/186, p. 284. (२५) P. D. 1832-33, Vol. 23/549. (२६) J. D. Volume 21/286 of 1833.



अनुक्रमणिका

# सावंतवाडी : १८२८ – ३८, १८४४ – ४५

पेशवाईच्या उत्तरकाळात इंग्रजाने कोकणांत आपले पाय पसरायचा चंग बांधला. एकछत्री राज्य करण्याकरिता मालवणला १८१३ मध्ये वकिलात उघडली आणि ६ वर्षांच्या बऱ्यावाईट कारवायांनी सावंतवाडीकरांना सळो की पळो करून सोडले. अखेरीस साहेबाच्या अटी मान्य करून सावंतवाडीकरांनी इंग्रजांचे मांडलिकत्व १७ फेब्रुवारी १८१९ रोजी तहाने कबूल केले. ब्रिटिश पोलिटिकल एजन्ट सावंतवाडी दरबारी काम करू लागला. युनियन जॅक फडकावीत इंग्रज तुकडी सावंतवाडीत शिरली आणि ख्यालीखुशालीने राहू लागली. हे पाहून लोकांची मने चर्रर्र झाली. १८२३ मध्ये नवीन खेमसावंत (बापूसाहेब) गादीवर आला. यांच्या कारकीर्दीत १८२८, १८३८, १८४४-४५ मध्ये बंडाळी माजली. प्रत्येक वेळी राजाला ब्रिटीश सरकारचे सहाय्य घ्यावे लागे. याचा फायदा इंग्रजाने पुरेपूर घेतला. १८२८ मध्ये महादेवगडचा पूर्वीचा किल्लेदार फोंडसावंत तांबुळवाडीकर याने वाडीसरकारविरुद्ध बंड केले आणि किल्ला ताब्यात घेतला. बंडाचा मोड करण्याकरिता राजेसाहेबाने मुंबई सरकारकडे मदत मागितली. मुंबई सरकारने एक पलटण किल्ल्यावर पाठविली. बंडवाले किल्ला सोडून शेजारच्या इचलकरंजी संस्थानात पळून गेले (१८३०). इ. स. १८३२ मध्ये पुन्हा बरीच धामधूम सुरू झाली. राजेसावंत यांची बायको दादीबाई हिचे व राजाचे वैमनस्य येऊन तिने काही लोक मदतीस घेऊन बंड केले. तेव्हा संस्थानाचे सैन्य व दादीबाईचे लोक यांचा मुकबला वाडी येथे झाला. तीत दादीबाईकडील लोकांचा पुरा मोड होऊन त्यांना पळून जावे लागले. याच साली ता. २६ डिसेंबर रोजी कं. सरकारने सावंतवाडीकरांशी करारनामा केला की इंग्रज सरकारच्या संमतीवाचून वाडी सरकार मुख्य दिवाण विठ्ठल सबनीस यांस दूर करणार नाही. ही अट राजाच्या मनाविरुद्ध होती पण राजा मूग गिळून गप्प बसला. गांवगन्नाचा वसूल चिठ्या न देता होऊ घातला. संस्थानचे जकातीचे उत्पन्नही साहेबाने ब्रिटीश फौजेच्या खर्चासाठी ता. २५ सप्टेंबर १८३८ पासून आपल्याकडे घेतले. शेवटी शांतता राखण्याच्या कामी वाडीकर कमकुवत असा ठपका त्याजवर ठेवला व राजास पदच्युत करून ता. १७ सप्टेंबरपासून संस्थानचा कारभार कं. सरकारने पोलिटिकल एजन्टच्या हाती दिला. त्याच दिवशी एक जाहीरनामा काढून इंग्रज करणार असलेल्या सुधारणा लोकांच्या निदर्शनास आणल्या. या सर्व प्रकारामुळे सावंतवाडीत इंग्रजांविषयी घृणा निर्माण झाली. जिकडे तिकडे सुडाची भावना निर्माण झाली. राजा इंग्रजांच्या आपमतलबी धोरणामुळे राज्यकारभारात लक्ष घालीना. ही संधी साधून चळवळ्या सरदारांनी आपल्या योजनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी गोव्यांत पलायन केले आणि तिथे वाडीचा ताबा मिळविण्याची योजना शिजविली. योजणेप्रमाणे वाडीचा किल्ला ताब्यात घेण्याचे ठरले. ठरलेला बनाव घडला तो दिवस ता. ५ नोव्हेंबर १८३८ चा होता. बंडाचा पुढारी आत्मा चौकेकर याने १०० लोकांच्या मदतीने सावंतवाडीच्या कोटावर अचानक हल्ला केला आणि कोट ताब्यात घेतला. कोटात दिवाणास कोंडून ठेवले. बंडवाले बापूसाहेबास जाऊन भेटले. यावेळी स्पूनर हा पोलिटिकल एजंट होता. त्याला ही बातमी कळताच त्याने लोकांची जमवाजमव केली व तो मुशीच्या दरवाजाजवळ आला. ते पाहताच बंडवाले आर्काच्या दिंडीने पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले तेव्हा इंग्रज सरकारने त्यांच्या पुढाऱ्यांपैकी रामसावंत शिवसावंत तिरवडेकर यांना पकडले. बाकीचे तटावरून उड्या टाकून पळून गेले. पकडलेल्यांपैकी १४ असामीस साहेबाने काळ्यापाण्याच्या शिक्षा ठोठावल्या आणि त्यांची रवानगी अहमदाबाद तुरुंगात केली.

आपल्या सहकाऱ्यांना या शिक्षा ठोठावल्या म्हणून पळून गेलेल्या बंडाच्या पुढाऱ्यांनी हातपाय गाळले नाहीत. उलट सुडाची भावना जास्तच फोफावली. चौकेकर याने यावेळी भोजसावंत माणगांवकर यास मदतीस घेतले. गोव्यांतील काही लोकांची मदत मिळविली. काही वाडीचे लोक गोळा केले व ता. १९ डिसेंबर १८३८ रोजी हणमंतगड किल्ल्याचा ताबा मिळविला. वाडीतील कोट घेण्यासाठी वाडीनजीकची

मेटे धरून मार्ग बंद केला. पोलिटिकल एजंटने या बंडवाल्यांवर सैन्य पाठविले. या झटापटीत सैन्याच्या हाती चौकेकर आदि बंडाचे पुढारी सापडले. त्यांना गिरफदार केले. बंडाचा एक पुढारी भोजसावंत गोळागोळीत ठार झाला. पकडलेल्यांपैकी काहींना काळ्यापाण्याची व बाकीच्यांना कैदेची शिक्षा देऊन त्यांचा निकाल लावला.

दुसरा प्रसिद्ध बंडवाला फोंडसावंत तांबूळवाडीकर व त्याचे मुलगे हे लपून राहून सरकारास वरचेवर त्रास देऊ लागले. त्यांच्यासाठी स्पूनरने एक जाहीरनामा काढला : "हे लोक हजर होऊन सरकारच्या स्वाधीन झाले तर त्यांस मागील अपराधाबद्दल पूर्ण माफी मिळेल." त्याप्रमाणे फोंडसावंत व त्याचे सात मुलगे हजर झाले. त्यापैकी चार असामींनी आळीपाळीने वाडीत रहावे व बाकीच्या चारजणांनी कलंबिस्त येथे राहून वतनाची व्यवस्था करावी, परवानगीशिवाय बाहेर कोठे जाऊ नये, रयतेपासून पैसा वसूल करू नये, अशा अटी घातल्या. ह्या अटी मान्य करून ही मंडळी त्याप्रमाणे ४ वर्षे चालली.

या मुदतीत संस्थानचा कारभार साहेब हाकीत होता. त्याने बऱ्याच सुधारणा केल्या. वसुलाचे सोईकरिता संस्थानाचे तीन भाग पाडले. तीन मुलकी अंमलदार नेमिले. पण लोकांनी पोलीस अंमलदारांना दाद दिली नाही. त्यांनी आपले बंडाळीचे उद्योग चालूच ठेवले.

कोल्हापूरमधील १८४४ च्या गडकरी उठावाची पुनरावृत्ती इथेही झाली. कोल्हापुरातील इतस्ततः पसरलेली बंडाळी इंग्रज सरकारने मोडून काढली. बंडवाल्यांस आपले आपमतलबी हेतू साधण्यास अडचण झाली, त्यामुळे कित्येक लोकांची मने दूषित झाली होती. हे लोक मनोहरगडास गेले. हा किल्ला बेळगावच्या नैर्ऋत्येस ३५ मैलांवर आहे. त्यास सावंतवाडी संस्थानातील प्रसिद्ध बंडवाले फोंडसावंत व त्यांचे मुलगे जाऊन मिळाले. किल्ल्यातील गडकरीही सामील झाले. किल्ला बंडवाल्यांचा तळ झाला. रांगणा व मनोहरगडावरील हालचाल पाहता यावी म्हणून सावंतवाडी लोकलकोरचा अंमलदार मेजर बेनबो याच्या हाताखाली सैन्याची एक टोळी हनुमंत घाटाच्या पायथ्याशी नेरूर येथे छावणी करून राहिली. नंतर १० ऑक्टोबर रोजी बंडवाले किल्ल्याखाली उतरून गोठोस गावात शिरले. तेथे गावातील प्रतिष्ठितांच्या घरांवर हल्ले चढविले. कुळकर्णी व गडाचे सबनीस यांच्या ताब्यातील कागदपत्रे जाळून टाकले. दुसऱ्या दिवशी नेरूर गावात उतरले. तेथेही पहिल्याचीच पुनरावृत्ती झाली आणि हाच कार्यक्रम त्यांनी चालू ठेवला. जिकडे तिकडे जाळपोळ, लुटालूट, धान्याची दुकाने, सराफांची दुकाने, इंग्रजांबद्दल ओलावा असलेल्या सावकारांची घरे, सर्वत्र लुटालूट केली. लोकांनी कायदा आपल्या हातात घेतला. या बंडवाल्यांच्या चाळ्यांस आळा घालण्याकरिता मेजर बेनबोच्या हाताखालील इंग्रजी तुकडीने शिकस्त केली. पण त्यालाही बंडवाल्यांनी झोपवले. बंडवाल्यांना आता आत्मविश्वासाची प्रचिती आली. राजघराण्यातील पुरुषांनी आपले पुढारीपण करावे असे त्यांना वाटू लागले. गादीचे वारस आण्णासाहेब त्यावेळी १६ वर्षांचे. त्यांचे मन वळविण्यात बंडवाल्यांनी यश मिळविले. १६ नोव्हेंबर १८४४ रोजी रात्री ते बंडवाल्यांस मिळाले. मनोहरगड किल्यामध्ये जाऊन पोहोचताच त्यांच्या सन्मानार्थ तोफांची सलामी दिली. बंडवाल्यांना परमावधीचा आनंद झाला. अण्णासाहेबाने राजा पदवी धारण केली. काही गावांचा वसूलही गोळा केला. गावागावांतून बंडाळ्या माजू लागल्या. बंडवाले आता एवढे प्रबळ झाले की, त्यांनी दहाव्या पलटणीच्या अधिकारीवर्गास बोलणी करण्यास पाचारण केले. धुमाकूळ तसाच चालूच राहिला. १८४५ मध्ये सबंध सावंतवाडी संस्थानात अराजकी माजली. ना कायदा, ना न्याय, ना निवाडा. बळी तो कान पिळी अशी स्थिती सर्वत्र झाली होती. ब्रिटीश सरहद्दीवरील नाकी सुद्धा सुरक्षित नव्हती.

**बंडाचा कळस**

डोंगराळ मुलूख, जिकडे तिकडे जंगल, त्यात लपून राहण्याची बंडवाल्यांस उत्तम सोय यामुळे अराजक जास्त वाढले. बंडवाल्यांपैकी सुभाना निकमने मालवण व आसपासचा मुलूख आपल्या ताब्यात घेतला. उत्तरेला दाजी लक्ष्मणने आपला जमाव जमवून प्रतिकाराची जोराची तयारी ठेवली. हिरसावंत डिंगणेकरने रामघाट रस्त्यावरील भेंडशी ठाण्यावर रोख धरला. मनोहरगड येथील बंडवाल्यांनी शिवापूर व शिरशिंगे गावाच्या जंगलात स्वतःचा एक दारू काढण्याचा कारखाना काढला. त्यासाठी लागणाऱ्या सामानाचा पुरवठा देशावरून होत असे. अशा प्रकारच्या जय्यत तयारीमुळे चळवळ फोफावत होती. नवीन नवीन नेते निर्माण होत होते. त्यांनी ब्रिटिश हद्दीतील वराड व पेंडूर या गावांचा वसूलही गोळा केला.

**उपाय**

पण हळूहळू कं. सरकारने ही सर्व परिस्थिती आपल्या आटोक्यात आणली. बंडाचा जास्त प्रसार होऊ नये म्हणून निरनिराळे हुकूम काढले. गांवकर, फौजदार, कुळकर्णी यांनी एकत्र जमावे, आपल्या खेड्यांतील कोणी इसम गैरहजर असतील तर त्याबद्दल तपास ठेवावा, सर्व हत्यारे हजर करून घ्यावी, शक्य तितके आसपासचे जंगल तोडावे हे मुख्य हुकूम. त्याबरोबरच १४ जानेवारी १८४५ रोजी लष्करी कायदा पुकारला. वेंगुर्ला, बेळगाव व मद्रास येथून लष्करी मदत मिळविली आणि सावंतवाडीच्या तीन भागांत तीन लष्करी तुकड्या ठेवल्या. तसेच निरनिराळ्या ठिकाणी बंडवाल्यांच्या पुढाऱ्यांस गुंतवून ठेवले. त्यातील उल्लेखनीय म्हणजे रांगणा किल्ल्यावरील झोंबाझोंबी. येथे हल्ल्याप्रतिहल्ल्यात बंडवाले गुंतून राहिले असता कॅ. औटरॅमने मनोहरगड घेतला आणि बंडवाल्यांस पिटाळून लावले. त्यांपैकी काही गोवा हद्दीत पळाले.

इंग्रज सरकारने सर्वसाधारण जनतेकरिता एक माफीचा जाहीरनामा काढला. ता. १३ फेब्रुवारी १८४५ रोजी फोंडसावंत व त्याच्या मुलांना पकडून देण्याकरिता रु. १.००० व ३,००० ची बक्षिसे जाहीर केली. तरी सुद्धा यांपैकी एकासही धरून देण्याची कोणाची छाती झाली नाही. बंडवाल्यांस सामील झालेले जे लोक त्यांना सोडून पूर्ववत आपआपले धंदे सुरू करतील त्यांना कं. सरकारने माफी जाहीर केली तसेच अण्णासाहेबांचा संस्थानावरील हक्क काढून घेतल्याचा पुकारा केला. त्यांचे मुलूखही खालसा केले. मात्र त्यांस सावंतवाडीत येऊन राहण्याची मोकळीक दिली. त्यांच्या योगक्षेमाकरिता १०० रु. नेमणूक दिली. त्याप्रमाणे ता. २१ ऑगस्ट रोजी ते सावंतवाडीस येऊन राहीले. १८५० मध्ये यांच्या कुटुंबियांना ठराविक तनखा देण्याचे ठरविले. फोंडसावंतांच्या धाकट्या मुलांना माफी दिली आणि सावंतवाडीत येऊन राहण्याची परवानगी दिली. परंतु नाना, बाबा व हनुमंत असे फोंडसावंतचे तिघे मुलगे गोव्यातच राहिले. सरकारने त्यांजवर नजर राखली.

**आधार :** पिंगुळकर सावंतवाडी संस्थानचा इतिहास; Pre-1857, Records Ratnagiri Distriot, Vol. 2/1 (Poona Daftar); P. D. 1844, Vol. 23/28; P. D. 1849, Vol. 157/2340; P. D. 1846, Vol. 1850; Choksey, Malwan Residency Records.

अनुक्रमणिका

# कोल्हापूर गडकऱ्यांचा उठाव (१८४४)

कोल्हापूरच्या छत्रपतींनी १ ऑक्टोबर १८१२ च्या तहाने कं. सरकारचे मांडलिकत्व पत्करले. इ. स. १८१३ ते १८२१ पर्यंतत संभाजी ऊर्फ आबासो, ह्यानंतर १८२१ मध्ये राजा शहाजी ऊर्फ बुवासाहेब गादीवर आल. तो उधळ्या पण इंग्रजद्वेष्टा होता. आपले सैन्य वाढविण्याचा उपक्रम त्याने सुरू ठेविला. संधी येईल त्यावेळी इंग्रजांविरुद्ध उठाव करणाऱ्यांसही त्याने गुप्त मदत केली. १८२४ मध्ये कित्तूरला उठाव झाला. कलेक्टर थॅकरे मारला गेला. त्यावेळी सुद्धा शहाजी ऊर्फ बुवासाहेबांची गुप्त फूस या उठावाला असल्याचा वास इंग्रजांस आला होता. त्याने आपल्या सरदारांना त्रास देण्यास सुरुवात केली. राज्यात वारंवार लुटालूट होऊ लागली त्यामुळे प्रजेने या गोष्टीचा धसका घेतला. हा धुमाकूळ थांबविण्याकरिता मग त्याजविरुद्ध इंग्रजांनी सैन्य पाठविले. त्याचा परिणाम म्हणून कागल व सातारा या दोन्ही राज्यांतील बळकाविलेला मुलूख त्यास परत करावा लागला. ३० डिसेंबर १८२५ च्या कराराने राजा पुन्हा बांधला गेला. कं. सरकारच्या शत्रूंना कोल्हापूरने कधीही आसरा देऊ नये. गुंडापुंडांचा पाठलाग करून त्यांना चिरडून टाकावे व शांतता राखावी; अशा शर्ती राजाने कबूल केल्या. पण ह्या तहास मुंबई सरकारने मंजुरी देण्याच्या अगोदर राजाने आपली सैन्यसंख्या कमी करावी आणि शांततेस धोका येईल असे काहीच करू नये अशा दोन अटी आणखी जोडल्या. तह २४ जानेवारी १८२६ रोजी मंजूर झाला. त्यानंतर राजाने पूर्वी दिलेली आश्वासने, तहातील अटी या सर्वांवर बोळा फिरविला. लुटालूट सैन्यभरती वगैरे गोष्टी चालू ठेविल्या. पुन्हा येरे माझ्या मागल्या प्रकार सुरू झाला. तेव्हा ऑक्टोबर १८२७ मध्ये कं. सरकारने राजावर नवा तह लादला. सैन्यसंख्या कमी करणे आणि कोल्हापूर व पन्हाळगड किल्ल्यांत ब्रिटिश सैन्य ठेवणे या दोन मुख्य अटी राजाकडून कबूल करविल्या. नेहमीप्रमाणे राजाने हो म्हणावे आणि आपले उद्योग चालूच ठेवावे असा कार्यक्रम शहाजी राजाने आपल्या मरणापर्यंत चालू ठेवला. तो २९ नोव्हेंबर १८३८ रोजी मरण पावला.

शहाजी राजाला दोन बायकांपासून दोन मुलगे होते. जिजाबाई व दिवणाबाई या त्यांच्या दोन राण्या. जिजाबाईच्या मुलाचे नाव बाबासाहेब (चौथे शिवाजी) व दिवणाबाईच्या मुलाचे नाव चिमासाहेब. दोन्ही मुले अल्पवयी. राण्यांनी कारभार पहावयाचा पण राजाच्या मृत्युनंतर या दोन्ही राण्यांचे आपसांत पटेना. त्याचा फायदा घेऊन करवीर कारभारात इंग्रजांनी हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. तहातील कलमामुळे इंग्रज सरकारने राज्यकारभार सुधारण्याकरिता दाजी कृष्ण पंडित यास कोल्हापूरचा दिवाण नेमले. दाजी कृष्णाच्या हातात कारभार गेलेला पाहून धाकट्या राणीस व तिच्या तंत्राने चालणाऱ्या दरबारी मंडळींस रुचले नाही. त्यांचा तडफडाट झाला. पण त्यांना उघड काहीच करता येईना. दाजी कृष्ण पंडिताने राज्यकारभारात बऱ्याच सुधारणा घडवून आणल्या. पण या सुधारणा दरबारातील बड्यांच्या इच्छेविरुद्ध झाल्या, त्यामुळे कटुता वाढली आणि तिचा स्फोट १८४४ च्या गडकरी उठावात झाला.

**गडकऱ्यांच्या जमिनी गेल्या**

मराठी राज्यांत किल्ल्यांतील बंदोबस्त गडकरी ठेवीत असत. त्यांना त्याबद्दल तनखा मिळत असे. त्या त्या किल्ल्याच्या जवळपासच्या जमिनी त्यांच्यकडे तनख्यासाठी लावून दिलेल्या असत. इंग्रजांचे राज्य आले. सातारा गादीचे पुनरुत्थान होऊन राजा प्रतापसिंहाचा मार्गदर्शक ग्रॅन्ट डफ बनला. या ग्रॅन्ट डफने सातारा राज्यातील जमाबंदीस नवीन धर्तीने सुरुवात केली. तीच पद्धती इतर मराठी संस्थानांत लागू केली. गडकऱ्यांना इतःपर किल्ला संरक्षणाकरिता जमिनी द्यावयाच्या नाहीत. कारण किल्ल्याचे संरक्षण

अनुक्रमणिका

करण्याकरिता इंग्रजांना गडकऱ्यांच्या नोकरीची गरज नव्हती. त्यांना तसे कळविण्यात आले. मात्र ज्या जमिनी त्यांच्याजवळ होत्या त्या तशाच राहू दिल्या आणि त्यांचा जमीनसारा त्यांनी सरकारात भरावा असे ठरले.

झालेल्या नवीन बदलास गडकऱ्यांनी सकृतदर्शनी मान तुकविली. शेतसारा वसुलीकरिता दाजीबाने एका मामलेदाराची नेमणूक केली. याचे गडकऱ्यांना फार वाईट वाटले. गडकऱ्यांचे म्हणणे- "दाजीबा राजाचा कारभारी. त्याने आम्हांपासून वसूल न्यावा. हा मामलेदार आमच्याहून कमी. त्यालाच आमच्या डोक्यावर बसविले. हा आमच्यावर अन्याय आहे, आमचा आपमान आहे." त्याप्रमाणे त्यांनी कोल्हापूरच्या कारभाऱ्याला कळविलेही. पण दाजीबाने त्याचे म्हणणे ऐकले नाही. दाजीबा आपले म्हणणे ऐकत नाही हे पाहून गडकऱ्यांनी आपली तक्रार राजघराण्यातील मंडळीकडे नेली. दरबारी मंडळीला तरी दाजीबाचे आणि त्याच्या पाठीराख्या कं. सरकारचे कुठे बरे पहावत होते? त्यांनी आपला काही इलाज नाही असे सांगून असहाय्य स्थिती व्यक्त केली.

कारभारी आणि गडकरी यांच्यात पेच निर्माण झाला. याचे पर्यावसन सामानगडावरील सामन्यात झाले. सामानगडावरील हुजरे, कारकून व सैनिक यांनी दाजीबाने पाठविलेल्या मामलेदारास वसूल देण्याचे नाकारले. इतकेच नव्हे तर त्यांनी मामलेदारातर्फे आलेल्या माणसांना चोपून काढले. दाजीबाला हे कळताच त्याचा राग अनावर झाला. ह्या गडकऱ्यांना शिक्षा केलीच पाहिजे हे त्याने ठरवून टाकले. सामानगडावरील गडकऱ्यांशी दोन हात करून तो किल्ला खाली करण्याच्या उद्योगास दाजीबा लागला. त्याने बेळगावहून इंग्रजी सैन्य मागविले आणि गडावरील किल्लेदारास खलिते पाठवून किल्ला खाली करण्यास फर्माविले. सामानगडावर हल्ला करण्याकरिता कं. सरकारचे सैन्य बोलाविले. तेव्हा १,२०० सैन्याची सुसज्ज तुकडी कॅप्टन औटरॅम याच्या नेतृत्वाखाली गडाच्या रोखाने आली. त्याचा तळ गडाच्या पश्चिम बाजूने पडून किल्ल्यास वेढा घातला. किल्ला फारच मजबूत आणि अवघड ठिकाणी होता. गडकऱ्यांनीही आपल्या परीने लढ्याची सर्व तयारी केली होती. कारण तो त्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न होता. आग धुमसत होती. तिला फक्त वाचाच फोडावयाची होती. किल्ल्यावरील तोफा धडाड धडाड गर्जू लागल्या. गडकरी घारीसारखा इंग्रजांवर तुटून पडला. पहिल्याच धडाक्यात कंपनीचे काही सैनिक आणि अधिकारी गारद झाले.

दाजीबा स्वतः या सामन्यांत होता. त्याने इंग्रजी तुकडीचा धुव्वा उडालेला पाहिला आणि तो कोल्हापूरास परत गेला. आल्यानंतर त्याने गडकऱ्यांची शक्ती हिरावून घेण्याचे उपाय योजण्यास सुरुवात केली. प्रथमतः माऱ्याच्या जागी ठेवलेल्या किल्ल्यावरील सर्व तोफा खाली आणण्याचा हुकूम त्याने दिला. सरकारच्या ऑर्डिनन्स खात्यातील नोकरांना हा हुकूम होता. हुकूम मिळताच त्यांनी दाजीबाला विनयाने सांगितले, "या तोफा आज कैक वर्षे राजाच्या परवानगीने किल्ल्याच्या बुरुजांवर खड्या आहेत. त्या तुमच्या अधिकारांत आम्ही खाली आणू शकत नाही." यावर दाजीबाने या तोफांची अणकुचीदार टोके छाटण्याचा हुकूम दिला. पण तोही त्या लोकांनी मानला नाही. तेव्हा त्यांना पकडण्याचा धाकदपटशा दाखविण्यात आला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

अनुक्रमणिका

**प्रतिसरकारची स्थापना : दाजीबाला पकडले.**

ऑक्टोबर १८४४ मध्ये बंडवाल्यांनी दाजी पंडीत कारभाऱ्याला कैद करून शहराचा ताबा घेतला. संस्थानचा बेळगावशी असणारा पोष्टाचा संबंध तोडून टाकला. सुभाना निकम ५०० बंडवाल्यांसह सामानगडला गेला आणि कोल्हापुराशी असलेले दळणवळण तोडून टाकले. बंडवाल्यांनी पन्हाळा आणि पावनगड हे दोन्ही किल्ले घेतले. रावजी वाकनीस आणि दिनककराव गायकवाड यांनी बंडाचा झेंडा उभारला आणि कोल्हापूर शहराभोवती रक्षक ठेवून सर्व दळणवळणावर ताबा मिळविला. बंडवाल्यांनी सैनिक जमा केले आणि पुष्कळ लोक त्यांना साहाय्य करू लागले.

विशाळगडचे लोक ह्यांना सामील झाले. चिकाडीचा खजिना त्यांनी लुटला. लुटताना सरकार रक्षक मारले आणि कैद्यांची सुटका केली. सरकारी कागदपत्रही जाळले. सरकारी अधिकारी या जागेतून पळून गेले.

बंडखोरांनी १३ ऑक्टोबर १८४४ च्या सकाळी समानगड ताब्यात घेतला.

इंग्रज सरकारने १९ सप्टेंबर १८४४ रोजी गड जिंकण्यासाठी फौज पाठविली. त्या फौजेत मद्रासकडील बाराशे लोक होते. त्यांच्याजवळ चार तोफा, शंभर बंदूकबारदार व दोनशे इतर सैनिक होते. २४ सप्टेंबर रोजी इंग्रजांच्या फौजेने किल्ल्यावर हल्ला केला. पण त्याचा उपयोग झाला नाही. मग फौजेने किल्ल्याच्या तटास भगदाडे पाडण्यासाठी तोफांचे मोर्चे लाविले. गडकऱ्यांनीही मोर्चे उधळून लावण्याचा निकराचा प्रयत्न केला. कोल्हापूराहून मदत न मिळाल्यामुळे गडकरी एकाकी पडले. त्यांना इंग्रजांच्या तोफांच्या माऱ्यापुढे टिकाव धरता आला नाही शेवटी गडकरी शरण आले. समानगड इंग्रज फौजांच्या हाती १३ ऑक्टोबर १८४४ रोजी पडला.

दि. १२ नोव्हेंबर रोजी कर्नल ओव्हॅन्स सातारा सोडून कोल्हापूरला येण्यास निघाला. पण वाटेत त्याला बंडखोरांनी पकडले आणि कैदी म्हणून पन्हाळा किल्ल्यामध्ये नेऊन ठेवले. त्याला ब्रिटिश फौजांनी काही दिवसांनी सोडविल्यावर तो. २५ जानेवारी १८४५ रोजी साताऱ्यास आपल्या कामावर हजर झाला.

**आधार :** (१-६) Pre. 1857 Records (Peshwa Daftar). Kolhapur, Vol. 1/2 (७-१२) P. D. 1844. Vol. 74/18 7. pp. 168-187. (१३) Pre. 1857 Records (Peshwa Daftar). Kolhapur, Vol. 1/2, p. 338. (१४) Per. 1857 Records (Peshwa Daftar). Kolhapur, Vol. 1/2, p 347. (१५) Per. 1857 Records (Peshwa Daftar), Kolhapur, Vol. 1/2, p. 328. P. D. 1844, Vol. 1612, p. 749 (१६) Per. 1857 Records (Peshwa Daftar), Kolhapur, Vol. 1/2, p. 481.

# प्रकरण चौथे

# स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्र

## कोल्हापूर

बंगाल रेजिमेंट या देशी सैनिकांच्या तुकडीने भरतभूमीची इंग्रजांच्या कचाट्यांतून मुक्तता करण्यासाठी इ. स. १८५७ मध्ये रणशिंग फुंकले. या निनादाला उत्तर भारताने किती तेजस्वितेने साथ दिली ते आता सर्वश्रुत आहे.

इ. स. १८५७ मध्ये महाराष्ट्राची स्थिती काय होती?

सातारा राज्य १८४८ सालात खालसा झालेले, निजाम इंग्रजांचा दोस्त बनलेला. कोल्हापूर, सांगली, कुरुंदवाड वगैरे छोटे संस्थानिक हयात होते पण इंग्रजांविरुद्ध जाण्याइतकी त्यांच्यात शक्ती नव्हती. असे असतानाही या आगीने महाराष्ट्रात पेट घेतला हे नाकारता येणार नाही. त्यावेळची महाराष्ट्रातील जनशक्ती दुभंगलेली होती.

त्यावेळी महाराष्ट्र "थंडगोळा" होऊन पडला होता असे म्हणायला हरकत नाही. तरीपण महाराष्ट्र-मन पारतंत्र्याच्या तापाने एकसारखे जळत होते. ते संधीची वाट पहात होते. ती संधी १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाने आली. रंगो बापूजी सातारकरांचा वकील त्यावेळचा मोठा कारस्थानी माणूस, त्याने ही ज्वाला महाराष्ट्रात पेटवून महाराष्ट्र इंग्रजांच्या तावडीतून सोडवावयाचा निश्चय केला. त्याप्रमाणे त्याने प्रयत्नही केला पण तो अयश्स्वी ठरला.

### कोल्हापूरचा प्रयत्न

दुसरा प्रयत्न कोल्हापूरचा. कोल्हापूरची गादी शिवछत्रपती शाखेपैकी. कोल्हापूरचा राजा बुवासाहेब १८३८ मध्ये वारला त्यावेळी त्यास दोन अल्पवयीन मुलगे होते. तिसरे शिवाजी ऊर्फ बाबासाहेब व चिमासाहेब. इंग्रजांनी दोघांपैकी एकालाही गादीवर बसवले नाही. ब्रिटिश सरकारने आपल्या तंत्राने चालणारा रामराव देसाई यास मुख्य कारभारी नेमिले. त्याने बेळगावचे ब्रिटिश पोलिटिकल एजंट अंडरसन यांच्या सल्ल्याने व सूचनेप्रमाणे कोल्हापूरचा कारभार सुरू केला. लागलीच इंग्रजांनी स्वतःच्या पथ्यावर पडणाऱ्या नवीन सुधारणा घडवून आणण्यासाठी पाऊले उचलली. पूर्वी कोल्हापूर संस्थानच्या ताब्यातील सर्व किल्ल्यांवर शिबंदी असे. ती पोलिटिकल एजंटने काढून टाकली. साहजिकच दरबारी लोकांना हे पसंत पडले नाही. लोकांच्या मनात त्यामुळे कटूता निर्माण झाली. ह्या शिबंदीतील गडकरी सैनिक होते. त्यांना शिवकालापासून किल्ल्यांच्या रखवालदारीबद्दल किल्ल्यांच्या आसमंतातील जमीनजुमला वहिवाटीस मिळालेला. शिबंदी गेल्यानंतर जमिनी तरी कशा राहणार? त्याही गेल्या. साहजिकच या लोकांनी इ. स. १८४४-४५ मध्ये बंड केले. या बंडाचा पुरा मोड कंपनी सरकारने केला आणि कोल्हापूरला पोलिटिकल सुपरिटेंडेन्ट नेमला. विधवा राणीने बंडाचा झेंडा उचलला असा समज होता. तिला पुण्यास ठेविले. हे बंड सावंतवाडीला सुद्धा झाले. या बंडाचा मोड करण्यास लागलेल्या खर्चाचा भुर्दंड १/३ सावंतवाडी व २/३ कोल्हापूर दरबारावर इंग्रजांनी लादला. हा खर्च म्हणजे कोल्हापूर राजाने घेतलेले शे.

५ दराचे कर्ज असे समजण्यात यावे असे त्यांनी ठरवून दिले. राज्यकारभाराच्या अति खर्चिक व्यवस्थेमुळे हे कर्ज फिटणे शक्य नव्हते आणि कर्ज फिटेपर्यंत राजाला गादीवर बसवायचे नाही असे कंपनी सरकारने ठरवून टाकलेले, यामुळेच लोकांचा संशय दुणावत चालला व त्यांना वाटू लागले की राजाच्या हातात आता राज्यकारभार येतच नाही. या संशयामुळे दरबारी मंडळींची मने कटाकडे झूकु लागली. कंपनी सरकारची सत्ता झुगारून देण्याचा कट राणी सईबाई व दिनकरराव गायकवाड यांनी केला. इंग्रज सरकारने हा कट मोडून काढला आणि राणी सईबाईस पुण्यास आणून नजरकैदेत ठेवले. तिथे ती १८६१ मध्ये निवर्तली. दिनकरराव गायकवाड अशिरगडावर कैदेत वारला.

**ताईबाईसाहेबांचा हस्तक**

हां... हां म्हणता १८५७ उजाडले. नानासाहेब पेशव्यांचे दूत दक्षिणेतही वावरू लागले. कोल्हापूर दरबारी व सैनिकांना निरोप देणे, आणणे ही कामे सुरू झाली. कोल्हापूर महाराजांस भेटून त्यांना आपलेसे करण्याचे काम ग्वाल्हेरचे ज्योतिराव ऊर्फ भाऊसाहेब घाटगे याजकडे सोपविण्यात आले.[१] ही स्वारी कोल्हापुरास जून १८५७ मध्ये आली. त्याने धाकटे राजे चिमासाहेब यांची भेट घेऊन त्यांना चांदीची मूठ आणि मौल्यवान पाते असलेली तलवार भेट दिली. तीवर नक्षीदार अक्षरांत लेख कोरलेला होता. ती ग्वाल्हेरहून आलेली होती. याच वेळी नानासाहेब पेशव्यांनी चिमासाहेबांच्या भेटीस पाठविलेला इसम कोल्हापुरात हजर होता. त्याने दिवसा बहुधा शहराबाहेर जायचे व रात्री राजाला भेटायचे असे ठरले. त्यांची राजाशी गाठ ह्या घाटगेनेच घालून दिली. हा इसम पुण्यास पेन्शन खात असलेल्या कोल्हापूरच्या विधवा ताईबाईसाहेबांचा हस्तक होता असे मागाहून उघडकीस आले.[२]

बंडखोरांनी बळवंतराव नाईक निंबाळकर या सरदारांचेही साहाय्य या कामी मिळविले. हा गृहस्थ सातारा व कोल्हापूर या दोन्ही राज्यांतून जहागीर म्हणून काही गावे उपभोगीत होता.[३] याची सत्ताविसाव्या पलटणीच्या आसमंतात सारखी ये-जा चालू होती. यानेच त्या पलटणीस उठाव करण्यास उद्युक्त केले असे मागाहून उघडकीस आले आणि जेव्हा त्यास वाटले की, आपण व्यवस्थित दारू भरलेली आहे, आता स्फोट होण्याचा अवकाश तेव्हा तो (उठावाच्या) अगोदरच ग्वाल्हेरला निघून गेला.[४] हा त्याचा उद्योग मागाहून उघडकीस आल्यावर इंग्रजांनी त्याची नेज आणि बुडावर ही दोन इनामी गावे जप्त केली.[५]

धाकटे राजे चिमासाहेब यांजकडूनही गुप्त माणसांची ये-जा सैनिकांकडे सुरू झाली.[६] प्रमुख नागरिकांनी या सगळ्या बनावास मूक पाठिंबा दिला. मुंबईहून प्रसिद्ध होणारी "वर्तमानदीपिका" आणि "वृत्तसार" ही दोन मराठी वृत्तपत्रे उत्तरेकडील उठावाच्या ऐकीव बातम्या देऊ लागली[७] व प्रत्यक्षपणे दक्षिणेतील सैनिकांना चेतवू लागली. नानासाहेब पेशवा लवकरच फौज घेऊन दक्षिणेत येणार असल्याची भित्तिपत्रे पुण्यात आढळली.[८] यावरूनही आफवांना ऊत आला. इंग्रज या वर्षी बुडणार असे भाकित कोणी केले होते. तेच खरे ठरणार असेच सैनिकांना वाटू लागले.[९]

**३१ जुलै १८५७ ची रात्र**

कोल्हापूरात सशस्त्र उठावाची पूर्ण सिद्धता झाली. सत्ताविसाव्या पलटणीतील २०० शिपायांनी ३१ जैले रात्री "मारो फिरंगी को" अशा आरोळ्यांत मे. रोलंड आदि मिलिटरी अधिकाऱ्यांच्या निवासस्थानांवर हल्ला चढविला.[१०] पण या हल्ल्याची कुणकुण इंग्रज लोकांना अगोदरच लागल्यामुळे अगोदरच

अनुक्रमणिका

रेसिडेन्सीमध्ये त्यांनी आश्रय घेतला होता.[११] तेथे त्यांना कोल्हापूर लोकल इन्फंट्री, सदर्न मराठा घोडेस्वारांची एक तुकडी आणि राजाची खाजगी संरक्षक सेना यांचा आधार मिळाला. निवासस्थाने निर्मनुष्य पाहून क्रांती सैनिकांचा पुढारी रामजी शिरसाट याने सैनिकांस खजिना लुटण्यास फर्माविले.[१२] त्यांनी सैन्यखजिना लुटला, दारूगोळा ताब्यात घेतला व कँटोनमेंट बाझारही लागलीच लुटून फस्त केला. त्यानंतर हे क्रांतिसैन्य कोल्हापूर शहराच्या दिशेने निघाले शहराच्या वेशीपाशी येताच त्यांना शहराचे दरवाजे बंद आढळले.[१३] आपणाला विरोध होत आहे असे पाहून या शूर वीरांनी आपला तळ "पागा" या जागी दिला. रात्र तेथेच घालविली. त्या रात्री त्यांनी आपले बेत निश्चित केले.[१४] सकाळी ५ च्या सुमारास सुमारे १२५ सैनिक राजाच्या भेटीस निघाले.[१५] पण राजाने शहराचे दरवाजे उघडण्याचे नाकारून त्यांना आत घेतले नाही.[१६] तेव्हा ते सैनिक राधाकृष्णाच्या देवळात शिरले.[१७] सकाळी कर्नल मोघॅमने आपल्या हाताखालील बाजारबुणग्यांसह "पागे" वर हल्ला चढविला. पण त्या शूर सैनिकांनी कॅ. मोघॅमला पाणी पाजले. त्याला हात हालवीत परत जावे लागले.[१८] पण परतता परतता मोघॅमने काही क्रांतिसैनिकांना पकडले आणि राहिलेल्यांना शहरात पळून जाता येऊ नये अशी तजवीज केली.[१९] त्यांपैकी ३० शिपाई पागेची जागा सोडून दि. १ ऑगस्टला रत्नागिरीस बंडखोरांना सामील होण्यास निघाले[२०] पण घाट उतरत असताना गोऱ्या शिपायांनी रस्ते रोखून धरल्याचे त्यांना दिसून आले.

रस्ते रोखले गेल्यामुळे बरेचसे शिपाई रामजी शिरसाटच्या नेतृत्वाखाली सावंतवाडीच्या रोखाने निघून गेले. क्रांतिकारकांच्या दुर्दैवाने झांशीच्या राणी, तात्या टोपे किंवा नानासाहेब यांसारख्या धैर्याचा मेरू असा पुढारी त्यांना लाभला नाही. रामजी शिरसाटचे नेतृत्व अपुरे पडत होते. तरी पण त्यांना आपल्या यशाची अशा वाटत होती. दुसऱ्या दिवशी हे सैन्य सोळुंकर गावी गेले.[२१] तिथे त्यांना तीन इंग्रज अधिकारी भितीने सैरावैरा पळत असलेले दिसले. रामजी शिरसाटने आपल्याकडून खोटी होऊ दिली नाही. त्यांना पकडून कंठस्नान घातले.[२२]

**पहिल्या उठावाची समाप्ती**

३ ऑगस्टला ले. केर यांच्या आधिपत्याखाली साताऱ्याहून रवाना झालेले सैन्य कोल्हापूरला पोहोचले. पुण्याहून सुद्धा गोऱ्या पलटणी व दारूगोळा ह्या उठावाच्या शमनार्थ पाठविल्या. गोऱ्यांची एक तुकडी बेळगावच्या बंदोबस्ताला गेली. तळकोकणात क्रांतिसेनेपैकी कोणी जाऊ नये म्हणून तिला वाघोटण्याला ठेविले. कोकणातील रस्त्याची मारगिरी अशा रीतीने केल्यामुळे इंग्रजांना पुढील कार्य सोपे गेले. तरी पण ह्या गोऱ्या लोकांच्या हातावर तुरी देऊन काही सैनिकांनी अन्य मार्गाने कोकणात उतरण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचा तो बेत फसला. ते पकडले गेले. ह्या वेळेपर्यंत क्रांतिसैनिकांनी लोकांना ह्या उठावात सामील करून घेण्याचा प्रयत्न केला. जनतेची मुग्ध सहानुभूती त्यांना होती. पण तिचा उपयोग काय ? ज्याच्या हाती सत्ता तो राजाच मुळी त्यांच्या विरुद्ध होता. त्यामुळे सैनिकांचा नाइलाज झाला. काहींनी जंगलाचा आश्रय घेतला. तर काहींनी दुसऱ्या रात्र पागेमध्ये धरणे धरले. पागेकडे जायला एकच चिंचोळी वाट होती. ती सैनिकांनी रोखून धरली होती. या वाटेवर सदर्न मराठा घोडदळाने हल्ला चढविला. त्यांना राजसैन्याच्या गोलंदाजांनी सहाय्य दिले. घनचक्कर लढाईस सुरुवात झाली. रणशूर लढवय्ये प्रयत्नांची शिकस्त करीत होते. प्रयत्नांचा हिमालय करून त्यांनी दुपारपर्यंत हल्ल्याला तोंड दिले. राजाचे गोलंदाज कंपनीच्या बाजूने साक्षात आग ओकू लागले. त्यांच्यापुढे क्रांतिकारकांचा निभाव लागेना. गोलंदाज एवढी जबरदस्त होती की, तीमुळे बरेच सैनिक कामास आले.[२३] बाकी राहिले त्यांना नाइलाजास्तव इंग्रजांच्या स्वाधीन होणे भाग पडले. झाले. कोल्हापूरच्या या पहिल्या उठावाची समाप्ती

झाली. इंग्रज सरकारने ग्रँट जेकब यास स्पेशल कमिशनर म्हणून कोल्हापूरास पाठविले. जेकब कोल्हापूरास पोहोचल्यावर पहिले तीन-चार दिवस त्याने एकदंर परिस्थितीची पाहणी केली. जे बंडखोर शिपाई पकडले होते त्यांना निःशस्त्र करण्यात आले. १९ ऑगस्टपासून बंडखोर शिपायांना शिक्षा देण्याचे सत्र सुरू झाले. त्यासाठी महाराजांकडील चार तोफांचा उपयोग केला. पहिल्या दिवशी आठजणांना तोफेच्या तोंडी दिले, दोघांना फासावर लटकविले आणि अकराजणांना बंदुकीच्या गोळ्या घालून ठार केले. अनेक शिपायांवर खटले चालू केले. त्यात दोषी ठरलेल्या ५१ शिपायांना ठार करण्यात आले. असे आणखीही दहशतीचे प्रकार चालू होते. सर्वत्र अस्थिर आणि भयावह वातावरण निर्माण झाले होते. वरवर मात्र सर्वत्र शांत असल्याचे दिसत होते. असे असले तरी इंग्रजांविरुद्ध उठाव होणार याची चाहूल जेकबला लागली म्हणून त्याने जागोजागी फौजेच्या तुकड्या ठेवल्या. आपल्या सैन्याला जागरूक रहाण्याच्या सूचना दिल्या. सत्ताविसावी रेजिमेंट निःशस्त्र करून इंग्रज अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली ठेवली होती.[२४] पहाराही कडक ठेवण्यात आला. ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात वरवर सर्वत्र शांतता निर्माण झाली. पण ती वादळापूर्वीची शांतता ठरली. हे दुसऱ्या उठावाने दाखवून दिले.

म.स्वा.ल.-५

**रत्नागिरी, बेळगाव**

या कोल्हापूर उठावाच्या वार्तेने रत्नागिरीस त्यावेळी असलेले गोरे लोक भयभीत झाले. त्यांच्या संरक्षणाकरिता पलटणीतील २५० काळे लोक ठेवले, पण त्यांच्यावर गोऱ्यांचा विश्वास नसल्यामुळे सर्व गोरे लोक रत्नागिरीहून मुंबईस नेले. दरम्यान एक इंग्रज तुकडी रत्नागिरीला पाठविली आणि तिच्या आगमनानंतर काळ्या पलटणीतील लोकांना निःशस्त्र केले व त्यांच्याकडून निःशस्त्र स्थितीत काम करून घेण्यात येऊ लागले.[२५]

बेळगावचा बंदोबस्तही इंग्रजांना करावा लागला. यावेळी पाऊस जोरात सुरू झाला होता. बेळगावला रत्नागिरीवरून समुद्रामार्गे मदत पाठविणे धोक्याचे होते. म्हणून इंग्रज सरकारने गोवा सरकारची मदत घेतली. पोर्तुगीज सरकारनेही मित्रत्वाच्या भावनेने इंग्रजांस खुषीने हात दिला. गोवा हद्दीतून गोरे सैन्य बेळगावला जाऊ दिले आणि याच तुकड्यांचे बळावर बेळगावच्या पाचव्या पलटणीतील क्रांतिसैनिकांचा कं. सरकारने समाचार घेतला. त्यांच्या चौकशीचा फार्स करून बंदुकीने त्यांना यमनदनास पाठविले. या सर्व घडामोडींमध्ये रत्नागिरी, सावंतवाडी आणि धारवाड या ठिकाणी उठाव होऊ नये याची तजवीज करणे इंग्रजांना भाग पडले.[२६]

**शिरसाटला पकडण्यासाठी बक्षीस**

सावंतवाडीबद्दल त्यांना जास्त धाकधुक होती. कारण कोल्हापूरच्या क्रांतिसैनिकांचा पुढारी रामजी शिरसाट हा हातावर तुरी देऊन निसटला होता. त्याला जिवंत पकडणे किंवा त्यास मारणे हे काम इंग्रजांना सर्वप्रथम करावयाचे होते. शिरसाटचा शोध लावणारास रु. ३०० चे रोख बक्षीस कोल्हापूर आणि सावंतवाडी येथील सुपरिटेन्डंटनी जाहीर केले.[२७] रामजी शिरसाटने मात्र कोणासही बक्षिस मिळू दिले नाही. तो सारखा फिरत होता. सावंतवाडीच्या दऱ्याखोऱ्यांतून आणि गावागावांतून त्याची भ्रमंती सुरू होती. असाच एक दिवस तो कुडाळ पेट्यातील पावशी गावी वस्तीस असल्याचा सुगावा सावंतवाडी पोलिसांना

लागला. पोलीस त्याचा मागोवा घेत पावशी गावी गेले. पोलिसांची चाहूल लागताच त्याने जंगलाचा रस्ता सुधारला. पोलिसही त्याच्या पाठीवर जंगलात गेले. कोकणची जंगले, झाडी किर्रर्र इकडचा माणूस तिकडे दिसणे काही ठिकाणी कठीण. रामजी शिरसाटची चाहूल लागताच पोलीसांनी गोळ्या झाडल्या आणि याच गोळ्यांनी रामजी शिरसाटचा निकाल लागला.[२८]

**प्रजा असंतुष्ट का?**

अशा रीतीने पहिल्या उठावाच्या सूत्रधाराचा व सहकाऱ्यांचा संहार केल्यावर कर्नल ग्रँट जेकबने या उठावाच्या उगमस्थानाचा छडा लावला. त्यात त्याला असे दिसून आले की प्रजा इंग्रजी राज्यकर्त्यांवर नाखूष आहे त्याचे कारण चरबीची काडतुसे हे नसून छत्रपतींची सातारा गादी नष्ट केली हे होय. त्यावेळचा मुलकी बंदोबस्त एवढा खिळखिळा झाला होता की राज्यांतर्गत पोलिसांवर विश्वास ठेवण्यास इंग्रज सरकार तयार नव्हते. म्हणून जेकब मुंबई सरकारकडे जादा सैनिकी कुमकेची याचना करीत होता.[२९]

या उठावास कुठून सुरुवात झाली याचा छडा शेवटी ग्रँट जेकब यास लागला.

गोविंद दळवी या २८ व्या तुकडील प्रायव्हेटने ही सर्व माहिती घाबरून साहेबाला दिली. उठावाच्या पूर्वी ४-५ महिने अगोदर पलटणीतील १२ अधिकारी आणि काही प्रायव्हेट पुण्याला ड्रील शिकण्यास गेले. त्यांपैकी एकजणाने सुभेदार सेन दीनसिंग ह्या चौथ्या मुंबईतील पलटणीतील सुभेदारास कळविले की, आम्हाला गाईच्या चरबीची काडतुसे वापरायला दिली आहेत. ही बातमी सैनिकांच्या वस्तीत कर्णोपकर्णी झाली. आपल्या धर्माचे काय होणार ? ही चिंता हिंदु-मुसलमान या दोघांसही सारखी भेडसावू लागली. त्यांना वाटू लागले की, आपणांस आपला परमप्रिय धर्म सोडून द्यावा लागून लवकरच आपण एकधर्मी होणार. त्यांत काहींनी तर त्वेषाने बोलून टाकले की चरबी लावलेली काडतुसे तोडून आपण आपला प्रिय धर्म सोडण्यापेक्षा मेलेलं काय वाईट?[३०] या एकाच विचाराने प्रेरित होऊन त्यातून मार्ग काढण्याकरिता चौथ्या पलटणीतील सुभेदार सेन दीन, ग्रेनेडिअर कंपनीतील सुभेदार इमामखान, प्रायव्हेट राम शिरसाट, महादेव चव्हाण, साबाजी पवार, बाबाजी ठाकूर व हवालदार शिवा मुकुंद सावंत हे सुभेदार दाउद बेगच्या घरी जमायला लागले. तिथे त्यांची खलबते होऊ लागली. त्यातच शुभ्र घोड्यावर आरुढ होऊन एक मराठा गडी बॅरॅकमधून शहरात व शहरातून बॅरॅकमध्ये वारंवार जाऊ येऊ लागला.[३१] त्याने राजाच्या धाकट्या बंधूंच्या खाजगी कारभाऱ्याची भेट घेतली. त्याने राजाची संमती व सहकार्य आपल्या कार्यात मिळेल याचे आश्वासन दिले. बनाव एवढ्या थराला गेला की ह्या कृत्याबद्दल आपणांस आनंद होतो व आपण ह्या रेजिमेंटची काळजी घेऊ अशा प्रकारचे लिखाण महाराजांकडून मिळवू अशी सुभेदार सेन दीन याला आशा वाटू लागली. फौजेतील जो तो उठावाला उत्सुक झाला आणि बेळगावच्या लष्करी तुकडीनेही एकाच वेळी उठाव करावयाचा असे ठरले. १० ऑगस्टला नवीन (चरबी लावलेली) काडतुसे वाटायची होती तोच उठावाचा दिवस ठरला. याच कामगिरीवर बडोद्याहून एक मुसलमान जासूद आला. त्याचे काम फक्त सहकार्याने आंदोलन तडीस नेण्यासंबंधीची योजना आखणे हे होते. पण कोल्हापूरला मीरतचीच पुनरावृत्ती झाली आणि ठरलेल्या तारखेच्या अगोदर म्हणजे ता. ३१ जुलैला उठाव झाला. उठाव झाल्यानंतर चौथ्या-पाचव्या दिवशी हा इसम पकडला गेला आणि इंग्रजांनी चौकशीचा फार्स करून त्याची रवानगी खुदाघरी केली.[३२]

अनुक्रमणिका

**आधार :** (१-२) P. D. 1858, Vol. 33, pp. 91-101. (३-६) P. D. 1858, Vol. 33, pp. 247-248. (७-९) P. D. 1857, Vol. 31, p 13. (१०-१४) P. D. 1857, Vol. 26, pp. 181-183. (१५-१७) P. D. 1857, Vol. 31, pp. 157-159. (१८-१९) P. D. 1857, Vol. 26 p.183-84. (२०-२२) P. D. 1857, Vol. 26, p. 184-185, P. D. 1857, Vol. 31, p. 189. (२३-२४) P. D. 1857, Vol. 26, pp. 181-186. (२५-२६) P. D. 1857, Vol. 26, pp. 187-189. (२७) P. D. 1857, Vol. 27, p. 576. (२८) P. D. 1857, Vol. 31, p. 13. (२९) P. D. 1857 Vol. 32, p. 451. (३०-३१) P. D. 1858, Vol. 24, pp. 245-250. (३२) कित्ता p. 241.

अनुक्रमणिका

# कोल्हापूरची दुसरी सलामी

पहिल्या उठावाचा शेवट वाईट रीतीने झाला तेव्हा लोकांच्या हृदयाची जळफळाट काही कमी झाली नव्हती. उलट क्रांतिसैनिकांची वाट लागलेली ऐकून स्वाभिमानी मराठ्यांच्या अंगाचा सूडाच्या भावनेने तिळपापड होत होता. पण इतक्यात उघड काहीच करता येण्यासारखे नव्हते. राजा चिमासाहेब मोठा धीराचा माणूस. धिप्पाड शरीरयष्टीचा, उत्साही. शिवरायाचा खरा वंशज आणि जनतेचा लाडका असे त्याचे वर्णन कॅ. ॲबट करतो.[१] त्याने क्रांतिकारकांना आश्वासन दिले होते पण इंग्रजांशी इमानदारी दाखविणाऱ्या आपल्या भावाविरुद्ध उघड बंड त्याला करावयाचे नव्हते. सैनिकांनी उठाव करावा आणि परस्पर यशस्वी व्हावे, आपली मूक संमती ह्या कृत्याला आहे असाच चिमासाहेबांचा मनसुबा असावा. पण चिमासाहेब यांस हालवून जागे करणारे १३ सप्टेंबरचे पत्र बिठूरहून आले.[२] पहिल्या उठावाच्या वेळी "तुम्ही काहीच केले नाही याबद्दल दोष देण्यांत आला आणि आतांतरी तुम्ही सहकार्य करा, शिंद्यांची फौज, बायजाबाई वगैरे आम्हांस अनुकूल आहेत. तेव्हा कृपा करून तुम्ही स्वस्थ बसू नका, इंग्रज हे घातकी आहेत, त्यांच्यात खरेपणा नाही. आम्ही आमची शिरे तळहातावर घेऊन इथे सज्ञ आहोत" असा त्यात मजकूर होता. दुसरे पत्र पुण्याचे.[३] कोल्हापूरची राणी म्हणजे गायकवाडांची मुलगी (कोल्हापूरच्या राजाला दिलेली) कोल्हापूरास सासरी जात असता वाटेत पुण्यास ती भेटली. बऱ्याच जनांना कोल्हापूरच्या बंडवाल्यांना स्वतः ती माहिती पुरविणार आहे अशी बातमी मि. रोझ-साताऱ्याचे मॅजिस्ट्रेट-यांनी ग्रँड जेकबला कोल्हापूरास कळविली. डाव टाकून या गोष्टीचा छडा लावण्याकरिता कॅप्टन जॉन शिनेदार याची नेमणूक झाली. त्याने एका माणसाला पकडले. पण लागलीच त्या माणसाने स्वतःजवळील पत्र तोंडात घालून ते गिळण्याचा प्रयत्न केला. पण अर्धवट चघळलेले पत्र त्याच्या घशातून बाहेर काढवले. त्यात काय होते? ते राजाच्या खाजगीतील नोकराकडे देण्याकरिता पुण्याहून दिले होते. अशा प्रकारची गुप्त सूत्रे हालत होती. अशी पत्रे पाठवून हे क्रांतिकारक थांबले नाहीत. अप्पा फडणीस, राजाचा कारभारी आणि तात्या मोहिते हा राजाचा खाजगी सेवक यांना आपल्याकडे वळविले.[४] यात पन्हाळ्याचे गडकरीही सामील झाले. कोल्हापूर शहर हस्तगत करून राजवाडा ताब्यात घ्यावयाचा अशा प्रकारची योजना होती ती.

### कोल्हापूरवर हल्ला

या सगळ्या बनावाची बातमी गुप्त होती. ज्याला जो आदेश मिळेल त्याप्रमाणे त्याने वागायचे, इतर चौकशी करायची नाही असेच जणू काय ठरलेले. मागील कृत्यापासून यावेळी त्यांनी धडा घेतला होता.[५] शहरातील लोक तर या उठावाला तयार होते. मराठे सैनिकही या बनावास सामील होण्यास उत्सुक होते. ऑक्टोबर महिना इंग्रजांनी मुंबईतील उठावाची व्यवस्था लावण्यात घालविला. त्यांच्या बातम्या या लोकांना समजल्या. त्याच महिन्यात उठाव करावा असे काहीजणांचे मत पडले. पण पूर्ण तयारी झाल्याशिवाय आपण उठाव करायचा नाही असे सूत्रचालकांनी ठरविले. नोव्हेंबर महिनाही असाच गेला. डिसेंबर महिना उजाडला. क्रांतिकारकांच्या हालचाली जोरात सुरू झाल्या. ५०० लोक कोल्हापूरापासून १० मैलावर असलेल्या स्थळी रानात जमा झाले. त्यांनी ता. ४ रोजी रात्री कोल्हापूर ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला.[६]

त्याच रात्री जमावाने शहरावर हल्ला चढविला. शहराभोवती तट होता. तटाला भलेभक्कम दरवाजे होते. बाहेरून शहराचे संरक्षण कॅ. ग्रॅन्ड ॲबट आपल्या युरोपियन साथीदारांसह करीत होता. क्रांतिकारकांनी ॲबटला चकविण्याची एक शक्कल काढली. मराठ्यांच्या गनिमी काव्याचा यावेळी त्यांनी

अनुक्रमणिका

अवलंब केला. क्रांतिकारक शिड्या लावून पटापट तटावर चढले आणि त्यांनी थोडीशी लुटूपुटूची लढाई करून राजवाड्याचा ताबा घेतला. राजवाड्याचा ताबा घेतल्याबरोबर शहरही ताब्यात आल्यासारखे झाले. सर्व दरवाजे ताब्यात घेतले. त्यावर सैनिकांच्या चौक्याही बसल्या. पण फितुरीने दावा साधला. ॲबटला याची खबर कोणीतरी दिली. ॲबट सावध राहिला. त्याने आपल्यापरी शहराच्या बचावाची तयारी केली होती. त्याच्याकडे कोल्हापूर लोकल इन्फन्ट्रीशिवाय गोरे सैन्य २५० च्या वर होते. पण त्याची भिस्त सैनिकांपेक्षा कोल्हापूर लोकल इन्फन्ट्रीवर जास्त होती.[७]

रात्री दोन वाजताच्या इशाऱ्याने तो खडबडून जागा झाला. तोच त्याला बातमी लागला की, शहरात संशयीत आवाज ऐकू येत आहेत पण द्वाररक्षकांनी आवाजाला प्रत्युत्तर मिळाले नाही. ॲबटची चिंता दुणावली. त्याचा संशय खरा ठरला. कोल्हापूर शहर बंडवाल्यांच्या हाती गेले. दरवाजे रक्षणाकरिता ठेवलेल्या सशस्त्र सैनिकांनी प्रतिकारार्थ खरा प्रयत्न केलाच नाही. अर्थात् ह्याही सैनिकांची मूक संमती बंडखोरांनी असलीच पाहिजे हे ॲबटला कळून चुकले.[८]

विश्वासघात

आता काय करावे हे त्याला सुचेना. आपल्या कॅम्पवर हल्ला होणार ह्याची त्याने खूणगाठ बांधली. शिवाय कॅम्पमधील सत्ताविसाव्या पलटणीचे निःशस्त्र केलेले लोक होतेच. तेही बंडवाल्यास सामील होतील अशी त्याला भिती वाटू लागली. बंडवाल्यांनीतुरंग ताब्यातघेऊन त्यातील कैदी सोडविले तर आगीत तेल ओतल्यासारखे होईल. कारण हे सर्व कैदी पहिल्या उठावात सापडलेले संशियत होते. तेव्हा तुरंग बंडवाल्यांच्या ताब्यात न जाऊ देणे हे पहिले व आपल्या कॅम्पचे संरक्षण, अशी दुहेरी कामगिरी त्याला करावयाची होती.[९] त्याने गोऱ्या सैनिकांच्या तुकड्या बनवून शहरतटबंदीवर फैरी झाडायचे ठरविले. तशी सुरुवातही झाली. पैकी ले. होल बर्टन याच्या हाताखालील तुकडीने एका दरवाजावर हल्ला केला. त्याच्या नशिबाने आतून जास्त प्रिताकार झाला नाही. इंग्रजांनी जास्त लगट केली आणि त्या दरवाजाचा ताबा मिळविला. या दरवाज्यातूनच आंगल सैनिक आत घुसले.[१०] क्रांतिसैनिकांनी त्यांचे स्वागत गोळ्यांच्या फैरीने केले. चकमकीला तोंड लागले. कॅ. थॉम्पसनला लाथ बसली व तो घोड्यासह खंदकात पडला. या दणक्याचा प्रसाद कॅ. शेनिडरलाही मिळाला. त्याचे काही लोक क्रांतिवीरांनी कापून काढले. [११] क्रांतिवीरांचा बहुतेक सर्व आघाडीवर जय होत चालला.

**इंग्रजांची युक्ती**

इतक्यात एक घातक घटना घडली. क्रांतिसैनिकांच्या पुढाऱ्यासच गोळी लागली व तो पडला. [१२] क्रांतिसैनिक दचकले. त्यांचा धीर खचला. ते सैरावैरा पळू लागले. इंग्रजांनी ही संधी साधून जास्त लगट केली. आणि मुख्य दरवाजाचा ताबा घेतला. [१३] या दरवाजातून त्यांनी आपला तोफखाना आत घातला. या कामी कोल्हापूरच्या नाझीरने बाहेरील दरवाजा बंद करून इंग्रजांना हात दिला. इंग्रजांनी आता राजवाड्याच्या मुख्य प्रवेशमार्गावर आपला तळ दिला. येथून त्यांना राजवाड्याकडे चाल करणे सोपे होते. पण राजवाड्याचा ताबा त्यावेळी क्रांतिसैनिकांनी घेतलेला. त्यांत ते किती आहेत याचा अंदाज (राजवाडा हा लहानसा किल्लाच असल्यामुळे) लागणे कठीण.[१४] अशा स्थितीत इंग्रजांना काय करावे हे सुचेना. पण अखेरीस इंग्रजी डोक्यातून शक्कल निघाली. शरणागतीचा पाढंरा बावटा कॅ. शेनिडर याने घेऊन जावे आणि राजाची भेट घ्यावी असे ठरले. [१५] निधड्या छातीचा कॅ. सेनिडर पांढरा बावटा घेऊन राजवाड्यात गेला.

अनुक्रमणिका

त्याला शरणांगत समजून कोणी अडथाळा केला नाही. राजवाड्यात आल्यावर त्याला काय दिसले ? सर्वत्र सैनिक. जिथे जिथे म्हणून उभे रहावयास जागा असेल अशा ठिकाणी उभे असलेले शेकडो सैनिक [१६] हे दृष्य पाहून त्याने मात्र आपला धीरं सोडला नाही. क्रांतिसैनिकांकडे राजाच्या मुलाखतीची परवानगी त्याने मागितली. ती त्याला मिळाली.[१७] वास्तविकांशी इंग्रजांचा मुकाबला होता. तहाच्या अटी सैनिकांनीच ठरवावयाच्या आणि सैनिकांनीच तशी गळ इंग्रजांना घालावयाची. पण क्रांतिसैनिक भोळ्या भावनेने पछाडलेले. त्यांना वाटले, इंग्रज आता शहर सोडून मुकाट्याने जायाला आला आहे. घेऊ द्या त्याला राजाची भेट. आपल्यातर्फे सांगेल आपला राजा त्याला लवकर निरोप घ्यायला. पण घडले याच्या उलट. राजाच्या मुलाखतीनंतर राजाकडूनच क्रांतिसैनिकांना राजाच्या हुकूमाप्रमाणे आपली शस्त्रे खाली ठेवून शरण यावे लागले. हा ५ डिसेंबरचा दिवस. याच दिवशी क्रांतिसैनिकांना दहशत बसावी म्हणून कॅ. ॲबटने राजवाड्यातच कोर्ट बसविले आणि छत्तीस जणांना फाशी दिले. राहिलेल्यांचा समाचार त्याने एकदोन दिवसांत घेतला आणि या बंडाचा सपशेल बीमोड करण्याच्या मागे तो लागला.[१८]

**चिमासाहेब**

उठावामागील सुप्त शक्ति चिमासाहेब आहे हे ॲबटला ठाऊक होते. [१९] पण त्याबद्दल निश्चित पुरावा त्यास मिळेना. संश्यावरून त्यास पकडले तर त्यामागे जनशक्ती होती. म्हणजे वातावरण जास्तच प्रक्षब्ध व्हावयाचे. शिवाय त्याला पकडून अदालतीपुढे उभे केल्याने राज्याच्या भावना दुखावल्या असत्या.[२०] कारण त्याचा मोठा भाऊ जो राजा त्याने या उठावाची पाळेमुळे सपशेल खणून काढण्यास इंग्रजांना मदत केली होती. ॲबटने याबद्दलचा मजकूर मूबई सरकारला कळविला[२१] आणि चिमासाहेबाला कोल्हापूरातून गुप्त रीतीने उठवून दुसरीकडे दूर ठेवणे रास्त हा उपाय त्याने सरकारला सुचविला. सरकारने लागलीच या त्याच्या सूचनेस अनुमती दिली. [२२] दरम्यान ॲबटने चिमासाहेबास आपल्या भेटीस बोलाविले.[२३] त्यात त्याचा हेतू फक्त चिमासाहेबाच्या मनाचा ठाव घेणेचा होता. बोलण्यावरून चिमासाहेब ॲबटच्या भेटीला आला.ॲबट चिमासाहेबास म्हणाला की, काही क तुम्हाला या बंडाचे सुप्त नेते समजतात याबद्दल आपले काय मत आहे? शिवाय बंडखोर शहरात घेतले कसे ? अन् त्यांना तुम्ही शरण गेलात हे कसे ? उत्तरादाखल चिमासाहेब एवढेच म्हणाले की मला याबाबतीत काहीच माहीत नाही. मी निष्पाप आहे, हे सांगून चिमासाहेब जेव्हा राजवाड्याकडे जायला निघाले तेव्हा रस्त्यात दुतर्फा जमलेल्या जनसंभर्दाने चिमासाहेबांचा जयजयकार केला. काही सुवासिनींनी त्यांना ओवाळलेही. याचा अर्थ इंग्रजांनी योग्य तोच केला अन् राजा हा बंडखोरांची सुप्त शक्ती हेच खरे असे अनुमान काढले. दरम्यान राजाची उचलबांगडी करावयाची योजना पूर्ण झाली.[२४] मे महिन्याच्या सुरूवातीस वाघोटणे बंदरी इंग्रजी जहाज तयार ठेवले. लोकांना या गोष्टीचा काहीच पत्ता लागू नये म्हणून विशेष खबरदारी घेतली. कोणालाही सरकारी परवानगीशिवाय शहराच्या बाहेर सोडावयाचे नाही अशी चौकीदारांना सक्त ताकीद दिली. अशा प्रकारे जय्यत तयारी झाल्यावर चिमासाहेबांस पोलिटिकल सुपरिटेंडेंटनी रात्री आपल्याकडे बोलाविले. [२५] त्याला सरकारी हुकूम वाचून दाखविला आणि या मानी राजपुत्रास त्याच्या १६ नोकरांसह लष्करी बंदोबस्तांत वाघोटण्यास आणले. [२६] त्याजबरोबर जे १६ नोकर होते त्यांत बापू यादव स्वयंपाकी, कृष्णा पराजू धोबी अन् मुधोजी न्हावी असे होते. [२७] ही बोट मुंबईला जायला निगाली तेव्हा वाटेत जास्त खबरदारी घेण्याकरिता अलिबागला असलेले युरोपियन संरक्षक याच बोटीतून मुंबईस गेले.[२८]

अनुक्रमणिका

**कराचीत मृत्यू**

ता. १२ मे रोजी चिमासाहेबांस घेऊनबरीनीस बोट मुंबईहून कराचीला निघाली.२९ मुंबई सरकारने सिंध कमिशनरला कळविले की, चिमासाहेबांस हैदराबाद (सिंध) येथे किंवा कराचीमध्ये बंदीत ठेवणे हे आपल्या मर्जीवर आहे, त्याचा निर्वाहखर्च कोल्हापूर दरबाराकडून मिळेल. [३०] अशा रीतीने राजास कराचीला नजरकैदेत ठेविले. चिमासाहेब ता. १५ मे १८६९ रोजी निवर्तले.

मे महिन्यात चिमासाहेबांना कराचीस रवाना केल्यानंतर लागलीच त्याचा कारभारी अण्णा फडणीस आणि खाजगी सेवक तोत्या मोहिते यांजवर इं. सरकारने रीतसर खटले भरले. [३१] या दोघांनी सप्टेंबर १८५६ पासून कोल्हापूर गादीवर कोणत्याही रीतीने राजास बसविण्याचा चंग बांधला होता आणि त्याकरिता बऱ्यावाईट उपायांचा अवलंब केला. तसेच पूर्वेकडून येणाऱ्या कटवाल्यांना मदत केली, कोल्हापूरातील हिंदी सैनिकांना फितविले वगैरे आरोप त्यांच्यावर ठेवले आणि त्या दोघांना २६ जुलै १८५८ रोजी जन्मठेपेच्या शिक्षा ठोठावल्या.[३२]

अशा रितीने या कोल्हापूरच्या अयशस्वी उठावाची परिसमाप्ती झाली.

आधार: (१) Jacob, Western, P. 179. (२) P.D.1857, Vol. 30, p. 47. (३) P.D. 1857, Vol. 30, (४) P.D. 1852.Vol. 24, pp. 245-258. (५) P.D. 1852, Vol, 24, pp. 278-290. (६) Jacob, Western India, p. 184. (७) Jacob, Westrn India, P. 180 (८-११) Western India p. 188. (१२-१५) Western, India. 189. (१६-१७) Western India, p. 190. (१८) Jacob, Westrn India, p. 191. (१९) P.D. 1858. Vol. 24, pp. 185-197. (२०)P.D.1858, Vol. 24, p.199. (२१) P.D. 1858, Vol. 24,p.185-197.(२२)P.D. 1858, Vol. 24, p. 199. (२३) Jacob, Western, India, p.201. (२४-२५) P.D. 1858, Vol. 24, p. 535. (२६) Jacob, Western India, p. 202-203 (२७) P.D. 1858. Vol. 27. P. 93 (२८) P.D. 1858, Vol. 27, p.65. (२९) P.D. 1858. Vol. 27. P. 59-67. (३०) P.D. 1858, Vol.27.p.63. (३१-३२) P. D. 1858, Vol.34, pp. 245-339

अनुक्रमणिका

## सातारा

सातारकरांचा वकील म्हणून इंग्लंडमध्ये रंगो बापूजी १५ वर्षे राहिला. तेथेच इंग्रजी शिकला आणि सातारा राजाची बाजू इंग्लिश जनतेपुढे मांडीत असता इंग्रजी सत्तेचे वाभाडे तो काढू लागाला. पण इंग्रजांनी, त्यांना नकोशी झालेलीही ब्याद एक फुकट तिकीट आणि रुपये पंचवीस हजार खर्चास देऊन हिंदुस्थानात घालविली. १८५४ मध्ये तो हिंदुस्थानात परत आला. याच वर्षी प्रतापसिंहाची दुसरी स्त्री माईसाहेब व दत्तक पुत्र शाहूराजे ही दोघे ता. ३ जुलै १८५४ रोजी बनारसहून साताऱ्यास येऊन दाखल झाली. तेव्हा साताऱ्याकडून कै. अप्पासाहेब ऊर्फ शहाजीराजे यांची पत्नी सगुणाबाई व दत्तक पुत्र व्यंकोजी राजे हे त्यांस सामोरे गेले. नंतर परस्परांच्या भेटी झाल्या.२

रंगो बापूजी काही दिवस मुंबईस राहिला व नंतर मावलातील आपल्या कारी गावी गेला. जनताजनार्दनाचे दर्शन आणि जनसंमर्दाची सकाळ संध्याकाळ भेट असा उपक्रम काही दिवस चालल्यानंतर हा कारस्थानी पुरुष पुढील कार्यास लागला. तो. इ. स. १८४० पासून पंधरा वर्षे एकाच तळमळीने पछडाला होता. ती म्हणजे सातारला प्रतापसिंहाच्या वंशजाचा अंमल जारी करणे. हे ईप्सित साधण्याकरिता त्याने इंग्लंडमध्ये पंधरा वर्षे हालअपेष्टांत काढली होती. प्राणघातक संकटे व अंनत यातना भोगल्या होत्या. खर्चापायी धन्याचे व आपले सर्वस्व वेचले होते. तरीपण नाउमेद न होता हिंदुस्थानात आल्यावर तोच उद्योग चालू ठेवण्याचा त्याचा मानस होता. त्याप्रमाणे त्याने आपल्या गुप्त हालचाली सुरू केल्या. नानासाहेब पेशव्यांशी संगनमत सुरू केले.

### स्स्थानिकांच्या पोटात भीतीचा गोळा

म्हणता म्हणता इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्य समरची पावले वाजू लागली. जूनच्या सुमास उत्तर हिंदुस्थानात जिकडे तिकडे इंग्रजांविरुद्ध उठाव सुरू झाले. मग दक्षिण त्यापासून अलिप्त कशी राहणार ? त्यातच शहाजीराजाने व प्रतापसिंहाने घेतलेले दोन्हीही दत्तक कं. सरकारने अमान्य केले. रेसिडेंटच्या परवानगिशिवाय दत्तक घेतल्यामुळे त्यांचा गादीवरील वारसाहक्क मान्य करता येणार नाही. असे धोरण सरकारने जाहीर केले. त्यामुळे तत्कालीन महाराष्ट्रात राज्य करणाऱ्या सर्व संस्थानिकांच्या पोटात भीतीचा गोळा उठला होता. कारण त्यांपैकी बहुतेक निपुत्रिक होते आणि आपल्यानंतर आपली राज्य खालसा होणार असे त्यांच्या मनाने पक्के घेतले होते. [३] साहजिकच सातारकर महाराजांच्या वंशजाबद्दल सर्वाच्याच मनात सहानुभूती बसत होती. सन १८५४ मध्ये राजकुटुंबीय मंडळी साताऱ्यास राहण्यास आल्याने तर या सहानुभूतीस व प्रेमास नवांकूर फुटले होते आणि या नवाकुंरांची वाढही करणारा पुरुष रंगो बापूजींच्या रूपाने अवतरला होता.

१८५७ च्या उत्तर हिंदुस्थानातील बातम्या ऐकून रंगो बापूजी चमकून उठला व क्षणाचाही विलंब न करता उद्योगास लागला. त्याने आपल्या जीवाभावाची माणसे गोळा केली आणि आपल्या ध्येयपूर्तीकरिता कोणत्या मार्गाचा अवंलब करावा याची मनमोकळेपणाने चर्चा केली. या बनावात मुख्यत्वे त्याचा मुलगा सीताराम कारखानीस यांचे सहाय्य त्याला होते. दाफेदार कारखानीस हा २२ व्या हिंदी फौजेतील होता.[४] ह्या सर्वांचा हेतू इंग्रज सरकारचा अंमल खिळखिळा करणे, सातारच्या गादीचे पुनरूत्थान करणे आणि प्रतापसिंहाचा दत्तक पुत्र, त्यावेळी जंगली महाराज किंवा काशी राजा म्हणून प्रसिद्ध असलेला शाहू यास गादीवर बसविणे हा होता.[५] सर्व बेत जूनच्या मध्यास ठरले असे म्हणावयास हरकत नाही हा बनाव घडवून

अनुक्रमणिका

आणण्याची रंगो बापूजींने आपल्या घरी शिकस्त केली. तो या उठावाकरिता डिसेंबर १८५६ पासून तो जून १८५७ पर्यंत सारखा खपत होता.६ या काळात त्याच्या पायाला जणू भिंगरीच बांधली होती. भोर संस्थान व बेळगाव जिल्हा यांनी व्यापलेला प्रदेश त्याने या काळात पालथा घातला. ठिठिकाणी आपली गुप्त ठाणी निर्माण केली. या योजनेकरिता पैसा,माणसे व इतर जी साधने लागतात ती निर्माण करण्याचे काम त्याने जोरात सुरू केले. भोर, पुरंदर, वाठार आणि वरधनगड या भागातून माणसे जमविण्याचे काम रंगो बापूजीचा मेहुणा केशव चित्रे याने केले. ७ पण एवढ्याने त्याचे समाधान होईना, म्हणून त्याने येनेवाडा. वरधनगड. आरवी, कलंबी, कराड, अरले, अरबुजाबाद, एकमुल्ली, जाफतवाडी, फलटण, पंढरपूर, बेळगाव, शहापूर आणि कोल्हापूर या गावी आपली गुप्त केंद्रे सुरू केली,८ पिढीजात स्वातंत्र्योत्सुक असे जंगलाचे राजे रामोशी यांना गाठले.सत्तू रामोशी त्यांचा पुढारी. त्याने या बनावास आपला क्रियाशील पाठिंबा दिला. शिवराम महादेव कुळकर्णी याजकडे मांगांना ह्या कटात सामील करून घेण्याची कामगिरी सोपविली होती. त्याने मांगांचे पुढारी बाबीया, योरिया मांग आणि मलया यांना येकुमळी गावी भेटून त्यांची समजूत काढली. तुम्ही तुमची माणसे जमवा. फिरंग्यांनी घटका भरत आली आहे. ते बऱ्याच बोलाने स्वाधीन झाले. तर त्यांना कैद करायचे, नाहीतर त्यांचा खुर्दा करवयाचा, सरकारी खजिना लुटायचा व आपले आप्तइष्ट जे तुरंगात खितपत पडले आहेत त्या सर्वांची सुटका करायची इतक्या गोष्टी त्यांना सांगितल्या.९ ते या गोष्टीस तयार झाले आणि माणसे जमविण्याकरिता आपआपल्या गावी निघून गेले. शिवा रामोशाने मांग, रामोशांचा कानोसा घेतला आणि शिवरामला आश्वासन दिले. की, तुमच्या कार्याकरिता मी गावच्या जत्रेस जमलेल्या मांग रामोशांना देतो. हा बनाव एप्रिल मध्ये घडला.

**रंगो बापूजी यांच्या कारवाया**

रंगो बापूजी अति हुशार व कल्पक होता. त्याने मांग, रामोशांना तिजोरी फोडायचे आमीष दाखविले आणि वश केले. १० जे राजाचे भले व्हावे म्हणून तळमळ होते त्यांना सातारा गादी महाराजांना मिळवून द्यायची हे सांगितले. अन् जे कच्च्या दिलाचे पापभीरू होते त्यांना गव्हर्नरच्या ऑर्डरचा निर्वाळा दिला. "गव्हर्नरसाहेबानेच मला लेखी ऑर्डर देऊन सांगितले की, तू माणसे गोळा कर आणि साताऱ्यातील सगळ्या साहेब लोकांना तुरंगात डांब." हे करीत असतांना गव्हर्नर म्हणतो की, "मी स्वतः साताऱ्याला किंवा महाबळेश्वरला येईन त्यावेळी माझ्याकडून सातारा गादीच्या पुनरूत्थानाची मागणी कर आणि ही मागणी मान्य झाली तरच साहेब लोकास सोड, पण मागणी मान्य झाली नाहीच तर रीतसर युद्ध करून इंग्रजांना ठार करणे आणि लुटालूट करणे हे प्रथम कार्य राहील.११ "रंगो बापूंचा इंग्रजांशी १९ वर्षे असलेला सहवास आणि त्यांचे व्यक्तिमत्व यामुळे साहजिकच सामान्य माणसांना या गोष्टीची भुरळ पडली व असाच एक नाझार ऑफीसमधील सखाराम दाजी काबाडे नावाचा कारकून, रा. सातारा या कार्यात सामील झाला.[१२]

अशा रीतीने माणसे मिळविल्यानंतर गोऱ्या लष्कराशी मुकाबला करणारी माणसे मिळविण्याच्या कामी रंगो बापूजी लागला. त्याने गेंडा महाल रेजिमेंट, मोगलाय स्वार पलटण आणि रेग्युलर इन्फन्ट्री यांना तडा पाडला. "घोडदळांतील माणसे सर्व तयार आहेत. हल्ल्याच्या वेळी एकाकडूनही प्रतिकार होणार नाही. "अशा तऱ्हेचे आश्वासन त्याने मिळविले.[१३]

हिंदी सैनिक तटस्थ राहिले म्हणून फिरंगी सैनिक थोडेच गप्प बसणार होते. उठाव करणारांस त्यांच्या गोळ्यांचा मार खावा लागणारच, तेव्हा या गोळ्यांना गोळ्यांनीच उत्तर दिले पाहिजे हे रंगो बापूजीने

हेरले व गोळ्या तयार करणाऱ्या मार्गास तो लागला. त्याने ही कामगिरी नारायण पावसकर सोनाराकडे सोपविली. त्याने लागलीच अप्पा ऐतवडेकर नावाचा वाळव्याचा गृहस्थ या कामावर नेमला आणि त्याला ८०० गोळे ओतवण्यास सांगितले.१४

म. स्वा. ल. -६

**हल्ल्याचा बेत**

सातान्यावर आणि महाबळेश्वरवर एकाच वेळी हल्ला करायचा हे जवळजवळ ठरल्यासारखेच होते. अन्नामामा (केशव निळकंठ चित्रे) याने महबळेश्वरवर हल्ला करून इंग्रजांना कापून काढावयाचे आणि त्याच दिवशी नारायण पावसकरणे जमावाच्या साहाय्याने साताऱ्यामधील फिरंग्यांना पकडायचे व खजिना लुटायचा अशा प्रकारच्या आपआपसांत बोलाचाली झाल्या१५ आणि पुन्हा माणसे गोळा करण्याकरिता दोघेही आपआपल्या केंद्रस्थानी गेले. जूनच्या पहिल्या आठवड्यात ही सगळी मंडळी साताऱ्यास "गोसावी "वाड्यात जमा झाली आणि तेथेच कामाची वाटणी झाली. शिवराम मोरेश्वर कुलकर्णी ऊर्फ बहुश्रुतवार हा या कटाचा प्राण होता. १६ रंगो बापूचा मुलगा सीताराम याजकडे देखरेखीचे काम सोपविले होते. त्याने उठावासाठी प्रेरणा निर्माण करावयाची होती. सखाराम कबाडे तर या सर्व कटाचा ताबेदार. कराडचा दौलता हरी पवार व सातारचे अप्पा फडणीस यांनी कोल्हापूर राजबंधू चिमासाहेब यांशी संधान बांधले होते. १७ त्यांत मालिया आणि सतीया रामोशी आपल्या परीने हातभार लावीत होते. अशा रीतीने वर निर्देशिलेली महत्वाची सर्व माणसे आपआपल्या परीने रंगो बापूजीस त्यांच्या दिव्यात मदत करत होती.

**साताऱ्यास आलेली पहिली बातमी**

उत्तर हिंदुस्थानात एक ठिणगी आगीचे रूप घेऊन भडकली होती. त्या वणव्याच्या ज्वाला फिरंग्यांना जाळत होत्या. या भडकलेल्या आगीचा बातमी पहिल्यांदा साताऱ्यास आली ती एका ब्राह्मणास आलेल्या पत्रातून. हे पत्र प्रतापसिंहाच्या राणीस वाचून दाखविले व आपण सत्ताधारी झाल्यावर "गरिबांवर लक्ष असू द्या "अशी त्या ब्राह्मणाने विनंती केली. हे पत्र नेटिव्ह लायब्ररीत वाचून दाखविण्यात आले नंतर हे पत्र जाळण्यात येऊन त्या ब्राह्मणास ही बातमी गुप्त ठेवण्याबद्दल बजावण्यात आले. १८ या पत्रामुळे सातारा शहरात खळबळीचे वातावरण निर्माण झाले. निरनिराळ्या अफवांना ऊत येऊ लागला. कोणी म्हणू लागले की या कटांत सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे कुटुंबही सामील आहे. १९ तसेच इतर संस्थानिकही सामील आहेत. दुसरी अशी अफवा पसरली की प्रतापसिंहाचा दत्तक मुलगा शाहू व अप्पासाहेबांचा दत्तक मुलगा व्यंकोजी हे दोघेही या उठावाचे पुढारीपण स्वीकारणार आहेत. साताऱ्याचा पोलीस अधिकारी अंताजी शिर्के ऊर्फ बुवासाहेब यास राणीने पैसे चारून वश करून घेतले आहे व त्यामुळे बंडाच्या वेळी पोलीस शिपाई जागच्या जागी थंड राहणार आहेत अशीही एक कंडी उठली. २० आणि याच्यावर कळस म्हणून की काय ४०,००० रोहिले या कार्याच्या पूर्तीसाठी आणण्याचे ठरले आहे अशीही एक वावडी हवेत उडाली.२१ या कार्यपुर्तीसाठी लागणारा पैसा भोरपासून खानापूरपर्यंतच्या प्रांतांतून गुप्तपणे वसूल केला होता. असेही ऐकिवात होते की या सर्व उठावास भोरच्या पंतसचिवाची फूस होती.२२ लागले तो पैसा आणि माणसे देण्याचेंही त्याने कबूल केले होते.अशा रीतीने उठावाची कडेकोट तयारी चालली होती.२३ पण उठावास सुरुवात कोठे करावयाची याचाच नीट निश्चय होईना. पुढाऱ्यांची एकवाक्यता होईना. अखेरीस

म्होरक्यांनी बेलभंडार उचलून शपथा घेतल्या व दूधभातही खाल्ला, अशा तऱ्हेने सातारा प्रांत हा इंग्रजांविषयीच्या असंतोषाने काठोकाठ भरला. एखाद्याच ठिणगीचा अवकाश, की भडका उडाला असता.

**साहेबांची धावपळ**

पण हे सर्व चालू असता साहेब काही गप्प बसला नव्हता. त्याने आपले हेरजाळे चांगले मजबूत केले होते. आणिषे आणि बक्षिसांची विलोभने लोकांच्यासमोर पसरवली होती. निनावी पत्रे पाठवून या सर्व बनावाचा वृत्तांत आमच्यातील फितूर साहेबाला कथन करीत.२४ अशाच एका निनावी पत्राने नाझर कोर्टातील शिपाई मानसिंग याचे उठाव वाल्यांशी असलेले संगनमत कळविले. मानसिंगवर साहेबाने पाळत ठाखली. त्याला पकडले, फिर्यादीचा फार्स केला आणि ता १२ जून रोजी बंदूकीच्या गगोळीने त्याचा निकाल लावला. धरपकडीचे सत्र सुरू केले. कोणत्याही अनुचित प्रकारास तोंड देता यावे म्हणून जूनच्या शेवटास युरोपियन सैनिकांची एक तुकडी साताऱ्यास ठेविली. या कटाचे संचालकत्व रंगो बापूजींच्या हाती आहे हे साहेबाने हेरले पण रंगो बापूजी सुद्धा तेवढाच वस्ताद. साहेबाच्याच गावचं १५ वर्षे पाणी प्यालेला. तो कसाचा सापडतो इंग्रजांना ? ५ जुलै १८५७ पासून तो जो भुमिगत झाला तो कायमचाच. त्याला पकडण्याकरिता रू, ५,००० चे बक्षीस लावले. पण तो इंग्रज सरकारास कधीच सापडला नाही. [२५]

मानसिंगचा निकाल लावल्यानंतर सर्वत्र धरपकड सुरू झाली. ह्या उठावाचे मूळ कोल्हापूरात असून बेळगावचे सैनिकसुद्धा सामील होणार अशी बातमी साहेबास समजली. सर्वसाधारण धरपकडीत सखाराम दाजी काबाडे आणि अप्पा ऐतवडेकर हेही पकडले गेले तेव्हा स्वतःची चामडी बचावण्याकरिता त्यांनी सरकारला उठावातील माणसे व त्यांच्या हालचाली यांचा गौप्यस्फोट केला. [२६] सरकारला आयतेच फावले. रंगो बापूजींचा मुलगा सिताराम मिळून १७ आसामींना ता. २० जून १८५७ रोजी कोल्हापूरात पकडले. त्यात केशव चित्रे हा रंगो बापूजींचा मेव्हणा, शिवराम मोरेश्वर कुलकर्णी बहुश्रुत, बाबीया मांग, यशा मांग, गणेश सखाराम कारखानीस ही मंडळी मुख्य होती.[२७]

**खजिना लुटला**

कोल्हापूरला पकडलेल्या आपल्या दोस्तांवर मरण ओढवणार याची खूणगाठ सर्व भूमिगतांनी बांधली. त्यांच्यात एक प्रकारची सूडबुद्धी जागृत झाली. त्यांपैकी काहींनी ता. १३ जुलै १८५७ रोजी पंढरपूर येथील ठाणे, खजिना आणि मामलेदार यांजवर हल्ला चढविला. या हल्ल्यात मामलेदार, नागेश राघवेंद्र व त्याचे दोन मुसलमान शिपाई गारद केले आणि खजिना लूटून फस्त केला. त्यात कनैया वेल्लूडी व धर्मा सुभाना हे मांग, गणू बापू चव्हाण हा रामोशी आणि पिरा अप्पा, घंड्या, पाटलू बागल वगैरे ८-१० आसामी मुख्य होते. पण पैशाच्या आमिषाने या बहादुरांची नावे गिरजाअप्पा चिपण्णा वाणी याने सांगितली. पकडापकडी सुरू झाली आणि मिश्र बंधूंना ता. ४ ऑगस्ट रोजी तोफेच्या तोंडी दिले व बाकीच्यांना जन्मठेपेवर पाठविले. कोल्हापूरात पकडलेल्या सतराजणांविरुद्ध सरकारतर्फे सतरा साक्षीदार उभे करण्यात आले. त्या साक्षीदारांत रंगो बापूजींचे दोन साथीदार सखाराम दाजी काबाड व अप्पा ऐतवडेकर हे मुख्य होते.२८

या सतराजणांची निवेदने, साक्षीदारांच्या साक्षी आणि त्यावर अदालतीचा निर्णय हा फार्स ता. २७ ऑगस्ट ते सात सप्टेंबर १८५७ पर्यंत चालला आणि त्यांच्यावर सरकारविरुद्ध उठाव करणे, पोलीस

अनुक्रमणिका

स्टेशनवर हल्ला करणे, सरकारी खजिना लुटणे वगैरे आरोप ठेवून या सतराजणांना देहांताच्या शिक्षी दिल्या आणि ७ सप्टेंबर रोजी सातारच्या गेंडामाळावर त्या अंमलातही आणल्या. अशा रीतीने पकडापकडीचा आणि खटपटे लोक फासावर चढविण्याचा धूमधडाका सरकारने सुरू केला.२९

**राजघराण्यातील वासलात**

छत्रपती प्रतापसिंह महाराजांशी एकनिष्ठाणे वागणाऱ्या गुप्ते घराण्यातील मंडळींची डोकी मारण्यात आली. या उठावाचा अंकूर सातारचे छत्रपती कुटुंब हे साहेबाने हेरले आणि त्यांची उचलबंगडी केल्याशिवाय या भागात शांतता लाभणे दुरापास्त ही ठाम समजूत करून घेतली.

त्याप्रमाणे ता. ६ ऑगस्ट १८५७ रोजी प्रतापसिंहाचा दत्तकपुत्र शाहू, त्याचा चुलता काकासाहेब, दत्तक माता राजसबाई, जनक माता गुणवंताबाई व सेनापती दुर्वासिंग वगैरे राजघराण्यातील प्रमुख मंडळींस अटक करून त्या सर्वास मुंबईस आणले. ३० व येथे बुचर बेटावर अलग अलग कोठडीत ठेवण्यात आले. एका वर्षानंतर १८५८ च्या मार्च महिन्यात या सर्वास कराचीस नेण्यात आले व २७ वर्षे रखडल्यानंतर त्यांना १८८५ नंतर सोडून देण्यात आले. ३१

शहाजीराजे ऊर्फ अप्पासाहेब यांचा दत्तकपुत्र व्यंकोजी यास राजबंदी म्हणून मार्च १८५८ नंतर सुरत किल्ल्यात ठेवण्याचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांच्या राहण्याची व्यवस्था करण्यास सुरत कलेक्टरला कळविले. ३२ नंतर १८५९ मध्ये अहमदनगरास त्याची रवानगी केली. तेथेच व्यंकोजी सन १८६४ मध्ये मरण पावला.३३

फितुरी, विश्वासघात, वैयक्तिक स्वार्थ यांच्या बजबजपुरीत स्वातंत्र्यवीरांच्या आहुत्या पडल्या.

आधार : (१-२) P.D. 1855, Vol. 100/1408. Jacob, Western India, p. 158. (३.९.११.१८. १९-२३-२५) Gazetteer of Bombay Presidency, Vol. XIX, Satara, pp. 317-318. (४-६. १०) P.D. 1857 Vol. 29, p.297. (७-८, १२-१६, २६ – २९)P.D. 1857, Vol. 29. (१७) P.D. 1858, Vol. 25, pp. 627 – 641. (३०-३१) P.D. 1857, Vol. 25,pp.31, 55, 574. (३२ -३३) P.D. 1858. Vol. 28.pp.41. 43.

अनुक्रमणिका

# १८५७ चे मुंबईतील पडसाद

१८५७ च्या उठावाच्या वार्ता मुंबईमध्ये धडाक्याने धडकत होत्या. मीरतची कत्तल, दिल्लीचा नाकेबंदी आणि क्रांतीसैनिकांनी दिल्लीचा घेतलेला ताबा या सर्व प्रकारामुळे मुबंईतील गोऱ्या लोकांची धाबा दणाणली आणि मुंबईत असाच प्रकार झाला तर आपल्या हितसंबंधांना बाध येईल, आपला व्यापार कोसळून पडेल, अशा भीतीने मुंबईच्या जीवनांत अग्रेसर असलेल्या आणि आपल्या लांगूलचालनामुळे इंग्रजांच्या स्तुतीस पात्र ठरलेल्या मुंबईकरांनी भराभर सभा घेतल्या. त्या सभांतून शूर सैनिकांची निंदा केली, इंग्रजांचे गोडवे गायिले आणि आपण इंग्रजी राज्यामध्ये अत्यंत सुखी आहोत आणि इमानी नागरिक म्हणून राहू इच्छितो अशा प्रकारचे विनंतीअर्ज सह्यांनिशी त्यावेळचे गव्हर्नर एल्फिन्स्टन यांजकडे पाठविले.१

## राजनिष्ठेचा अर्ज

अशा प्रकारचा पहिला अर्ज ता. १५ जून १८५७ चा आहे. हा अर्ज मुंबईतील ज्यू रहिवाशांनी केलेला होता. २ त्यात त्यांनी म्हटले आहे की आम्हाला अशी भिती वाटते की, मुंबईत काहीतरी गडबड होईल. या बाबतीत शांतता राखण्याकरिता आम्ही वाटेल ती मदत सरकारला करु. ही मदत म्हणजे सरकारने आजपर्यंत आम्हाला दिलेल्या दिलादार वागणुकीचे प्रतीकच. या सही करणाऱ्यांत दाविद ससून, मोसेस गुबे वगैरे धनाढ्य (लोक) नागरिक आहोत. हा अर्ज मुंबई सरकारकडे गेल्यानंतर ५ दिवसांनी बहुजन नागरिकांचा अर्ज मुंबई सरकारास सादर करण्यात आला. ३ आपण गप्प राहीलो तर सरकार आपणास बंडखोरांचे पाठिराखे किंवा त्यांना सहानुभूती दाखविणारे समजेल आणि उगाच वहीम धरून सरकारशी असलेले हितसंबंध गोत्यात येतील म्हणून या लोकांनी तसे स्पष्ट लिहून सरकारला आम्ही वाटेल त्या प्रकारचे साहाय्य करण्यास तयार आहोत अशा प्रकारची ग्वाही देणारा फतवा तयार केला व तो गव्हर्नरकडे पाठविला. त्या फंतव्यावर सही करणारे सर्व जातीचे लोक होते. हिंदु होते, तसेच पारशी, मुसलमान, यहुदी व ख्रिश्चनही होते. यांत प्रामुख्याने डॉ. भाऊ दाजी, आबाजी बापूजी, नारायण दाजी, नवरोजी फ्रामजी, कावसजी जहांगिर, कवसजी जमशेटजी, काझी महंमद युसूफ अशा एकंदर सुमारे ५०० नागरिकांच्या सह्या होत्या.

## राजनिष्ठेची लागण

तशाच प्रकारचा अर्ज ता. २३ जून रोजी बॉम्बे असोसिएशन या संस्थेने गव्हर्नरकडे पाठविला. ४ या प्रत्येक अर्जाची दकल गव्हर्नर आपल्या ठराविक पद्धतीने घेत होता आणि मुंबई सरकारने नेटिव्हांकरिता आजपर्यंत काय केले, नेटिव्ह लोक त्यामुळे कसे सुखी आहेत वगैरै गोडवे आपल्या प्रितउत्तरांत देऊन या फतव्यांची संभावना करीत होता.५

सरकारच्या सहाय्याला जाण्यासाठी मुसलमान बांधवांनाही उत्कंठा लागली. मुसलमान भाईंना वाटेल की आपण स्वतंत्र कबुलीजबाब पाठविला नाही आणि म्हणून त्यांनी तशा प्रकारचा एक अर्ज हजारो मुसलमानांच्या सह्या घेऊन पाठविला. त्यात त्यांनी आम्ही इंग्रज सरकारला वाटेल ती मदत करू असे आश्वासनही देऊन टाकले.६

अनुक्रमणिका

**उठावाची मसलत**

अशा रितीने प्रमुख नागरिकांनी जिव्हाळ्याने सरकारला मदतीची आश्वासने दिली खरी. पण सामान्य जनांत मात्र इंग्रजांबद्दल घृणाच वास करीत होती. त्यावेळी सैनिकांपैकी गुलमार डूबे हा पुरभय्या फार वस्ताद माणूस होता. त्याने मुंबईतील उठावाचा आराखाडा तयार केला.मशीदीमध्ये बैठका होऊ लागल्या.सैन्यामध्ये फितुरी सुरू झाली आणि १५ ऑक्टोबरच्या रात्री इंग्रज लोकांवर हल्ला करून मुंबई ताब्यात घ्यायची असे ठरले.७ या कामी नेटिव्ह इन्फन्ट्रीच्या नं.१० व ११तुकड्यांतील सैनिकांनी भाग घेतला होता. गुलमार डुबे याने या सगळ्या बनावाची हकीकत इतकी गुप्त ठेवली होती की स्कॉटलंड यार्डच्या बरोबरीने चालणाऱ्या मुंबई पोलिस कमिशनरला त्याची दादही काही दिवस लागली नाही.८ मोहरमच्या दिवशी हा उठाव व्हावा असे पहिल्याप्रथम ठरले होते पण नंतर मुसलमानांनी मोहरमच्या दिवशी ही गडबड नको म्हणून दिवाळीचा दिवस मुक्रर केला. ९ दिवाळी म्हणजे ऑक्टोबरपर्यंत ही बातमी गुप्त थोडीच राहणार ? तिला पंख फुटले. २६ सप्टेंबरला जमादार लालसिंगने आपल्या कंपनीचा कॅप्टन मॉफ गोवन यांना ही बातमी सांगितली. मरीन बटॅलियन १० वी व ११ पलटन या तुकड्यांची लक्षणे काही ठिक दिसत नाहीत; त्यातील दोन नाईकांना तर लागण लागलेली आहे. अशी गुळमुळीत भाषा त्याने वापरली . झाले इंग्रजांना ताबडतोब वहिमावरून नाईक कामत प्रसाद याला कैद केले आणि पुढील निरवाविरवीकरिता त्याला पोलिसांच्या स्वाधीन केले.१०

**मसलत फुटली**

मरीन बटॅलियनचा कमांडर कॅप्टन बॅरोटा फार धूर्त ऑफिसर होता. त्याला लागलेल्या सुगाव्यानुसार बॅरॅकमध्ये तिन्ही पलटणींच्या सैनिकांची चाललेली सभा त्याने गुप्ततेने अगदी जवळून पाहिली. त्या खोलीत झगझगीत प्रकाश होता व त्या प्रकाशात १० व्या तुकडीतील मुंगूळ जमादार व ड्रील हवालदार (मरीन बटॅलियनचा ) आणि दुसरे दोन नागरिक या गुप्त मसलीत सामील झालेले आढळले. जमादार सभेस असताना सभेतील कामकाज हलक्या आवाजात चालत होते. त्या सभेस दोनच विषय चर्चिले जात होते. एक कामत प्रसाद याला काढून टाकले त्याचा व दुसरा मुंबई लुटण्याचा. शिवाय मोहरमच्या दिवशी उठाव करून खून करणे आणि शहर लुटणे हेही बोलले जात होते. पण हा उठाव दिवाळीला व्हावा असे मागाहून झालेल्या बैठकीत ठरले.११ कॅ. बॅरोटाने उतावळीपणा न होऊ देता इलाज करण्याचे ठरविले आणि अधिक माहिती मिळवून मुख्य सूत्रधारांना पकडून बंडाचा बीमोड कसा करायचा यासंबंधीची योजना त्याने आपल्या मनाशी, इतर सहकाऱ्यांशी चर्चा करून ठरविली. दिवाळी जवळ येऊ लागली. तसतशा क्रांतिकारकांच्या बैठकी होऊ लागल्या.१२ या बैठकीच्या बातम्या त्यावेळचे मुंबईचे डेप्युटी पोलिस कमिशनर फोरजेट यांना तपशीलावर मिळू लागल्या. याच ऑफिसकडून या बैठकीच्या साद्यंत हकिगती कॅ. शोरट याला समजू लागल्या. बिचाऱ्या क्रातिकारकांना कल्पनाही नव्हती की या आपल्या हालचालीत गुप्तता केव्हांच लयाला गेली आहे व आपण आपल्या दुशमनांच्या फासात लवकरच अडकले जाणार आहोत.

[अनुक्रमणिका](#)

**धरपकड व शिक्षा**

१५ ऑक्टोबरला उठाव होणार हे निश्चित झाले. तेव्हा ८ ऑक्टोबरला ब्रिगेडडियर शोरटने दहाव्या व आकराव्या पलटणीचे कॅ. शेफर्ड आणि वाईड यांना छावण्यांचा ताबा घ्यायला सांगितला आणि त्यांच्या तुकड्यांतील हालचाली डोळ्यांत डोळ्यात तेल घालून पहा असे सांगितले.१३

कॅ. बॅरोटा आणि कॅ. फोरजेट हे पुन्हा एकदा पूर्वी भरत असलेल्या सभेच्या ठिकाणी जाऊन आले. त्याना तिथे निरनिराळी माणसे दिसली आणि संभाषणात फिरंग्यांना ठार मारणे, शहर लुटणे आणि दिल्लीश्वराला जाऊन मिळणे अशा प्रकारच्या गप्पा ऐकू आल्या. त्यांनी मात्र अशी खूणगाठ बांधली की सुभेदार गुलमार डुबे याचा सूत्रधार आहे. पण तो बेटा सभेला हजर नव्हता. आता यापुढे बातम्या काढण्यात वेळ न गमविण्याचे ब्रिगेडियर शोरटने ठरविले. त्याने ता. ११ च्या सायंकाळी अकराव्या पलटणीतील सुभेदार गुलमार डुबे, जमादार शेख रहिमान, मरीन बटालियनचा कवायती शिक्षक हवालदार सईद हुसेन आणि दहाव्या पलटणीचा प्रायव्हेट मंगल यांना पकडण्याचे ठरविले आणि त्याचप्रमाणे त्यांना पकडून दुसऱ्या दिवशी स. ९ वाजता फोर्ट जॉर्ज किल्ल्यात नेऊन ठेवले.१४

१३ तारखेस कवायती शिक्षक हवालदार सईद हुसेन आणि प्रायव्हेट मंगल यांना लष्करी कोर्टापुढे उभे केले आणि १५ तारखेला त्यांना गोळ्या घालून ठार मारण्याची शिक्षा सांगितली आणि लागलीच त्याची अंमलबजावणीही झाली पण त्याच दिवशी जमादार शेख रहिमानची चौकशी होऊन त्याला निर्दोष म्हणून सोडून दिले. गुलमार डुबेला ता. २२ रोजी मात्र प्रथम फाशीची शिक्षा झाली पण मागाहून जन्मठेपेची करण्यात आली. तशीच शिक्षा दहाव्या पलटणीच्या नाईकास खेचण्यात आले आणि त्याला काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावली.१६

**उठावावर भाष्य**

मुंबईला पहिल्यापासून काळजी घेत असता ह्या दहाव्या आणि अकराव्या पलटणींनी उठाव करण्याचे कारण काय? याचा खुलासा ब्रिगेडियर शोरट याने मुंबई सरकारला पाठविलेल्या ३१ ऑक्टोबरच्या पत्रात केला आहे.१७ तो म्हणतो की हे दोन्ही तुकड्यांतील लोक बॅरेकच्या जवळपास असणाऱ्या काही उपद्यापी नागरिकांच्या सभांना नियमित जात असत. त्या सभावाल्यांचा अजमीरच्या बंडवाल्यांशी गुप्त पत्रव्यवहार चालत होता आणि त्या लोकांनी जरी लुटालूट, कत्तल वगैरेच्या योजना मोहरला अंमलात आणण्याकरिता आखल्या होत्या तरी त्याबद्दलची माहिती ऑक्टोबर अखेरपर्यंत पोलीस खात्याला असू नये याबद्दलचे आश्चर्य प्रकट केले. शिवाय दहावी पलटण ही दंगेखोर म्हणून प्रसिद्धच होती. त्यातील लोकांनी नशिराबादला १८५४ मध्ये दंगा केला होता. १८५७ च्या उठावात २ सुभेदार, १ हवालदार आणि ७ प्रायव्हेट गुंतल्याचा सुगावा लागला.१८

**गोळ्या घातल्या**

या पकडलेल्या लोकांस गोळ्या घालून निजधामास पाठविण्याचे ठरले. पण हा समारंभ एका विशिष्ट रीतीने घडवून आणण्याचा सरकारचा इरादा दिसला. जनतेच्या मनात ज्या रीतीने भीतीचा गोळा उत्पन्न होईल आणि तेणेकरून पलटणीतील लोकांनीही धाक वाटेल अशा रीतीने या प्रकरणाचा शेवट

अनुक्रमणिका

करण्याचे अधिकाऱ्यांनी ठरविले. कैद केलेल्या सैनिकांनी गुप्त रितीने देहदंड द्यायच्याऐवजी त्याच्याकरिता सध्याच्या आझाद मैदानाची जागा निवडली. ज्या पलटणीतून बंड झाले त्या सैनिकांना रांगेने उभे करण्यात आले. आणि संध्याकाळी शाळकरी पोरांपासून तो म्हाताऱ्या कोताऱ्या प्रेक्षकांसमोर या सैनिकांना तोफेच्या बाराने उडवून दिले.१९

इंग्रजांचे नशीबच सिकंदर की हे बंड मुळातच उखडून टाकण्यात यश आले व त्यांना मुंबईतील या बहुरंगी इंग्रजाळलेल्या नागरिकांच्या साहाय्याची गरजच पडली नाही.

आधार: (१-६) P.D. 1857, Vol. 13, pp.3-4, 7-9, 11-13,35-37, 47-48. (७-११,१३-१६)P.D. 1857,Vol.30.pp.321-325. (१२) P.D.1857, Vol. 28, P. 333. (१९) Wacha, Shells from the Sands of Bombay, p. 67.

अनुक्रमणिका

# खानदेश

### १८५७ च्या उठावाचे निमित्तः काजीसिंगास मिळालेल्या शिव्या

आतापर्यंतचे भिल्लांचे उठाव जरी पोटार्थी असले तरी १८५७ तील उठावाचे स्वरूप मात्र पूर्वीचेच राहिले नव्हते. या उठावात तत्कालीन राजकारणाचा रंग भरला गेला. त्याची प्रचिती पुढील विवेचनावरून कळून येईल.

काजीसिंग हा भिल्लांचा नायक, कंपनी सरकारच्या नोकरीत १८३१ ते १८५१ पर्यंत होता. त्याने इमाने इतबारे सरकारची २० वर्षे चाकरी केली. सिध्वा ते सीरपूर या ४० मैलांच्या जंगलातून जाणाऱ्या रसत्यावरील भिल्ल पोलीसांवर देखरेख करण्याचे काम त्याने चोख बजावले.१ या काळात चोरीचा किंवा खुनाचा असा गुन्हा त्या भागात झाला नाही. त्याने दरोडेखोर भिल्लांचा पाठलाग करून पकडून देण्यातही मे. ग्रॅहॅम, मे. मॉरिस, कॅ. रोझ, मे. केर यांना बहुमोल मदत केली होती. पण १८५१ मध्ये त्याच्यावर बालंट आले. सिंध्वा रस्त्यावरील चोरीत सापडलेल्या गुन्हेगारास त्याने बेदम मारले, तो मेला. काजीसिंग खुनी ठरला. सरकारने त्याला १० वर्षाची सजा ठोठावली. पण दयाळू होऊन १८५५ मध्ये मुक्त केले.२ ज्यांना त्याने पूर्वी मदत केली होती अशा कॅ. रोझ, मे. हमलेकड या गृहस्थानी त्याला पुन्हा नोकरीत ठेवण्यासाठी कंपनी सरकारला विनविले. पण त्याचा उपयोग झाला नाही. १८५७ चा मे महिना आला. बंडाच्या बातम्या धडकू लागल्या. इंग्रजांचे धाबे दणाणले. भिल्ल लोक स्वस्थ बसणार नाहीत हे त्यांनी जाणले. काजीसिंगला नोकरीत घेतल्याने खानदेश जिल्ह्यातील भिल्ल प्रदेशातील सिंध्वा रस्ता मोकळा राहील व सरहद्दीवरील भिल्लांच्या उच्छृंखलपणास पायबंद बसेल असे कंपनी सरकारला वाटले आणि म्हणून त्यास १८५७ च्या जूनमध्ये नोकरीत घेतले. पण काजीसिंगने यावेळी उत्तर व मध्य हिंदुस्थानातील उठावाच्या शोकजनक हकिकती ऐकल्या होत्या. वरवानी नाईकानी हल्ले करूनही कंपनी सरकारकडून त्यास काही शासन झालेले नव्हते हेही त्याने पाहिले होते. इंग्रज सत्ता आता खलास होत आलेली आहे असा त्याचा कयास झालेला होता आणि वाडवडिलांनी चोखाळलेला लुटीचा मार्ग पत्करावा लागणार असे त्याचे मन सांगू लागलं. दिल्लीहून उठावाच्या आज्ञा काजीसिंग, भीमा आणि मवासिया नाईक यांना मिळाल्या. त्यातच काजीसिंगला नोकरीवर असताना कॅ. बर्च व रिसालदार यांच्याकडून शिव्या खाण्याचे निमित्त झाले. आगीत तेल ओतले. काजीसिंगने कंपनी सरकारला सतावण्याचे सत्र सुरू केले. ३ त्यास पलीकडील प्रदेशातून आलेल्या बंडवाल्यांची फूस मिळाली. होळकरांच्या सैन्यातून काढून टाकलेले लोक, झांशी, कोटा या ठिकाणी पराभूत झालेले लोक भिल्लभूमीत शिरले होते. मग काय विचारता? भिल्लांच्या उठावाचा धूमधडाका सुरू झाला. जवळपासच्या गावांवर छापे घालणे, सरकारी खजिन्यांची लूट करणे, अफूच्या गाड्यांची लूट यांचे सत्र सुरू झाले.

या उठावास खरी सुरुवात १८५७ च्या सप्टेंबरमध्ये झाली.४ खानदेशच्या भिमा नाईकाच्या नेतृत्वाखालील भिल्लांनी ले. केनेडीच्या पार्टीवर हल्ला चढविला आणि त्याला चित केले. याच भीमा नाईकाने खानदेशच्या पोलीस अधिकाऱ्यांना फर्मावले की, तुम्ही सरकारशी एकनिष्ठ रहात आहात त्याचे परिणाम वाईट होतील. मी हे दिल्ली बादशहाच्या आदेशानुसार तुम्हास बजावीत आहे.५ या भिमा नाईकाला पकडण्याकरिता सरकारने एक हजार रुपयांचे बक्षीस लावले.६ पण बक्षीस जाहीर केल्याची शाई वाळते तोच ता. २९ ऑक्टोबरला रात्री भिमा नाईक, काजी नाईक आणि दुसरे पुढारी यांच्या नेतृत्वाखाली १,५०० भिल्लांनी सिरपूरवर हल्ला चढविला. मिळेल ती लूट घेऊन ते निघून गेले.७ त्यांचा पाठलाग करण्याकरिता

अनुक्रमणिका

कॅ. बर्च गेला. ५६ मैल अंतर गेल्यावर ते भिल्ल जंगलात नाहीसे झाले, या सबबीवर बर्चला हात हलवित परत यावे लागले.८

१ नोव्हेंबरला काजीसिंग, भिमा वगैरेंनी मिळून खानदेश जिल्हाधिकाऱ्यांच्या तळापासून ६ मैलांच्या आत असलेली दोन खेडी लुटली. त्याचवेळी खाला नाईकाने सुलतानपूर तालुक्यातील एक गाव लुटले.९

मुंबई सरकारकडे या लुटालुटीच्या व उठावाच्या बातम्या जिल्हाधिकाऱ्यांकडून लगेच लिहून येत होत्या. पण त्यात बंदोबस्ताचा उल्लेख नसायचा. कारण बंदोबस्ताकरिता लागणारे पुरेसे सैन्य खानदेशात नव्हतेच मुळी.

एक वेळी अशी बातमी दिली की, खानदेश व अहमदनगर जिल्ह्याच्या सरहद्दीवर पतोडा तालुक्यात काही भिल्ल जमले असून सिन्नरकडील ४०० भिल्ल त्यांना लवकरच मिळाणार आहेत.१० यावरून सबंध भिल्ल जमातच उठाव करण्याच्या उद्योगास लागल्याचे सिद्ध होते. तेव्हा सरकारने त्यांजविरुद्ध जालीम उपाय योजावेत अशी शिफारस मुंबई सरकारला जिल्हाधिकाऱ्याने केली.११

**सात लाखांची लूट**

या शिफारशीचा विचार होऊन प्रतिकारास सुरुवात होण्याच्या आतच ता. १७ नोव्हेंबर रोजी भिल्ल लोकांनी सिंध्वा घाटात होळकर हद्दीत एक मोठा डाका घातला व सात लाखांचा खजिना घेऊन जात असलेल्या बैलगाड्या लुटल्या. खूप चंगळ झाली. सरकारने या डाक्याची धास्ती घेतली. होळकरांच्या सहेतुक दुर्लक्षामुळे हा प्रकार घडला असे इंग्रज अधिकारी कुजबुज लागले. या लुटीची हकीकत मोठी मनोरंजक आहे. थैल्या घेऊन जाणाऱ्या खटाऱ्यांपाशी सुमारे ३०० भिल्ल जांभळी चौकात आले. त्यांनी खटाऱ्यांना गराडा घातला. संरक्षकांची संख्या २०० होती. त्यांनी बंदुकीच्या फैरी सुरू केल्याबरोबर हे भिल्ल दूर उभे राहिले, पण पळून गेले नाहीत. हे पाहून संरक्षक प्रमुख धिग्रज व चतुरभूज, भिल्ल नेत्यांपाशी गेले आणि कुंपणाने शेत खावे त्यातील गत झाली. चतुरभुजाने तिजोरीच्या रखवालदारास सांगितले की, भिल्लनेता काजी नाईक हा या खटाऱ्यांचे संरक्षण करण्याकरिता आला आहे. तुम्ही दूर व्हावे, झाले रक्षक दूर झाले. चोहोंकडून भराभर भिल्ल आले.१२ लुटीला सुरुवात झाली. त्यात रक्षकांनीही हात धुवून घेतला.१३ चांदी रुपयांनी तुंबड्या भरल्या. भिल्लांनी लूट केली असा बोभाटा मात्र झाला. याचा पुढे इंग्रजांनी छडा लावला. कॅ. बर्चला त्या लुटीतील काही चांदीचे बार सुद्धा सापडले. या सात लाखांच्या लुटीवर खूष होऊन काही काजीसिंग व त्याचे साथीदार गप्प बसले नाहीत. त्यांनी अफूने भरलेल्या ६० गाड्याही लुटल्या, सरकारी पोस्ट लुटले, सिंध्वा घाटातील टेलिग्राफ ताराही तोडल्या.१४ वरील उद्योगात नाईक काजीसिंगला भीमा नावाच्या त्यांच्यातील प्रसिद्ध नेत्याचं पाठबळ मिळालं होतं. ह्या दोघांनी मिळून पंधराशे लोक जमा केले आणि सातपुड्याच्या रांगेतून खाली उतरून सुलतानपूरजिल्ह्यातील लोकांना त्राही भगवान् करून सोडले. त्यांच्या या आक्रमणाचा धोका शाडा आणि दुसऱ्या गावांना होण्याची भीती होती. १५ या दोघा खंद्या वीरांना नगर-नाशिकच्या बाजूचा भागोजी नाईक आपल्या साथीदारांसह मदत करू लागला. उफाळलेल्या समुद्रास वाऱ्याने साथ दिली. १६ धारच्या सेनेतून मोकळे झालेले मक्राणी - विलायती (पठाण) वगैरै दोन हजार साथी त्यांना येऊन मिळाले. या सर्वांनी सिंध्वा किल्ल्यानजीकचा मुंबई - आग्रा रस्ता अडविला . कंपनी सरकारला या लोकांच्या एकजुटीने भितीच उत्पन्न झाली. १७ राजा या

अनुक्रमणिका

बंडखोरांना वस्त्रे व अवश्यक जिन्नस गुपचूप पुरवित होता, हे १८५८ च्या एप्रिलमध्ये पहिल्या अठवड्यात उघडकीस आले.१८

**अंबापाणीची लढाई**

भिल्लांचा उपद्रव वाढत चालला आहे. इंग्रज पलटणी त्यांच्या संहाराकरिता जंग जंग पछाडत होत्या. भिल्लही त्यांना पुरून उरले होते. मेजर इव्हान्सेन भीमा आणि मोवासिया नाईक यांना चार समजुतीच्या गोष्टी सांगून वाटाघाटी करण्यास बोलविले. पण वाटाघाटी फिसकटल्या. तेव्हा मे. इव्हान्सने या भिल्लांच्या जमावावर कडाडून हल्ला चढविला. या जमावांत भिल्ल नेते काजीसिंग, दौलतसिंग व काळू बाबा हे होते. ते नकराने लढले. इंग्रज सेनेला त्यांनी पुरा मार दिला. कॅ. बर्च, ले. वेसवी हे अधिकारी जखमी झाले व क हिंदी अधिकारीही मारला. भिल्लसेनेपैकी ६५ मेले व १७० जखमी झाले. ही लढाई अंबापाणी (खानदेश) येथे ता. ११ एप्रिल रोजी झाली.१९

याच झटापटीत भिल्लांच्या इतक्याच त्यांच्या स्त्रियाही धोक्याच्या, उपद्रवकारक असल्याचे कंपनी सरकारला आढळून आले. २० तेव्हा ४०० वर भिल्ल स्त्रिया पकडल्या. त्यांत काजीसिंग, मोवासिया नाईक आणि करीचा माऊ रावळ यांच्या बायका प्रमुख होत्या. भागोजी नाईक, भीमा नाईक आणि काजीसिंग हे सापडेपर्यंत त्यांच्या स्त्रियांना ओलीस ठेवण्याचा आदेश मुंबई सरकारने दिला होता.२१ अंबापाणी लढाईनंतर "ड्रम ट्रायल" खटले होऊन ६२ आरोपींपैकी ५७ लोकांना गोळी घालून ठार करण्याची सजा दिली.

पण याचा बदला नगरच्या भिल्लांनी घेतला. नांदगावच्या आसपास ते गाळा झाले. ही बातमी ले. स्टुअर्टला कळल्याबरोबर तो आपल्या ३०० सैनिकासंह गेला. भिल्लांची संख्या ४०० च्या आसपास होती. त्यांनी नदीकिनाऱ्याने लगतच्या दाट झाडीचा आश्रय केला होता. लढाई जुपंली, भिल्लांनी इंग्रजांवर अक्षरशः आग ओकायला सुरुवात केली. त्यांच्या आगीच्या माऱ्याने कॅ. मॉन्टगोमेरी जखमी झाला. ले. चेंबरलेन, स्टुअर्ट व डाक्सिन यांनाही तसाच तडाखा बसला. ले. स्टुअर्ट दुसऱ्या दिवशी ता. २१ रोजी ख्रिस्तवासी झाला.२२ इंग्रजांकडील ५० जखमी झाले. व १९ मृत्यू पावले तर भिल्लांकडील २५ लोक कामास आले. खानदेशात शिरपूर, सुलतानपूर, पाचोरा, यावल आदि तालुक्यांत वर्षभर चकमकी झडतच होत्या व भिल्लांचा धुमाकूळ चालू होता. २३



आधार: (१-४) P.D. 1858, Vol. 33. pp. 349-55. (५-६) P.D. 1857, Vol. 28, p. 125, P. D. 1858, Vol. 27.pp. 495. (७-८) P.D. 1857 Vol. pp. 113-114, 137, (९-१०)कित्ता, p. 137. (११) P.D. 1853,V.I. 27.pp. 492-493. (१२-१३). कित्ता, P. 229. (१४) P.D. 1858, Vol. 14,pp. 285-286. (१५) P.D. 1857, Vol. 31, p. 525. (१६)P.D.1858 Vol. 24. pp.287-289. (१७) P.D. 1857. Vol. 32, pp, 77-81. (१८) P.D. 1858, Vol. 25.pp. 673-674. (१९-२२) P.D. 1858,Vol. 25,PP. 383-387. (२०-२२)P.D.1858,Vol. 29 pp. 657-666. (२३) P.D. 1858, Vol. 21, P. 51,pp.539-544.

अनुक्रमणिका

# नाशिकः १८५७

या खटाटोपांत नाशिक भागातील गिरीजन काही गप्प बसले नव्हते.त्यांनीही आपला वाटा उचला. पेट (नाशिक) चे चोवीस परगण्यांचे कोळी राजे भगवंतराव हेही यात सामील झाले.१ या भागातील कोळी भिल्लांनी बंडाच्या उठावाची तयारी सतत ४-६ आठवडे म्हणजे जवळजवळ ऑक्टोबरच्या मध्यापासून केली.२ त्यात राजा व राणीचा दिवाणजी या उभयतांचा बराच भाग होता. ता. ६ डिसेंबरला ठरल्याप्रमाणे पेटचे ठिकाण हरसूळ येथील कचेरीवर बंडवाल्यांनी हल्ला चढविला. मामलेदाराला मिरवीत नेलं. पेट येथील कचेरीची व पेटच्या बाजाराचीही तीच गत झाली. लुटीनंतर बंडवाल्यांनी राजाकडे जाऊन मुजरे केले. ३ पण सायंकाळी या छोट्याशा बंडाचा निकाल लावण्याकरिता ले ग्लासपूल तिथे आला. ही बातमी समजताच बंडवाल्यांनी पकडलेल्या मामलेदार व शिपाई यांस सोडून दिले आणि आपण जंगलात फरारी झाले.४ ले. ग्लासपूलने आठवडाभर भिल्लांविरुद्ध चढाई चालू ठेवली पण त्याला काही विशेष यश मिळाले नाही. ५ उलट बंडवाल्यांनी त्यालाच काही दिवस कचेरीत कोंडून ठेवला होता.भागोजी नाईक व मक्राणी फुलदिखान हे दोघे या लढ्याचे पुढारी होते. कॅ. नेटल ग्लासपूलकडे धावत गेला व त्याची बंडवाल्यांच्या कोंडीतून सुटका केली. राजे भगवंतराव व इतर पुढारी यांना ता. २८ डिंसेबर रोजी फाशी दिले.६ शेकडो लोकांना काळ्या पाण्यावर रवाना केले. तेव्हा हळूहळू उद्रेकाचा उपशम झाला.

कंपनी सरकारने भिल्लांचा बंदोबस्त करण्याचे ठरविले तरी निबिड अरण्यप्रदेशांत व पहाडा-पर्वतांत त्यांचा पाठलाग करणे फारच कठीण. तेव्हां एकतर त्यांना शरण यावयास सांगून माफी देणे आणि त्यांच्या आश्वसनांवर विसंबून राहणे किंवा त्यांचा संपूर्ण बिमोड करून त्यांना पुन्हा उठाव करणे अशक्य करून सोडणे हे दोनच मार्ग होते. परंतु यांतील पहिला मार्गच सोयीस्कर व यशस्वी होण्याजोगा होता. म्हणून कंपनी सरकारने काजीसिंग व त्याचे साथीदार यांना माफी द्यावी व त्यांच्यावर पूर्ववत जबाबदारी टाकावी अशी शिफारस खानदेश जिल्हाधिकाऱ्याने लिहून पाठविली ७ आणि आपल्या औदार्याची खूण म्हणून त्याने काजीसिंगच्या बायको, बहिणीस व पकडलेल्या इतर सर्व बायकांस सोडून दिले.८

### भिल्ल नाईक पथाजीची शरणागती

पथाजी नाईक सुमारे ८० वर्षाचा म्हातारा. पण त्याने आपल्या टोळीवाल्यांसह धिंगाणा सुरू करून कॅ. हेन्री यास ठार केले होते. पाठलागानंतर तो जो पळून गेला तो पुण्याच्या पोलीस ठाण्यावर जाऊन एप्रिल १८५८ मध्ये ठाकला. त्याला तोबडतोब असिस्टंट मॅजिस्ट्रेट गौनी यांजसमोर उभे केले. पथाजी नाईक म्हणाला, "महाराज, मी पथाजी नाईक भिल्ल आहे. तुम्हांकडे येऊन तुमच्या हस्तगत व्हावे असे जर माझ्या मनात आले नसते तर मी तुमच्या हाती कधीही लागलो नसतो. आता तुम्ही मला धरा आणि पाहिजे असल्यास ताबडतोब फाशी द्या. पण माझ्या दोघा मुलांस वाचवा.९"

पथाजीच्या वयाकडे पाहून त्यास माफी दिली. भागोजी ह्याचा १८५९ च्या नोव्हेंबरात अहमदनगरचे पोलीस सुपरिंटेंडंट सर फ्रॅन्क सौटर यांच्याशी सिन्नर येथे समोरासमोर सामना होऊन तो ठार झाला.१०

याच सुमारास सार्वत्रिक निःशस्त्रीकरणाचा हुकूम सुटला. प्रत्येक जिल्ह्यातून शस्त्रधारी लोकांकडून शस्त्रे सरकारजमा होऊ लागली. भिल्ल मात्र यामुळे क्षुब्ध झाले. सुखासमाधानाने ते शस्त्रसंन्यास घेण्यास तयार नव्हते. म्हणून या कठिण कामगिरीवर सरकारने अहमदनगरचे त्यावेळचे हुजूर डेप्युटी कलेक्टर

दादोबा पांडुरंग यांची नेमणूक केली. त्यांनी भिल्लांची मने वळवून हे धोक्याचे आणि तितकेच जिकरिचे काम शांततेनं पार पाडिले.११

आधार: (१-४) P.D. 1858.Vol. 20, pp. 381-387. (५-६) P.D. 1854, Vol. 21,pp.71-73. (७-८) P.D. 1858,Vol. 33. pp, 360-62. (९) P.D. 1858, Vol. 25,pp.459-464. (१०) P.D. 1858, Vol. 28. (११) प्रियोळकर, दादोजी पांडुरंग चरित्र, पृ. २२५-२६.

अनुक्रमणिका

# नागपूरचा उठावः १८५७

नागपूरचे राज्य खालसा झाल्यावर. नागपूरच्या जडजवाहिराचा निकाल कंपनी सरकारच्या नोकरांनी उधळेपणाने लाविला. ७५ लाखाचे जडजवाहिर १०-१२ लाखला मातीमोलाने विकले गेले. त्यामुळे लोकांची आणि राजघराण्यांतील मंडळींची मने कं. सरकारविरुद्ध प्रक्षोभक बनली होती. मीरत, दिल्लीच्या बातम्या नागपूरला येऊन थडकल्या. नागपूरमधील सैनिकांमध्ये यासंबंधीचा उत्साह होताच. कामतीमध्ये यावेळी मद्रासी पलटण होती. तिला या बातमीची लागण पहिल्यांदा झाली नाही. पम राजाचे जुने बिनकवायती लष्कर नागपूरपासून तीन मैलांवर टाकळी येथे होते. त्यात मात्र चुळबुळ सुरू झाली.त्यात घोडेस्वार, पायदळ व थोडासा तोफखाना होता. घोडेस्वरांत मुसलमान बहुसंख्येने होते. पायदळात हिंदुस्थानी लोकांचा भरणा होता. मुसलमान सैनिकांची मने बिथरण्यास सरकारचेच कृत्य कारणी.भूत झाले होते. शहरात असलेले कबरस्थान शहराच्या बाहेर हलविलेल्यामुळे ते बिथरले होते. इतक्यात उत्तरेकडील हेर नागपूरास येऊन गेले. त्यांनी कामतीचे सैन्यासही फितूर केले.

नागपूरमधील सैनिकांत गुप्त रीतीने खल होऊन अखेरीस कट ठरला. मिशन हाऊसचे जवळ मोतीबाग म्हणून बगीचा होता त्यात १३ जून रोजी रात्री१२ वाजता खुणेकरिता लोकांनी दारूचे फुगारे उडवावे; ते आकाशात दिसताच टाकळी येथील सैनिकांनी निमिषार्धात निघून लोकांसह रेसिडेंटवर एकदम हल्ला चढवावा; युरोपियन अधिकाऱ्यांची कत्तल करावी, दारूगोळा व तोफा हस्तगत कराव्या आणि सीताबर्डीचा किल्ला ताब्यात घ्यावा व मग कामती येथील सैन्यानेही या सैन्यास मिळावे.

बेताची बातमी फुटली. बेत ठरला खरा पण चुगलखोरांनी डाव साधला. कॅप्टन वूडला त्याच्या प्याद्याने टाकळी येथील सैन्यातील फितुरीची हकीगत कानात सांगितली. तसेच ता. १२ जून रोजी फैझबक्ष व त्याचा मुलगा, सिटुफन हिस्लॉप मशिनरी याचे बंगल्यावर रात्री गेले. फैजबक्षाचा मुलगा पूर्वी हिस्लॉपच्या शाळेत होता. त्यामुळे त्याला हिस्लॉपविषयी कलकळ होती. या दोघांनी हिसलॉप यास बातमी दिली की लवकरच इंग्रजांची कत्तल होणार तेव्हा बायकामुले एकदम मुंबईस पाठवा. हिस्लॉप हे वर्तमान कमिशनरला कळविले, तसेच तुरंगावरील दरवानने या कटाची बातमी वाटसरू बोलताना ऐकली होती. तेव्हा कर्व्य म्हणून त्यानेही आपण जे ऐकले होते ते जेलच्या असिस्टंट कमिशनरला सांगितले. या सर्व बातम्या कमिशनर प्लौडतला ता. १३ रोजी रात्री १० वाजता समजल्या. आता दोन तास राहिले होते. दोन तासानंतर भयानक प्रसंग ओढवणार होता. पण इंग्रजांचे नशीव बळावर होते. म्हणून तो प्रसंग या बातमीमुळे टळला.प्लौडत साहेबाने उपाय योजिले. सीताबर्डी किल्ल्यांतील सैन्य ताबडतोब शहरात अणविले. सीताबर्डीच्या किल्ल्यावर बंदोबस्त करून तोफा रोखून ठेवल्या. सर्व इंग्रज बायकांस कामतीस रवाना केले. पायदळ व तोफखाना यांच्या ईमानावर नागपूरची सर्व भिस्त होती. पायदळाचे अधिकारी गैरहजर असल्यामुले कमिशनरचा असिस्टंट कंबरलेन याने पायदळाचे अधिपत्य आपणाकडे घेतले. त्यास कळून चुकले की पायदल व तोफखान्यातील लोक बददले नसून वाटेल तो हूकुम ऐकण्यास तयार आहेत. हे पाहताच एलिस निर्धास्त झाला.

इकडे ठरल्याप्रमाणे रात्री दहाच्या सुमारास ४०० मुसलमान लोक जमले. इतरही जमाव जमला व टाकळीकडून लोक येण्याची वाट पहात बसले. टाकळीचे स्वारही घोडे तयार करून वाट पहात बसले ते पायदळाच्या लायनीत पाठविलेल्या दफेदारांच्या परतण्याची.पण यावरच दुर्दैव ओढवले. मद्रासी हवालदाराने या तोफेदारास पकडले.सर्व कारस्थान उघडकीस आले. दारूचे फुगारे उडाले नसल्यामुळे

बंडखोर लोकांनी योजनेप्रमाणे एकदम अंमलबजावणी केली नाही. अधिकाऱ्यांची गस्त सुरू झाली . त्यामुळे घाबरून घोडेस्वारांचे पलटणीतील लोकांनी घोड्यावरील जीन उतरले. यामुळे रात्रभर काही गडबड झाली नाही.

**दुसरा दिवस (रविवार ता.१४) – सार्वत्रिक धरपकड**

रविवारी कामतीहून एकदम सैन्य बोलविण्यात आले. ते येताच धरपकड सुरू झाली. घोडदळातील २० लोकांना पकडून त्यांच्यावर कटले भरले. इनायतुलाखान, विलायतखान आणि नबाब कादरखान यांना फाशी दिले. घोडेस्वारातील जो दफेदार पायदळात गेला होता त्यासही फाशी दिले. आणखी नऊ लोकांना निरनिराळ्या शिक्षा ठोठावल्या. शहराच्या सर्व लोकांची हत्यारे काढून घेण्यात आली.त्यामुळे एकदम वचक बसला.

**बाकाबाईचा इंग्रजधार्जिणेपणा**

यावेळी मराटे मंडळीतही खळबळ उडाली. लोकांच्या टोळ्या जागोजाग हिंडू लागल्या. त्यांना फक्त पुढारी पाहिजे होता. युवराज जानोजी भोसल्यांच्या नावे द्वाही फिरवून गादीचे पुनरूज्जीवन करायचे लोकांच्या मनात फार होते. राणी बाकाबाईला हे कळून चुकले. पण तिने इंग्रजांच्या बाजून कौल दिला. बकाबाई ही भोसले राजघराण्यातील वृद्ध बाई. तिचे वर्चस्व लोकांवर फार होते. तिने सर्व प्रतिष्ठित मामसांना राजवाड्यात बोलविले व कोणीही काही गडबड करू नका असा उपदेश केला. त्यांतील प्रमुख लोकांस तर तिने रोज आपलेकडे येऊन हजेरी देण्यास सांगितले व सर्वांना अशी तंबी दिली की जो कोणी या कृत्यास चिथावणी देईल त्यास मी धरून देईन. मग त्यात माझा नातेवाईक असला तरी मी पर्वा करणार नाही. बाकाबाईचा असा कल पाहून मराठे मंडळींत काही गडबड झाली नाही. चुगल्या फैजबक्ष यास एकदम शहर कोतवालाची जागा मिळाली व त्याने कटवाल्यांना हुडकून काढून कडक शिक्षा देवविल्या.

आधार: काळे, नागपूर प्रांताचा इतिहास, The History of Freedom Movement in Madhya Pradesh, pp.66-74.

अनुक्रमणिका

# औरंगाबादचा उठावः १८५७

हैदराबादेत वातावरण हळूहळू तंग होत होते. शिकंदराबाद आणि बोलाराम येथील फौजेत फितुरी करण्याचे प्रयत्न चालू होते. त्याच वेळी औरंगाबादेतही सैन्यात बेदिली माजण्याचा संभव दिसू लागला. कॅ. एस्. जी. ऑर यांच्या अधिपत्याखाली हैदराबदची तिसरी घोडदळाची पलटण मालेगावला रवाना केली. तिची जागा घेण्यासाठी म्हणून हैदराबादची पहिली पलटण मोमिनाबादहून ११ जून रोजी हलविली. तिथे नेतृत्व कॅ. एच. डी. ॲबट यांजकडे होते. या पलटणीचा मुक्काम औरंगाबादपासून १४ मैलावर छोट्या पिंपळगावी होता. याच मुक्कामी उत्तरेतील बंडाच्या हकिकती सैन्याला कळल्या. ९ जून रोजी ही पलटण औरंगाबादला गेलो आणि काळा चतुबरा व घोडदळाच्या रांगा यांच्या दरम्यान या पलटणीचा तळ पडला. त्यावेळी सैन्यातील असंतोषाची चाहूल येऊ लागली. १२ जून रोजी सकाली या सेनेत बंडखोर वृत्ती दिसून आली. असंतोषाचे प्रमुख कारण म्हणजे हे सैनिक उत्तरेत जावयास नाखूष होते. उत्तरेत आपल्याला बंडवाल्यांविरुद्ध व विशेषतः दिल्लीच्या बादसाहाविरुद्ध लढावे लागले असे त्यांना वाटत होते. आपण दक्षिणेत चाकरी करण्यासाठी म्हणूनच केवळ आलेलो आहोत. अशा वेळी उत्तरेत जाणे हे करारविरुद्ध आहे अशीही त्यांची भावना होती. सैन्यात बहुसंख्य मुसलमान होते व त्यांना दिल्लीच्या बादशहाबद्दल आपुलकी वाटत होती. ही राजनिष्ठेची भावना त्यांना इंग्रजांविरोधी बनविण्यास पुरेशी होती. पाचव्या टरूपमध्ये प्रथम हा असंतोष पसरला. त्यानंतर सभा झाल्या व हिंदू आणि मुसलमान शिपायांनी शपथासुद्धा घेतल्या.

कॅ. ॲबटला याची कुणकुण लागली. तेव्हा तो सायंकाळी ५ वाजता रिसालदारांसह पाहणी करण्यासाठी गेला. त्यावेळी त्यास पलटणीची पहिली व तिसरी तुकडी पुढे जाण्याचे नाकारीत असल्याचे समजले. त्यांची समजूत घालण्याची खटपट करण्यात आली. परंतु सैनिक बिथरले होते. सबंध पलटण रविवारी दुपारी ३ वाजता निघून अंबड या ठिकाणी परतणार असल्याची बातमी आली. यावेळी जे एतद्देशीय अधिकारी व इतर सैनिक फटकून राहतील त्यांना जबरदस्तीने नेण्याचा प्रयत्न होणार असे दिसले. पुष्कळसा रक्तपात होणारसे वाटू लागले. तेव्हा युरोपियन अधिकाऱ्यांची बायकामुले सुरक्षित स्थळी पाठवून देण्यात आली. कॅ. ॲबट सुरक्षित जागा पाहून तोफखान्याच्या आश्रयाने राहिला. परंतु ५-३० वाजता रिसालदार अबदुल रहेमान यांच्या हाताखालील सैनिकांनी कॅ. ॲबटचा हुकूम पाळण्याचे ठरविले व ते इतर पलटणीतील लोकांपासून अलग राहिले. मग त्यांचे अनुकरण हिंदूंनी केले आणि अखेर २.३.५.६. या टरूपच्या अधिकाऱ्यांनीही आपल्या वर्तनाबद्दल खेद प्रदर्शित करून सरकारशी एकनिष्ठा व्यक्त करणाऱ्या पत्रकावर सह्या दिल्या.

आता हा असंतोष मात्र केवळ पहिल्या घोडदळापुरता मर्यादित राहिला नाही. औरंगाबादला दुसरी इन्फन्ट्री ही पलटण होती. यातील २०० सैनिक उत्तर प्रदेशातील अवध परगण्याचे होते. यांच्याबद्दल युरोपियन अधिकाऱ्यांच्या मनांत अविश्वास निर्माण झाला होता. भीती आणि संशय यांच्या योगाने अतिरंजित बातम्या त्यांच्या कानी येऊ लागल्या. युरोपियन अधिकाऱ्याच्या घरादारांची त्यांच्या मुलांबाळांसकट होळी करावयाची; कॅन्टोनमेंटवर हल्ला करून लुटालूट करावयाची, गोऱ्यांना ठार मारावयाचे अशा बातम्या उठत होत्या. असे असता एके रात्री इन्फन्ट्रीचा प्रमुख कॅ. स्पीड याला तीसऱ्या घोडदळातला बुऱ्हानबक्ष भेटावयास आला. त्यांचा कॅप्टन व त्याची पत्नी यांजवर फार जीव.त्याने येऊन कॅप्टनला सांगितले की घोडदळ पलटण शस्त्रास्त्रनिशी पहाटे कॅन्टोनमेंटवर हल्ला करणार. तेव्हा कॅप्टनने मिसेस स्पीड, मुले व इतर एक दोन स्त्रिया यांना बैलगाडीत बसविले. बैलगाडीला बाहेरून पांढरे पडदे लावून मुसलमानी जनानखान्याचे स्वरूप त्या बैलगाडीला दिले. बरोबर विश्वासू बुऱ्हानबक्ष होताच. ही मंडळी अहमदनगरला

रवाना करण्यात आली. याचवेळी एकदम वादळी हवा सुरू झाली व जोराचा पाऊस, विजांचा कडकडाट व वादळी वारा यांनी थैमान मांडले. या वादळी वाऱ्याने घोडदळाने उभारलेले मोठे हिरवे निशाण खाली ओढले. हा वादळी पाऊस व निशाणाचे काली येणे हा ईश्वरी प्रकोपच वाटला आणि त्यामुळे या घोडदळाच्या सैनिकांच्या हालचालींवर विरजण पडले. युरोपियन अधिकारीवर्गात औरंगाबादेतील गुंड वगैरे लोक सैन्यामधील या असंतोषाचा फायदा घेऊन कॅनटोनमेंटवर लुटीसाठी हल्ला करणार अशी भूमिका उठली व कॅन्टोनमेंट आणि घोडदळ पलटण यांमधील नदीवरील पुलावर घाईघाईने इन्फन्ट्रीने काही लोक पाठविले. याचा परिणाम असा झाला की, गोडदळात गोंधळ व गडबड सुरू झाली. तुताऱ्या वाजविल्या व रात्री झोपेतून सारे लोक उठून घोड्यावर स्वार होऊ लागले आणि कॅन्टोनमेंटकडे निगाले. सारे घोडदळ सरकारविरुद्ध बंड करून उभे राहल्याचा देखावा दिसू लागला.

हैदराबादला या सर्व हकिकती कळविल्या गेल्या होत्या.पुन्याहून औरंगाबादला सैन्य धाडले. परंतु हे सैन्य येईपर्यंत औरंगाबादेतील बंड उग्र स्वरूप धारण करू लागले. १७ जून रोजी इन्फन्ट्रीमधील असंतोषसुद्धा उघड दिसू लागला. इन्फन्ट्रीमधील शिपायाने घोडदळातल्या माणसाला विचारले, रेजिमेंटमधील काही भाग जर तुमच्या बाजूचा आहे तर अजून कसे काहीच घडले नाही? कॅ. सिंक्लेअरला तर घोडदळातल्या लोकांविरुद्ध तोफा न वापरण्याचा पुढारी लोकांचा निर्धारसुद्ध कळला होता.

कॅ. ॲबटने या पथकाला भेट देऊन जनरल बुडबर्नचे सैन्य लवकरच येत आहे तोपर्यंत शांत राहण्यास सांगितले. दरम्यानच्या काळात मेजर जनरल बुडबर्नचे सैन्य औरंगाबादकडे निघाले होते. त्याच्या हाताखाली कॅ. गिलच्या अधिपत्याखाली चौदावी लाईट ड्रॅगून पलटण, कॅ. वूलकाम्बच्या नेतृत्वाखालील युरोपियन तोफखाना व कर्नल फौलेटच्या हुकूमतीतील पंचविसावा मुंबईची नेटिव्ह इन्फन्ट्री यांचा भरणा होता.

हे सैन्य २३ जून रोजी सकाळी १० वाजता औरंगाबादला येऊन पोहोचले. कॅ. ॲबटच्या सांगण्यावरून घोडदळाच्या तळाजवळ जाऊन त्यांना चकित करून सोडण्याचे ठरले. १२ वाजता तेथे हे सैन्य जाऊन थडकले. दोन तोफा व ड्रॅगूनची एक तुकडीनिजामाचा तोफखाना व पायदळ यात बंड उद्‌भवल्यास पुलाच्या संरक्षणासाठी ठेवण्यात आले. घोडदळातील बिगूल वाजविण्यात येऊन लोकांना रांगेत उभे राहण्याचा हुकूम देण्यात आला. ॲबट घोड्यावरून रपेट करीत त्याच्याजवळून गेला व जे इंग्रजांशी विशवासू व एकनिष्ठ राहिले होते त्यांना बाकीच्या बंडकोर लोकांपासून वेगळे होण्याचा हुकूम दिला वूलकोम्बच्या बॅटरीज सज्ज ठेवण्याचा हुकूम देऊन त्या ३० यार्डावर आणण्यात आल्या. कॅ. ॲबटला सैनिकांना चार शब्द सांगण्याची आज्ञा आली. अंबटने बंडखोरांना आज्ञाभंगाबद्दल कारणे विचारली बंड करण्यास ते का प्रवृत्त झाले त्याबद्दल विचारणा केली. सरकारचे धोरण सैनिकांचे धर्मांतर न करण्याचेच आहे असे त्याने सांगितले व या आज्ञाभंगाबद्दल होणाऱ्या सजेची कल्पना दिली. नंतर प्रत्येक रिसालदाराला बंडखोरांच्या नायकांची नावे पुकारण्याबद्दल सांगण्यात आले. त्यावेळी आमिरखानचे नाव पुकारण्यात आले. त्यावेळी "हे चांगले नाही, हे सर्व कोटं आहे." असे तो ओरडला. अँवटचे भाषण परत चालू झाले.तेव्हा ते मध्येच पुन्हा एकदा ओरडला व "सर्व बंधूंनो, बंदुका सज्ज करा, गोळीबार चालू करा !" अशी आज्ञा देता झाला. कॅ. वूलकोम्ब हा आपल्या तोफानिशी तयारीत होता व हुकूमची वाट पहात होता. परंतु सारे सैनिक एकदम लाइनकडे निघाले ते २६० यार्ड गेल्यानंतर वूलकॉम्बने तोफा चालू करण्याची आज्ञा विचारली. परंतु काही वेळानंतर ती मिळाली. तोपर्यंत ते तोफांच्या टप्प्याबाहर निघून गेले होते. राहिलेल्या सैनिकांना शस्त्रे खाली करण्याचा हूकुम झाला. पहिल्या टरूप खेरीज बाकीच्यांनी हूकुम मानले.

पहिल्या टरूपचे लोक पळू लागले. त्यांचा ड्रॅगून पलटणीने पाठलाग केला. ॲबटही या पाठलागात होता. दफेदार मीर फिदाअली त्याच्या हातात सापडला त्यावेळी त्याने दातात तलवार धरली व घोड्याचे लगाम सोडून शरणागति दर्शविण्याकरिता दोन्ही हात उंचवाले. कॅ. ॲबटने आपली तलवार खाली केली. नेमके त्याचवेळी फिदाअलीने ॲबटवर गोळी झाडली. घोड्याची क्षणाची हालचाल झाली व नेम चुकला. फिदाअलीला नंतर पकडण्यात आले. या हाणामारीत ५-६ लोक मारले गेले व ५-६ पकडण्यात आले. निःशस्त्र करून कैदेत ठेवण्यात आलेल्या लोकांत एक रिलासदार,३ जमादार, ९, दफेदार, ७६ सेनिक, व ४ तुतारीवाले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी वुडबर्नच्या सैन्याची कवाईत झाली. त्यावेळी मीर फिदाअलीला बाहेर आणण्यात आले. त्याची ड्रम-बेट कोर्टमार्शल झाली व तोफेच्या तोंडी देण्यात आले. त्यावेळी तो इतकेच म्हणाला "माझ्याविरुद्ध साक्षी देणाऱ्यांना परलोकी याचा जाब द्यावा लागेल." त्याला तोफेच्या गाडीला बांधत असता त्याने तसे न करण्याबद्दल विनविले व आपण जरासुद्धा गाडीपासून हालणार नाही. असे सांगितले. किती निर्धाराने व शांतपणे त्याने मृत्युला तोंड दिले. असेच खटले इतरांवर भरले व शिक्ष झाल्या. त्यात चौघांना गोळ्या घालण्यात आल्या. आणखी दोघांना तोफेच्या तोंडी दिले. कितीतरी फाशी गेले. तीस ते चाळीस लोक जन्मठेपी गेले. शेकडो लोकांना नोकरीतून जावे लागले. अशा रीतीने हे बंड मूर्तस्वरूप घेण्यापूर्वीच समूळ उखडण्यात आले.

आधार: P.D. 1857, Vol. 25.pp.255-60, 263,267; Freedom struggle in Hyderabad, Vol.II; (out-break of Aurangabad in June 1857), p.24.

अनुक्रमणिका

# नरगुंदचे भावे

धारवाड जिल्ह्यात नरगुंद हे एक छोटेखानी संस्थान होते. या संस्थानचे त्यावेळचे अधिपती बाबासाहेब भावे होते. त्यांचा एकुलता एक मुलगा १८४३ मध्ये निधन पावला. तेव्हा त्यांनी दत्तक घेणयाची कंपनी सरकारकडे परवानगी मागितली. त्यावेळचा दक्षिण महाराष्ट्राचा पोलिटिकल एजन्ट मॅनसन याने त्यास दत्तक घेण्यास मंजुरी दिली नाही. बाबासाहेबांना त्यामुळे फारच वाईट वाटले १८५७ मध्ये दक्षिणेतील संस्थानांनी सरकारविरुद्ध उठाव करण्याकरिता ज्या खटपटी केल्या होत्या त्यात त्यांनी हिरीरीने भाग घेतला. सोलापुरच्या राजाने उठाव करताच नरगुंदनेही करावा असे ठरले होते. तसेच त्याने कोल्हापूर, सांगली, मिरज, जमखिंडी इत्यादी संस्थानिकांशी पत्रव्यवहार करून त्यांचे सर्व सहकार्यही मागितले होते. धारवाड जिल्ह्यात धुमाकूळ घालणारा प्रसिद्ध क्रांतिकारक भीमराव मुंडरगी यालाही हाताशी धरले.१ अशी सर्व तयारी झाली तरी धारवाडच्या कलेक्टरला भावेविषयी बिलकूल संशय आला नाही. ता. २४ मे. (म्हणजे भावेने सरकारविरुद्ध युद्ध पुकारण्याच्या अगोदर एक दिवस) च्या पत्रात भीमराव मुंगरगीच्या बंडाचे वृत्त देताना कलेक्टर म्हमतो की, "नरगुंदकर भावे हे गृहस्थ भित्रे आहेत. २ ते ही सहजासहजी या बंडखोरांना सामील होणार नाहीत. त्यांना धारवाडला बोलावून नरगुंदमधील शांततेचा भंग करू नका. असे सांगावे पण दुसऱ्या दिवशी ता. २५ मे १८५८ रोजी नरगुंदकरांनी कंपनी सरकारविरुद्ध युद्ध पुकारून कलेक्टरचा कयास खोटा पाडला.

**मॅसनचा वध**

युद्ध पुकारल्यावर कंपनी सरकारने मॅनसनला त्याचा बंदोबस्त करण्यास पाठविले. मॅनसन रामदुर्गास होता. रामदुर्गचे अधिपती नरगुंदकरांचे धाकटे भाऊ पण ते इंग्रजांस सामील होते. ३ मॅनसनने आपल्या दिडशे स्वारांसह नरगुंदकडे चाल केली. ४ नरगुंदकरांना ही बातमी हेरांकडून कळली. त्यांनीही बरोबर सहाशे स्वार घेऊन मॅनसनवर चाल केली. दोघांची गाठ सुरेबान या गावी पडली. नरगुंदकरांना पाहून मॅनसन घाबरला आणि त्या गावाच्या देवळात दडून बसल. त्याला नरगुंदकर भावे आणि त्याचे दोस्त यांनी हुडकून काढले. एका बाजूस त्याच्या घोडेस्वारांचा समाचार घेतला. इतक्यात नरगुंदकरांचा प्रसिद्ध दोस्त भीमराव मुंडरगी हा आपल्या २,५०० जमावानिशा (त्यांना) येऊन मिळाला. मॅनसनला विष्णु कुलकर्णी नावाच्या इसमाने पकडले. दोघांचे मल्लयुद्ध झाले. विष्णुने मॅनसनला खाली लोळविले. मॅनसन बाबासाहेबांकडे जीवदान मागू लागला. पण त्याला कंठस्नान मिळाले.५ त्याचे शिर धडावेगळे करून ते नरगुंदला ता. ३० रोजी सकाळी ८ वा. पाठविण्यात आले आणि लोकांना पाहण्यासाठी ते वेशीवर टंगून ठेवण्यात आले. हा प्रकार ता. ३० मे १८५८ रोजी घडला.६

**फितुरी**

या घटनेमुळे नरगुंदमध्ये भयावह वातावरण निर्माण झाले. मॅनसनच्या धडावरचे कपडे तपासता त्यांत बाबासाहेबांना दोन पत्रे सापडली. त्या पत्रावरून कळून चुकले की "किल्ल्यात असलेल्या कोठारांतील दारूच्या साठ्यांत शेण व बाजरी मिसळून टाकली आहे.७" आपल्या कारभाऱ्यांचे विश्वासघातकी काम त्यांना कळून चुकले.हे कारभारीच मॅनसनला सामील होत. त्यांचे पुढे काय?

अनुक्रमणिका

**लढाईत वेशांतर**

मॅनसनच्या खुनाच्या बातमीने इंग्रजांच्या अंगाचा थरकाप झाला मालकमच्या अधिपत्याखाली इंग्रज सेना चालून आली. तिने नरगुंदला वेढा दिला. युद्धास लागले. पण आपली शक्ती अपुरी पडत आहे हे पाहून बाबासाहेबांनी वेशांतर करून किल्ल्यांतून पलायन केले. ८ बाबासाहेबांच्या मातोश्री व पत्नी यांनीही राजवाडा सोडला आणि दहा मैल अंतरावरील मलप्रभा नदीत प्रवेश करण्यासाठी आल्या. तिरावर जाऊन जवळचे गळ्यांतील सौभाग्य अलंकार मंगळसूत्राशिवाय बाकीचे सर्व, एका ब्राह्मणास दान करून त्यांनी नदीत सासूसह जलसमाधी घेतली. त्यांची प्रेते बुदिहाल गावी येऊन पडली. त्यांचे दहन केले गेले.

नरगुंदचा ताबा इंग्रजांनी घेतला. तिथे शांतता प्रस्थापित केली आणि संशयावरून अनेकांची धरपकड केली. सापडलेल्या मंडळीत बाबासाहेबांचे सेनापतीही होते. इंग्रज अधिकाऱ्यांनी चौकशीचा फार्स करून दहा-बारा जणांसह त्यांनाही फाशी दिले ९ आणि बाबासाहेबांना पकडून देण्यासाठी १०,००० रु. बक्षीस जॅकबने जाहीर केले. १० फ्रँक सूटर या अनुभवी अधिकाऱ्यास त्यांच्या पाठलागावर सोडले. बाबासाहेब वेशांतर करून तोरगल संस्थानिकांच्या हद्दीतील एका पाटलाच्या घरी आले.११ फ्रँक सूटर वेशांतर करून त्यांचा मागोसा गेतच होता. त्याला ही बातमी कळली. तोही तोरगळला गेला.१२ त्याने बाबासाहेब होते त्या घरास गराडा घातला. तोड्याशा झटापटीनंतर बाबासाहेबांना त्याच्या स्वाधीन होणे भाग पडले. बाबासाहेबांस पकडल्यावर त्यांना बेळगावास ता. २ जून रोजी नेले. १३ त्यांच्यावर अनेक आरोप ठेवले आणि चौकशी होऊन त्यांना फाशीची शिक्षा सुनाविली. ता. १२ जून १८५८ रोजी सकाळी ७ वाजता सर्व लोक समुदायासमोर त्यांना फाशी दिले.१४

इकडे नरगुंदला ता. २ रोजी संस्थान खालसा झाल्याचे जाहीर करून त्याचा अंतर्भाव खालसा प्रदेशात केला. १५ भीमराय मुंडरगीच्या शोधात ब्रिटिश सैन्य होते. भीमराय हा नरगुंदकरांचा साथीदार होता. त्याने नरगुंद इंग्रजांच्या हाती पडल्यावर कोयलच्या किल्ल्याचा आसरा घेतला. ले. केरने त्या किल्ल्यास वेढा घातला णि भीमरायास ठार मारले, १५० लोकांना कैद केले आणि त्यांना निरनिराळ्या शिक्षा ठोठावल्या १६ व शांतता प्रस्थापित केली.

आधार: (१) P.D. 1858, Vol. 29. Letter of 29-5-58. (२) कित्ता,pp. ९-१३. (3) कित्ता, Letter 27-5-58. (४) कित्ता, p. 165. (५) P.D. 1858, Vol. 31,p. 177. (६) P.D. 1858, Vol. 29. Letter 30-5-58. (७) Nargundvaril Kavan. (८-११-१२) P.D. 1858,Vol. 33,pp. 113-21. (९)P.D.1858, Vol. 30, pp. 23-33. (१०) P.D. 1858, Vol. 29. Letter 29-5-58. (१३-१४)P.D. 1858. Vol. 31, pp. 45-48. (१५) P.D. 1858, 1858, Vol. 30,pp. 22-33. (१६) P.D.1858. Vol.29, Letter 5-6-58.

# जमखिंडी

जमखिंडी संस्थानचे अधिपती रामचंद्रपंत पटवर्धन यांचा भाग या उठावात मोठा होता. पण इंग्रजांच्या हातात पुरेसा पुरावा मिळू शकला नाही. त्यामुळे त्यांना काही दिवस नजरकैदेतच भोगावी लागली.१ उत्तरेकडे ठिणगी पडून उठावाची आग भडकण्याच्या अगोदरपासूनच अप्पासाहेबांनी किल्ल्याची डागडूजी करम्याचे काम हाती घेतले. ते पुरे झाल्यावर निरनिराळ्या विश्वासू लोकांकडून शस्त्रे, दारूगोळा वगैरे साहित्य तयार करवून घेतले. त्याचा साठा राजवाड्यात केला.२ राजाला किल्ल्याची डागडूजी का करता म्हणून इंग्रज सरकारने विचारले. राजाने सांगितले की पठाण, रोहिले यांच्या हल्ल्यापासून संरक्षण करण्याकरिता ही डागडुजी आहे.३ पण राजाच्या व त्याच्या हस्तकांच्या हालचालींची गुप्त बातमी कंपनी सरकारला कळली.४ त्यांनी ताबडतोब काटाचे धागेदोरे मिळविले आणि अनेक लोकांच्या धरपकडी केल्या. रामचंद्रपंतांचा या प्रकरणांत हात आहे असे समजल्यावरून कंपनी सरकारच्या हालचाली जोरात सुरू झाल्या. यावेळी जमखिंडीकरांचा राजनिष्ठ सेवक छोटूसिंग याने धन्यास वाचविण्याचे ठरविले व उठावाची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेतली.५ लागलीच छोटूसिंगाच्या चौकशीचा फार्स केला.छोटूसिंगाने आपल्या कबुलीजबाबात सर्व जबाबदारी स्वतं:च्या शिरावर घेऊन अप्पासाहेबांना तोशीस लागू दिली नाही. छोटूसिंगास फाशीची शिक्षा सुनावली आणि लोकांना वचक बसावा म्हणून त्यास बेळगावमधून मुद्दाम जमखिंडीत आणले.६ दवंडी पिटून लोकांना जमविले आणि तोफेच्या तोंडी देऊन निकाल लावला.७

छोटूसिंगाने कबुलीजबाब देण्याच्या आधी त्याने जमविलेले सर्व युद्धोपयोगी साहित्य गावातील आप्पासाहेबांच्या विहिरीत टाकले.८

छोटूसिंगास अटक करून त्याच्यावर बेळगावास पोलिटिकल एजन्ट समोर खटला भरला. तेव्हाच आप्पासाहेबांना जमखिंडीस कैद केले.९ आणि आप्पासाहेबांविरुद्ध सबळ पुरावा मिळविण्याच्या प्रयत्नास गव्हर्नर एल्फिन्स्टपासून ते पोलिटिकल एजन्ट सेक्टन कार हे सर्व लोक लागले.१० पण भरपूर पुरावा मिळाला नाही. तेव्हा जमखिंडी राजास राजकैदी समजून त्याला कोणाशीही पत्रव्यवहार करू देऊ नये असे सेक्टन कारने ता. २० मार्च १९५८ च्या पत्राने बजाविल. ११ पण लागलीच ता. २२ मार्च रोजी त्यांना कैद म्हणून बेळगावास रवाना केले. तेथे काही दिवस ठेवल्यावर, जमखिंडीचे बंडखोर त्यांच्याशी संगनमत करतात असा संशय कंपनी सरकारला आला. तेव्हा त्यांना वेंगुर्ल्यास हलविले. पुढे त्यांना रत्नागिरीस कैदी म्हणून नेण्यात आले. १२ तेते ते ७ जानेवारी १८५९ पयंत कैदेतच होते. त्या दिवशी व्हिक्टोरिया राणीच्या जाहीरनाम्याप्रमाणे त्यांची बिनशर्त मुक्तता झाली आणि पुन्हा ते जमखिडीचे राजे झाले. जमखिंडीकरांच्या खाजगीत आबा देवधर नावाचा एक नोकर होता. वहिमानावरून त्याला अटक करण्यात आली आणि त्याने दक्षिण महाराष्ट्रात प्रवेश करायचा नाही या अटीवर त्याला हद्दपार करण्यात आले.

आधार: (१-९)P.D. 1858, Vol. 27, p. 291. (२,३-१०)P.D. 1858. Vol. 28, pp. 235-236. (४-८)कित्ता, 231-64, 265-268,(११-१२)कित्ता

अनुक्रमणिका

## दक्षिण महाराष्ट्रातील उठाव

दक्षिण महाराष्ट्रात त्यावेळी कोल्हापूर, जमखिंडी, मिरज, तासगाव, मुधोळ, जत, सोलापुर, नरगुंद अशी संस्थाने होती. यांचे एकमेकांशी संधान होते. या सर्व संस्थानिकांनी या उठावात कमीअधिक प्रमाणात भाग घेतल्याचे दिसते. पण सोलापूरच्या राजाच्या निवेदनावरून असे कळते की, बहुतेक सर्व संस्थानिकांचा उठावास सक्रीय पाठिंबा होता. त्यांनी सोलापूर राजासही आपल्यात सामील करून घेतले होते.

### सोरापूर राजाची कामगिरी

मुंबई इलाख्यातील विजापूर व सोलापूर जिल्ह्यांच्या सरहद्दीवरील निजाच्या मुलखात सोरापूर हे छोटेसे संस्थान होते. या संस्थानचा त्यावेळचा राजा वैकप्पा नाईक बलवंत बेहरी हा होता. तो वयाने लहानच होता. त्याच्या मनात ब्रिटिशांनी आपल्यावर अन्याय केल्याचे शल्य सलत होते. निजामाला इंग्रजांचे कर्ज जाले. त्याची रक्कम ६२ लाखांवर गेली. ती फेडता येईना म्हणून इंग्रज सरकारने ५२ लाख उत्पन्नाचा मुलूख आपल्या ताब्यात घेतला.१ त्यामुळे ३ लाख रुपये निजाम, सोरापूर राजाकडून घेऊ लागला. हा मुलूख सोडवून आपल्या ताब्यात आणण्याकरिता सोरापूर राजाने इंग्रज ठाण्यावर आपल्या मेहुण्याकरवी हल्ला चढविला. पण हल्ल्यात त्यांच्या मेहुण्याचा पराभव झाला. हे शल्य राजाला बोचत होतेच. शिवाय नानासाहेबांचे हस्तक दक्षिणेत येऊन राजाला भेटत असत आणि इकडे दक्षिणेतील संस्थानिकांनीही सोरापूर राजास उठाव करण्यास उत्तेजन दिले.त्यामुळेच राजाने उठावाची तयारी करण्यास सुरुवात केली.२

### सैन्यभरती

त्याने ६०० अरब, ४०० रोहिले आणि ५० परदेशी इतक्यांची सैन्यात भरती केली. यांच्या लहान लहान तुकड्या करून त्या राजवाड्याच्या आजूबाजूस ठेवल्या. कॅप्टन टेलरच्या संरक्षणास २५ रोहिले ठेवले. एवढी सैन्यभरती कशाला ? असा प्रश्न कॅ. बालमेल याने राजास करून त्यास हे सैन्य कमी करण्याचा हुकूम दिला. राजाने हो म्हटले आणि सैन्याच्या लहान लहान तुकड्या केडोपाडी रवाना केल्या.३

### हल्ला

रोहिले, पठाणांची भरती झाल्यावर कस्तुरीराज, महमदहुसेन व केसूराम यांना मुधोळ, कोल्हापूरकडून बातम्या आणण्याचे काम दिले.४ इकडून तिकडे बातम्या जात येत होत्या. अशा स्थितीत एका संध्याकाळी राजा आपल्या राजवाड्यात बसला असता कॅप्टन कम्बेलच्या कॅम्पवर हल्ला केला आणि कॅम्बेल मारला गेला. राजाला पकडले.५ त्यांच्यावर रीतसर खटला भरला णि त्यास फाशीची शिक्षा ठोठावली. कॅ. मेडोज टेलर हा राजाचा शिक्षक होता. त्याने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. राजाने त्याला निवेदन सादर केले. त्या निवेदनात त्याने उठावात सामील असलेल्याची आणि उठावाशी संबंध असलेल्यांची नावे सांगून टाकली. ६ दक्षिण महाराष्ट्रातील सर्व संस्थानिक व विशेषतः जमखिंडीकर यांचा उल्लेख त्यांत प्रामुख्याने होता. तसेच जतचे जहागिरदार यांचाही संबंध त्याने बोलून दाखविला. शेवटी

त्यास काळ्यापाण्याची शिक्षा दिली. पण काळ्यापाण्यावर नेत असता या बालराजाने अधिकाऱ्यांच्या कमरेचे पिस्तुल लीलेने ओढून घेतले आणि क्षणार्धात त्याच्या योगाने त्याने मृत्युला मिठी मारली.७

आधार: (१-२)P.D. 1858, Vol. 28, p.153. (३) P.D. 1857, Vol, 25, pp. 417-430. (४-७) P.D.1858, Vol. 28, pp. 153-163.

अनुक्रमणिका

# मुधोळमधील हुलगडीचे बेरड यांचा उठाव

हुलगडीचे उठाव हा काही संस्थाने खालसा झाल्यामुळे किंवा तनखा बंद पडल्यामुळे नव्हता. त्यांपैकी कोणी जहागिरदार किंवा अधिपतीही नव्हते. शस्त्रस्वातंत्र्य अबाधित राखण्याकरिता हुलगडीच्या बेरडांनी प्राण पणास लावून लढा दिला.

उत्तर भारतातील उठावाने निरनिराळ्या अफवा पसरल्या गेल्या त्यातच इंग्रज राज्य लवकरच लयास जाणार अशी गप्प सुशिक्षित लोकही मारीत असत. या गप्पांचा परिणाम हुलगडीच्या बेरडांवर झाला. तेवढ्यात मुंबई सरकारने हत्यारे (जवळ ठेवण्यासंबंधी) प्रतिबंधक हुकूम काढला. हुलगडीच्या बेरडांनी हा हुकूम मानण्याचे नाकारले. नव्या कायद्याप्रमाणे शस्त्रास्त्रांची नोंद करण्याचा हुकूम मि. सिटन कार, पोलिटिकल एजन्टने, बेळगाव गावी ऑक्टोबरमध्ये दिला. त्या हुकूमाची अंमलबजावणी मुधोळ संस्थानातील काही गावांत १० नोव्हेंबर १८५७ रोजी झाली. ता. ११ रोजी बेरड जमादाराला बोलावणे पाठविले ते हत्यारांची नोंद करण्याकरिता. पण या बोलवण्याकडे त्यांनी लक्ष दिले नाही.

१५ नोव्हेंबर १८५७ रोजी मुधोळच्या कारभाऱ्याने रामराव भुजंग कारकुणास हुलगडीच्या बेरडास बोलविण्याकरिता निरोप पाठविला. त्यांनी हत्यारे नोंदावी अशी विनंती केली पण त्यांनी शस्त्रे दिली नाहीच व हत्यारे नोंदही केली नाहीत. तदनंतर ५-६ दिवसानी नारप्पा नाईकाला बोलाविले. त्यानेही दाद दिली नाही. शेवटी ता. २२ रोजी राजाचा मानकरी भीमराव अनंत घारपुरे याला नारो रामचंद्र पोतनीस याजबरोबर मुधोळच्या कारभाऱ्याने हुलगडीस रवाना केले. भीमरावाला बेरडांची समजूत काढता येईना. उलट बेरडांनी भीमरावाला जीवे मारण्याचाही धाक घातला. तदनंतर ता. २४ व २५ रोजी बेरडांची समजूत पाडण्याचे असेच प्रयत्न केले पण ते निष्फळ ठरले.

**बेरडांचा उठाव**

ता. २७ नोव्हेंबर रोजी कारभाऱ्यास कळून आले की, बेरडांनी सशस्त्र उठाव करण्याचे ठरविले आहे व त्यांना बुडनी व मंतूर या ठिकाणचे सनदीही जाऊन मिळाले आहेत. ही बातमी त्याने ले. क. मालकमला कळविली. शिवाय अलगुंडीचे बेरडसुद्धा हुलगडीच्या बेरडांना मिळाले आहेत हेही त्याबरोबरच कळविले,

**लालगडाला ब्रिटिशांचा वेढा**

बेरडांनी उचल खाल्ली आणि ते "लालगड" या डोंगराच्या उतारावर मि. केर, पोलिटिकल एजंट बेळगाव, याने ता. ३० नोव्हेंबर रोजी हल्ला चढविला.गोऱ्या सोजिरांच्या गोळीबारास जवळजवळ ५०० बेरडांनी दुप्पट जोराने प्रत्युत्तर दिले. सर्व रात्रभर गोळागोळी चालूनही ब्रिटिश अधिकारी हलगली गावच्या मध्यभागापर्यंत प्रवेश करू शकले नाहीत. आता आपला पराक्रम लोपला असेच ब्रिटिश सैनिकांना वाटले. तेव्हा फितुरी सुरू झाली. रात्रीच्या गडद अंधःकारात ब्रिटिश घोडेस्वार हलगली गावात घुसलेआणि त्यांनी स्वैर गोळीबारास सुरुवात केली. स्वैर गोळीबाराने वातावरण संशयीत झाले; लोक भयभीत झाले. ते सैरावैरा पळू लागले. त्यांच्यावर केरच्या हाताखालील घोडेस्वारांनी गोळ्या चालविल्या. सुमारे १५० बेरड या गोळीबारात ठार झाले. काहींनी बचावार्थ सुरक्षित जागी असरा घेतला. पण अखेरीस बेरडांचा नाइलाज झाला. त्यांनी आपली शस्त्रे सरकारच्या स्वाधीन केली. तोफा डागून केरने हलगलीचा लालगड

अनुक्रमणिका

जमीनदोस्त केला. जे बेरड लढाईत सापडले त्यांना मुधोळला नेले आणि त्यांना जबर शिक्षा ठोठावल्या. त्यांचे म्होरके होते त्यांना मुधोळच्या वेंकटेश तलावाजवळील माळावर फाशी दिले. गावातील लोकांना दहशत बसावी म्हणून काही नेत्यांना परत हलगलीस नेऊन तेथे गावाजवळील उघड्या जागेत तोफेच्या तोंडी दिले. अशा रीतीने ता. १ डिसेंबर १८५७ रोजी या प्रकरणावर अखेरचा पडदा पडला. बेरडांची झालेली अवस्था ऐकून मुधोळच्या सेंट्रीने निमूटपणे हुकूमाप्रमाणे शस्त्रत्याग केला.

आधार: पी. डी. १८५७, व्हॉल्यूम २४, पृ. २५७-२९५.

अनुक्रमणिका

# महिपालसिंगाची बेळगावातील कामगिरी

दक्षिणेत नानासाहेब पेशव्याने आपले हस्तक पाठविले होते. त्यांपैकी काहींना इंग्रजांनी पकडले. या हस्तकांनी दक्षिणेतील संस्थानिकांच्या पदरी असलेल्या स्वदेशाभिमानी इसमांना स्वातंत्र्यसग्रामात भाग घेण्यास उद्युक्त केले. यापैकीच सोरापूरचा महिपालसिंग होय. हा मूळचा बंगालमधील पण नोकरीनिमित्त सोरापूरात स्थायिक झालेला होता. तो सोरापूर राजाच्या पदरी नोकरीस होता. बेळगावला जाऊन तेथील रेजिमेंटला फितूर करण्याची कामगिरी त्याजवर सोरापूरच्या राजाने सोपविली होती. ''रेजिमेंटमधील सैनिकांमध्ये बंडाची चेतना निर्माण कर व ही कामगिरी फत्ते झाल्याचे घोडेस्वाराकडून कळव. शिवाय रेजिमेंटच्या लोकांना असेही साग की ते उठावांत सामील झाले तर त्यांना माझ्याकडून जमिनी मिळतील व त्यांचे मी भले करीन.'' त्याप्रमाणे महिपाल बेळगावात गेला.८ दिवसांच्या मुक्कामानंतर रेजिमंटमधील परदेशी व मुसलमान सैनिकांनी त्याला बोलावून घेतले आणि झालेली हकिकत सांगितली. ''शहरवासियांनी जर उठाव केला तर आम्ही त्यांना खात्रीने सामील होऊ, खजिना लुटू, तोफखाण्याचा ताबा घेऊ आणि सर्व युरोपियनांचा नायनाट करू व त्याच्या तंत्राने वागू.या अटीवर शहरवासीयांपैकी शापूरकर याजशी बोलणी सुरू केली.''

''पण तोच माणूस इंग्रजास फितुर झाला. त्याने आमचा बेत सरकारला सांगितला. इंग्रज सरकार वेळीच सावध होऊन त्यांनी तोफखाना व खजिना किल्ल्यात नेऊन ठेवला. त्यामुळे एक सुवर्णसंधी गमाविली. अशी संधी पुन्हा आली तर आम्ही पहिल्यांदा शापूरकरचा काटा काढू आणि मग पुढील कामगिरीला लागू.'' रेजिमेंटच्या या बोलण्याने महिपालचा उत्साह अधिकच दुणावला. रेजिमेंट उटाव करणार याची त्यास खात्री वाटू लागली. त्यातच त्याला सैनिकांनी असेही सांगितले की सरकारचा आमच्यावर विश्वास नाही. सरकार आम्हाला आपले शत्रू मानते म्हणून त्यांना आमची शस्त्रे काढून घ्यावयाची आहेत. पण शस्त्रे खाली ठेवण्याचा हुकूम झाल्यास आम्ही खात्रीने बंड करु. सैनिकांच्या मनाचा कानोसा घेतल्यावर महिपालसिंग पुन्हा दुसऱ्या दिवशी (ता. २३ ऑगस्ट १८५७ रोजी ) सैनिकांच्या वसतिगृहात गेला.त्यावर पाळत राखून त्यास पकडले. त्याने आपल्या कबुलीजबाबात बातमी घेऊन जाण्याकरिता सोरापूरहून येणारा स्वार अद्याप आला नाही असे सांगितले. त्याला फाशी दिले.

आधार: पी.डी.१८५७, व्हॉल्युम २५, पृ.४१७-४३०.

# प्रकरण पाचवे

## इ. स. १८५८ ते १८७७ या कालखंडातील महाराष्ट्र

इ. स. १८५७ च्या उठावानंतर ब्रिटिशांनी राणीचा जाहीरनामा १८५८ मध्ये काढून सर्व हिंदुस्तान आपल्या एकछत्री अंमलाखाली आणला. समग्र राज्य पद्धती व राजकीय व्यवहाराची दिशा जाहीरनाम्यास अनुसरून बदलावयास सरूवात केली. या अगोदर १८४० ते १८५८ या काळात महाराष्ट्रात शिक्षण व नवा विचार यांच्यामुळे वैचारिक उत्थानाला सुरुवात झाली होती. ह्याच काळात काही सांस्कृतिक संस्थांची स्थापना झाली व त्या विकसित झाल्या, त्यामुळे त्या प्रगत विचार बळकट करू शकल्या. ह्याच काळात धर्म-सुधारणा करण्यासाठी ब्रिटिशांनी पावले उचलली. इ. स. १८५० साली धर्मांतर करणारांना वडिलार्जित इस्टेटीचे भागिदार बनविणारा कायदा सर्व हिंदुस्थानात लागू करण्यात आला. १८५५ साली विधवा विवाहाचा कायदा झाला. त्या अगोदर १८४९ मध्ये सतीबंदीचा कायदा जारी करण्यात आला होता. १८५३ मध्ये रेल्वे सुरू होऊन जातीभेदाच्या भिंतीला धक्के बसू लागले. जातीभेद खिळखिळे करण्याच्या बाबतीत रेल्वेने उत्तम कामगिरी बजावली. इ. स. १८६० साली इंडियन पिनल कोड मंजुर करण्यात आले. त्यात हिंदु-मुसलमानांच्या रुढींची व शास्त्रवचनांची पायमल्ली करणाऱ्या अनेक कलमांना कायमचे स्वरूप देण्यात आले. येव्हाना पाश्चात्त्य इंग्रजी विद्या हिंदी समाजाची मुळे खिळखिळी करण्यासाठी आघात करीत होती. १८५७ मध्ये विद्यापिठांची स्थापना होऊन पाशचात्त्य विद्येच्या अभ्यासास अधिक चालना मिळाली. १८४८ मध्ये लॉर्ड डलहौसी हा हिंदुस्थानची औद्योगिक पाहणी केली. चहा, कापूस, खनिज संपत्ती या वस्तू हिंदुस्थानात कोठे कोठे मिळू शकतात याचा त्याने अभ्यास केला. नवीन रस्ते बांधले. आगगाडीचा मार्ग मुंबईहून मध्य भारतात जाऊन पोहोचला. त्यानेच पोस्ट आणि तार-खाते सुरू केले. तसेच देशभर कंपनीचे एकच नाणे सुरी केले. त्यामुळे देवघेवींचा व्यवहार सुरळीत झाला. न्यायापासून नाण्यापर्यंत व दळणवळणापासून व्यवस्थापनापर्यंत डलहौसीने सुसूत्रता आणली आणि भूप्रदेशात सुसूत्रता यावी म्हणून त्याने संस्थाने खालसा करण्याचे आपले धोरण अंमलात आणले; हेतु हा की इंग्रजी राज्य भक्कम पायावर उभे राहावे व टिकावे. पण हा हेतू साध्य होण्याच्या मुळावर नेटिव्हांस दिलेले इंग्रजी शिक्षण आले. शिक्षण सर्व थरात पोहोचविण्याची ब्रिटिशांनी व्यवस्था केली त्यामुळे ज्ञान प्राप्ती होऊ लागली, त्या जोरावर धर्माच्या कल्पनांवर लोकांचा विश्वास कमी होऊ लागला. इंग्रजी विद्या, कायदा, न्याय व मिशनरी अशा चतुरंग दलाने धर्म-कल्पना आणि धर्माधिष्ठित समाजरचना खिळखिळी केली. यामुळे नव्या विचारांचे वारे वाहून नव्या –जुन्यांचा संघर्ष सुरू झाला. त्याचे पडसाद वृत्तापत्रात उमटू लागले. ह्याच वेळी ज्योतिबा फुले यांनी बहुजन समाजाने चाली सोडाव्या म्हणून सत्यशोधक साजाची स्थापना केली व आपले सामाजिक नवविचार मांडण्यास सुरुवात केली. सरकारी धोरण आणि परिस्थिती यामुळे त्यावेळची वृत्तपत्रे असंतोषाला वाचा फोडू लागली. इंग्रजी राजवट सुरू झाल्यापासून मिशनऱ्यांचा स्वधर्म प्रसारार्थ उद्योग सुरू झाला. यामुळे महाराष्ट्रातील समाजात जागृती होऊ लागली.१८६० मध्ये इंग्रजांनी निःशस्त्रीकरणाचा कायदा (Disarmament Act) पास करून सर्व जाती धर्माच्या लोकांकडील शस्६, भाले, तलवारी, बंदुका, पिस्तुले काढून घेतली. गुजरातेतील नाईकडे, महाराष्ट्रातील भिल्ल, वानरमारे अशा रानटी जातींकडूनही ते उपजीविकेकरिता बाळगीत असलेली शस्त्रे ह्या नवीन कायद्यामुळे बळजबरीने हिसकावून घेण्यात आली. सरदार, जमीनदार, पेशवाईत सैनिकीपेशा, तलवारीद्वारा मर्दुमकी गाजविलेल्या लहानमोठ्या लढवय्या मराठ्यांनी आपली शस्त्रास्त्रे इंग्रज सरकारला मिळू नयेत म्हणून ती खड्डे खनून गाडली. काहींनी ती नदी-नाल्यात व जवळपासच्या विहिरीत फेकून दिली, काही सरकारजमा झाली. अशा तऱ्हेने सबंध समाजाचे कायद्याने निःशस्त्रीकरण झाले.

अनुक्रमणिका

१८६० मध्ये इंग्रजी राजवटीने कायदेमंडळे अस्तित्वात आणली त्यामुळे सरकारमान्य हिंदी पुढाऱ्यांना आपली मते बड्या अधिकाऱ्यांच्या कानावर समक्ष घालता येऊ लागली, परंतु हिंदी पुढाऱ्यांचे त्यामुळे समाधान होऊ शकले नाही. १८६० नंतर इंग्रजी राजवटीने निःशस्त्रीकरणासारखे कित्येक कायदे एकामागून एक जारी केले, की ज्यांच्या योगे हिंदी जनतेला आपली राजकीय गुलामगिरी काळजास जाऊन झोंबल्याचे वाटू लागले. १८६० ते १८८५ ह्या कालखंडात महाराष्ट्रामध्ये युनिव्हर्सिटीचे शिक्षण घेतलेल्यांची संख्या पुष्कळच वाढली होती. देशपरदेशातील राजकारणाचे ज्ञान देणारी व त्याचा साधक वाधक खल करणारी देशी व इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रे वाढत्या संख्येने लोकमताला जागृत करण्याचे काम करत होती. विलायतेस जाऊन तेथील शिक्षण घेतलेली माणसेही भारतात बरीच होती. महाराष्ट्रात गुलामगिरीच्या शृंखला तोडण्यासाठी लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख (१८२३-९२) यांनी सर्वप्रथम वैचारिक पातळीवरून हल्ला करण्यास प्रारंभ केला. लोकहितवादींची शतपत्रे त्या काळातील "प्रभाकर " साप्ताहिकातून प्रसिद्ध झाली. त्या पत्रांनी क्रांतीपूर्व वैचारिक पार्श्वभूमी तयार केली. वैचारिक हल्ला होत असतानाच ज्योतिबा फुले यांनी शुद्रातिशूद्रांना शिक्षण देण्याचे प्रत्यक्ष कार्य १८४८ मदये सुरू केले. ह्या वर्षी अखिल भारतातील मुलींच्या पहिल्या शाळेची स्थापना ज्योतिबारांनी आपल्या मित्रांच्या सहाय्याने पुण्यात केली. १८४८ ते १८५१ या काळात ज्योतिबांनी मुला-मुलींकरिता १८ शाळा काढल्या. त्यांच्या शाळेत ब्राह्मण, मराठा, धनगर, मांग, मुसलमान अशा सर्व जातीतील विद्यार्थी शिक्षण घेत होते. अशा रितीने ज्योतिबा फुले यांनी प्रत्यक्षात शुद्रतिशूद्रांना "विद्यादान" सुरू केले. मुलींसाठी व विधवांसाठी शाळा काढल्या. भ्रूणहत्या टाळावी म्हणून वाम मार्गाने गर्भवती होणाऱ्या स्त्रियांसाठी सुलभ प्रसुती करण्याचा उद्योग आपल्या राहत्या जागेत सुरू केला. ब्राह्मणांच्या विधवा स्त्रियांच्या केशवपनाचा निषेध केला. भिक्षुकशाहीविरुद्ध ज्योतिबारावांनी बंड पुकारले. धर्माच्या नावाखाली भटभिक्षुकशाहीच्या जाचातून सुटका करण्यासाठी आणि लोकांना शहाणे करून सोडण्यासाठी ज्योतिबारावांनी "तृतीय रत्न" नाटक (१८५५), "ब्राह्मणांचे कसब" (१८६९), "गुलाममगिरी" (१८७३) व "शेतकऱ्यांचा आसूड" (१८८३) ही पुस्तके समाजाला सादर केली. सभासंमेलनातून भिक्षुकशाहीचे स्तोम चव्हाट्यावर मांडले. शुद्रातिशुद्रांचे धर्म, रूढी, कर्मकांड याविषयींचे अज्ञान दूर करण्यासाठी आणि त्यांना स्वयंप्रकाशित करण्यासाठी ज्योतिरावांनी ज्ञानदानच्या कार्यासाठी शाळा काढल्या होत्या. त्याचप्रमाणे ज्या रुढींचे जनमानसावर प्राबल्य होते दूर करण्यासाठी विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंध, अस्पृश्यता निर्मूलन, विधवांचे केस कापले जाऊ नयेत म्हणून न्हाव्यांचा संप वगैरे कार्य हाती घेतले. बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, न्या. रानडे यांनीही या काळांत धर्म व रूढी यांवर वैचारिक हल्ले चढविले होते तर ज्योतिरावांनी प्रत्यक्षात रुढींच्या विरोधात पाऊल टाकले. ज्योतिरावांच्या प्रत्यक्ष कार्याने प्रेरित होऊन कित्येक लहानमोठे समाजकार्यकर्ते तयार झाले होते. महार, अस्पृश्य जातीमधून गोपाळ बाबा वलंगकर हे ज्योतिबांच्या कार्याने प्रभावित झालेले होते.

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी अमेरिकन लोकांच्या मदतीने या देशातील हजारो गांजलेल्या शूद्रादी अतिशूद्रांनी वर्णव्यवस्थेचा धिक्कार करून जाणून बुजून ख्रिस्ती धर्माचा अंगिकार करण्याचा तडाखा सुरू केला तो इतका की अखिल भारतात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी शाळा. हायस्कुले, रूग्णालये, कुष्ठरोग निवारण केंद्रे, अनाथ बालकाश्रम आणि अंध व पंगू यासाठी कित्येक गृहे अशा बहुविध सेवा संस्था स्थापन केल्या. हे सर्व सेवाकार्य हिंदु धर्ममार्तंडांच्या कल्पनेच्या बाहेरचे होते. याचा परिणाम असा झाला की माणुसकीचे कोणतेच हक्क मिळत नव्हते अशा अतिशुद्र आणि यांच्याशिवाय शूद्र व ब्राह्मण जातीतूनही कित्येक अमानुषतेला कंटाळून ख्रिस्चन धर्मात जात होते. तोडक्यात तत्कालीन महाराष्ट्रात ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रभावाने ख्रिश्चनीकरणाची प्रक्रिया मूळ धरू लागली होती.

अनुक्रमणिका

ही ख्रिश्चनीकरणाची प्रक्रिया थांबविण्यासाठी हिंदु-धर्माभिमान्यांनी धर्मसुधारणेस प्रारंभ केला होता. बाळशास्त्री जांभेकर व दादोबा पांडुरंग यांनी १८४४ मध्ये "मानवधर्मसभा" या नावाची धर्म सुधार संस्था स्थापन केली होती. पुढे दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी १८४९ मध्ये मुंबईत परमहंस सभा स्थापन केली होती. या व खाली नमूद केलेल्या संस्था मध्यम वर्गातील डॉक्टर, वकील, बॅरिस्टर, पेन्शनर, बिन सरकारी व निम सरकारी कारकून, वृत्तपत्रकार वगैरे क्रियाशील लोकांच्या पाठिंब्याने उभ्या राहिल्या होत्या. याच काळात १८६७ मध्ये प्रार्थना समाज, १८७५ मध्ये मुंबईला स्वामी दयानंद सरस्तींचा आर्य समाज अशा हिंदी राष्ट्रीयत्वाच्या भावनेस धर्माभिमानाची पुष्टी चढविणाऱ्या संस्था उदयास आल्या. आर्य समाजाने शुद्धीविषयक चळवळ सुरू केली होती. परमहंस सभेच्या सदस्यांनी अनेकदा निरनिराळ्या जातींच्या लोकांचे सहभोजन घेणे व प्रत्येक बैठकीच्या वेळी हलक्या जातीच्या व्यक्तीने शिजविलेले अन्नग्रहन करणे असे उपक्रम चालू केले. ह्या सर्व गोष्टी हिंदु धर्म बचावासाठी होत्या.

१८७० मध्ये पुण्यास "सार्जनिक सभेची" स्थापना होऊन राजकारणाची पहिली आघाडी उघडली गेली. ही संस्था न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे या चतुरस्त्र देशभक्ताच्या प्रेरणेने सुरू झाली होती. गणेश वासुदेव जोशी या दुसऱ्या थोर देशभक्ताने आपले सर्वस्व ह्या सार्वजनिक सभेस दिले म्हणून लोक त्यांना "सार्वजनिक काका" असे संबोधू लागले. प्रचलित अन्यायाविरुद्ध आंदोलन उठविण्यात सार्वजनिक काकांची धडाडी तरूणांसही लाजविणारी होती. निरधार लोकांना आश्रय मिळावा म्हणून पुण्यात त्यांनी श्री विष्णूचे मंदिर बांधले होते. "स्त्री विचारवती" नावाची संस्था त्यांनी पुण्यास स्थापन केली होती. १८७१ मध्ये न्या. महादेव गोंविद रानडे यांची बदली पुण्यास झालीव सार्वजनिक काकांना त्यांच्या नेतृत्वाची जोड मिळाली. ह्या दोघांच्या कर्तबगारीने वातावरणात चैतन्य निर्माण झाले. पुण्यामध्ये एक नवे वारे नवे विचार संचार करू लागले.१८७२ च्या डिसेंबरात न्या रानड्यांनी आपले स्वदेशी व्यापारावरील पहिले व्याख्यान पुण्यात दिले. विदेशीय वस्तूंचा वापर प्रामुख्याने केल्यामुळे बहुसंख्यांक हिंदी लोक स्वदेशी वस्तूंचा खप करीत आहेत आणि त्यामुळे देशाची किती हानी होत आहे हे न्यायमूर्तींनी आपल्या भाषणात आकड्यासह सिद्ध केले. न्यायमूर्ती व सार्वजनिक काका यांच्या भाषणांना तरूणांची झुंम्मड उडू लागली. फेब्रुवारी १८७३ मध्ये न्या. रानडे यांनी स्वदेशावरील आपले दुसरे व्याख्यान दिले. रानड्यांच्या व्याख्यानांचा परिणाम तरूणांवर व प्रौढांवर सारखाच होऊ लागला. १८७३ मध्ये सार्वजनिक काकांनी स्वदेशी वस्तू वापरण्याचे व्रत अंगिकारले हातमागावरील जाड्याभरड्या खादीचे कपडे ते वापरू लागले. त्याचा परिणाम तरूणांच्या मनावर होऊन त्यांपैकी काहींनी विदेशी कपडे वापरण्याचे सोडले.

इ.स. १८५८ ते १८७७ या कालखंडातील महाराष्ट्र

म. स्वा. ल.-९

**दख्खनचे दंगे**

१८७५ च्या जूनमध्ये पुणे, नगर, सोलापूर ह्या जिल्ह्यांत दरवड्यांची व जोळपोळीची साथ उद्‌भवली.

सावकार व कुले जिल्ह्यांत बेबनाव उत्पन्न होऊन त्यांचे पर्यावसान दंग्यांत झाले. " दख्खनचे दंगे" अथवा "डेक्कन रायट्‌स्" ह्या नावाने ते प्रसिद्ध आहेत.

अनुक्रमणिका

पुणे जिल्ह्यांतील सुपे ह्या गावी ह्या दंग्यास सुरुवात झाली. नित्यप्रमाणे तो बाजाराचा दिवस होता, म्हणून तेथे अगोदरच आजूबाजूचे पुष्कळ गांवढळ लोक आले होते. तो एकदम वाण्यांच्या व मारवडयांच्या दुकाणात लुटालूट सुरू झाली. तेथील कापड चोपड जाळून फस्त व्होऊ लागले. ही बातमी समजताच जिल्हा मॅजिस्ट्रेट हे पुण्याहून पोलीस पायदळ व घोडेस्वार, लष्करी पलटण घेऊन तेथे आले. त्यांच्या प्रयत्नाने सहा सात हजार रूपायांचा माल ज्याचा त्यास परत मिळाला. शंभरहून अधिक शेतकरी पकडून ज्यांवर दंगा शेकवला, त्यांस शिक्षा झाल्या. सुप्याप्रमाणे इतर गावीही दंगे झाले, त्या सर्वांचे सामान्य लक्षण हेच की, ऋणमुक्त होण्याच्या हेतूने शेतकऱ्यांनी सावकारांजवळील कर्जरोखे, गहाणखते, फरोक्ते केली, ही त्यांच्या दप्तरातून हुडकून काढून त्यांची राखरांगोळी केली. व ज्या सावकरांनी कागदपत्र देण्यात दिरंगाई केली, त्यांचा खरपूस समाचार घेतला. त्यांचे दस्तैवजरूपी अस्त्र उद्ध्वस्त केले. एवढेच नव्हे तर त्यांचे नाक-कान कापून त्यांच्या येथे लूटमार केली. पुणे जिल्ह्यातील दंग्याचा प्रवेश नगर, नाशिक, खानदेश आणि सोलापूर ह्या जिल्ह्यांतही झाला; तेव्हा अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रयत्नाने सर्व ठिकाणी शांतता प्रस्थापित केली; सावकारांना अभयवचन दिले व श्तकऱ्यांच्या स्थितीकडे लक्ष दिले.

वरील हकीगतीवरून हे दंगे का उद्भवले ह्याची सहज अटकळ बांधता येईल. त्यावेळी शेतकऱ्यांचे दुःख निवारण करणारा कायदा पास झाला नव्हता. शेतकरी लोक कर्जबाजारी झालेले होते, व सावकार लोक त्यांना वाटेल तसे लुबाडीत होते, शेतकरी कर्जबाजारी होण्यास वास्तविक कारण सरकारच होते. सरकारने जमिनीचा धारा वाढविला व तो पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे माल उत्पन्नांतून देण्याची सवड न ठेवता पैशाच्या रूपाने वसूल करण्याची पद्धत सुरू केली. परंतु असे असताही सरकारने ह्या दंग्यांचे खापर सर्वस्वी सावकांरावर फोडले. सार्वजनिक सभेने न्यायमूर्ती रानडे यांच्या नेतृत्वाखालील नेमलेल्या चौकशी मंडळाने ह्यासंबंधीचा आपला रिपोर्ट शासनास सादर केला. त्यात शेतकऱ्यास शिक्षण मिळावे,शेतकी शिक्षणाचे वर्ग जागोजाग काढून ते हायस्कूलांसही जोडावे, शेतकऱ्यांस कर्ज देण्यासाठी पेढ्या काढाव्या, आणि रोखे कागद कसेही असले तरी शेतकऱ्यांवर फिर्याद झाली असता न्यायाधिशाने शेतकऱ्यांच्या वतीने कसोशीने सर्व व्यवहार पहावा आणि निकाल द्यावा. वर दिलेल्यांपैकी काही तरतुदी सरकारने दक्षिणेतील शेतकऱ्यांचा कायदा जो केला त्यात अंतर्भुत केल्या.

**महाराष्ट्रातील दुष्काळ**

सन १८७६ – ७७ साली महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला. हा दुष्काळ इतका उग्र होता की त्याची वर्णने वाचून आज देखील अंगावर शहारे येतात ! मग ज्यांना प्रत्यक्ष दुष्काळाचे चटके सहन करण्याचा प्रसंग आला असेल त्यांची अवस्था काय वर्णावी बरे? त्यावर्षी पाऊस पडला नाही. नदी, नाले, तलाव, विहिरी अशी पाण्याची जलासये आटून गेली. महाराष्ट्रातील सुपीक भूमीला ओसाड प्रदेशाची कळा आली. पाण्याच्या दुर्भाक्षाने जनता व्याकूळ झाली. खेड्यांतील मोलमजुरी करणारे लोक आपल्या झोपड्या सोडून समूहाने देशांतर करू लागले. त्यापैकी कित्येक भुकेने आणि चालण्याच्या परिश्रमाने वाटेतच मरून पडले. त्यावेळी सरकारचे फॅमिन –कोड अस्तित्वात नव्हते.; त्यामुळे सरकारला देखील दुष्काळाला तोंड देणे कठीण गेले. त्यावेळी सर रिचर्ड टेपल सारखा दुराग्रही गव्हर्नर होता. फॅमिन –कोड अस्तित्वात नसल्यामुळे दुष्काळाचे प्रसंगी लोकपोषणाची जबाबदारी सरकारवर किती आहे हे ठरविलेले नाही, लोकांची माहिती सरकारास नाही, व सरकारची माहिती लोकांस नाही. इकडे पावसाने दगा दिला, लोकांजवळ खायला अन्ना नाहीसे झाले. गाठचा पैसा संपून गेला; स्त्रिया आपली लहान लहान तान्हुली टाकून देऊन पोटासाठी इकडे तिकडे सैरावैरा धावू लागल्या, नवरा बायकोची पर्वा करीनासा झाला, बाप

अनुक्रमणिका

लेकाला विचरीनासा झाला, जो तो आपल्या विवंचनेत; कोणाच्या शरीरात त्राणउरला नाही; अन्नविणे तडफडून मरण्यापेक्षा एकदम डोळे मिटले तर बरे, असे ज्याला त्याला वाटू लागले. पुष्कळ लोक देशत्याग करावयास तयार झाले. जी स्थिती मनुष्याची झाली होती. तीच स्थिती जनावरांचीही झाली होती. त्यांना खायला गवत मिळेना. प्यायला पाणी मिळेना. बिचारी याकूळ होऊन तडफड तडफड करून प्राण सोडू लागली.

ह्या हृदयविदारक प्रसंगी सार्वजनिक सभेने आपले विश्वासू एजंट दुष्काळी भागात जागोजागी पाठवून दिले. त्यांनी दुष्काळी भागात फिरून दुष्काळाची स्थिती प्रत्यक्ष नजरेखाली घातली. आपल्या एजंटांकडून जशी जशी माहिती मिळत गेली त्याप्रमाणे सार्वजनिक सभेतर्फे न्या. माधवराव रानडे दुष्काळासंबंधाने लेख लिहून सरकारकडे पाठवू लागले. ह्यातील काही लेख अर्जवजा असून त्यात दुष्काळी कामे, आणि त्यावरील मजुरांची स्थिती ह्यासंबंधाने सरकारची कानउघडनी करण्यात आलेली आहे. सरकारने सभेच्या ह्या कामगिरीबद्दल आभार मानिले होते.

दुष्काळातील लोकांचे दुःख हलके करण्यासाठी सरकारने दुष्काळी कामे काढून लोकांस मदत करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्या वेगाने आपत्ती दूर न होता संकटे मात्र वाढत गेली. दुष्काळी कामावर असलेल्या लोकांना अधिकारी लोकांपासून उपद्रव होऊ लागला, मारहाण सोसावी लागली. पाठीवरील व पोटावरील असे दोन्ही मार त्या निस्त्राण लोकांना सहन होईनासे झाले. शेवटी मरण पुरवले पण हा त्रास नको असे त्यांस होऊन गेले, व त्यांनी "संप" पुकारला. दुष्काळाचा वणवा आधीच पेटलेला, त्यात हे संपाचे वारे शिरलेले पाहून सरकारलाही भीती वाटली. शेवटी ह्या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता "केर्ड" साहेबांच्या अध्यक्षेखाली एक कमेटी नेमण्यात आली. सार्वजनिक काकांनी ह्या कमिटीपुढे सार्वजनिक सभेतर्फे साक्ष दिली, व त्यात त्यांनी रयतेच्या दु;खाची कहाणी निर्भीडपणे कमेटीपुढे मांडली. "केर्ड" साहेबांनी "नाइनटींथ सेंचरी" मधील "नोट्स बाय धी इन इंडिया" ह्या लेखात सार्वजनिक सभेच्या कामगिरीबद्दल प्रशंशोद्गार काढले आहेत.

वरील कमेटीपुढे शेतकऱ्यांचे दुःख निवारण करण्याकरिता तीन उपाय सुचविण्यात आले. एक उपाय असा की, सरकारने आपल्या "पब्लिक बर्क्स" खात्यामार्फत दुष्काळ पीडितांकरिता कामे काढावी; मात्र धान्याचा भाव रुपयास १४ शेर व ३२ शेर असता जो दोण आणे मजुरीचा दर होता, तो प्रस्तुत दुष्काळात तीन आणे करण्यात येऊन त्यापैकी अर्धा रोख व अर्धा ऐन जिनसा देण्यात यावा. दुसरा उपाय असा की, शिजविलेले व कोरे अन्न ह्यांचा धर्मदाय व्हावा. ह्यात सरकारने व लोकांनी एक विचाराने झटावे. मात्र प्रत्येक तालुक्यात असे हजारो लोक असतात की ज्याना दुष्काळाच्या कामावर जाण्याचा कमीपणा वाटतो. त्यांना राजाच्या किंवा प्रजेच्या अन्नसत्राने पोसले पाहजे. अशा संस्था सरकारी स्थानिक अधिकाऱ्यांच्या प्रेरणेने निघून लोकाचार व आरोग्य ह्याकडे लक्ष ठेवण्याकरिता त्यातील व्यवस्था लोकांकडे असावी. जे थोडे लोक नेमस्त दराने धान्य घेण्यासारखे असतील त्यांच्याकरिता खाजगी वर्गणी, म्युनिसिपालिटीची मदत, किंवा सरकारचा हातभार ह्यांचा अवश्य त्या हमीवर धान्याची स्वस्त दुकाने काढावीत. तिसरा आणि शेवटचा उपाय, म्हणजे देशावरील दुष्काळ पीडीत भागांतील गुराढोरांना कोकणपट्टीत आणून, तेथे त्यांच्या दाणावैरणीची सोय करणे. प्रत्येक कलेक्टरने आपल्या जिल्ह्यात दहापासून पंचवीसपर्यंत अशी स्थळे निर्माण करावी की जेथे चार पाचशे गुराढोरांच्या खाण्यापिण्याची तजवीज होईल. तसेच वर्षारंभी लिलावाने विकून टाकलेली कुरणे सरकारने त्या त्या खरेदीदारांपासून योग्य मोबदला देऊन परत घ्यावी, व ती कुरणे रयतेस खुली ठेवावी. त्यातील काही उपायांची यथावकाश

अंमलबजावणी झाली. जनतेने मात्र एकत्र येऊन जागोजाग फंड गोळा केले. दुष्काळ कमिट्या स्थापन करून स्वस्त धान्याची दुकाने उघडली.

अनुक्रमणिका

# प्रकरण सहावे

## क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके

न्या. रानड्यांच्या पुण्यातील १८७३ ते १८७५ पर्यंतच्या दोन वर्षातील वास्तव्यात पुण्यामध्ये जनजागृती झाली. हिंदी लोकांवर इंग्रजांनी लादलेल्या अन्यायाची वर्णने न्या. रानडे आपल्या व्याख्यानातून देत असतानाच १८७६ साल उजाडले आणि महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट आले. याबद्दल गेल्या प्रकरणात माहिती दिली आहे. ह्या दुष्काळात अन्नाचे व पाण्याचे दुर्भिक्ष आले, त्या संकटाबरोबरच रोगांचे संकट महाराष्ट्रावर आले. कॉलरा व देवीच्या साथींनी ह्याचवेळी थैमान घातले. लोक मोठ्या संख्येने प्राणास मुकले. सोलापूर आणि विजापूर ह्या दुष्काळी जिल्ह्यांमध्ये मोट्या प्रमाणावर प्राणहानी झाली. एकेकट्या जिल्ह्यातील मृतांची संख्याच सात हाजारांवर गेली. रोगराईमुळे मेलेल्यांची संख्या चार हजारांवर होती.१

ह्या प्रक्षोभक शोक कथेची त्ते वर्तमानपत्रात झळकू लागली. त्याचा फायदा ख्रिश्चन धर्म प्रसारकांनी घेतला. अनाथ अर्भके ख्रिश्चन धर्मातच वाढविण्याच्या योजना त्यांनी गुप्तपणे आखल्या. पुण्याच्या बिशपने पुण्यास एक अनाथ अर्भकालय काढून त्यात येणारी मुले ख्रिश्चन बनविली जातील अशी त्यानी अट घातली.

सरकारने काही ठिकाणी दुष्काळी कामे उघडली आणि दुष्काळातील उपासमारीने अशक्त झालेल्या श्रमिकांकडून चोपून काम करून घेण्याची व्यवस्था केली. लोकांना ह्याची प्रचिती येताच बरेच जण कुदळी, फावडी खाली टाकून निघन गेले, त्यामुळे त्यांना मिळणाऱ्या धान्य सहाय्यास ते मुकले आणि त्यांची उपासमार चालूच राहिली. ह्यावर उपाय म्हणून गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल याने प्रति माणशी अर्धा सेर धान्य मंजूर केले, ह्या तुटपुंज्या प्रमाणाविरुद्ध एतद्देशीय वृत्तपत्रांनी खूप ओरड केली पण त्याचा उपयोग झाला नाही. ह्या तुटपुंज्या अन्नावर दिवस काढीत काही लोक अर्धपोटी जगले, बरेचसे मेले. महाराष्ट्रात ह्या दुष्काळाने इ. स. १८७६ ते १८७८ अशी दोन वर्षे थैमान घातले. दक्षिणेचे दंगे (Deccan riots) ह्या नावाने ही दोन वर्षे प्रसिद्ध आहेत.२ (आर. कुमार यांच्या द डेक्कन रायटस् ऑफ १८७५ ह्या लेखाच्या आधारे. ॲसियन स्टडी लेख प्रसिद्धी, खंड २४,४ ऑगस्ट १९६५).

महाराष्ट्रावर ही आपत्ती आलेली पाहून वासुदेव बळवंत फडके नावाच्या पुण्यात वास्तव्य करीत असलेल्या तरूणास स्वस्थ बसवले नाही. तो इंग्रज सरकारकडे नोकरीत होता. त्याने लोकस्थिती अजमावून लोकांना इंग्रजांविरुद्ध उठाव करण्यास उद्युक्त करण्याचे ठरविले. त्याने कार्यालयातून ह्या वेळी दीर्घ मुदतीची सुटी घेतली आणि देशबांधवांच्या सान्निध्यात जाण्यासाठी वेषांतर करून खेडेगावातून प्रवास सुरू केला. तेव्हा वृत्तपत्रात आलेली दृष्ये त्याला प्रत्यक्षात दिसू लागली. गावातील घरे ओसाड पडली होती. भयाण निर्मनुष्यता त्याला दिसली. मृत गुरांचे सांगाडे आणि मृत मनुष्यांचे सापळे ह्यांच्या मधून हिंडत असता त्याचे अंतःकरण पिळवटून गेले.

ह्या वासूदेव बळवंताचा शिरढोणच्या फडके१ घराण्यात झाला. त्याचे आजोबा अनंतराव फडके हे कर्नाळ किल्ल्याचे किल्लेदार होते. वासुदेवाचा जन्म ४ नोव्हेंबर १८४५२ चा. लहाणपणी अडीच वर्षाचा होईपर्यंत वासुदेव शिरढोणलाच होता. त्याची अंककांती गोरीपीन, शरीर गुटगुटीत, सरळ नाक, निळसर३ व पाणीदार डोळे.लहानपणी तो अतिशय खोडकर होता. शिक्षणाकडे त्याचे लक्ष नव्हते. त्यास त्याच्या वडिलांनी शिक्षणासाठी कल्याणला त्याच्या आजोळी ठेवले होते. तेथे चार वर्षे त्याने अभ्यास केला.

मिशनरी शाळेत नाव घालून श्रीधरशास्त्री जांभेकर ४ या शिक्षकाच्या हातून इंग्रजी शिकला. कल्याण येतील शिक्षण संपल्यावर तो पुण्यास येऊन पूना हायस्कूलमध्ये शिक्षण घेऊ लागला. ५ मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रवेश परिक्षेपर्यंत त्याने शिक्षण घेऊन नंतर सोडले. नंतर तो शिरढोणला६ आला. वडिलांनी त्याचा विवाह शिरढोण येथे १९५९ मध्ये वयाच्या पंधराव्या वर्षी मोठ्या थाटामाटाने केला. ७ विवाहानंतर वासुदेव मुंबईला जी. आय. पी रेल्वेच्या ऑफिसमध्ये नोकरी करू लागला. तेथे त्याचा अपमान हेडक्लार्कने केला.८ तेव्हा त्याने त्या नोकरीचा राजीनामा देऊन तो पुण्यास १८६५ मध्ये आला. नवीन नोकरी पत्करली. त्यात जम बसला.९ त्याला क्रांतिकारी कार्याची प्रेरणा पुण्याच्या मुक्कामी मिळाली. वासुदेव बळवंतास पुण्यास आल्यावर इ. स. १८६७ मध्ये त्यास एक पुत्ररत्न झाले. पण तो मुलगा लहानपणीच मृत्यु पावला. त्यानंतर दोन वर्षांनी इ. स. १८६९ मध्ये त्यास एक कन्यारत्न झाले. हीच वासुदेव बळवंतची वंशवेल. हिचे नाव मथुताई. पुण्यात आल्यापासून वासुदेव बळवंताची मानसिक अस्वस्था फार वाढली. तो जपजाप्य करून ध्यानमग्न राहू लागला. मानसिक स्वास्थासाठी सत्परूषांच्या गाठीभेटी घेतल्या, मंत्रतंत्र केले, व्रतवैकल्ये केली. अक्कलकोट स्वामी महाराजांना भेटला. पण त्यास मनःशांती लाभली नाही. इतक्यात इ. स. १८७० मध्ये त्यास आपली आई मृत्युशय्येवर असल्याची बातमी समजली. तेव्हा त्याने वरिष्ठांकडे आईचे दर्शन घेण्यासाठी रजा मागितली पण ती त्याला नाकारण्यात आली. १० या घोळात चार पाच दिवस गेले. शेवटी मनाचा हिय्या करून त्याने कार्यालयात रजेची चिठ्ठी पाठवून दिली आणि स्वतः शिरढोणला रवाना झाला. पण शिरढोणला पोहोचण्यापूर्वीच आईचे निधन झाले. अंत्यदर्शनही त्यास घडले नाही. विमनस्क स्थितीत पुण्यास परत आल्यावर तो कार्यालयात गेला तेव्हा वरिष्ठांनी त्याची सुटी मंजूर करून न घेता परवानगीशिवाय गेल्यामुळे खरडपट्टी काढली . त्यामुळे त्याचे मन दुखावले. इ.स. १८७१ मध्ये परमप्रिय आईच्या वर्षश्राद्धास जाण्यासाठाही रजा मंजूर झाली नाही. तेव्हा तर तो फारच उद्विग्न झाला. त्याचे मन इंग्रज सत्ताधाऱ्यांविरुद्ध प्रतिशोध घेऊ लागले.११ इतक्यात पुण्यामध्ये सार्वजनिक काका जोशी आणि न्या. महादेव गोविंद रानडे यांनी भाषणाद्वारे लोकांमध्ये राजकीय जागृती निर्माण करण्यास प्रारंभ केला. पारतंत्र्यामुळे आपले आर्थिक शोषण कसे होत आहे हे न्या. रानडे आपल्या भाषणात आकडे देऊन सिद्ध करून सांगू१२ लागले. ह्यावेळी त्यावेळचे सुशिक्षित लोक इंग्रजी राजवटीमुळे झालेल्या राजकीय हानीचा विचार करू लागले. त्यामुळे वासुद्व बळवंताचा देशाभिमान जास्त जागृत झाला आणि प्रत्यक्ष जनतेच्या दुःख निवारणाच्या खटपटीस प्रारंभ केला (आत्मचरित्र). १८७३ पासून वासुदेव काका जोशींच्या सांगण्यावरून त्याने विदेशी कपडे वापरण्याचे सोडून स्वदेशीच व्रत आचरण्यास सुरुवात केली.१३ देशाभिमानाने घेतलेले हे व्रत तो धार्मिक निष्ठेने पाळू लागला. त्यावेळेपासून ब्रिटिशांनी तयार केलेली कोणतीही वस्तू वापरावयाची नाही असा वासुदेव बळवंतासह त्याच्या सोबत्यांनी निश्चय केला व परदेशी मालावर बहिष्कार घालण्यास सुरुवात केली (बॉम्बे गॅझेट, दि. २६ जून १८७९). कार्यालयातही तो लिहिण्यासाठी बोरू वापरू लागला (पूना ऑबझर्व्हर, दि. ४ ऑगस्ट १८७९). ह्यावेळी त्याच्या आयुष्यात एक शोचनीय गोष्ट घडला. इ. स. १८७३ च्या मध्यास त्याची प्रिय पत्नी थोड्या दिवसाच्या आजारानंतर निवर्तली.तोही आघात त्यास सहन करावा लागला. तदनंतर त्याने दुसरे लग्न केले. नाव गोपिकाबाई. तिला त्याने घोड्यावर बसणे, सस्त्रकला,युद्धकला शिकविली आणि पट्ट्यांचे हात करण्यात व बंदुक उडविण्यात बाईस तरबेज केले. स्वतः वासुदेव बळवंत नित्याच्या तीन्नचारशे जोर बैठका काढीत होता. त्याचे शरीर पिळदार, छाती भरलेली, दमदार आणि वाहू सामर्थ्य संपन्न बनले होते.

पुण्यात आल्यावर त्यास मल्लविद्येची आवड उत्पन्न झाली. अनेक गुरूपासून तो मल्लविद्येचे निरनिराळे पेच शिकला. त्याचेबरोबर मल्लविद्या शिकण्यास तरूण वयात महात्मा फुले होते. लखुजी वस्तादाच्या १५ आखाड्यात जाऊन गळीबार, दांडपट्टा व तलवार चालविणे ह्या शस्त्रांच्या विद्या तो

अनुक्रमणिका

शिकला. घोड्यावर बसण्यात व निशाण मारण्यात त्याने प्राविण्य मिळविले. घोडदौड व मल्लविद्या यांच्याप्रमाणे तो दांडपट्टा फिरवण्यातही पटाईत झाला. त्याला हत्यारांचा फार शौक होता. नेहमी तीन बंदुका, चार –पाच तलवारी, पट्टे, भाले इ. त्याजपाशी असत. दावत्या घोड्यावर बसून निशाणबाजी करण्याचा सरावे त्याने केला होता. त्याने आपल्या सहकाऱ्यांना पुण्याच्या गुलटेकडीवर घेऊन जाऊन युद्धकला व हत्यारांच्या फेकी शिकविल्या. १८७३ ते १८७५ पर्यंतच्या दोह वर्षांत न्या. रानडे यांच्या स्फूर्तीने जनजागृती करण्यासाठी वासुदेव बळवंत पुढे सरसावला. स्वतःच्या व्याख्यानाकरिता हातात थाळी घेऊन ठिकठिकाणी वाजवून शनिवारवाड्यासमोरील आपल्या व्याख्यानास लोकांना बोलवू लागला. वीरश्रीयुक्त व्याख्याने लोकांसमोर देऊ लागला.वैध चळवळीचा हा मार्ग स्वीकारून आपल्या व्याख्यानातून जनतेस लढण्यासाठी सिद्ध करण्याचा प्रयत्न वासुदेव बळवंत करू लागला. त्याला वाटत होते की आपल्या व्याख्यानांनी लोकांमध्ये क्रांतीचा बडवानल पेटेल. पम तसे काही झाले नाही. लोक त्याची व्याख्याने ऐकून गपचूप घरी जाऊ लागले. तेव्हा व्याख्यानबाजीने आपले इंग्रजांना घालविण्याचे उद्दिष्ट साध्य होत नाही हे त्यास कळून चुकले आणि त्याची निराशा झाली.पुढील दोन वर्षात महाराष्ट्रात आणखी अस्वस्थता माजली. दक्षिणचे दंगे म्हणून प्रसिद्ध असलेल्या मोठ्या दुष्काळाने हाहा:कार केला. परकीय सत्तेमुळे दुष्काळात अपरंपार क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके मनुष्यहानी झाली आणि त्यासाठी आप काहीच करू शकलो नाही ह्याची खंत त्यास बोचू लागली. त्याला मनःस्ताप होऊ लागला. स्वाराज्यासाठी भाषणबाजी व बाहेर लेखनबाजी करून देशाला स्वातंत्र्य मिळेल अशी ज्यांची धारणा होती त्यांची तो निर्भत्सना करी.

सुशिक्षित पांढरपेशा लोकांच्या हातून सशस्त्र उठाव करण्याचे धाडस होणार नाही अशी त्याच्या मनाची खात्री झाली आणि तो सशस्त्र क्रांतीकडे वळला. संताजी घोरपडे, पेशवे थोरले बाजीराव, विश्वासराव, "बचेंगे तो और भी लढेंगे" असे निश्चयपूर्वक आपल्या गनिमास ठासून सांगणारे दत्ताजी शिंदे, पर्वतप्राय इंग्रज शक्तीला तलवारीच्या तालावर नाचवत ठेवणारे, दे माय धरणी ठाय करणारे, यशवंतराव होळकर त्याच्या डोळ्यापुढून सरकू लागले. हे सर्व मराठे योद्धे पंचविशीत ४०/४० हजार सैन्याचे संचलन करत हा ताजा इतिहास त्याच्या डोळ्यापुढून सरकू लागला. मनात गतकालातील स्मृती जागृत होऊ लागल्या.मुंबईहून गावी शिरढोणला जाताना कर्णाळगड आदि डोंगरी प्रदेश पाहून त्याच्या चित्तवृत्ती थरारल्या. ह्याच कडेकपारीतून शत्रूशी गनिमी काव्याने लढून आपल्या पूर्वजांनी स्वाराज्याचे साम्राज्य केले मग त्यांच्याप्रमाणे इंग्रज शत्रूशी लढून मला माझी जन्मभूमी स्वतंत्र करता येईल हा मनात येणारा विचार पक्का होऊ लागला. त्यासाठी शिरढोणच्या आसमंतातील दऱ्याखोरी व खिडींचे निरीक्षण त्याने केले. शिवाजी महाराजांनी मावळ्यांशी संधान बांधले, तर स्वातंत्र्याच्या साध्यासाठी वासुदेव बळवंत फडके याने पुणे आणि सातारा जिल्ह्यांतील रामोशांना हाताशी धरले. रामोशी लोक स्वामिनिष्ठ असतात हे वासुदेव बळवंतला माहीत होते. तसेच रामोशांशी संधान बांधल्यावर ते ह्या आपल्या सेनानीच्या झेंड्याखाली इंग्रजांशी लढण्यास एकत्र आले त्याचे तत्कालीन मुख्य कारण असे:

मराठेकाळी गडरक्षणाचे काम रामोशी करत असत. इंग्रजी सत्ता आली. त्यांनी मैदानी लढाईचा स्वीकार केला. तेव्हा गडांचे महत्व कमी झाले. इंग्रज सरकारने सर्व गडांवरून रामोशाना हुसकावून लावले, तेव्हा श्रीमंत लोकांच्या मिळकती राखण्याचे काम त्यांच्या नशिबी आले. किल्लेदारीचा हक्क नष्ट झाल्यामुळे रामोशी लोकांत असंतोष धुमसत होता. दुष्काळात त्यांना पोटभर खाण्यास न मिळाल्याने त्यांचा असंतोष वाढत गेला. फावल्या वेळेचा धंदा म्हणून रानातील लाकडे तोडून आणून विकावयाची हा त्यांचा शिरस्ता होता. इंग्रजांनी जंगल लॉ करून नवीन अरण्य निर्बंध घातले. त्यामुळे त्यांचे रानातील लाकडे

तोडणे बंद झाले. त्यांचे उपजिविकेचे एक साधन इंग्रज साहेबाने नष्ट केले. रानात गुरे फुकट चारण्यासही त्यांना बंदी करण्यात आली. सावकारविरोधी दंग्यात, गावात झालेल्या चोरी, खून यात आरोपी म्हणून ते गोवले जाऊ लागले. असे गुन्हे केल्याचा संश्य घेऊन इंग्रज सरकार त्यांच्यापैकी कित्येकजणांना पकडून मारझोड करू लागले. दंग्याच्या काळात त्यांच्यावर प्रतिदिनी उपस्थिती कळविण्याचे निर्बंध लादले गेले. दुष्काळात त्यांची उपासमार वाढली. स्वतंत्र जीवन जगणाऱ्या ह्या रामोशांनी इंग्रजांविरुद्ध आपला संताप व्यक्त करण्याची संधी वासुदेव बळवंतने इ. स. १८७७ मध्ये आणून दिली. वासुदेव बळवंतने रामोशी लोकांस आपल्या स्वराज्याच्या उद्योगात सामील करून घेण्याचे ठरविले. त्याकरिता तो व त्याचे साथीदार रामोशांकडे जाऊन त्यांना इंग्रजांविरुद्ध भाषणे करून भडकविले.१५ अ त्यांच्या गुणांचा व स्वातंत्र्यवृत्तीचा गौरव केला. त्यांच्या म्होरक्यास पागोटी बांधविली. मद्याकरिता त्यांना पैसे दिले. त्यांना जेवणे घातली. तेव्हा साहजिकच त्यांच्या मनात वासुद्व बळवंतविषयी आपुलकी निर्माण झाली. तुम्हाला ब्रिटिशांना इथून गालवून स्वातंत्र्य मिळावयास हवे असले तर तुम्ही माझ्या छत्राखाली या. मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो असे वासुदेव बळवंत रामोशांना सांगू लागला व त्याने त्यांना आपल्याकडे आकृष्ट केले. प्रमुख रामोशी त्यामुळे वासुदेव बळवंतास सामील झाला त्यांची संघटना बांधण्यात वासुदेव बलवंतला यश आल्यावर त्याने रामोशांच्या मदतीने सरकारला हैराण करण्याचे ठरविले.

रामोशांची फौज उभारण्याची त्यांची कल्पना रामोशी त्याच्या छत्राखाली गोळा झाल्यामुळे सरकार होऊ लागली. पण ह्या फौजफाट्यास पैसा पाहिजे होता. तो मिळविण्यासाठी वासुदेव बळवंतने श्रीमंत लोकांशी वाटाघाटी केल्या पण त्यास द्रव्य देऊन इंग्रजी सत्तेचा रोष ओढून घेण्यास कोणी सिद्ध होईना. तेव्हा स्वातंत्र्य लढ्यासाठी हवा असलेला पैसा उभारण्याचे काम श्रीमंत लोकांवर छापे घालून करण्याचे ठरविले.इ. स. १८७९ च्या सुरूवातीस त्याने आपल्या सेनेस ह्या कामासाठी कार्यरत केले.१६

१८७८ च्या प्रारंभी वासुदेव बळवंत याने पुण्यात आणि महाराष्ट्रात पहिल्या क्रांतिकारक गुप्त संस्थेची स्थापना केली. प्रभात फेऱ्या काढून इंग्रजी सत्तेविरुद्ध गर्भीत अर्थाची गाणी म्हणणे व व्याख्याने देणे हे त्याचे काम त्या वेळी सुरूच होते. त्याने पुण्यातील युवक संघटीत केले होते. संघटनेत येणाऱ्या युवकांना “मी माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी वेळ पडेल तेव्हा सर्वस्वार तिलांजली देऊन लढण्यास सिद्ध होईन” अशा प्रकारची प्रतिज्ञा घेववीत असे, संघटनेतील तरूण मंडळीस तो तवार, दांडपट्टा इत्यादींचे हात स्वतः शिकवीत होता. चाळीस —पन्नास सभासदांचा एक गट अशा प्रकारे कित्येक गट त्याने तयार केले. त्याचे साथी मंडळीत पागे, वझे (मारनर), हर्डीकर, दोन सहस्त्रबुद्धे, नारायणराव फौजदार, घोटवडेकर, मोरोपंत घारपुरे, दोन गुरूजी, दादा दामले इत्यादी लोक होते.

वासुदेव बळवंताचा शिष्य परिवारहि मोठा होता. त्यात तरूणच होते. मोरो बळवंत खरे, चिंतो भिकाजी वैद्य, विष्णू बळवंत खरे, बळवंत सखाराम घाटे, परशराम पाटणकर, हरी गुपचूप, गोपाळ कर्वे, महादेव करमरकर, वासुदेव कृष्णाजी भट, गोविंदभटजी दाते, नारायण रामचंद्र पोंक्षे, पुरुषोत्तम चिंतामण गोखले इत्यादी प्रमुख नावे होती.

‘फर्ग्युसन’ टेकडीच्या मध्याला किल्ला कल्पून टोळ्याटोळ्यांनी लुटूपुटीच्या लढाईची प्रात्यक्षिके तो आपल्या संघटनेतील तरूणांस दाखवीत असे. बंदुका उडविण्याचे शिक्षण तो स्वतः संघटनेतील तरूणांस देई. वासुदेव बळवंताचे सारेच विचार प्रत्यक्ष बंड करावयाच्या सिद्धतेच्या दिशेने चालत. आपल्या संकल्पित उठावाच्या टापूतील टेकड्यांची, गावांची, तलावांची इत्यादींची खडानखडा माहिती त्याने मिळविली होती

अनुक्रमणिका

व बारीकसारीक स्थलनिर्देश दाखविणारे नकाशे संग्रही ठेवले होते. शिवाजी महाराज हे वासुदेव बळवंतांचे स्फूर्तीस्थान होते. शिवाजी महाराजांप्रमाणे बंड करून आपण स्वराज्य मिळविले पाहिजे असे तो नेहमी म्हणे. १८७९ चे वर्ष उजाडल्यावर वासुदेव बळवंतने "उठाव" करण्याचा दिवस निश्चित केला. घरची निरवानिरव केली आणि बंडखोर जीवनास प्रारंभ केला.

१८७९ च्या महाशिवरात्रीच्या दिवशी रात्री लोणी गावच्या मैदानात आपल्या सर्व पांढरपेशी आणि रामोशी सहकाऱ्यांस वनभोजन दिले. भोजनास सुमारे १५० मंडळी जमली होती. जमलेल्या मंडळींपैकी भोजनोत्तर काहींस पागोटी, उपरणी व कोणास पैसे दिले. तसेच शस्त्रेही वाटली. ह्याच वेळी वासुदेव बळवंतने पहिल्या लुटीत आपणाला आणखी पैसे आणि शस्त्रे मिळतील असे भाकित केले व सर्वांस लढण्यास सिद्ध होण्यास सांगितले.

रविवार २३ फेब्रुवारी १८८९ हा पहिल्या लुटीचा दिवस ठरला. लोणीजवळच्या चिंचुशीच्या जंगलात तो व त्याचे साथीदार जमले.१७ बरोबर दीडशेच्यावर लोक घेतले. त्यांना बंदुका, भाले, तलवारी, काठ्या, गोफणी आणि दांडपट्टे वाटले. चिंचुशी गावाजवळच्या एका गुहेमध्ये कानोबाचे देऊळ होते. त्या गुव्हेत मुक्काम केला. रात्री धामारी गावी जाऊन दौलतराव किल्लकचंद मारवाड्याच्या घरावर दरोडा घातला. जवळजवळ तीन हजारांची लूट मिळवून जवळच्या चिंचुशीच्या अरण्यात सर्व सेना निघून गेली.

धामारीच्या छाप्याचे वृत्त पोलिसांना कळताच त्यांनी दरोडेखोरांचा लोणी गावापासून शोध केला. फौजदाराच्या हाती एक रामोशी सापडला पण शेवटी तोही फौजदाराच्या हातावर तुरी देऊन पळाला.

त्यानंतर हा कंपू रामदऱ्याच्या अरण्यात जमला. तिथे त्यांना पिलाजी रामोशी, रामा कोळी, भिकाजी शिंदा, कोंडाजी नाव्ही इत्यादी नवीन सहकार मिळाले. तिथून गावागावात भेट देण्याचे व शेतकऱ्यांपुढे भाषण करण्याचे सत्र वासुदेव बळवंतने सुरू केले. "गरिबांच्या कल्याणासाठी आम्ही फिरत आहोत.आमची भिती तुम्ही बाळगू नका. रयतेच्या सुखासाठी आम्ही झगडत आहोत.आमच्या ह्या कार्यात तुम्ही सर्वांनी आम्हास सहाय्य केले पाहिजे". (वासुदेव बळवंताची दैनंदिनी, दि. २४ फेब्रुवारी १८७९).

गावकऱ्यांनी आपल्याजवळील दही, लोणी, दूध देऊन वासुदेव बळवंत व त्याचे सहकारी यांचे स्वागत केले आणि "सरकारकडून कोणी इकडे आल्यास तुम्हास त्याची बातमी आधीच कळवू आणि शक्य ते सर्व सहाय्य देऊ" असे त्यांनी आश्वासनही दिले. त्यानंतर त्याने आमली गावच्या इनामदाराकडून बंदुका मिळविल्या. पुढे वाल्हे गावी धाड घातली. त्या दरिद्री गावात विशेष काही द्रव्य मिळाले नाही. कारण त्या गावातील जनतागरीब होती. पुढे पुरंदरगडाच्या आश्रयाने ही सर्व मंडळी राहू लागली. वासुदेव बळवंतने रामोशांच्या सहाय्याने गावे लुटण्याचे सत्र सुरू केले आहे अशा बातम्या पुण्यात पसरल्या. पुण्याचे पोलीस फौजदार पोलीस पथक घेऊन छाप्याच्या अपराध्यांना पकडण्यासाठी चालले होते. त्नीकाही पांढरपेशा आणि काही रामोशी सहकाऱ्यांना पकडले व वासुदेव बळवंतचा शोध घेऊ लागले. पण त्यात ते अपयशी झाले. दि. १३ मार्च १८७९ रोजी मांगदरी १८ गावाची लूट त्याच्या माणसांनी मारून आणली होती. इतक्यात वासुदेव बळवंतला समजले की, पुण्याहून पायदळाची पथके त्यांच्या शोधास निघाली होती; म्हणून ब्रिटीश हद्द सोडून वासुदेव बळवंत आपल्या मंडळीसह भोर सचिवांच्या प्रदेशात गेला. ह्यावेळी सर्व कंपू भोरजवळ राहत होता. भोरच्या प्रदेशात त्यांनी पहिली लूट हर्णे गावात केली; त्या गावातील वाण्यास

अनुक्रमणिका

लुटले. त्यानंतर १६ मार्च रोजी भोर संस्थानातील मांगदरी गावावर धाड घातली. त्या गावच्या गावकऱ्यांनी आगाशे नावाच्या श्रीमंताच्या नेतृत्वाखाली वासुदेव बळवंतास प्रतिकार केला. बंदुकीच्या फैरी दोन्ही बाजूंनी उडाल्या. त्यात वासुदेव बळवंताची सरशी होऊन सबंध गाव जीव मुठीत घेऊन आश्रयासाठी पळाला. तेवहा लुट मारून घेऊन वासुदेव बळवंताचे लोक खडकवासला अरण्यात दि. १७ मार्च रोजी सुखरूप स्थळी परत आले.

१७ मार्च १८७९ रोजी वासुदेव बळवंत आपल्या सहकाऱ्यांसह खडकवासल्याच्या अरण्यात शिरला. तिथे बाजूच्या खेड्यातील शेतकऱ्यांचा एक मोठा गट त्यास येऊन भेटला. त्यावेळी त्यांना इंग्रजांच्या वुरूद्ध तुम्ही उठाव केला पाहिजे असे इंग्रजांच्या जाचाची उदाहरणे देऊन सांगितले. आता वासुदेव बळवंताच्या कार्याची कल्पना त्या बाजूच्या बहुतेक गावातील शेतकऱ्यांस आली होती. गावचे पाटील ह्या कंपूस भेटून सारा देऊ लागले व जेवणे पोहोचवू लागले. तसेच इंग्रज सरकारकडून त्यांच्या हालचालींच्या बातम्या लपवून ठेऊ लागले. यापुढे हवेली तालुक्यातील सोनापूर हे गाव लुटीचे लक्ष्य झाले. २० मार्च रोजी गाव लुटल्यावर टोळके वडस गावावर आले. वासुदेव बळवंत वडस गावी आल्याचे कळताच आजूबाजूचे शेतकरी त्यांना भेटण्यास आले. त्यांना त्याने दिलासा देऊन आपल्या देशमुक्तीच्या कार्यात सामील होण्यास सांगितले.तिथून वासुदेव बळवंत सिंहगडावर २३ मार्च रोजी जाण्यास निघाला असता त्यास काही वाट चालून गेल्यावर रस्त्यात घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकू आला. त्याने मागे वळून पाहिले तो त्यास सरकारी स्वार आणि शिपाई दौडत येताना दिसले. तेव्हा वासुदेव बळवंत शेतातील झाडाखाली लपला. त्यामुळे त्याला न पाहता शिपाईस्वार दौडत पुढे गेले.

म.स्वा.ल.- १०

तेथून वासुदेव बळवंतने पुण्याजवळील कोटवाडीच्या धनगर वस्तीवर दि. २३ मार्च १८७९ रोजी मुक्काम केला व तेथील धनगरांना आपल्या बाजूस वळविले आणि तो भोर संस्थानाच्या हद्दीवरील जानेगावी गेला. जानेगावच्या दाट जंगलात गावच्या पाटलाला निरोप पाठवून खेडूतांचा जमाव जमविला आणि सांगितले की “जे इंग्रज सरकार आज तुम्हाला त्रास देत आहे ते तुमचा निःपात केल्यावाचून राहणार नाही तेव्हा तुम्ही इंग्रजांचा नाश करण्यासाठी आमच्या कार्यात मदत करा.” शेतकऱ्यांनी ते कबूल केले. त्याने लोकांपासून शेतसाऱ्याची मागणी केली ती त्यांनी नाकारली तेव्हा त्याच्या सहकाऱ्यांनी गावातील वाण्यावर धाड घातली आणि वाण्याच्या जाचातून गावकऱ्यांना सोडविले. तेथून वासुदेव बळवंत व त्याची सेना पुसानाच्या जंगलात गेली. तेथे विश्रांती घेऊन दुसऱ्या गावी धाड घालण्याचा बेत ठरविलाआणि त्यासाठी चांदखेड गाव निवडले. चांदखेड लुटल्यावर वासुदेव बळवंतच्या आज्ञेने त्याचे लोक विश्रांतीकरिता आपआपल्या माणसांसाठी भेटण्यास घरोघरी गेले.

१८७९ मध्ये मार्च महिन्यात वासुदेव बळवंतच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्रात व भोर संस्थानच्या प्रदेशातील गावांवर झालेल्या लुटीच्या छाप्यांमुळे सगळीकडे खळबळ उडाली. त्याचे वृत्तांत हिंदुस्थानात प्रसृत होऊ लागले. ह्या छाप्यामागे राजकीय हेतू असल्याचे स्पष्ट दिसू लागले. पुण्या-मुंबईच्या वृत्तपत्रांनी ह्यामागे वासुदेव बळवंताच्या कृतीचे समर्थन न करता सरकारला दोषी ठरविले. तसेच हा असंतुष्ट शेतकरी वर्गाचा लढा आहे, असे वरच्या वर्गास वाटून ते ह्या घटनांकडे सहानभुतिपूर्वक पाहू लागले. हे मुंबई सरकारच्या लक्षात येताच ह्या छाप्यामागे राजकीय चेतना असली पाहिजे हा मुबंई सरकारचा ग्रह कायम झाला.

अनुक्रमणिका

**वासुदेव बळवंत यंत्रणा**

इंग्रजांविरुद्ध बंड करून स्वराज्य स्थापण्यास निघालेल्या वासुदेव बळवंताकडे सुमारे २०० लोकांचे सैन्य होते. त्यात बहुसंख्य रामोशी होते. ह्या रामोशांचा म्होरक्या होता त्यास सरदार दौलतराव नाईक म्हणत. वासुदेव बळवंताच्या अनुपस्थितीत सरदार दौलतराव सैन्याचा प्रमुख होई व त्याचे आदेश सर्व सैन्य मानी. रामोशांप्रमाणे नगर, सातारा इत्यादी जिल्ह्यांतील कोळी, मांग प्रभृती लोकही होते. साहेबाला आपल्या देशातून घालविण्यासाठी "बंड करावयास हवे" असे वासुदेव बळवंत आपल्या सैन्याला सांगत असे. त्यामुळे रामोशी बंड करण्याच्या ध्येयाशी निगडीत झाले आणि मारता मारता मरू पण शरण जाणार नाही असा निश्चय त्यांनी केला. एखाद्या राजपुरूषाने आपल्या आपल्या सैन्याची व्यवस्था ठेवावी तशी ह्या सर्व सैन्याची व्यवस्था वासुदेव बळवंत ठेवीत असे. सैन्याची हजेरी ठेवण्याचे काम रामचंद्र कुलकर्णी नावाच्या निजाम राज्याच्या हद्दीतील इसमास दिले होते. त्यास दरमहा शंभर रुपये वेतन मिळे. वासुदेव बळवंताच्या सेनेत पांढरपेशा सहकाऱ्यांचाही अंतर्भाव होता. हे सर्व लोक आपले सुखवस्तु जीवन सोडून इंग्रजांविरुद्धच्या बंडात भाग घेण्यासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेवून बाहेर पडले होते. त्यात सिताराम गद्रे, गोपाळ मोरेश्वर साठे आणि भाऊसाहेब हे प्रमुख होते.

सेनेतील सर्व लोकांस प्रत्येक पंधरवड्यास वेतन देण्यात येई त्या सेनेत बंदुकवाले, तलवारवाले, गोफणवाले आणि लाठीधारी अशा निरनिराळ्या वर्गाचे लोक होते. बंदुकधारीस सोळा रुपये, बाकीच्या वर्गातील प्रत्येकास चार रुपयांपासूनपंधरा रुपयांपर्यंत वेतन वासुदेव बळवंत देत असे. काही रामोशी वेतन घेऊन त्याला सोडून जात. काही नवे मिळत. अशा प्रकारच्या सशस्त्र सेनेसह वासुदेव बळवंत सह्याद्रीच्या डोंगराळ प्रदेशात फिरत होता.

वासुदेव बळवंतजवळ सातारा, पुणे, नगर, सोलापूर, निजाम राज्य, भोर संस्थान,ठाणे, कुलाबा या भागातील दऱ्याखोऱ्यांची आणि आडमार्गांची संपूर्ण माहिती होती. ह्या भागातील श्रींमत लोकांची टिपणीच त्याजपाशी होती.

वासुदेव बळवंताच्या अनुपस्थितीत दौलतराव नाईक त्याच्या लोकांचे नेतृत्व करी. वासुदेव बळवंतने आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या केल्या होत्या.

मार्च महिन्यात महाराष्ट्रात पडलेले छापे राजकीय स्वरूपाचे होते. हे मुंबई सरकारच्या तात्काळ लक्षात आले.

वासुदेव बळवंतच्या लोकांनी काही गावे लूटत असता गावकऱ्यांना फसविण्यासाठी पोलिसांचे पोशाख आणि पट्टे घातले होते.

पुण्याच्या सरकारी खजिन्याची लूट करण्याचा संकल्प वासुद्व बळवंत याने केला होता. पण एका मुसलमान माहितीगाराने ह्या योजनेचा परिस्फोट केला आणि सरकारकडे माहिती कळविली. त्यामुळे तो बेत सोडून द्यावा लागला. वासुदेव बळवंतचे हे सर्व उद्योग तो जिथे नोकरीस होता त्या फायनान्स ऑफिसमधून रजा घेऊन चाललेले होते. लुटीच्या प्रकरणी पुण्याचे पोलीस सुपरिंटेंडट मेजर डॅनियलनी व्यक्तीशः फायनान्स कार्यालयात जाऊन प्रत्येक कारकुनाची हजेरी घेततली. रजेवर असलेल्या वासुदेव

बळवंतबद्दल त्यास काहीच माहिती कार्यालयातील कोणी देऊ शकला नाही. तदनंतर तो वासुदेव बळवंतच्या बिऱ्हाडी गेला. तेव्हा त्या खोलीस कुलूप लावलेले त्यास आढळले. सखोल तपासणीस मेजर डॅनियलची खात्री झाली की ह्या लुटारूंचा म्होरक्या वासुदेव बळवंतच असायला हवा. मुंबई सरकारने वासुदेव बळवंतच्या बंडाचा बीमोड करण्यासाठी मेजर डॅनियल यास नेमिले.

वासुदेव बळवंतच्या गावी पडणाऱ्या छाप्यांची माहिती 'डेक्कन हेराल्ड' आणि 'पुना आब्झर्वर' ही दोन वृत्तपत्रे देऊ लागली. तसेच त्यांनी वासुदेव बळवंताविषयीचे कुतुहलजनक लेख आपल्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केले. त्यामुळे वासुदेव बळवंताचा दरारा पुण्यातच नव्हे तर सर्व महाराष्ट्रात पसरला. वासुदेव बळवंत आपण शिवाजीचे अवतार आहोत आणि इंग्रज लोकांना हाकून देऊन महाराष्ट्राला स्वातंत्र्या मिळवून देण्याचा आपला हेतू आहे अशा प्रकारच्या कंड्या लोकांमध्ये पसरवू लागला.

**बंड निपटून काढण्याचे डॅनियल साहेबाने योजिलेले उपाय**

बंड दडपण्याची अधिकारसुत्रे हाती योताच डॅनियलने नव्यानव्या आज्ञा काढल्या. खेडेगावच्या रामोशी लोकांचे पट ठेवण्याची व्यवस्था अधिक कडक करण्यात आली. सायंकाळी जो रामोशी गावात आढळणार नाही त्याला कडक शासन केले जाईल असे जाहीर केले. अपराधी रामोशास पकडण्याकरिता त्याने छोटीछोटी पारितोषिके देण्याचे ठरविले. रामोशांचा पुंडावा मोडण्यासाठी अधिक पोलिस सामर्थ्य सर्व ठिकाणी पाठविले. ह्या त्याच्या दक्षतेनंतरही जिल्ह्यातून होणारे छापे थांबले नाहीत तेव्हा पुणे येथे इलाख्यातील सर्व कलेक्टरांची बैठक घेऊन आणखी कडक उपाय योजण्याचा निर्णय मेजर डॅनियलने त्या बैठकीत घेतला.१९

**वासुदेव बळवंताचा जाहीरनामा**[२०]

मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वासुदेव बळवंताने खालील जाहीरनामा सर्व वृत्तपत्रांकडे प्रसिद्धीस पाठविला. "दख्खनच्या प्रदेशाची लूट मारून आम्ही आता पुण्यास आलो आहोत आणि सरकारचे सैनिक मात्र आमच्या शोधासाठी दुसरीकडे धावत आहेत."

"आम्ही सरकारला कळवू इच्छितो की, देशात भरपूर धान्या असुनही आज दुष्काळ दरानेच धान्य विकले जात आहे. काही जिल्ह्यांत बहुसंख्य गरीब जनता रोजगाराशिवाय रहात आहे. गरीब जनतेला नोकरी मिळत नाही आणि कामावाचून दिवस काढावे लागत आहेत. ती सर्व आज सर्वनाशाच्या उंबरठ्यावर उभी आहे; स्वतःच्या उपजीविकेसाठी रानातून लाकडे तोडून आणून त्यावर गुजराण करणाऱ्या गरिबांना पोलीसांचा छळ सोसावा लागत आहे. इतरांना लूट मारून दिवस काढावे लागत आहेत.येथील बहुसंख्यांक प्रजा इंग्रज सरकारला शिव्याशाप देत उपासमारीने मृत्युमुखी पडत आहे."

"पुडील वर्षी १८७७ च्या दुष्काळापेक्षाही अधिक भयकंर दुष्काळ हिंदुस्थानात पडणार आहे, असे आमच्या हिंदु भविष्यवेत्त्यांचे म्हणणे आहे. म्हणून आम्ही सरकारला बजावू इच्छितो की, सर्वसाधारण जनतेकरिता या देशांच्या कानाकोपऱ्यातून मोठमोठी दुष्काळी कामे सुरू केली गेली पाहिजेत. येथील लोकांना सर्व उद्योगधंद्यांत प्रवेश मिळाला पाहिजे."

अनुक्रमणिका

“सरकारी कारभार कमी केला गेला पाहिजे आणि लठ्ठ पगाराच्या युरोपियन लोकांच्या पगारात कपात झाली पाहिजे एतद्देशीय व्यापारास उत्तेजन देऊन येथील लोकांना काम आणि अन्न पुरविले गेले पाहिजे.”

“ह्या गोष्टी जर झाल्या नाहीत, तर आतापर्यंत येथील श्रीमंत लोकांविरुद्ध होणारी आमची मोहिम पुढे युरोपियनांविरुद्ध सुरू होईल. सबंध देशभर देशशत्रूंचे वध होतील आणि अव्यवस्था माजेल व अठराशे सत्तावनच्या बंडा सारखे युरोपियन लोकांविरुद्ध आणखी एक बंड हिंदुस्थानात उद्भवल्यावाचून राहणार नाही.

“दुष्काळामुळे मरणारे लोक यापुढे नुसते फुकट मरणार नाहीत. जगण्यासाठी प्राणावर उदार होऊन ते बंड करून उठतील. सहस्त्रावधी लोकांची आम्ही भरती करू आणि ठिकठिकाणी उठावणी करून सरकारला जेरीस आणू, एकाच वेळी देशाच्या चारी कोपऱ्यात अशी उठावणी झाली म्हणजे सरकार आम्हाला तोंड देऊ शकणार नाही. औरंगजेबाच्या राजवटीत शिवाजीचा जय कसा होत गेला, त्याची आठवण ठेऊन, हिंदुस्थान सरकारने जागे व्हावे, शांत चित्ताने आमच्या मागण्यांचा विचार करावा आणि लोकांची प्राणहानी होऊ देऊ नये.”

“असे जर झाले नाही, तर गव्हर्नर वगैरेंच्या डोक्यासाठी इनाम जाहीर करण्यात येईल आणि आमचे उद्दिष्ट साध्य होईपर्यंत आमचा लढा चालू राहील.”

सरकारच्या असहिष्णू धोरमामुळे होणाऱ्या भीषण परिणामांचे असे चलद्दर्शन केल्यानंतर वासुदेव बळवंताने देशाच्या मुक्ततेसाठी एक मोठे बंड लवकरच घडून येणार आहे, अशी आपल्या देशबांधवाना ग्वाही दिली होती आणि त्या संग्रामात देशासाठी सर्वस्वाचा होम करण्यासाठी प्रत्येक भारतीयाने सिद्ध असले पाहिजे असे आवाहन केले होते.

वासुदेव बळवंताचा हा जाहीरनामा, गव्हर्नरपासून कलेक्टरपर्यंत सर्व अधिकाऱ्यांना पाठविला गेला होता. त्या जाहीरनाम्याखाली वासुदेव बळवंताच्या सहकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या होत्या. वासुदेव बळवंताची राजमुद्रा त्यावर होती आणि दुसऱ्या शिवाजीचा मुख्य प्रधान म्हणून त्याने त्याच्यावर स्वाक्षरी केली होती. ह्या जाहीरनाम्यामुळे देशात खळबळ उडून गेली.

**सरकारने योजिलेले कडक उपाय**

चौथ्या बंदुकवाल्या सेनेची दोन पथके जेजुरीकडे रवाना केली. त्यांच्या मदतीस एतद्देशीय पायदळातील ३०० शिपाई दिले. तसेच कॅ.ब्रेन ह्याच्या नेतृत्वाखाली अठराव्या एतद्देशीय पायदळातील शंभर लोक शिरवळकडे पाठविले व त्यांना प्रत्येकी दोनशे गोळ्यांचा पुरवठा करण्यात आला ह्यामुळे पुण्याच्या लोकांत घबराट निर्माण झाली. अँग्लो इंडियन पत्रांनी वासुदेव बळवंतच्या राजकीय बंडखोरीवर टीका केली. वासुदेव बळवंतला मिळत असलेल्या लोकांच्या सहाय्यास व सहानुभूतीस पायबंद घालण्यासाठी सरकारने शिक्षेच्या अनेक उपायांची घोषणा केली.

अनुक्रमणिका

काही वृत्तपत्रांनी बंडाच्या प्रवृत्तीवर टीका करून शेतसारा, स्टँपडयूटी आणि ऋणनिर्बंध अधिक सुसह्य करा, असे सरकारला सुचविले तरच लुटी थांबतील असे त्यांचे म्हणणे होते.

महाराष्ट्रातील लुटारूंचे छापे तसेच चालू राहीले. सातारा जिल्ह्यातील खंडाळा गावी, पूरंदर तालुक्यात पांगरे गावी, पुण्याजवळ महाळुंगे गावी, बार्शी गावात भर राजमार्गावर आणि औंध येथे लुटारूंचे छापे पडले.

भगीरथ प्रयत्नानंतर वासुदेव बळवंताचा पत्ता लावण्यात सरकार अयशस्वी ठरले तेव्हा त्यास पकडून देणाऱ्यास मोठ्या रकमेचे पारितोषिक जाहिर केले. वासुदेव बळवंत यास सरकारचे हे कृत्य समजताच त्याने मुंबईच्या गव्हर्नरच्या मस्तकासाठी आणि पुण्याचे कलेक्टर व सेशन जज्ञ यांच्या मस्तकांसाठी अनुक्रमे पाच हजार आणि तीन हजार रुपयांची पारितोषिके लावली आणि घोषपत्रकावर त्याने, पेशव्याचा नवा मुख्य प्रधान – वासुदेव बळवंत फडके अशी स्वाक्षरी केली होती. आपले हे घोषपत्रक प्रत्येक वृत्तपत्र संपादकाने छापावयास हवे. जो छापणार नाही त्यास कडक शासन केले जाईल अशी तंबी वासुदेव बळवंतने अँग्लो इंडियनसह सर्व वृत्तपत्रांना दिली व आपण काढलेले परिपत्रक प्रसिद्धीकरता त्यांच्याकडे पाठवून दिले.

मे १८७९ मध्ये सरकारने वासुदेव बळवंत आणि त्याचे साथीदार यांना पकडण्यासाठी घाटावर ३-४ जिल्ह्यात सैन्य रवाना केले तेव्हा त्या सैन्यास बगल देण्यासाठी वासुदेव बळवंतने आपला मोर्चा कोकणाकडे वळविला. कोकणपट्टीतील कुलाबा जिल्हा हे आपले लक्ष्य ठरविले. त्यानी पनवेल तालुक्यातील नेरे गावच्या गोडबोले या सुखवस्तूस व प्रमुख व्यापारी महादेव गोंविद जोशी यांना लुटले व परत जाताना बंदुका उडवीत नेरे गाव सोडले. दुसऱ्या दिवशी चिखले गाव १-२ तासांत लुटले. पळस्पे गावी संस्थानिकासारखे वैभवात राहमारे ओझे हे त्यांचे पुढील लक्ष्य. पळस्पे गावी ओझ्यांच्या वाड्याजवळ येताच रामोशांना दहशत बसविण्याकरिता दगडांची आणि विटांची सरबत्तीवाड्यावर केली आणि ह्या तुकडीचा प्रमुख दौलतराव नाईक याने आप्पासाहेब ओझे यांचे घर लुटले. चांदी सोन्याचे दागिने, भांडी, हिऱ्या-मोत्याचे दागिने सर्व काही बांधून रामोशांनी ओझे यांना रामराम ठोकला आणि ते सर्व बंडवाले वासुदेव बळवंताचे शिरढोण मागे टाकून कल्हई खिंडीतून डोंगरळ प्रदेश ओलांडून घाटावर गेले. लुटारूंच्या ह्या कृत्यामुळे अत्यंत अस्वस्थतेचे वातावरण सर्वत्र पसरले. खेड्यातील सुखवस्तु लोक आपले घरेदारे सोडून मुंबई, पुणे ह्या शहरात येऊन राहू लागले. युरोपियन लोकांवर वासुदेव बळवंतचा जास्त राग होता. कल्याण येथे राहणाऱ्या युरोपियनास कल्याणवर रामोशांचा छापा येणार अशी बातमी समजली तेव्हा त्यांनी आपली बायका-मुले मुंबईस पाठवून दिली. पुण्याच्या युरोपियनांनी संरक्षणासाठी पिस्तुलाच्या खूप गोळ्या खरेदी केल्या.

वासुदेव बळवंताची वक्र दृष्टी पुण्यावर वळली. त्याच्या सैनिकांनी पुण्याच्या विश्रामबाग वाड्यास सैनिकी शिंगांचे निनाद करत आग लावली. लोक ब्युगुलांच्या आवाजाने जागे होऊन सैरावैरा पळू लागले. लोकांची व इंग्रज अधिकाऱ्यांची त्यामुळे भंबेरी उडाली पण आगीचे बंब आणून मिलिटरीच्या सहाय्याने कशीबशी ही विश्रामबाग वाड्याची आग विझत आहे, इतक्यात बुधवार वाडा पेटला. तीही विझविण्याचे काम लष्कराच्या मदतीने करण्यात आले. आता काही तासातच पुणे इंग्रजांच्या हातातून वासुदेव बळवंतांच्या हाती जाणार असे लोक बोलू लागले. पुण्याच्या ह्या आगीने इंग्रज सरकारची झोप उडाली.

पश्चिम महाराष्ट्रात बंड गाजू लागले. १३ मे १८७९ च्या अग्निप्रलयानंतर पुण्यात अवकळा पसरली. बहुतेक वृत्तपत्रांनी विशेषतः “बॉम्बे गॅझेट” [बॉम्बे गॅझे, दिनांक १९ मे १८७९] ने लिहिले की, “प्रस्तुतची पुण्याची अवस्था ही नुसत्या अर्धपोटी असणाऱ्या गरीब लोकांची नाही, तर तिच्या मुळाशी प्रसंगी सहाय्य न करता हसत खिदळत मजा पाहत उभे होते.” तसेच ते या राजद्रोही उठावणीच्या मुळाशी आहेत असे आपल्या लेखात म्हटले.

ह्या कांगाव्यास उत्तर देणारे पत्र सार्वजनिक काकांनी “बॉम्बे गॅझेट” कडे पाठविले व त्यात म्हटले की, “सैन्य किंवा पोलिस येण्याच्या अगोदर नगरपालिकेची अग्निशामक यंत्रे आम्ही स्वतः चालविली आणि भोवतालची घरे वाचविण्यात नि आगीच्या वाड्यातून कागदपत्रे इत्यादी काढण्यात शेवटपर्यंत आम्ही सहाय्य केले.”

आगीच्या कारणाविषयी पुण्यातील लोक निरनिराळे तर्क करू लागले. खबरदारीचा इलाज म्हणून सरकारने पुण्यात संचारबंदी जाहीर केली.

“बॉम्बे गॅझेट” प्रमाणेच “नेटिव्ह ओपिनियन” आणि “इंदुप्रकाश” या देशी वृत्तपत्रांनीही वासुदेव बळवंतच्या मनोरथांची कुचेष्टा करणारे लेख लिहिले होते.

पुण्यात लागलेल्या आगीमुळे वासुदेव बळवंतच्या बंडाचे वृत्त सबंध हिंदुस्थानात पसरले. तसेच ते “लंडन टाईम्स” ने दिनांक १९ मे १८७९ रोजी प्रसिद्ध केले.

बंडाचे पडसाद अशा रीतीने हिंदुस्थानावर व इंग्लंडमध्ये गाजत असतानाच वासुदेव बळवंतचे सैन्य कसारा घाटाच्या बाजूच्या दऱ्याखोऱ्यात राहिले. दिनांक १७ मे १८७९ रोजी ते महिपाल नावाच्या टेकडीवर असता पोलिसांनी त्यांच्यावर फैरी झाडल्या. दैलतराव नाईकाच्या हाताखालील बंडखोऱांनी त्याला गोळ्यांनीच उत्तर दिले आणि आपली जागा सोडली नाही. साध्या पोलिसांना बंडखोर दाद देत नाहीत असे पाहून मेजर डॅनियल आणखी सैन्य घेऊन “बंडखोर” च्या पाठलागावर निघाला. त्याच्या आधीच महिपाल टेकडी सोडून बंडखोरांनी दुसऱ्या उंच डोंगराचा आश्रय घेतल्याचे आढळले. दोन्ही पक्ष समोरासमोर आले. युद्धास तोंड लागले. दौलतरावांने ठिसुबाई नावाच्या उंच टेकडीचा आश्रय घेतला व बचावासाठी प्रतिपक्षावर गोळ्यांचा वर्षाव केला. त्यात डॅनियलचा एक पोलिस आणि एक स्वार ठार झाले. बंडखोरांच्या गोळ्यांच्या माऱ्यात मेजर डॅनियलच्या लोकांची फार सोचनीय अवस्था झाली. त्याचे काही लोक घायाळ झाल्यामुळे दुसरे सैनिक पुढे जाण्यास कचरू लागले. तेव्हा त्याने सर्व सैनिकांस बंदुका देऊन सैन्यासह बंडखोर लपले होते त्या टेकडीवर तो चालून गेला. दौलतरावाने आपल्या साथीदारांस मैदानात येण्याचा हुकूम केला. बंडखोर मैदानात आल्यावर त्यांचेवर डॅनियलने गोळ्यांचा वर्षाव केला. त्यांची स्थिती फारच शोचनीय झाली अभय बाजूचे लोक घायाळ होऊन पडत होते. दौलतरावाचे सैन्य व युद्ध साहित्य कमी होते. तरीपण दौलतरावाने जवळ जाऊन डॅनियलवर गोळी चालविली ती त्याच्या खालच्या दाढीस चाटून गेली लागलीच डॅनियलने नेम धरून दौलतरावावर जवळून चार गोळ्या झाडल्या त्याबरोबर दौलतराव जमिनीवर कोसळला. त्याचे सैनिक जीव बचावण्यासाठी पळून जात होते. त्यांचा पाठलाग करून

डॅनियलच्या लोकांनी त्यांपैकी घायाळ झालेले चारजण पकडले. ठिसुबाईचे युद्ध संपवून विजयश्री घेऊन डॅनियल पुण्यास परतला.

म. स्वा. ल.- १२

ठिसुबाई टेकडीवरील चकमकीस वृत्तपत्रांत प्रसिद्धी मिळाली. आगलाव्यांना हुडकण्यासाठी पुण्यात सक्त शोध सुरू झाला होता. पुण्यात गुप्तहेरांचा सुळसुळाट होऊन त्यांच्या फेऱ्यांचा नागरिकांना त्रास होऊ लागला. पुण्यात सरकारी दडपशाहीचा धिंगाणा सुरू झाला. वासुदेव बळवंताच्या बंडाच्या बातम्या संबंध दिंदुस्थानभर पसरल्या इंग्लंडमध्ये वृत्तपत्रे वासुदेव बळवंताच्या उठावाच्या स्वरूपाची चर्चा करू लागली. सरकारहितैशी लोकांनी पार्लमेंटमध्ये त्याविषयी प्रश्न विचारले. लडंनमध्ये वासुदेव बळवंताच्या बंडाचे पडसाद उमटले तेव्हा तो स्वतः त्या बातम्या वृत्तपत्रांत वाचून पुढील योजना आखीत होता.

पुण्याच्या आगीच्या संदर्भात जी धरपकड झाली त्यात केशव रानडे या नावाचा इसम सापडला. त्याने मॅजिस्ट्रेटपुढे साक्ष दिली की आम्ही हे कृत्य बंडवाल्यांच्या दबावाखाली त्यांनी आम्हास पैसे व दागिने दिल्यामुळे व तुम्ही हे काम न केल्यास त्याचे परिणाम वाईट होतील हे सांगितल्यामुळे केले. रानडे नावाचा इसम ह्या आगीच्या संदर्भात सापडल्यामुळे सरकारने न्या. मू. रानड्यांचा ह्या प्रकरणी संश्य घेऊन त्यांची बदली धुळ्यास केली. न्यायमूर्ती रानडे यांना हा जाच वासुदेव बळवंत यास शिक्षा होईपर्यंत सोसावा लागला.

वासुदेव बळवंत अज्ञातवासात दिवस काढू लागला. कोकणची लूट घेऊन दौलतराव येईल अशी अशा त्याला आशा वाटत होती, ती दौलतरावाच्या मृत्युमुळे फोल ठरली. त्यानंतर त्याने चांदखेड लुटले. लुटीतील पैसा रामोशी लाटू लागले, शिवाय वर पगार मागू लागले. हे पाहून त्यास चिंता निर्माण झाली.

अशी बाह्या जगाची चिंता करीत असता त्यांच्या खिळखिळ्या प्रकृतीने आणखी निराशेची भर टाकली. डोंगराळ जीवनात त्याला पराकाष्ठेचे हाल सोसावे लागले. त्यामुळे त्यास जोराचा ताप आला. शारिरीक आणि मानसिक दौर्बल्याने तो कंगून गेला.

कार्यसिद्धीचा विचका झालेला, शरीर तापाने फणफणलेले, पुण्यात कित्येक लोकांचा त्याच्यामुळे छळ चाललेला. अशा मनःस्थितीत वैराग्य वृत्तीकडे वासुदेव बळवंत झुकला. तो विरक्त वृत्तीने राहू लागला. पुण्याहून तो गाणगापुरास आपले आराध्य दैवत श्रीदत्त याचे दर्शन घेण्यासाठी गेला. त्याने दत्ताला नमस्कार करून आपल्या जवळचे सोने व रूपे त्या दैवताला अर्पण केले. गामगापुरास काही दिवस राहून तो निजामी हद्दीत लातूरला गेला. तदनंतर शहाबादला भेट दिली व तिथून श्री शैलमल्लिकार्जुन क्षेत्र गाठले. दैवीशक्तीचे पाठबळ असल्याशिवाय आपणास कार्यात यश येणार नाही असे त्याला वाटू लागले म्हणून त्याने अन्नत्याग करून मंदिरातील मूर्तिसमोर बैठक मारली आणि तो ईशप्रार्थनेच्या सुत्रांचा जप करू लागला. त्याचा ताप अद्याप उतरला नव्हता. प्रकृती क्षीण होत चालली होती, जगाचा निरोप आपल्याला लवकरच घ्यावयाचा आहे हे लक्षात घेऊन त्याने आपले आत्मचरित्र एका लेखकांस तोंडी सांगितले व पुरे केले. अशा रीतिने वासुदेव बळवंतने प्राणत्याग करण्याची तयारी केली. तेव्हा ह्या कृश शरिराच्या योग्यास श्री शैलमल्लिकार्जुनाच्या पुजाऱ्याने त्याजशी मायेने बोलून प्राणार्पणाच्या त्याच्या वेडापासून त्यास परावृत्त केले.

अनुक्रमणिका

तेव्हा शरीरस्वास्थ्यासाठी वासुदेव बळवंतने श्रीशैलमल्लिकार्जुनी काही दिवस काढले आणि प्रकृती सुधारण्यासाठी तो गाणगापूरास येऊन “काशीकर बाबा” हे नाव धारण करून राहू लागला. गाणगापूरवासी मित्र महाजन आणि गोगटे या द्वयांनी “काशीकर बाबाची” बडदास्त ठेविली. त्यामुळे त्याची ढासळलेली प्रकृती सुधारली. तेव्हा पुनःश्च त्याने आपले उद्योग सुरू केले. ह्या खेपेस त्याने रामोशांचा नाद सोडून निजाम हद्दीतील रोहिल्यांची सेना आपल्या मित्रांच्या सहाय्याने उभी केली.२२अ शस्त्रास्त्रे जमविली, युद्धक्षेत्राचे नकाशे काढले, बंदुका मिळविल्या, दोनशे घोडेस्वार. चाकरीस ठेवण्याचा संकल्प सोडला. रोहिल्यांनी आगाऊ पैसे मागितले त्या रकमेची जमवाजमव करण्यासाठी वासुदेव बळवंतने पंढरपूरला जाण्याचे ठरविले. पैसे मिळाल्यावर अहमदनगर आणि अकोला जिल्ह्यांमध्ये त्याचप्रमाणे नाशिकपासून सातपुडा पर्वताच्या डोंगराळ प्रदेशापर्यंत आपल्या उठावणीचा व्याप पसरविण्याचा वासुदेव बळवंतचा मानस होता. ह्याच वेळी बागलाण, अहमदनगर, बेळगाव इत्यादी ठिकाणी लुटांरूचे छापे वासुदेव बळवंतच्या नावे घातले जात होते. वास्तविक वासुदेव बळवंतचा ह्या छुप्यांशी काही संबंध नव्हता. वासुदेव बळवंताची उठावणी दडपण्यासाठी गोऱ्या सैनिकांची पथके फिरत होती. लंडन टाईम्सने दिनांक ३ जून १८७९ रोजी वासुदेव बळवंतवर सर्वात मोठा अग्रलेख लिहिला व त्यात लिहिले की, “सरकारने सारापद्धतीमध्ये सुधारणा करून शेतकऱ्यांना सुखी करणाऱ्या सुधारणा ताबडतोब अंमलात आणाव्या म्हणजे हे बंड थंडावेल” लंडन टाईम्स आपल्या ९ जूनच्या वृत्तात म्हणतो की या आंदोलनाचा संघटक वासुदेवबळवंत फडके हा अजून मोकळाच आहे.

आता वासुदेव बळवंतला पकडण्यासाठी सरकारची धावपळ सुरू झाली. त्यास गती आली ती सरकारच्या धावपळीची टिंगल करणारी पत्रे पुण्यातील अधिकाऱ्यांस मिळाल्यामुळे. पावसाळा संपल्यानंतर वासुदेव बळवंतच्या कारवायास अधिक जोर येईल, तेव्हा वासुदेव बळवंतास त्वरेने पकडले पाहिजे असा निर्धार सरकारने केला. त्याप्रमाणे चक्रे फिरू लागली. प्रथमतः वासुदेव बळवंतच्या सर्व नातेवाईकांस शोधून त्यांना एकत्र आणले, बंदिस्त केले. वासुदेव बळवंतचा ठावठिकाणा असण्याचा संभव असेल अशा घरांच्या वारंवार झडत्या घेतल्या. जुन्नर येथे असलेल्या आपल्या पत्नीस भेटण्यास वासुदेव बळवंत जात असेल, असे समजून तिला चाळीसजणांच्या पहाऱ्यात शिरढोण येथे आणून ठेवले.

पुण्यात झडत्या, शोध, चौकशा ह्यांना ऊत आला होता. पुण्यामध्ये जुलै महिन्यात शोधाचा हा धुमाकुळ चालला होता. तेव्हा वासुदेव बळवंतचा खरा ठावठिकाणा कोणासही माहीत नव्हता. बंडाच्या उपशमासाठी गोरे व एतद्देशीय असे पंधराशे सैनिक सर्व भागात खपत होते. बंड दडपण्याच्या कामगिरीवर सर्वश्रेष्ठ अधिकारी मेजर डॅनियल होता. ह्याने ऐकीव बातम्यांवरून वासुदेव बळवंतचा ठावठिकाणा शोधण्यासाठी हैदराबादला भेट दिली, देवळे धुंडाळली पण त्यास वासुदेव बळवंतचा सुगावा लागला नाही.

पण दुर्दैव असे की, वासुदेव बळवंत यास गाणगापुरास पाहिल्याची बातमी एका बाईने पुराण श्रवणास देवलात गेली असता दुसऱ्या बाईस सांगितली. ही बातमी त्या बायकात असलेल्या हवालदाराच्या बायकोने ऐकली आणि ती तिने आपल्या नवऱ्यास सांगितली. वासुदेव बळवंतास पकडून देणाऱ्यास सरकारने बक्षीस जाहीर केले होते. त्या बक्षिसाच्या लोभाने ह्या हवालदाराने ते वृत्त पुण्याचे फौजदार हरिनारायण यांना कळविले आणि त्याने ते मेजर डॅनियल यास सांगितले. मेजरने गव्हर्नरास भेटून वासुदेव बळवंतास पकडण्याची व्यवस्था केली. मेजर डॅनियलने वासुदेव बळवंतला ओळखणारी दोन माणसे बरोबर घेऊन तो गाणगापुरास आला. वासुदेव बळवंतास हे समजल्यावर त्याने गाणगापूर सोडले व पंढपरपूरच्या बाजूस तो वेगाने निघाला पंढरपुरी भीमानदी ओलांडून तो शिंदगी नावाच्या खेड्यात आला. एक रात्र

अनुक्रमणिका

विश्रांती घेऊन तो दुसऱ्या दिवशी नारायणपूर येथे आला व त्वरेने गाव देवरनावडगीकडे निघाला. बरोबर त्याचा साथी गोपाळ मोरेश्वर होता.

इकडे डॅनियल साहेबाने भीमेवर येऊन ज्या मीरसाहेबाने वासुदेव बळवंतास पलिकडे नदीपार पोहचविले होते त्यास पकडले व त्याजकडून वासुदेव बळवंताचे वृत्त मिळविले. भीमेपार झाल्यावर मेजर डॅनियलने आपले घोडेस्वार दुप्पट वेगाने दौडविले व स्वतः माहिती काढत शिरसगी, धिंबी खुर्द या गावातून दौडत २० जुलै रोजी रात्री देवरनावडगी या गावी आला. हे गाव विजापूर जिल्ह्यात त्यावेळच्या निजामाच्या सीमेपासून सहा मैल आत आहे. त्याच गावात वासुदेव बळवंतने चार दिवस अहोरात्र प्रवास करून प्रवेश केला होता. सततच्या श्रमाने त्याचे शरीर थकले होते. पायात त्राण नव्हते, अंगात बारीक ताप होता. अशा स्थितीत त्यास विश्रांतीची अत्यंत गरज होती. विश्रांती घेण्यासाठी त्या गावातील डोंगराच्या कुशीत असलेल्या भव्य बुद्ध विहारात प्रवेश केला आणि तो आपला विश्वासू साथीदार गोपाळ मोरेश्वर साठे याजबरोबर निद्राधीन झाला.

मेजर डॅनियल त्याच्या पाठलागावर होताच. धिंबी खुर्द गावी आल्यावर वासुदेव बळवंत देवरनावडगीत आश्रय करील अशी त्याच्या कानाशी पाल चुकचुकली म्हणून तोही देवरनावडगीत आला आणि त्याने गावच्या चावडीवर शोध घेतला तेव्हा कोणीतरी दोन माणसे रात्री विहाराच्या बाजूस निजण्यासाठी गेली अशी माहिती त्याला मिळाली, तेव्हा डॅनियल स्वतःमदतनीस स्टीफन्सन आणि सय्यद अबदुल हक यांजसह विहाराकड पायी गेला. विहारात कंदिलाच्या प्रकाशात दोन माणसे झोपलेली डॅनियलला दिसली. त्याने निद्रस्त वासुदेव बळवंतला ओळखले आणि दक्षता म्हणून त्याने आपले पिस्तुल सरसावले व आपल्यबरोबर असलेल्यांना शस्त्रे सिद्ध ठेवण्यास सांगितले आणि स्वतः त्यास गदागदा हलवून जागे केले आणि तुला मी पकडले आहे तेव्हा तू माझ्या स्वाधीन हो म्हणून करड्या आवाजात सांगितले.२३ तेव्हा वासुदेव बळवंतने त्यास द्वंद्वयुद्ध खेळण्याचे आव्हान दिले. डॅनियलच्या पकडीतून सुटण्याचा व्यर्थ प्रयत्न केला कारण वासुदेव बळवंत आणि त्याचा साथीदार गोपाळ मोरेश्वर हे दोघे होते व डॅनियलची सशस्त्र माणसे अनेक होती. शेवटी दोघांची झटापट होऊन वासुदेव बळवंत व त्याच्या साथीदारास शृंखलाबद्ध करण्यात आले. गावच्या चावडीवर नेऊन त्यांची दुसऱ्या दिवशी २१ जुलै १८७९ रोजी झडती घेण्यात आली.

मंगळावर दि. २२ जुलै रोजी दुधणी गावाहून ह्या कैद्यांना घेऊन ब्रिटिश लष्करी अधिकारी निघाले ते दुसऱ्या दिवशी पहाटेस पुण्यास आले. वासुदेव बळवंतला पुण्यात एका कोठडीत बंदिस्त ठेवण्यात आले आणि त्याजकडून आपणास हवी असलेली माहिती त्याचा अनन्वित छळ करून काढण्यास सुरुवात केली. त्या अगोदरच सर्व हिंदुस्तानभर व इंग्लंडला वासुदेव बळवंतला पकडल्याची बातमी ठळक अक्षरात सर्व वर्तमानपत्रांनी छापली होती. २४ लोकांनी ती वाचल्यावर त्याजविषयी प्रेम असलेल्या सर्वांना हळहळ वाटू लागली.

त्याजकडून त्याने केलेल्या कृत्यांची माहिती काढून घेण्यासाठी त्याचा अनन्वित छळ चालला होता हे वर सांगितले आहे.त्या स्वाभिमानी क्रांतिकारकाने छळ सहन केला पण माहिती सांगितली नाही. छळातून मुक्त होम्यासाठी त्याने कोठडीतच गळफास लावून गुरूवार दि. २४ जुलै ह्या दिवशी आत्महत्येचा प्रयत्न केला. पण पहारेकऱ्यांच्या दक्षतेमुळे तो फसला. वासुदेव बळवंताच्या आत्महत्येची पुनरावृत्ती होऊ

अनुक्रमणिका

नये म्हणून सरकारने युरोपियन सैनिकांचा कडक पहारा बसविला व अटकेपासून आठवडाभर वासुदेव बळवंतचा छळ केला.

सरकारने वासुदेव बळवंतास पकडल्यानंतर त्याच्याशी संबंध असल्याच्या संश्यावरून मुंबई प्रांतभर झडत्या, अटक आणि शोध सुरू झाले, ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात हैदराबादेतील काही कटवाल्यांना पकडण्यात आले. पुण्यातील बहुतेक सार्वजनिक स्थळांची झडती घेण्यात आली. धरपकड, झडत्याव अटक ह्याचे सत्र महाराष्ट्रात सुरू झाले. तेव्हा भाग घेतलेल्यांपैकी कोही लोकांनी पुरावे नष्ट करून भीत भीत दिवस काढले, तर कित्येकानी पुण्यातून फरारी होऊन पुण्यापासून दूर जाऊन दिवस काढले.

पकडल्यापासून दोन महिनेपर्यंत वासुदेव बळवंतला कोर्टापुढे उभे करण्यात आले नाही. वासुदेव बळवंतने सरकारला पत्र पाठवून त्याची आठवण करून दिली. तेव्हा तिसऱ्या महिन्याच्या शेवटी वासुदेव बळवंतवर कोर्ट केश सुरू झाली. कोर्ट केस सुरू होण्याअगोदर पुण्यातील न्या. रानडे आदि देशभक्त विचारवंतांनी वासुदेव बळवंतचा बचाव करण्याचा विचार करून त्या कामी "सार्वजनिक काका " म्हणून प्रसिद्ध असलेले गणेश वासुदेव जोशी यांनी त्याचे वकीलपत्र घेण्याचे ठरविले.

दि. २२ ऑक्टोबर १८७९ रोजी वासुदेव बळवंतचीकेस पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट मि. आल्फ्रेड केसर याच्या पुढे उभी राहिली एकंदर सोळा इसमांना वासुदेव बळवंतबरोबर आरोपी म्हणून गोवण्यात आले होते. पहिल्याच दिवशी ह्या केसचे काम पाहण्यासाठी व वासुदेव बळवंतला पाहण्यासाठी शेकडो पुणेकरांनी कोर्टात गर्दी केली होती. सरकारच्या वतीने काम चालविण्यास मुंईचे सरकारी वकील आले होते. सर्व आरोपींना हातकड्या घालून सशस्त्र पहाऱ्यांत कोर्टात आणण्यात आले होते.

मॅजिस्ट्रेटने सरकारी वकीलास वासुदेव बळवंतचे वकीलपत्र कोण घेणार असे विचारले. सरकारी वकीलने ह्याबाबत स्वतःस काही माहिती नसल्याचे सांगितले. इतक्यात सार्वजनिक काका न्यायालयात येण्यास उशीर झाल्यामुळे घाईघाईने आत शिरले आणि वकिलाच्या जागेवर जाऊन उभे राहून धीरगंभीर आवाजात न्याधिशांना म्हणाले,- "वासुदेव बळवंतांचे वकीलपत्र घेण्यासाठी मी आलो आहे." हे ऐकून प्रेक्षकवर्ग एकदम स्मिमित झाला. वासुदेव बळवंतला आपल्या देशभक्तीची कदर पुणेकरांस असल्याचे मनोमनी वाटले. सार्वजनिक काकांच्या वकीलपत्र घेण्याच्या घोषणेने इंग्रज मॅजिस्ट्रेट चक्रावून गेले. त्याने काकांच्या वकीलपत्रांस संमती देऊन पुढील कामास प्रारंभ करण्यास सरकारी वकील फर्माविले.

केसच्या पहिल्या दिवशी बुधवार दि. २२ ऑक्टोबर रोजी मेजर डॅनिअल आणि इतर ११ साक्षीदारांच्या साक्षी झाल्या. त्यानंतर वासुदेव बळवंतचा मेव्हणा वल्लाळ काशीनाथ कुंटे, अर्जुना व गणू रामोशी यांनी साक्षी दिल्या. सांयकाळी वासुदेव बळवंताची भेट सार्वजनिक काकानी वकील म्हणून घेतली. शेवटी कोर्ट उठल्यावर वासुदेव बळवंत आणि इतर आरोपींना निरनिराळ्या कोठडीत बंदिस्त ठेवण्यात आले. दुसऱ्या दिवशी खटला चालू झाला तेव्हा रामोशी यांच्या साक्षी झाल्या पण त्यांनी काही सांगण्याचे नाकारले. मात्र सरकारला हवी असलेली माहिती रंगनाथ मोरेश्वर महाजन या इसमाने आपल्या साक्षीत दिली कारण मित्र म्हणून अज्ञातवासात वासुदेव बळवंत त्याच्याकडे रहात होता व त्यास वासुदेव बळवंताच्या गुप्तकारवायांची माहिती होती. दि. २५ ऑक्टोबरच्या साक्षीत त्याने हैदराबादहून आलेले पत्र कोर्टात वाचून दाखविले. त्यांत वासुदेव बळवंत हा एक असामान्य देशभक्त असून त्याने आपले सर्व जीवन देशकार्यासाठी वेचिले आहे असा उल्लेख होता. नंतर हैदराबाद येथील पाच रोहिल्यांची साक्ष झाली. तीत

वासुदेव बळवंतने आखलेल्या नवीन सेनेच्या उभारणीच्या योजनांचा वृत्तांत आणि त्यासाठी झालेल्या लेखी कराराचा वृत्तांत साक्षीदारांनी सांगितला. या साक्षीदारांची उलटतपासणी आपण सेशन्सपर्यंत राखूनठेवीत आहे असे वासुदेव बळवंतांचे वकील सार्वजनिक काका यांनी सांगितले. तद्नंतर कोर्टाने उठण्यापूर्वी वासुदेव बळवंताच्या विनंतीवरून त्यास दर दिवशी व्यायाम करण्याची व उघड्यावर फिरण्याची सवलत देण्यास शासनास सांगितले.

प्राथमिक चौकशीचा शेवटचा दिवस सोमवार दि. २७ ऑक्टोबरचा होता. त्या दिवशी वासुदेव बळवंतने आपल्या बचावाचे भाषण केले. आपल्या भाषणातील मुद्द्यांच्या खरेपणासाठी आपल्या दैनंदिनीतील (मेमॉयर) उतारे कोर्टास वाचून दाखविले. छापे घालण्यात आपला हेतू वाईट लोकांना पोलिसांच्या ताब्यात द्यावयाचा होता. मलासरकारला सहाय्य करावयाचे होते अशा प्रकारची वक्तव्येव प्रश्नोत्तरे सबंध दिवस चालली. वासुदेव बळवंतने आपल्या वतीने २३ साक्षीदारांची नामावली कोर्टास आपल्या वकीलातर्फे सादर केली.

नंतर वासुदेव बळवंतविरुद्ध आरोपपत्र भरण्यात आले. त्यात इंग्रज सरकारविरुद्ध सशस्त्र युद्ध पुकारणे, ह्या युद्धासाठी माणसे, दारूगोळा, शस्त्रास्त्रे गोळा करणे, सराईतपणे दरोडे घालणे वगैरे आरोप होते आणि त्यांतील एकेक आरोपाबद्दल फाशीची शिक्षा देण्याची सुचविले होते. ह्यानंतर त्यांची केस सेशन्स कोर्टात पाठविण्यात आली व त्या दिवशीचे काम न्यायधिशांनी संपविले.

सोमवार दि. ३ नोव्हेंबर १८७९ रोजी सेशन्स कोर्टात वासुदेव बळवंताची केस सुरू झाली. वासुदेव बळवंत आणि त्याचे सहकारी ह्यांच्यावर दंड विधानाच्या निरनिराळ्या विभागाखाली भरलेले आरोप औपचारिपणे वाचून दाखविण्यात आले. पाच ज्युरी नेमण्यात आले. ज्युरींची निवड झाल्यावर वासुदेव बळवंताच्या वतीने चिमणाजी आपटे याने आपले वकीलपत्र सादर केले. त्याचे सहाय्यक म्हणून पांडुरंग लाटे नावाचे वकील काम पाहू लागले.

सरकारी वकील नानाभाई हरिदास याने वासुदेव बळवंत याजवर ठेवलेल्या आरोपांची यादी वाचून दाखविली. त्यात प्रामुख्याने तीन मोठे आरोप होते. प्रस्थापित सरकारविरुद्ध सशस्त्र युद्ध पुकारणे,त्यासाठी शस्त्रे व पैसा गोळा करणे, दरोडेखोर मंडळींचा सदस्य असणे व दरोडे घालणे असे ते आरोप होते. त्यापैकी त्याचा मुख्य उद्देश ब्रिटीश राज्य उलथून पाडण्याचा व ते नष्ट करण्याचा. त्यासाठी त्याने माणसे आणि पैसा दरोडे घालून जमविला. त्याचवेळी दुर्दैवाने देशात मोठा दुष्काळ पडला होता. दुष्काळात मरणाऱ्या माणसांची दुःस्थिती पाहून त्याला वाटले की ब्रिटिश सरकारविरुद्ध उठावणी करण्यास ही संधी बरी आहे. दुष्काळी जिल्ह्यातून बरेच बेकार लोक हिंडू लागले होते. त्यांच्यापैकी बहुतेक लुटारू जातीचे होते. त्यांची आपल्या सैन्यात भरती करविली.

पुण्यातच आपल्या उद्योगाला त्याने प्रारंभ केला. बंदुक उडविणे, नेम धरणे, शारिरीक सामर्थ्य वाढविणारे खेळ खेळणेइ. कला शिकविण्यासाठी त्याने वर्ग उघडले. पुण्याच्या शेकडो विद्यार्थ्यांना त्याने पारंगत केले. त्याने राजद्रोह करणारी भाषणे दिली. रामोशांशी संबंध प्रस्थापित करून त्यांना आपल्या सैन्यात ओढले. वासुदेवाचे पुढील उद्योग यशस्वी होण्याच्या अधीच त्याला तलवार आणि शस्त्रास्त्रे ह्यांसह पकडण्यात आले. तसे झाले नसते तर वासुदेवाने केवढा हाहा:कार उडविला असता ह्याची कल्पना करवत नाही असे सांगून सरकारी वकिलाने ज्यूरीस आपले मत, होणाऱ्या साक्षी ऐकल्यावर पूर्ण विचारवंती

देण्याची विनंती केली. तद्नंतर वासुदेव बळवंतास पकडणाऱ्या मेजर डॅनियलची साक्ष झाली. त्याने आपण वासुदेव बळवंतास पकडण्यासाठी सुरूवातीपासून कसे प्रयत्न केले हे सांगितले. शेवटी परशुराम नारायण पाटणकर, वासुदेवाचा मेव्हणा केशव काशीनाथ कुंटे आणि इतर बावीस आसामींच्या साक्षी झाल्या. त्यांतील रंगोपंत महाजन हा माफीचा साक्षीदार बनला. रोहिले साक्षीदारांनी सांगितले की, "बंडासाठी पाचशे रोहिल्यांची भरती करण्याचे वासुदेवने ठरविले होते." तद्नंतर वासुदेव बळवंतला भाषण करण्याची संधी दिली. त्याने आपले व्यक्तव्य आत्मचरित्र व दैनंदिनी यांच्या आधारे केले.

"हिंदी जनता उपासाने मरत असता ब्रिटिश लोक लठ्ठ पगार घेत आहेत. हिंदी माणसाला शेकड्यातून एखादी मोठी जागा द्यावयाची आणि डांगोरा पिटायचा की हिंदी लोकांना आम्ही मोठ्या औदार्याने वागवित आहोत आणि त्यांना मोठ्या जागा देत आहोत, इंग्रजांना आयात होणाऱ्या इंग्लीश मालावरची जकात लगलीच रद्द केली.युरोपियन लोकांस हिंदुस्थानातील लोकांपेक्षा लाखो रुपये जास्त दिले जातात. दुष्काळी कामे करणाऱ्यांस प्रत्येकी दीड आणि मजुरी रोज दिली जाते. अशा प्रकारची परकीय सरकारने चालविलेली फसवणूक, उपासमारीने मरत असलेल्या गरिबांचे हाल, त्यांची दुःखे पाहून माझा देशाभिमान जागृत झाला आणि म्हणून मी ब्रिटीशांविरुद्ध सशस्त्र बंड पुकारले. चांगल्या पायावर उभारलेले लहानसे बंड उभारून आपले राज्य परत मिळविणे ह्या हेतूने मी सैन्य घेऊन कार्य सुरू केले; शेवटी मला यश आले नाही. मी अयशस्वी झालो. पण मी हे सर्व देशासाठी केले. अहो हिंदुस्थानवासी लोकहो, माझ्यामुळे तुम्हाला काही सुद्धा लाभ झाला नाही, मी माझे उद्दिष्ट साध्य करू शकलो नाही. त्याविषयी मला क्षमा करा."

शेवटी ब्रिटिश सरकारचे वकील नानाभाई हरिदास याने सरकारची बाजू मांडणारे भाषण केले व वासुदेव बळवंतने ब्रिटिश राज्य उलथून टाकण्याचा कट केला हे सिद्ध झाले आहे असे सांगितले. ह्यानंतर वासुदेव बळवंतचे वकील महादेव चिमणाजी आपटे यांनी बचावाचे जोरदार भाषण केले. त्यात वासुदेव बळवंतने सरकारविरुद्ध युद्ध पुकारल्याचे, त्यासाठी माणसे व पैसा गोळा केल्याचे, राजद्रोहाचा आणि फुटीचा आरोप कसे खोटे आहेत हे आपल्या अस्खलीत युक्तीवादाने कोर्टास दाखवून दिले. वासुद्व बळवंतला वाचविण्यासाठी पांडित्ययुक्त प्रदीर्घ व सुंदर भाषण ऐकून न्यायालयातील श्रोते दिपून गेले.न्यायमूर्ती वासुदेव बळवंतास म्हणाले की कोर्टास काही सांगावयाचे असल्यास तू सांगू शकतोस. तेव्हा वासुदेव बळवंताने आपणास काही सांगावयाचे नाही असे सांगितले.

दुसऱ्या दिवशी नऊ वाजता निकाल ऐकण्यासाठी लोकांनी कोर्टाचे आवार भरून गेले होते. न्यायमूर्ती न्युन हॅम ह्यानी पंचांना आपले मत देण्यास सांगितले. पंचांनी सरकारने ठेवलेले आरोप सिद्ध झाल्याचे एकमुखाने जाहीर केले. तदनंदर न्यायाधिशानी इतर आरोपींना दहा दहा बारा बारा वर्षांच्या सक्तमजुरीच्या शिक्षा ठोठावल्या आणि वासुदेव बळवंत यास ब्रिटिश सरकार उलथून टाकण्याच्या प्रयत्नाबद्दल काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली. शिक्षा ऐकून वासुदेव चिंताक्रांत देशबांधवांकडे वळून म्हणाला, "पारतंत्र्याच्या ह्या असह्य जीवनातून आपणास सोडविण्यासाठी न्यायालयाने हा निर्णय देऊन कृपा केली आहे." सशस्त्र पोलिसांच्या पहाऱ्यात वासुदेव बळवंत यास कोर्टातून नेत असता जमलेला सहस्त्रावधी जनसमुदाय वासुदेव बळवंत फडकेचा जयजयकार करीत होता. (बॉम्बे गॅझेट, दि. १० नोव्हेंबर १८७९).

[अनुक्रमणिका](#)

वासुदेव बळवंत यास शिक्षा झाल्यावर त्याविषयी एक ध्येयवेडा देशभक्त असे मथळे देऊन एतद्देशीय वृत्तपत्रांनी आपले प्रेम व्यक्त केले होते. तसेच महाराष्ट्रातील देशभक्त वृत्तपत्रांनी वासुदेव बळवंतावर स्तुतिसुमने उधळली. त्याचप्रमाणे महाराष्ट्राबाहेर देशभर राष्ट्रीय वृत्तपत्रांनी त्याच आशयाचे अग्रलेख लिहीले. अमृतबझार पत्रिकेने (१५ नोव्हेंबर १८७९) एक अग्रलेख लिहून फडक्यांची प्रजासत्ताक राज्य स्थापण्याची कल्पना, त्यासाठी प्राणार्पण करण्याची त्याची सिद्धता हे लक्षात घेतले म्हणजे सातपुडा पर्वतांच्या रांगेसमोर हिमालय पर्वत जितका उंच दिसेल तितकेच सर्वसामान्य माणसाहून फडके थोर असलेला तुम्हाला दिसेल असा शेवट केला.

वासुदेव बळवंत यास शिक्षा झाल्यावर पुण्याहून ठाणे तुरुंगात हालविण्यात आले. ठाण्यास जाम्यासाठी त्याला आगगाडीत बसविले.हजारो लोकांनी त्याच्या नावाचा जयजयकार केला. गाडी ठाण्यास आल्यावर त्याला बंद गाडीत घालून ठाणे तुरुंगात नेले. त्याला दिलेली जन्मठेपेची शिक्षाही फारच कडक शिक्षा चुकून दिली गेली ती सौम्य व्हावी म्हणून मुंबई हायकोर्टास वासुदेव बळवंतातर्फे अपील करण्यात आले. पण हायकोर्टाने काळ्या पाण्याची शिक्षा कायम केली. मात्र वासुदेव बळवंतास अंदमानाऐवजी एडन द्विपकल्पावर पाठवावे असा शेरा मारला. ५ जानेवारी १८८० रोजी वासुदेव बळवंतला एडनला घेऊन जाणाऱ्या बोटीने मुंबई बंदर सोडले. एडनची हवा मनुष्याला त्रासदायक असते. तेथील माणसे त्या हवेने व्याकूळ होतात, मग कैद्याचा टिकाव कसा लागायचा ? ९ जानेवारीस बोट एडनला आली. एडन येथे वासुदेव बळवंत यास एकट्यालाच एका कोठडीत ठेवण्यात आले आणि कारागृहात त्याचा छळ सुरू झाला. दोन दोन महिने तेलाच्या घाण्यास त्याला जुंपून देण्यात येई. लंगोटी नेसून सकाळी दहा वाजेपर्यंत काम करावे. सारखे फिरत राहिल्याने चक्कर येत असे. ह्या छळातून निसटण्यासाठी त्याने १२ ऑक्टोबर १८८० या दिवशी तुरुंगातून पलायन केले.

त्याला पकडण्यासाठी दुसऱ्या दिवशी घोडेस्वार निघाले. दुसऱ्या दिवशी ३ वाजता त्यास त्यांनी पुन्हा पकडले आणि सैनिकी पहाऱ्यात एडनलाच आणून ठेविले. त्याच्या पायात जड बेड्या ठोकण्यात आल्या. अधिक कष्टाची कामे देण्यासाठी व पळून गेल्याचा गुन्हा केला म्हणून त्यावर कोर्ट बसविले व त्यास अधिक शिक्षा फर्माविण्यात आली. जन्मठेपीच्या कष्टाने त्याचे शरीर पिचत चालले. मुद्रा फिकट झाली. क्षयरोगाने त्यास पछाडले आणि १८८१ च्या मध्यास त्याने अन्नत्याग केला. प्रायोपवेशन सुरू केले. त्यापासून परावृत्त करण्याचे काम एडनला राहणारे डॉ. बर्वे यांनी केले. क्षयरोगाचा भर इतका झाला की तो अस्थिपंजर होऊन अंथरूणास खिळला. तेव्हा हा रोगी आता पळून जाणार नाही अशी ब्रिटिश सरकारची खात्री होऊन त्याच्या बेड्या १५ जानेवारी १८८३ रोजी काढून टाकण्यात आल्या. तरीपण बर्वे यांना रोगजर्जर झालेल्या वासुदेव बळवंतास फार दिवस वाचविता आले नाही. एडनच्या कारागृहात भारतीय स्वातंत्र्यार्थ लढलेल्या या आद्य क्रांतिकारकाला १७ फेब्रुवारी १८८३ २५ या दिवशी मृत्युने झडप घातली. एडनच्या किनाऱ्यावरच त्याच्या मृतदेहास अग्नी देण्यात आला.

मात्र हिंदुस्थानात वासुदेव बळवंतने पेटविलेली स्वातंत्र्याची ज्योत हजारो तरूणांच्या ह्रदयात मोठी मोठी होत गेली. स्वातंत्र्यासाठी तरूण मने अधिक धडपडू लागली. म्हणता म्हणता १८८५ साल उजाडले. ह्या तरूण मनाला राष्ट्रकार्य करण्याची संधी मेजर हयूम ह्या इंग्रजी गृहस्थाने इंडियन नॅशनल काँग्रेस नावाची संस्था स्थापन करून दिली.

अनुक्रमणिका

आधार: १. शिरढोण हे पनवेल – महाड मार्गावर पनवेलपासून ३ मैलावर आहे. २. वि. श्री. जोशी, आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, पृ. १८. ३. वा. ल. करंदीकर, वासुदेव बळवंत फडके, पृ. ११, १२. ४. बाळशास्त्री हरदास, क्रांतिकारकांचा इतिहास, पृ. २०. ५. रा. ग. बोरवणकर, महाराष्ट्राचा स्वातंत्र्यवीर वासुदेव बळवंत फडके यांचे चरित्र, पृ. ७. ६. गृ. भ. वैद्य, आद्य क्रांतिकारक वासुद्व बळवंत, पृ. १७. ७. वि श्री. जोशी, आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके,पृ. ३१. ८. बाळशास्त्री हरदास, क्रांतिकारकांचा इतिहास पृ. २०, ९. वि. श्री. जोशी. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, पृ. ३५, १०. श. ग. बोरवणकर, महाराष्ट्राचा स्वातंत्र्यवीर वासुदेव बळवंत फडके यांचे चरित्र, पृ. ३५. ११. के. श्रीपती शस्त्री, वासुदेव बळवंत फडके, पृ. ८.१२. न. र. फाटक, महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र, पृ. १८२. १३. बॉम्बे गॅझेट, दि. २६ जून १८७९. १४. पूना ऑब्झर्व्हर दि. ४ ऑगस्ट १८७९. १५. टिकेकर पाध्ये, आजकालचा महराष्ट्र पृ. ३०६.१५. अ.य बाळशास्त्री हरदास भारतीय स्वातंत्र्य समर. १८५७ ते सुभाष, पृ. ९०. १६. बॉम्बे अकाइव्हज जे. डी. व्हॉ. नं. ५८-५९, केस नं. १५३ वा बळवंत (१८७९-८०). १७ बॉम्बे अकाइव्हज, जे डी, व्हॉल्यूम (१८७९- ८०)फाईल नं. ५८-५९. केस न. १५३, १८.ज्ञानप्रकाश, २० मार्च १८७९.१९ जे डी व्हॉल्यूम (बॉम्बे आर्काइव्हज), क्र.६४. दि.२३ जुलै १८७९जाहीरनामा – वि. श्री. जोशी. आद्य क्रातीकार वासुदेव बळवंत फडके यांचे चरित्र यांचे, पृ १४७. २१. बॉम्बे गॅझेट, दि. १९ मे. १९७९. २२. Sou rce Material for History of Freedom Movement In india, Vol, 1. Pp. 75 76. २३ वि. श्री. जोंशी, वासुदेव बळवंत, पृ २५४.२४. पूना ऑब्झव्हर अँडमिलिटरी जनल, दि. २३ जुलै. १८७९. २५. बाळशास्त्री हरदास, भारतीय क्रांतिकारकांचा इतिहास, पृ. ५६.

## अनुक्रमणिका